धम्मपद

अनुवादक
कै. पु. मं. लाड
संपादक
प्रा. पु. वि. बापट

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

धम्मपद

[मूळ पालिग्रंथ व त्याचे गद्यमय व पद्यमय मराठी भाषांतर]

अनुवादक

पुरुषोत्तम मंगेश लाड

आय. सी. एस.

[संशोधन करून प्रास्ताविक, ग्रंथ परिचय व टिपा, टिप्पणी, पादसूची, शब्दसूची, निरनिराळ्या संस्करणांतील वर्गसादृश्य, गाथासादृश्य व संदर्भित ग्रंथ दाखविणारी परिशिष्टे जोडून संपादिलेले]

संपादक

प्रा. पु. वि. बापट

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : जुलै १९७५ (शके १८९६)

पुनर्मुद्रण : २००१ (शके १९२३)

प्रकाशक :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
तिसरा मजला, दादर, मुंबई ४०० ०१४

किंमत : रु. १०८

मुद्रक :
व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
मुंबई ४०० ००४



प्रा. धर्मानंद कोसंबी (१९१३)

[९-१०-१८७६ ते ४-६-१९४७]

पालिभाषेच्या अध्ययनाला ज्यांनी

महाराष्ट्रात

चालना दिली त्या विद्वान्

प्रा. धर्मानंद कोसंबी

ह्यांच्या स्मृतीस

अर्पण

निवेदन

"धम्मपद"ची दुसरी आवृत्ती मराठी वाचकांना उपलब्ध करून देताना मला विशेष आनंद होत आहे. "धम्मपद" या ग्रंथाची पहिली आवृत्ती दिनांक ८ मार्च, १९७५ रोजी प्रकाशित झाली होती. त्यावेळी लक्ष्मणशास्त्री जोशी हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष होते.

आज काळ बदललेला आहे, परिस्थिती बदललेली आहे. अभिजात ग्रंथाची मराठी भाषेत भाषांतर करण्याची आवश्यकता मात्र संपुष्टात आलेली नाही इतकेच नव्हे तर आवश्यकता अधिकच वाढलेली आहे, असे मला वाटते या दृष्टीने मराठी वाचकांनी, लेखकांनी व समीक्षकांनी या ग्रंथाकडे बघावे.

"धम्मपद"ची पहिली आवृत्ती संपण्यास २५ वर्षांपेक्षा अधिक काळ लागावा, ही बाब मराठीवर प्रेम करणाऱ्या सर्वच घटकांना अंतर्मुख होऊन विचार करावयास लागणारी आहे.

रा. रं. बोराडे,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

दिनांक २० जून, २००१.

निवेदन

आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी इत्यादी क्षेत्रांत त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य यावे हा उद्देश लक्षात घेऊन साहित्य संस्कृती मंडळाने वाङमय निर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. मराठी विश्वकोश, मराठी भाषेचा महाकोश, मराठी वाङमयकोश, विज्ञान-माला, भाषांतरमाला, आंतरभारती, विश्वभारती, महाराष्ट्रेतिहास इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत केल्या आहेत.

२. मराठी भाषेला विद्यापीठीय भाषेचे प्रगत स्वरूप व दर्जा येण्याकरिता मराठीत विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रविज्ञान या विषयांवरील संशोधनात्मक व अद्ययावत माहितीने युक्त अशा ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणावर होण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसाराने मराठी भाषेचा विकास होईल, ही गोष्ट तर निर्विवादच आहे. पण मराठी भाषेचा विकास होण्यास आणखीही एक साधन आहे आणि ते साधन म्हणजे मराठी भाषेत निर्माण होणारे उत्कृष्ट वाङमय हे होय. जीवनाच्या भाषेतच ज्ञान व संस्कृती यांचे अधिष्ठान तयार व्हावे लागते. जोपर्यंत माणसे परकीय भाषेच्याच आश्रयाने शिक्षण घेतात, कामे करतात व विचार व्यक्त करतात, तोपर्यंत शिक्षण सकस बनत नाही, संशोधनाला परावलंबित्व राहते व विचाराला अस्सलपणा येत नाही, एवढेच नव्हे तर वेगाने वाढणाऱ्या ज्ञानविज्ञानापासून सर्वसामान्य माणसे वंचित राहतात.

३. संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटिन इत्यादी पश्चिमी भाषांतील अभिजात ग्रंथांची व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांची भाषांतरे किंवा सारांश—अनुवाद करणे अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा भाषांतरमालेचा उद्देश आहे.

४. भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्त्य व भारतीय भाषांतील सुमारे ३०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस, ॲरिस्टोफेनीस, युरिपिडिस्, प्लेटो, अरिस्टॉटल, थॉमस् ॲक्वाइनस्, न्यूटन, डार्विन, रुसो, कांट, हेगल, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉलस्टॉय् दोस्तएव्स्की, केसिरेर, गॉर्डन् व्ही. चाइल्ड् इत्यादीकांचा

या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत रामायण, भरताचे नाट्यशास्त्र, संगीत रत्नाकर, ध्वन्यालोक, प्राकृतातील गाथासप्तशती, त्रिपिटकातील निवडक भाग इत्यादीकांचाही भाषांतरमालेत समावेश केला आहे.

५. मंडळाच्या भाषांतर योजनेखाली मंडळाने आतापर्यंत अनेक अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिलचे 'On Liberty', रुसोचे 'Social Contract', एम. एन. रॉय यांची 'Reason, Romanticism and Revolution' व 'Letters from Jail', स्तानिस्लावस्कीचे 'An Actor Prepares', तुर्गेनिव्हचे 'Fathers and Sons', रायशेनबाखचे 'Rise of Scientific Philosophy', गन्नर मिर्दालचे 'Economic Theory and Underdeveloped Regions', पां. वा. काणे यांचे 'History of Dharmasastra', कोपलँडचे 'Music and Imagination', बर्ट्रान्ड रसेलचे 'Religion and Science', तेरझागीचे 'Theoretical Soil Mechanics', विशाखादत्तचे 'मुद्राराक्षसम,' भरतमुनीचे 'भरत नाट्यशास्त्र' (अध्याय ६ व ७ आणि अध्याय १८ व १९), निकोलाय मनुचीचे 'Storia Do Mogor', ए. सी. पिगु-लिखित 'Socialism Vs Capitalism' इत्यादी पुस्तकांची भाषांतरे व सारानुवाद प्रकाशित झाले आहेत.

६. "धम्मपद" या पालि भाषेतील सुविख्यात बौद्ध ग्रंथाचे पद्य व गद्य मराठी भाषांतर कै. पु. मं. लाड यांनी केले आहे. सदर भाषांतराची मुद्रणप्रत प्रा. पु. वि. बापट, यांनी काळजीपूर्वक संपादित केली. ठिकठिकाणी टिपा दिल्या आहेत. संस्कृत, तिबेटी, चिनी व प्राकृत 'धम्मपदां'ची संस्करणे लक्षात घेऊन टिप्पण्या दिल्या आहेत. शेवटी पादसूची व शब्दसूची दिली आहे. अशा-प्रकारे सुयोग्य प्रस्तावनेसह भाषांतराची मुद्रणप्रत तयार करून ती प्रा. बापट यांनी मंडळाकडे प्रकाशनार्थ सादर केली. या भाषांतराच्या प्रकाशनाने मराठी वाङ्मयात मोलाची भर पडणार आहे, हे लक्षात घेऊन मंडळाने ते आपल्या भाषांतरमालेखाली प्रकाशित करण्याचे ठरविले. 'धम्मपद'चे प्रस्तुत भाषांतर मराठी वाचकांना सादर करण्यास मंडळास आनंद होत आहे.

वाई, फाल्गुन १७, शके (१८९६) ८ मार्च १९७५.

लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

निवेदन	(१)
अनुक्रमणिका	(३)
प्रास्ताविक	(५)
संक्षिप्त चिन्हांचा खुलासा	(१०)
ग्रंथ-परिचय	(१)–(४४)
ग्रंथ व भाषांतर	१–११९
(१) यमकवग्गो	१
(२) अप्पमादवग्गो	७
(३) चित्तवग्गो	१०
(४) पुप्फवग्गो	१३
(५) बालवग्गो	१८
(६) पण्डितवग्गो	२२
(७) अरहन्तवग्गो	२६
(८) सहस्सवग्गो	२९
(९) पापवग्गो	३३
(१०) दण्डवग्गो	३७
(११) जरावग्गो	४३
(१२) अत्तवग्गो	४६
(१३) लोकवग्गो	४९
(१४) बुद्धवग्गो	५२
(१५) सुखवग्गो	५७
(१६) पियवग्गो	६०

धम्मपद

(१७) कोधवग्गो ६३
(१८) मलवग्गो ६७
(१९) धम्मट्ठवग्गो ७३
(२०) मग्गवग्गो ७७
(२१) पकिण्णकवग्गो ८२
(२२) निरयवग्गो ८६
(२३) नागवग्गो ९०
(२४) तण्हावग्गो ९४
(२५) भिक्खुवग्गो १०३
(२६) ब्राह्मणवग्गो १०९

टिप्पणी १२०
गाथापाद सूची १२५
शब्दसूची १५१
परिशिष्ट पहिले—निरनिराळ्या संस्करणांतील वर्गांचा अनुक्रम व त्यांतील गाथा-संख्या १७७
परिशिष्ट दुसरे—निरनिराळ्या संस्करणांतील गाथा-सादृश्य दाखविणारी तालिका १८१
परिशिष्ट तिसरे—त्रि-विभागीय चरणांच्या गाथा २०३
परिशिष्ट चौथे—मूलस्थानांची किंवा समान-आशय-स्थानांची निर्दशिका २०५
परिशिष्ट पाचवे—संदर्भित ग्रंथांची निवडक यादी २१५

प्रास्ताविक

पुरुषोत्तम मंगेश लाड, आय.सी.एस. हे पालि-धम्मपदाच्या मराठी भाषांतराचे काम करीत होते हे बरीच वर्षे मी ऐकून होतो. प्रत्यक्ष ह्या बाबतीत त्यांचा माझा परिचय होता तरी, कधी बोलणे होण्याचा योग आला नाही. कारण, दिल्लीत जेव्हा त्यांच्या माझ्या गाठी पडत, तेव्हा ते आपल्या सरकारी कामात इतके गर्क असत की ह्या विषयावर बोलण्यास कधीच सवड मिळाली नाही. त्यानंतर १९५७ मध्ये त्यांना काळाने ओढून नेल्यानंतर हा विचार स्थगितच राहिला. पुढे मी पुण्यास परत आल्यानंतर १०–१२ वर्षे अन्य ग्रंथांच्या लेखनात गुंतलो होतो त्यांतून मोकळा झाल्यावर १९७२ च्या मार्च-एप्रिल महिन्याचे सुमारास श्री. लाड ह्यांच्या पत्नी श्रीमती माणकबाई लाड ह्यांचा मुंबईचा पत्ता मिळवून त्यांच्याशी ह्या धम्मपदाच्या भाषांतराचे बाबतीत मी पत्र-व्यवहार सुरू केला व त्यांना अशी विनंती केली की, लाड ह्यांनी ह्या ग्रंथाचे काम पुरे केलेले असल्यास ते छापले जावे. काही दिवसांनंतर त्यांनी आपली कन्या कु. गौरी––ही पुण्यातील डेक्कन कॉलेजात पीएच्.डी.चा अभ्यास करते––हिच्याबरोबर मूळ पालि धम्मपद व त्याच्याच समोर गद्य व पद्य मराठी भाषांतर असलेले एक हस्त-लिखित माझ्याकडे पाठविले. त्याबरोबर असाही खुलासा केला की, हे हस्तलिखित (लाडांनी आपल्या हातांनी लिहिलेले नसून, त्यांच्या मूळ हस्तलिखि-ताची) छपाईकरिता म्हणून मुंबईतील एका प्रकाशकाने तयार करवून घेतलेली नक्कल आहे. लाडांच्या हातचे मूळ लिखाण, अनेक विनंत्या करूनही, ते प्रकाशक देऊ शकले नाहीत. ते कोठेतरी गळबटले आहे असेच पर्यायाने सुचवले. दहा वर्षांच्या वर ते लिखाण त्यांचेकडे पडून होते तरी त्याच्या प्रकाशनाची व्यवस्था ते करू शकले नाहीत. म्हणून श्रीमती लाडांनी ही नक्कल परत मागून घेतली व माझ्याकडे पाठविली व शक्य झाल्यास अन्यत्र कोठेही छापून प्रकाशित होत असल्यास तशी व्यवस्था करावी असे सांगितले.

धम्मपदाचे हे भाषांतर श्री. लाडांनी केव्हा सुरू केले व केव्हा संपविले हे नक्की समजत नाही. पण आमचे समान सन्मान्य मित्र, कोल्हापूरचे (हल्ली मुक्काम म्हैसूर येथील) प्रा. आ. ने. उपाध्ये ह्यांनी आम्हास पाठविलेल्या आपल्या इंग्रजीत लिहिलेल्या रोजनिशींतील उताऱ्यांवरून असे दिसते की, इ. स. १९४५ च्या सप्टेंबर ते डिसेंबर ह्या कालखंडात श्री. लाड धम्मपदाच्या मराठी भाषांतराचे कामी निश्चित गुंतलेले होते. श्री. लाड बेळगाव येथे नोकरीनिमित्त असताना प्रा. धर्मानंद कोसंबी तेथे गेले होते व त्यांचेबरोबर श्री. लाडांनी हा ग्रंथ वाचला

असाव.* कारण, धम्मपद ६,४४,३९६ इत्यादी गाथांच्या भाषांतरात प्रा. कोसंबीची छाप दिसत होती. प्रा. कोसंबी व श्री. रामनारायण वि. पाठक ह्यांनी धम्मपदाचे गुजराती भाषेत भाषांतर केलेले आहे. त्याच्याशी ह्या गाथांचे भाषांतर ताडून पाहता वरील अनुमान निघते. पण हे भाषांतर मला अन्य ग्रंथांच्या आधारावर बदलावे लागले आहे.

लिखाण मजकडे आल्यावर, स्थूलपणे अवलोकन केल्यावर, हे भाषांतर संपूर्ण असून, योग्य त्या दुरुस्त्या केल्यावर हा ग्रंथ छापून प्रकाशित करण्यासारखा आहे असे मला वाटले. पुढे प्रकाशनाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याच्या साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई, ह्यांच्याशी ह्या बाबतीत विचारविनिमय केला. पुढे जरूर त्या दुरुस्त्या करून हे हस्तलिखित वरील मंडळाच्या अवलोकनार्थ पाठविले. मंडळाने संमती देऊन ह्या ग्रंथाचे प्रकाशन करण्याचे ठरविले.

ह्या हस्तलिखितावर श्री. लाड ह्यांचा शेवटचा हात फिरला नसावा असे वाटते. कारण, भाषांतरात अनेक ठिकाणी त्यांनी पर्यायी दोन दोन शब्द किंवा पर्यायी दोन दोन पद्ये दिली होती. त्यांतून निवड करणे प्राप्तच होते. ह्या हस्तलिखितात मला एक महत्त्वाचा फेरफार करावा लागला. तो म्हणजे पालि ग्रंथांत 'अत्ता' व त्याची इतर अनेक विभक्तिरूपे जेथे जेथे आली आहेत त्या त्या ठिकाणी, बऱ्याच वेळा, 'आत्मा' व त्याची जरूर ती विभक्ति-रूपे वापरलेली होती. पण, काही ठिकाणी (१५८–१६०) त्यांनी 'आपण' हा शब्दही पर्याय म्हणून वापरला होताच. 'अत्ता हि अत्तनो नाथो' (६०, १६०, ३८०), 'अत्ता हि अत्तनो गति' (३८०)—ह्या ठिकाणी स्पष्टच आहे की 'अत्ता' म्हणजे 'आत्मा' हा शब्द भारतीय बौद्धेतर तत्त्वज्ञानातील 'अजर', 'अमर' आत्मा ह्या अर्थी वापरलेला नसून तो केवळ 'आपण', 'स्वतः' किंवा 'स्वयं' ह्या अर्थीच वापरलेला आहे. सर्व संस्कार अनित्य, दुःख व अनात्म (२७७–७९) आहेत, हे प्रतिपादणाऱ्या

*Sunday, Sept. 10, 1945.

"He (Shri Lad) is interested in Prakrits, since he studied Dhammapada with Shri Dharmananda Kosambi. He is preparing a metrical version of that work (in Marathi)".

* * *

Saturday, Dec. 1, 1945.

"We discussed some of his metrical translation of the verses of the Dhammapada. He has well attempted; and what I liked was the simple Marathi in which the verses are translated. We sat talking on various topics, mostly literary and linguistic".

गौतम बुद्धाच्या शिकवणीत, वर सांगितलेल्या अगर तत्सम, ठिकाणी आलेला 'अत्ता' हा शब्द 'आपण' ह्या अर्थीच आला आहे ह्याबद्दल शंकाच नसावी. श्री. लाड ह्यांचा शेवटचा हात फिरला असता तर कदाचित त्यांनी हाच पर्याय पत्करला असता. असो, बाकीचे इतर फरक मूळ गाथेचा अर्थ भाषांतरात शक्य तितक्या उत्तम रीतीने, किंवा काटेकोरपणे यावा ह्या दृष्टीनेच केलेले आहेत

भाषांतरात त्यांनी वापरलेली मुख्य वाक्ये आधी देण्याची व गौणवाक्ये नंतर देण्याची शैली बहुतेक ठिकाणी (२३,२८,१००, वगैरे) तशीच ठेवली आहे. तसेच काही ठिकाणी (१३५, १५४) गोवळ, वासळ्या असे देशावर प्रचलित नसलेले पण कोकणात कदाचित् वापरले जाणारे शब्द तसेच ठेवले आहेत.

हा छोटासा पण सुंदर व जागतिक वाङ्मयात स्थान मिळवलेला ग्रंथ महाराष्ट्रीय जनतेच्या पुढे चांगल्या स्वरूपात यावा ह्या भावनेने मी त्याला अनेक पुस्त्या जोडून नटविण्याचे व टिप्पणी, गाथापाद-सूची, शब्द-सूची, व परिशिष्टे जोडून उपयुक्त व लोकप्रिय करण्याचे ठरविले.

ग्रंथाचे महत्त्व विशद करण्याकरिता 'ग्रंथ-परिचय' आरंभी [पृ. १–४४] दिलेला आहे. ग्रंथात काही ठिकाणी निराळे पाठ व काही विशिष्ट शब्दांवर अट्ठकथाकाराचे भाष्य दिले आहे. ग्रंथ संपल्यावर काही पारिभाषिक शब्दांवर व विशिष्ट कल्पनांवर टिप्पणी दिलेली आहे. गाथांची पाद-सूची स्वागतार्हच आहे. पुष्कळ वेळा गाथांचे पाद नुसते स्मरतात पण ते नेमके कोठे आहेत हे ध्यानात येत नाही. अशा वेळी ही पाद-सूची तो पाद चटकन् शोधून काढण्यास उपयोगी पडते. शब्दसूचीची उपयुक्तता तर सर्वमान्यच आहे.

परिशिष्टांवरून धम्मपदाचे महत्त्व जास्त पटेल. चिनी भाषेतील कालानुक्रमे येणारी पहिली दोन भाषांतरे पालि ग्रंथाला अत्यंत निकटची आहेत. दोन्ही चिनी भाषांतरांत पालि ग्रंथांतील सर्व वर्गांचा समावेश झालेला आहे. परिशिष्ट १ मध्ये धम्मपदातील वर्गनामे इतर संस्करणातील वर्गनामाशी कशी व कितपत जुळतात हे दाखविले आहे. परिशिष्ट २ मध्ये पालि धम्मपदातील गाथांचे साम्य संस्कृत, प्राकृत, तिबेटी व चिनी १ व २ ह्या संस्करणांतील गाथांशी कसे आहे हे दाखविले आहे. चिनी ३ व ४ क्रमाची भाषांतरे ही संस्कृत उदानवर्ग व त्याचे तिबेटी भाषांतराशी जुळणारी आहेत म्हणून त्याचा विचार येथे केलेला नाही. परिशिष्ट ३ मध्ये धम्मपदात त्रि-विभागीय चरणांच्या गाथा कोणत्या आहेत व त्यांत चरणातील अक्षरांची संख्या अशी अनियमित आहे हे दाखविले आहे. परिशिष्ट ४ मध्ये धम्मपदांतील गाथांची संभाव्य मूलस्थाने किंवा समान-आशय-स्थाने पालि वाङ्मयात कोठे कोठे आढळतात हे दाखविले आहेत. ह्यातील साम्य कदाचित

एखाद्या चरणापुरतेच मर्यादित असू शकेल. हे चौथे परिशिष्ट माझे सन्मान्य मित्र, **भालचंद्र जैन,** प्रमुख पालि-प्राकृत विभाग, नागपूर विद्यापीठ, ह्यांनी तयार करून पाठविलेल्या लिखाणावर आधारलेले आहे. ह्या लिखाणाबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे*. परिशिष्ट ५ मध्ये संदर्भित ग्रंथांची निवडक यादी आहे.

पालि भाषेतील संधी फारच चमत्कारिक आहेत. ते केवळ संस्कृत संधीशीच ओळख असणाऱ्या वाचकांस बुचकळ्यात पाडतात. दोन स्वर एकत्र आले असता कित्येक वेळा पहिल्या स्वराचा लोप होतो व दुसरा स्वर तसाच राहतो; कित्येक वेळा दुसऱ्या स्वराचा लोप होतो व पहिला तसाच राहतो; कित्येक वेळा दोन्ही स्वरांचा लोप होऊन पहिल्या किंवा दुसऱ्या स्वरांत फेरफार घडून येतो.

दुसऱ्या स्वराचा लोप झाला आहे हे आम्ही 'अ' खेरीज इतर स्वराचा लोप झाला असेल तर तो शिरोरेखेतील बिंदूने दाखविले आहे. उदाहरणार्थं, यो + इध = यो॑ध (२६७, ४१२); बलिवद्दो + इव = बलिवद्दो॑ व (१५२); इच्छं + इव = इच्छं॑ व (३३४); समणो + इति=समणो॑ति; सो + इमं = सो॑मं (१७२). हा बिंदू न देता 'सोमं' असे नुसते लिहिले तर 'सोम' लोक असा अर्थ-विपर्यास होईल. पण हा दुसरा लुप्त झालेला स्वर 'अ' असेल तर तेथे संस्कृतप्रमाणे अवग्रह-चिन्ह (ऽ) च वापरलेले आहे. उदाहरणार्थ, उदकुम्भो + अपि = उदकुम्भोऽपि (१२१); येन + अत्थं = येनऽत्थं (२५६) ; दुक्खो + असमान = दुक्खोऽसमान (३०२). पहिल्या स्वराचा लोप झाला असल्यास ज्या व्यंजनातील त्या स्वराचा लोप झाला आहे त्या व्यंजनाखाली आम्ही बिंदू वापरला आहे. उदाहरणार्थ, अमित्तेन + एव = अमित्तेऩेव (२०७) ; कयिराथ + एनं = कयिराथ़ेनं (११८) ; नत्थि + अञ्ञो = नत्थ़्यञ्ञो (२७४) ; चोदये + अत्तानं = चोदय़त्तानं (३७९) ; यथा + अत्तना = यथ़त्तना (३२३); तथा + अत्तानं =

*ह्या ग्रंथ लिहून तयार होऊन मुद्रणालयात रवाना झाल्यानंतर एक सुंदर जपानी ग्रंथ उपलब्ध झाला. हा ग्रंथ तांज्यो जित्सुकेन (Tanjyo Jitsuken) ह्या नावाच्या एका जपानी पंडिताने तयार केला असून त्यात 'धम्मपदा' च्या निरनिराळ्या संस्करणांतील गाथा-सादृश्य दाखविणाऱ्या अनेक तालिका आहेत. त्यात आमच्या तालिकेत उल्लेख नसलेल्या अनेक संस्कृत गाथांचे निर्देश-अंक आहेत. पण ह्या संस्कृत गाथांचा मूळ आधार काय हे स्पष्ट न झाल्यामुळे व तिबेटी ग्रंथाचेही निर्देश-अंक आमच्या अंकांशी काही ठिकाणी न जुळणारे आढळल्यामुळे ह्या ग्रंथाचा आम्ही उपयोग करू शकलो नाही. तरी पण जिज्ञासूंनी हा धम्मपद-अध्ययन ग्रंथ, अनेक परिश्रम घेऊन तयार केलेला, अवश्य पहावा.

तथ्त्तानं (१६२–२८२) पण दोन्ही स्वर एकत्र येऊन मूळच्या स्वरांत फेरफार झाला असल्यास बिंदूचा वापर केलेला नाही. उदाहरणार्थ, लाभ + उपनिसा = लाभूपनिसा (७५); फेण + उपमं = फेणूपमं (४६); भिक्खू + इति = भिक्खूति (३६७).

ह्या ग्रंथ पुरा करण्याचे कामी ज्यांनी ज्यांनी मदत केली त्यांचे आभार मानणे मी आपले कर्तव्य समजतो. प्रथम श्रीमती माणकबाई लाड ह्यांनी ह्या ग्रंथाचे हस्तलिखित माझ्याकडे सोपविले ह्याबद्दल त्यांचे आभार मानतो. कु. गौरी लाड, एम.ए. ह्यांनी गाथांची पाद-सूची अत्यंत काळजीपूर्वक व सुवाच्य अक्षरांत तयार केली; पंडित ना. वा. तुंगार ह्यांनी आपल्या संग्रही असलेल्या धम्मपद व त्याच्या भाषांतराची पुस्तके उपलब्ध करून दिली; आमचे तरुण उत्साही विद्यार्थीमित्र श्री. दिगंबर पांडुरंग रणपिसे ह्यांनी सूच्या व परिशिष्टे आमच्याबरोबर ताडून पाहण्याचे काम केले—ह्या सर्वांचा मी ऋणी आहे. डॉ. भालचंद्र जैन, नागपूर, ह्यांचे आभार वर मानलेच आहेत. प्रा. प. ल. वैद्य, डॉ. वा. वि. गोखले, प्रा. मा. वा. पटवर्धन, प्रा. मोहन धडफळे ह्यांनी ग्रंथ-परिचय वाचून किंवा चर्चेच्या स्वरूपातून अनेक सूचना केल्या, त्यांचा मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांनी हा ग्रंथ मंडळातर्फे प्रकाशनार्थ घेतला ह्याबद्दल तर त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत. शेवटी श्री. का. गं. सोनार, व्यवस्थापक, लोकसंग्रह प्रेस, ह्यांनी तत्परतेने छपाईचे काम पुरे केले ह्याबद्दल त्यांचेही आभार मानतो.

१३–२–७५ पु. वि. बापट

संक्षिप्त चिन्हांचा खुलासा

सूचना.---(१) जैन प्राकृत ग्रंथांच्या निरनिराळ्या आवृत्तींतून संदर्भ-आकड्यांत एकवाक्यता नसल्यामुळे त्या ग्रंथांच्या संदर्भ-आकड्यांतून थोडाफार फरक आढळून येईल.

(२) पा० टे० सो० ग्रंथाचे संदर्भ-आकडे नालंदाच्या देवनागरी आवृत्तीत समासात दिलेले आहेत.

अ०–अट्ठकथा (धम्मपदावरील).

अं०–अंगुत्तरनिकाय (पालि टेक्स्ट सोसायटीने प्रसिद्ध केलेले).

अप० १–अपदान (,, ,, ,, ,, ,,).

अप० २–अपदान (देवनागरी लिपीतील; नालंदा महाविहाराचे).

अर्नोल्ड (Arnold)–Vedic Meter (पुनर्मुद्रित १९६७, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली).

आ०–गाथेचा दुसरा चरण.

आया०–आयारंग सुत्त (आचारांग-सूत्र).

इ०–इत्यादी.

इति०–इतिवुत्तक (पालि टेक्स्ट सोसायटीचे पृष्ठांक).

उ०–उपमा.

उत्तर०–उत्तराध्ययनसूत्र.

उदा०–उदान (पालि टेक्स्ट सोसायटीचे पृष्ठांक).

कौषी० उ०–कौषीतकि उपनिषद्.

कौषी० ब्रा०–कौषीतकि ब्राह्मण.

क्यू नौ (Dr. Richard Kühnau)–Triṣṭubha–Jagati–Familie.

चि० १–धम्मपदाचे सर्वात जुने चिनी संस्करण; वर्ग व गाथा.

चि० २–धम्मपदाचे कालानुक्रमे दुसरे चिनी संस्करण; वर्ग व गाथा.

छांदो०–छांदोग्योपनिषद्.

जा०–जातकट्ठकथा-फाउसब्यल (Fausböll)–संपादित, भाग व पृष्ठे.

ति०–तिबेटी भाषांतर, संस्कृत उदानवर्गाचे. हेर्मान बेख (Hermann Bekh)–संपादित, बर्लिन, १९११; वर्ग व गाथा.

तु०–तुकाराम; परिशिष्ट ४ मध्ये तु० म्हणजे तुलना करा.

तु०सं०–चीन देशातील तुन्-हांग् येथील गुहेत सापडलेल्या संस्कृत हस्तलिखिताचे अवशेष ; (J. R. A. S. १९१२, पृ. ३५५ ते ३७७ वर छापलेले).

थेर०–थेरगाथा (पालि टेक्स्ट सो०) मुद्दाम देवनागरी आवृत्तीचा उल्लेख केलेला नसेल तेव्हा; गाथाङ्क.

थेरी०–थेरीगाथा (वरीलप्रमाणे).

दी०–दीघनिकाय (पा० टे० सो० चे; भाग व पृष्ठ).

दी० नी० टीका–दीघनिकायावरील सुमंगल-विलासिनी नावाच्या अट्ठकथेवरील टीका, सिंहली लिपीत. (सोमावती हेवा–वितारण टीका ग्रंथ १, कोलंबो, १९६७).

दे० किंवा देव०–देवनागरी आवृत्ती (नालंदा येथे प्रसिद्ध झालेली).

ध०–धम्मपद, गाथाङ्क.

नि० १–महानिद्देस (पा० टे० सो०).

नेत्ती–नेत्ती–पकरण (पा० टे० सो०).

पा० टे० सो०–पालि टेक्स्ट सोसायटी (लंडन) ने प्रसिद्ध केलेले ग्रंथ.

प्रा०–प्राकृत; गांधारी धर्मपद. जॉन ब्रफ (John Brough) ने संपादिलेले; ऑक्सफर्ड युनि. प्रेस, लंडन. . . १९६२; गाथांचे आकडे.

मॅक्–(A. A. Macdonell)–A Vedic Grammar for Students, Clarendon Press, Oxford; १९१६.

म०–मज्झिम निकाय (पा० टे० सो०); भाग व पृष्ठ.

म० नि० अ०–मज्झिम–निकाय–अट्ठकथा (पा० टे० सो०) ; भाग व पृष्ठ.

मनु०–मनुस्मृति; अध्याय व त्यातील श्लोक.

म० भा०–महाभारत, भांडारकर इन्स्टिटयूटने संशोधन करून छापलेले.

म० वस्तु–महावस्तु किंवा महावस्तु-अवदान; सेनार (Senart)–संपादित, ३ भागांत; भाग व पृष्ठ; ह्या प्रतींतील भाग व पृष्ठांचे आकडे कलकत्ता येथील डॉ. राधागोविंद बसाख ह्यांनी बंगाली भाषांतरासह छापलेल्या ग्रंथात कंसांत दिलेले आढळतील.

गाथा त्याच विषयावरची असून ही केवळ शेवटच्या चरणात 'पण्डिता' हा शब्द आल्याकारणाने संकलनकाराने तिला पण्डित-वग्गात ढकलली.

उदान वर्गातील गाथांशी तुलना केली असताना हेच दिसून येते की, एकच गाथा निरनिराळ्या नावाच्या वर्गात ह्या उभय ग्रंथांत दिसून येते. गाथा २८३–२८४ पालित मग्ग-वग्गात आहेत, पण संस्कृत व तिबेटी उदान-ग्रंथात तदर्थी गाथा पुप्फ-वग्गात आहेत. ह्यावरून असेच अनुमान निघते की ह्या गाथांचा निरनिराळ्या संकलनकारांनी आपापल्या मनातील योजनेप्रमाणे त्या गाथा निरनिराळ्या वग्गात समाविष्ट केल्या. मूळ गाथा सामान्य जनतेत प्रचलित होत्या त्या संकलनकाराने आपापल्या गरजेप्रमाणे निरनिराळ्या गटांत वापरल्या. ह्या गाथा, गाथा-चरण किंवा त्यातील विचार हा बौद्धेतर वाङ्मयात म्हणजे ब्राह्मणी किंवा जैन वाङ्मयातही आढळतात. अशा गाथा बहुतेक सामान्य नीति-तत्त्वे, किंवा जगातील सामान्य अनुभव प्रकट करणाऱ्या असल्यामुळे भारतीय समाजातील निरनिराळ्या गटांच्या वाक्-प्रचारात असल्या तर त्यात काही नवल नाही. उदाहरणार्थ, अभिवादन-सीलस्स........(ध. १०९) ह्या गाथेचे संस्कृत रूपांतर मनुस्मृति २.१२१ मध्ये आढळते.

न हि पापं कतं कम्मं सज्जु-खीरं व मुच्चति (ध. ७१) ह्यातील कल्पना मनुस्मृति (४.१७२) मध्ये 'नाधर्मश्चरितो लोके सद्यः फलति गौरिव' ह्या वचनात सापडते. न तेन थेरो होति येनऽस्स पलितं सिरो (ध. २६०) 'न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः' (मनु. २.१३६) ह्यांमधील साम्य लक्षणीय आहे. सुखकामानि भूतानि यो दण्डेन विहिंसति (ध. १३१) ह्यांतील कल्पना महाभारतातील खालील श्लोकात आढळते—

अहिंसकानि भूतानि दण्डेन विनिहन्ति यः
आत्मनः सुखमन्विच्छन् न स प्रेत्य सुखी भवेत् ॥
(१३.११४.५ भां. आ.)

अक्कोधेन जिने कोधं..... (ध. २२३) ह्यातील विचारसरणी व शब्द-योजना खालील श्लोकाशी कशी जमते ती पहा—

अक्रोधेन जयेत् क्रोधं । असाधुं साधुना जयेत् ।
जयेत् कदर्यं दानेन । जयेत् सत्येन चानृतम् ॥
(म. भा. ५.३९.५८)

ह्यात शेवटल्या चरणाबद्दल 'सत्येनानृतिकं जयेत्' असाही पाठ आढळतो.

धम्मपद

ग्रंथ-परिचय

धम्मपद हा छोटासा ग्रंथ बौद्धवाङमयातील ग्रंथांपैकी अत्यंत महत्त्वाचा व लोकप्रिय असा ग्रंथ आहे. ह्याची लोकप्रियता केवळ बौद्धलोकांपुरतीच मर्यादित नसून तो अखिल जगतात मान्य झाल्याकारणाने त्याला जागतिक[१] वाङमयात स्थान प्राप्त झालेले आहे. आणि ह्याचे कारण मुख्यतः हे की, ह्यात बौद्धेतरांनाही पटतील असे नैतिक विचार व लौकिक शहाणपण ग्रंथित करणारी विश्वमान्य सत्ये साध्या, सोप्या व सुंदर भाषेत प्रदर्शित केलेली आहेत. ह्या ग्रंथाची भाषांतरे अनेक भाषांतून झाली आहेत. ह्यातील काही भाषांतरांची नावे संदर्भित ग्रंथांच्या दिलेल्या यादीत पाहावयास सापडतील (पृ. २१५–२१).


धम्मपद ह्या ग्रंथाला बौद्धांच्या पवित्र अशा त्रि-पिटकात स्थान दिलेले आहे. सूत्रपिटक नावाच्या ग्रंथसंग्रहातील खुद्दक-(क्षुद्रक-) निकायात ह्याचे स्थान आहे. बौद्धसांप्रदायिकांत जुने असे गणले केलेले थेर-(स्थविर-) वादी लोक तर ह्या ग्रंथास नित्य पाठान्तराचा ग्रंथ समजतात. बौद्ध भिक्षुधर्माची दीक्षा घेऊ इच्छिणारे अनेक तरुण हा ग्रंथ मुखोद्गत करतात. एवढेच नव्हे तर सिलोन, ब्रह्मदेश, थायलंड, कंबोडिया ह्या देशांतील भिक्षू न बनलेले, पण बुद्धाचे गृहस्थाश्रमी उपासक ह्यांच्याही नित्य पाठांतराचा हा ग्रंथ झाला आहे. प्रस्तुत लेखकाने धम्मपदातील काही गाथा थायलंडमध्ये बौद्धधर्माने प्रथम ज्या ठिकाणी प्रवेश केला त्या 'नखोन् पथोम्' (नगर प्रथम) ह्या गावातील एका पुरातन बौद्ध मंदिराच्या भिंतीवर लिहिलेल्या पाहिल्या आहेत.

त्रिपिटकामध्ये धम्मपदाचे स्थान कोठे येते हे दाखविणारा तक्ता पृष्ठ २ वर दिला आहे.

धम्मपद हा ग्रंथ काही कोणा एका व्यक्तीने लिहिलेला नसून तो एक केवळ गाथा-संग्रह आहे. ह्या संग्रहातील गाथा निरनिराळ्या विद्वानांकडून निरनिराळ्या काळी निरनिराळ्या प्रसंगांमुळे अस्तित्वात आल्या आहेत. त्या भगवान बुद्धाच्या

१. World's Great Classics, Sacred Books of the East, Colonial Press, New York, London, 1900. निरनिराळ्या भाषांतराकरिता संदर्भित ग्रंथांची यादी पहा (पृष्ठ २१५–२१).

धम्मपदाचे ति-पिटकातील स्थान



विचारसरणीच्या निदर्शक आहेत व त्यामुळे भाविक अनुयायांकडून बुद्धाच्या नावावर घातल्या गेल्या आहेत. त्रिपिटकातच अंतर्भूत झालेल्या महानिद्देस, चूलनिद्देस व कथावत्थु ह्या ग्रंथांत ही 'ननु वृत्तं भगवता' (भगवन्ताने खरोखर असे म्हटले आहे ना?) असा प्रस्ताव करून धम्मपदांतील अनेक गाथा[२] दिलेल्या आहेत.

ह्या पालि ग्रंथावर पालि भाषेतच अट्ठकथा (अर्थकथा) लिहिलेली आहे. त्यात कथानके असून धम्मपदांतील निरनिराळ्या गाथा कोणत्या ठिकाणी, कोणाला उद्देशून, व कोठल्या प्रसंगाने भगवान बुद्धाने म्हटल्या आहेत हे सांगून गाथेतील शब्दांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. ह्या ग्रंथासंबंधीचे विवेचन पुढे येणारच आहे (पृ० ४३–४४).

धम्मपदाची इतर संस्करणे

(१) **संस्कृत**—पालि भाषेतील धम्मपदाचे संस्कृत भाषेत संपूर्ण संस्करण हल्ली तरी उपलब्ध नाही. पण एके काळी बौद्ध-संस्कृत भाषेमध्ये 'धर्मपद' नावाचा एक संग्रह होता असे स्पष्ट दिसते. महासांघिकी लोकोत्तरवादी बौद्ध संप्रदायाचा 'महावस्तु अवदान' नावाचा एक विस्तृत ग्रंथ बौद्ध संस्कृतमध्ये लिहिलेला आहे. त्यात 'धर्मपदे' किंवा 'धर्मपदेषु' किंवा 'धर्मपदां (दान्)' असा स्पष्ट उल्लेख असून (२. २१२, ३. ९१–९२, १५६, ४३४) एका ठिकाणी (३. ४३४) तर धर्मपदातील सहस्रवर्गाचा (धर्मपदेषु सहस्रवर्ग) असा नाम-निर्देश करून त्यातील गाथा अवतरल्या आहेत. ह्या सर्वांच्या सर्व गाथा पालि सहस्सवग्गात सापडतात असे नाही. तरी पण बऱ्याच महत्त्वाच्या गाथा (उदा. ७०, १००, १०१,

---

२. Winternitz—History of Indian Literature, part II, P. 175, Calcutta University.

धम्मपद	कथावत्थु (पा०टे०सो०)	धम्मपद	महानिद्देस (पा०टे०सो०)	देव०
८१ (अ–आ)	९०	१६५	३२	(२८)
१६५	५२५, ५२७	२६८–६९	५८	(५०)
२३९	१०८, २१९	३०४	४४८	(३९०)
२७३	६००	३२१–२३	२४३	(२०४)
२७७–७९	५३१	धम्मपद	चूलनिद्देस	देव०
३५३	२८९	१६५	...	(१०१)
		३२१–२३	...	(७१)
		३२८–२९	...	(२७२–७३)

१०३, १०७, ११०, ११२–१५ इत्यादी) सापडल्या आहेत. ज्या सापडत नाहीत त्या केवळ मुख्य गाथांमध्ये एकाद-दुसऱ्या शब्दात फेरफार केलेल्याच आहेत. तसेच २.२१२ व ३.१५६ मध्ये असलेली गाथा, थोडाफार फरक असला तरी, एकच आहे. ती पालि-धम्मपदात सापडत नाही. महावस्तु ३.४२१–२३ मध्ये भिक्खु-वग्गातील काही गाथा (३६०–६१, ३६२ व ३६८ चे काही चरण व ३६९) आणि भिक्षु-संबंधीच्या इतर ठिकाणी असणाऱ्या काही गाथा (२६६, २७१–७२) सापडतात. ह्यावरून असे स्पष्ट होते की, बौद्ध-संस्कृतमध्ये ह्या ग्रंथाच्या वाढवलेल्या स्वरूपात 'धर्मपद' नावाचा गाथासंग्रह होता.

त्यानंतरच्या काळात (इ. स. ७५ च्या सुमारास) वसुमित्राचा मामा असलेल्या धर्मत्रात नावाच्या विद्वानाने लिहिलेला 'उदानवर्ग' नावाचा गाथा-संग्रह अस्तित्वात आल्याचे दिसते. तोही हल्ली संपूर्ण असा उपलब्ध नाही. उपलब्ध असलेले त्रुटित भाग मध्य आशिया व चीन ह्या देशांतील पुरातन बौद्ध अवशेषांत आढळले आहेत. त्यातील पहिले २१ वर्ग त्रुटित स्वरूपात डॉ. एन. पी. चक्रवर्ती (भारत सरकारच्या पुराण-वस्तु संशोधन खात्याचे दिवंगत डायरेक्टर) ह्यांनी इ. स. १९३० मध्ये संपादन करून पुस्तक रूपाने[३] छापले आहेत. पुढील वर्ग-२२ (फक्त २ गाथा), २९ (गाथा ३९–५३), ३० (गाथा २६–५२), ३१ (१-२५, २७–३७) व ३२ (गाथा १५–२८) हे मध्य आशियातील तुर्फान व चीन देशातील तुन्-हांग येथील गुहांत सर ऑरेल स्टाइन ह्यांच्या संशोधनमंडळाला सापडले असून ते रॉयल एशियाटिक सोसायटी फॉर ग्रेट ब्रिटन अँण्ड आयर्लंड ह्या संस्थेच्या १९१२ नियतकालिकात (पृष्ठे ३५५–३७७) लुइ-द-ला-वाले पूसँ ह्या विद्वानाने छापलेले आहेत. तसेच सिलव्हां लेव्हीचा लेख (JA. 1910 pp. 444–45) ही पाहण्याजोगा आहे. काही बौद्ध संस्कृत ग्रंथांतून 'धर्मपद' असा नावाचा स्पष्ट उल्लेख न करता, धम्मपदातील काही गाथांचा किंवा गाथा-चरणांचा, जरूर तर थोडासा फेरफार करून, संस्कृत रूपांतर केलेले दिसते. उदाहरणार्थ, इ. स. ६ व्या शतकातील चन्द्रकीर्तीने नागार्जुनाच्या मूलमध्यमक-कारिकेवरील आपल्या टीकेत (१७.१) खालील चरण दिलेले आहेत.

धर्मचारी सुखं शेतेऽस्मिल्लोके परत्र च ।

३. Mission Pelliot en Asie Centrale, Serie Petit In Octavo, Tome IV. N. P. Chakravarti—L'Udānavarga Sanskrit, Tome—Premier (Chaps. I-XXI), Libraire Orientaliste, Paul Guethner, Paris, 1930.

हे चरण धम्मपदातील गाथा १६८ व १६९ मधील तिसऱ्या व चौथ्या चरणांचे संस्कृत रूपांतर आहे. त्याचप्रमाणे १८.५ मधील कारिकेवरील भाष्यात खालील गाथा आहेत—

आत्मा हि आत्मनो नाथः [को नु नाथः] परो भवेत् ।

आत्मना हि सुदान्तेन स्वर्गं प्राप्नोति पण्डितः ॥ १॥

आत्मा हि आत्मनो नाथः [को नु नाथः] परो भवेत् ।

आत्मा हि आत्मनः साक्षी । कृतस्यापकृतस्य च ॥ २॥

ह्यातील पहिल्या गाथेतील पहिले तीन चरण व दुसऱ्या गाथेतील पहिले दोन चरण हे धम्मपदातील १६० व्या गाथेतील अनुक्रमे पहिल्या तीन व दोन चरणांचेच संस्कृत रूपांतर आहे. पहिल्या गाथेतील शेवटचा चरण व दुसऱ्या गाथेतील शेवटचे दोन चरण म्हणजे पालि १६० व्या गाथेत मुद्दाम घडवून आणलेले फेरफार होत. हे फेरफार संस्कृत धर्मपदातच घडवून आणलेले असतील.

वरील गाथांपैकी पहिली गाथा शान्तिदेवाच्या बोधिचर्यावतार ग्रंथावरील पञ्जिकेत ९.७३ (सुमारे ८०० इ. स. च्या पुढे) ही आढळते. तसेच ह्याच ठिकाणच्या भाष्यात

चित्तस्य दमनं साधु चित्तं दान्तं सुखावहम् ।

हे दोन चरण आढळतात. हे चरण धम्मपदातील ३५ व्या गाथेतील शेवटच्या दोन चरणांचे संस्कृत रूपांतर आहे. वसुबंधूच्या अभिधर्मकोशभाष्यात (१.३८) (इ. स. ४ थे शतक) व त्यावरील यशोमित्राच्या व्याख्येतही बोधिचर्यावतार पञ्जिकेतील गाथेचे शेवटचे दोन चरण व चित्तासंबंधीचे वर दिलेले दोन चरण आढळतात.[४] तसेच 'महावस्तु-अवदान' ह्या ग्रन्थातही (३.३२६, ४२१–२३) धर्मपदातील संकीर्ण गाथा ग्रंथाचा नामनिर्देश न होता सापडतात.

इ. स. १४–१५ व्या शतकात 'वनरत्न' नावाच्या सीलोनमध्ये दीक्षा घेतलेल्या भारतीय पण्डित भिक्षूने पालि धम्मपदाचे संस्कृत रूपांतर केले आहे. त्याचे हस्तलिखित मागधी लिपीत तिबेटमध्ये एक बौद्ध ग्रन्थ-भाण्डारात सापडले असून त्याचे छायाचित्र सुप्रसिद्ध संशोधक दिवंगत पण्डित राहुल सांकृत्यायन

---

४. अभिधर्मकोश भाष्य १.३८ कारिकेवरील; स्फुटार्था अभिधर्म-कोश-व्याख्या, मिनायेफ (Minayeff) ने संपादिलेली पृ. २२६; वोगिहार (Wogihara) ने संपादिलेली पृ. ७४.

ह्यांनी पाटणा येथील संग्रहात ठेवलेले आहे. ह्या ग्रंथाच्या स्वरूपासंबंधी काही निश्चित माहिती मिळालेली नाही.[५]

धम्मपद गाथा-संग्रह व उदानवर्ग गाथा-संग्रह ह्यांच्याच धर्तीवर तयार केलेला एक 'धर्मसमुच्चय' नावाचा ग्रंथ नेपाळात लिहिला गेलेला काही वर्षांपूर्वी उघडकीस[६] आला आहे. ग्रंथाच्या शेवटी ग्रंथसंकलनकाराने आपले नाव अवलोकितसिंह असे दिले असून त्याने ह्या ग्रंथातील गाथा 'सद्धर्मस्मृत्युपस्थान' व 'वैपुल्य महासागरोदधि-सूत्र' ह्या सूत्रांतून उचलल्या आहेत असे म्हटले आहे. ह्या ग्रंथातील वर्गांत धम्मपदातील काही वर्गांची नावे आढळतात. उदाहरणार्थ, अ-प्रमाद, तृष्णा, चित्त, पाप, नरक (निरय), मार्ग, भिक्षु, सुख इत्यादी, तर इतर काही नावे उदानवर्गातील आढळतात. उदाहरणार्थ, वाक्, कर्म, शील, निर्वाण इत्यादी. ह्या ग्रंथातील काही पाने मिळत नसली तरी हा ग्रंथ सुमारे २५०० गाथांच्यापेक्षा जास्त गाथा असलेला आहे असे ग्रंथातील उल्लेखावरूनच कळते. ह्या गाथांच्या संकलनकर्त्याच्या काळापर्यंत अशा धर्मनीतिपर गाथांचा संग्रह करण्याची प्रथा होती हे स्पष्ट आहे. संकलनकर्त्याचा काळ कोणता हे जरी निश्चित सांगता येत नसले तरी उपलब्ध झालेल्या ग्रंथाच्या हस्तलिखितात लिखाण करणाराचे नाव भिक्षु सुजित सुगन असे दिले असून तो 'चित्रविहारात' राहत असे व लिहिण्याचा काळ (नेपाळी) संवत २९३, वैशाख, कृष्ण चतुर्थी म्हणजे इ. स. ११७३ असा आहे. हा ग्रंथ म्हणजे एका नेपाळी भिक्षूने तयार केलेले बृहत्-धर्मपदच दिसते.

(२) **तिबेटी**—वर सांगितल्याप्रमाणे उदानवर्गाचा मूळ संपूर्ण ग्रंथ संस्कृतमध्ये उपलब्ध नसला तरी त्याचे तिबेटी भाषांतर संपूर्ण उपलब्ध आहे. हे भाषांतर उपलब्ध न झाल्यामुळे पालि धम्मपदाशी कितपत साम्य आहे हे सांगता येत नाही. काठमण्डू येथील 'बीर' ग्रंथालयातील बौद्ध संस्कृत हस्तलिखितांची जी यादी तायशो विद्यापीठाने जपानमध्ये प्रसिद्ध केली आहे (Taisho Diagaku Kenkyu Kiyo No. 40) त्यांत अनुक्रम ७४ चे हे हस्तलिखित आहे.

---

५. ह्यासंबंधी प्रा. डॉ. वासुदेव विश्वनाथ गोखले, माजी अध्यक्ष, बौद्ध-विद्या-कक्ष, दिल्ली विद्यापीठ, ह्यांचेकडून असे कळते की, ह्या ग्रंथाच्या हस्तलिखितांचे फोटो त्यांनी आपल्या दिल्ली विद्यापीठातील पीएच.डी.चा अभ्यास करणाऱ्या श्री. शुक्ल ह्या नावाच्या एका विद्यार्थ्यास दिले होते. त्याच्यावर काम करण्याकरिता तो फ्रान्स देशात गेलाही होता असे त्यांना समजले. पण पुढे त्याच्याशी संपर्क न राहिल्याकारणाने पुढे फोटोंचे काय झाले हे त्यांनाही माहीत नाही.

६. पहा—"Discovery of the *Dharma-samuchaya* by Dharmacarya, Nepal". (Proceedings and Transactions of the Third

Oriental Conference, Madras, 1924, pp. 142—160). हा मूळ ग्रंथ भारतीय पण्डित विद्याकरप्रभ (किंवा विद्याप्रभाकर) ह्याने तिबेटी पण्डित लो-त्छ-व बन्दे रिन्-छेन्-म्छोग् (दुभाषी वन्द्य महारत्न) ह्यांच्या सहायाने केले. ह्या भाषांतरावरून व उपलब्ध झालेल्या संस्कृत खण्डांवरून उदानवर्गाचे ३३ वर्ग होते असे दिसते. ह्या ग्रंथात पालि धम्मपदाच्या ४२३ गाथांपैकी सुमारे ८० टक्क्यांपेक्षा जास्त अशा गाथा, संपूर्ण किंवा अंशतः, समान आढळून येतात.[७] ह्यावरून ग्रंथाचे नाव जरी बदलले असले तरी ह्या ग्रंथाचे स्वरूप धम्मपदासारखेच आहे. फक्त उदान ह्या नावावरून ते उच्चस्वराने गाण्यायोग्य झाले असे दिसते. तिबेटी भाषांतरावरूनही त्याला गेयाचा दर्जा प्राप्त झालासे दिसते. हा धर्मनीतीपर ग्रंथ असल्याने धर्मत्रात ह्या विद्वानाने तो बऱ्याच प्रमाणात वाढवला आणि त्याच्या एकंदर गाथा हजाराच्या घरात आल्या. परिशिष्ट १ मध्ये दिलेल्या कोष्टकावरून दिसून येईल की, ह्या ग्रंथात पालि धम्मपदातील काही वर्ग अजिबात नसून नवीन वर्ग बरेच आले आहेत. जुन्या गाथासंग्रहावर आधारित पण त्यात कमी-जास्त करण्याची मुभा घेऊन हा ग्रंथ तयार झालेला आहे. ह्या तिबेटी ग्रंथाचे इंग्रजी[८] भाषांतरही प्रथम इ. स. १८८३ साली झाले आहे. हा तिबेटी[९] ग्रंथ स्वतंत्र रीत्या १९११ मध्ये बर्लिनमध्ये छापून प्रसिद्ध झालेला आहे.

(३) चिनी—वर उल्लेखिलेल्या धर्मत्राताच्या नावावर असलेल्या उदान-वर्गाच्या मूलग्रंथाची चार संस्करणे चिनी[१०] भाषेत उपलब्ध आहेत. पण त्यात

---

७. सादृश्य दाखविणारी तालिका परिशिष्ट २ मध्ये दिलेली आहे ती पहा (पृ० १७८–१९७).

८. Udanavarga : A Collection of verses from the Buddhist Canon, compiled by Dharmatrata, being the northern version of Dhammapada; translated from the Bkah-hgyur with notes and extracts from the Commentary of Pradjnavarman, by Woodville Rockhill (Trubner's Oriental Series), London, 1883, 1892. ह्यांतील धम्मपद-गाथांच्या अनुक्रम-अंकात व बेखच्या अनुक्रम-अंकात एकाद-दुसऱ्या अंकाचा फरक पडतो.

९. Udanavarga by Hermann Beckh, Verlag von Georg Reimer, Berlin, 1911.

१०. चिनी त्रिपिटक-तायशो आवृत्ती, पुस्तक ४. अनुक्रम २१०–२१३. ह्यावरून अशी साहजिक अशी शंका येते की, सध्या उपलब्ध असलेल्या उदान-वर्गाचीच ही कालानुक्रमे झालेली संस्करणे की काय ?

विभिन्नता खूप आहे. ह्या चारपैकी कालानुक्रमाने पहिले असलेले 'वइ-खि-नान्' किंवा 'विघ्न' ह्याने इ. स. २२४ मध्ये किंवा त्या सुमारास भाषांतरित केलेले आहे. ह्या ग्रंथाची चिनी भाषा साधी असून भाषांतर पालि ग्रंथाला जास्त धरून आहे. ह्या संस्करणात ३९ वर्ग असून गाथा ७५० च्या घरात आहेत (परिशिष्ट १ पहा; पृ० १७५–१७७). ह्यातील विशेष म्हणजे ह्या ग्रंथाच्या वर्गातील वर्ग ९ पासून वर्ग ३५ पर्यंत, पालि धम्मपदातील सर्व वर्गांचा समावेश झालेला आहे. ह्या ग्रंथातील पहिले ८ वर्ग, ३३ वा सत्कारवर्ग व शेवटचे चार वर्ग (३६–३९) हे पालीत नाहीत. ह्या ग्रंथाचा दुसरा एक विशेष म्हणजे १४ व्या पण्डितवर्गाखेरीज इतर सर्व वर्गात आरंभीच त्या वर्गातील गाथांची संख्या दिलेली आहे (हे काम कदाचित मूळ संपादकाचेच असावे). धम्मपदातील विवाद्य शब्दांपैकी काही शब्दांचा ह्या ग्रंथात दिलेला अर्थ पाली परंपरेला मान्य असलेल्या अर्थालाच पुष्टी देणारा आहे. उदाहरणार्थ, यमामसे (६) नेक्खम्म (१८१, २७२), विस्सं धम्मं (२६६) ह्या शब्दांचे चिनी १ संस्करणात दिलेले अर्थ पाली परंपरेत दिलेल्या अर्थाचेच समर्थन करतात. ह्या संबंधीचे सविस्तर विवेचन पुढे [पृ. २८–३१] येणारच आहे.

कालानुक्रमाने दुसरे येणारे चिनी संस्करण हे इ. स. २९०–३०६ पर्यंत झालेले आहे. त्यातही ३९ वर्ग आहेत व त्यांची नावे चिनी १ संस्करणातील नावाप्रमाणेच आहेत. पण वर्गातील गाथा पुष्कळच कमी आहेत. ह्या संस्करणाचा विशेष म्हणजे गाथा कोणच्या प्रसंगाने म्हटल्या गेल्या आहेत हे कथानके देऊन सांगितले आहे. ह्या ग्रंथातील कथानके संक्षिप्त रूपाने देऊन गाथांचे भाषांतरही सॅम्युअल बील (Samuel Beal) ह्या विद्वानाने इंग्रजी भाषेत[११] केलेले आहे. चिनी १ व २ ह्या ग्रंथातील वर्गांची नावे व गाथांचे सादृश्य दाखविणारे कोष्टक परिशिष्ट १ व २ ह्यांत तुलनात्मक तालिकेत दिले आहे ते वाचकांनी अवश्य पहावे (पृ. १७५–१९७).

तिसरे चिनी संस्करण 'संघभूति' नावाच्या भारतीय भिक्षूच्या सहाय्याने इ. स. ३९८–९९ च्या सुमारास झालेले आहे. ह्या भारतीय भिक्षूने मूळ भारतीय ग्रंथ आपल्या हातात घेतला व त्याच्या शेजारी बसून चू-फो-न्येन् ह्या चिनी विद्वानाने त्याचे भाषांतर चिनी भाषेत केले. ह्या ग्रंथाच्या चिनी नावावरूनही हा ग्रंथ भारतात 'उदानवर्ग' ह्या नावाने जो प्रसिद्ध होता तोच हा होय असे

---

११. Samuel Beal—Dhammapada, translated from Chinese, 1878; 1952 ed. published by Sushil Gupta (Indsia) Ltd. 35 Chittaranjana Aveuue, Calcutta 12.

दिसते. ह्यातील वर्गांची नावे उदानवर्गाच्या तिबेटी भाषांतराशी ताडून पाहता ती तंतोतंत जुळतात. पण भारतीय किंवा तिबेटी ग्रंथांपेक्षा ह्याचे वैशिष्ट्य असे की, ह्या गाथांचा संदर्भ सांगण्याकरिता कथानके दिली आहेत. त्यामुळे हा ग्रंथ प्रचंड झाला आहे. ह्यातील वर्गांची संख्या मूळ संस्कृत व तिबेटी भाषांतराप्रमाणे ३३ च आहे. पाली अट्ठकथेतील कथानके, चिनी २ व चिनी ३ मधील कथानके ह्यांचा एकमेकांशी संबंध काय आहे, एकमेकांशी कितपत जुळतात व कितपत विभिन्न आहेत हे पाहणे हा संशोधनाचाच एक विषय होईल.

चौथे चिनी संस्करण हे शेवटचे चिनी संस्करण असून तेही उदानवर्गावरच आधारलेले असल्याकारणाने त्यांतील वर्गांची संख्या व नावे चिनी ३ संस्करणाप्रमाणेच आहेत. हे भाषांतर ९८०–१००१ ह्या काळात झाले. तिसऱ्या आणि चौथ्या संस्करणातील फरक म्हणजे ह्यात कथानके मुळीच नसून निव्वळ गाथा आहेत. भाषांतर नवे आहे. ह्या चारही संस्करणाविषयी विशेष ध्यानात ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे ह्यांतील पहिली दोन पाली संस्करणाला जवळची आहेत, तर शेवटली दोन जी आहेत ती उदानवर्गाचीच साथ करतात. त्यामुळे पहिल्या दोनमधील ३९ वर्गांत पाली संस्करणातील सव्वीसच्या सव्वीस वर्गांचा समावेश झाला असून ही सव्वीस वर्ग-नावे ही पालि नावांशीच जुळणारी आहेत. त्यातल्या त्यात चिनी १ संस्करण पाली संस्करणाशी अत्यंत निकटवर्ती आहे. पालीतील वर्ग ८, १२, १७, १८, १९, २२–२३, २५ व २६ मधील गाथांशी व गाथाक्रमाशी चिनी १ मधील तदनुरूप वर्गांतील गाथांचे व गाथांच्या क्रमाचेही अत्यंत साम्य आहे हे परिशिष्ट १ व २ (पृ. १७५–१९७) वरून दिसून येईल. शेवटली म्हणजे तिसरे व चौथे संस्करण वर म्हटल्याप्रमाणे उदानवर्गाशी साम्यता दाखवितात.

(४) **प्राकृत**––मध्य-आशियातील खोतानजवळ १८९२ साली काही भूर्जपत्रे श्री. द्युत्रय्-द-हें (Dutreuil de Rhisns) व ग्रेनार्ड ((Grenard)) ह्या विद्वान् संशोधकांना सापडली. अशीच काही भूर्जपत्रे मध्य आशियातील रशियन वकील पेट्रोव्हस्कि (N. Th. Petrovski) ह्यांना ही १८९७ साली मिळाली. काही काळपर्यंत ह्या भूर्जपत्रांची विशेष दखल घेतली गेली नाही. पण १८९७ साली सुप्रसिद्ध फ्रेन्च पण्डित सेनार (Senart) व दुसरे जर्मन पण्डित ओल्डनबर्ग (Oldenberg) ह्यांनी ही भूर्जपत्रे त्याच साली प्रसिद्ध केली. त्यावरून असे कळले की, ही भूर्जपत्रे खरोष्ट्री लिपीत लिहिलेली असून ती मध्य आशियातील बौद्ध लोकांत एकेकाळी प्रचलित असलेल्या भारतवंशीय प्राकृतमध्ये लिहिलेली आहेत. ह्या भूर्जपत्रांवर सेनार व ओल्डनबर्गप्रमाणे ल्यूडर्स (Luders), फ्रांक (Franke), बेली (H. W. Bailey) वगैरे

युरोपियन विद्वानांनी व वेणीमाधव बरुआ व शैलेन्द्रनाथ मित्र ह्या भारतीय विद्वानांनी काम केले आहे. असे आढळून आले आहे की, ह्या भूर्जपत्रावर उजवीकडून डावीकडे लिहिली जाणारी (उर्दू, फारशी व अरबी लिपीप्रमाणे) खरोष्ट्री नावाची जी लिपी आहे (ज्या लिपीत हल्लीच्या पाकिस्तानातील शहाबाझगढी व मानशेरा येथे सम्राट अशोक ह्याचे लेख खोदले गेले आहेत), त्या लिपीत प्राकृतमध्ये लिहिले गेलेले एक धम्मपदाचे संस्करण आहे. उपलब्ध असलेल्या सर्व साहित्याचा उपयोग करून, लंडन विद्यापीठातील संस्कृत भाषेचे प्राध्यापक जॉन ब्रफ (John Brough) ह्यांनी 'गान्धारी धर्मपद' १२ ह्या नावाचे पुस्तक तयार केले व ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या छापखान्याने छापून १९६२ मध्ये प्रसिद्ध केले. ह्यातदेखील संपूर्ण 'धर्मपद' आलेले नसून मूळ ग्रंथाचा सुमारे $\frac{3}{4}$ भाग अद्याप हाती आलेला नाही. ह्यातील फक्त २२ वर्गाच्या नावांचीच कल्पना येऊ शकते. ह्या ग्रंथाचे वैशिष्ट्य चटदिशी नजरेस पडते ते हे की पाली व इतर संस्करणांत अगदी शेवटच्या भागात येणारे ब्राह्मण-वर्ग व भिक्षु-वर्ग हे ह्या संस्करणात अनुक्रमे पहिले व दुसरे आहेत. ह्यासंबंधी परिशिष्ट १ पहा (पृ. १७५–१७७).

ह्या पुस्तकातील वर्गांच्या अनुक्रमणिकेकडे पाहिले तर त्यांतील काही वर्ग पाली धम्मपदात मुळीच आढळून येत नाहीत. पण संस्कृत, तिबेटी व चिनी उदानवर्गात आढळून येतात. ह्या ग्रंथाच्या भाषेची कल्पना यावी म्हणून पालीतील व त्याच अर्थाच्या प्राकृतमधील दोन गाथा खाली दिल्या आहेत—

पालि धम्मपद	प्राकृत धर्मपद
यम्हा धम्मं विजानेय्य	यस धर्मो विकणेअ
सम्मासम्बुद्ध-देसितं	समे संबुध देशिद ।
सक्कच्चं तं नमस्सेय्य	सखच ण नमसेअ
अग्गिहुत्तं. व ब्राह्मणो ॥ ३९२ ॥	अगि-होत्र व ब्रम्मणो ॥ ३ ॥
किं ते जटाहि दुम्मेध	किं दि जडइ दुमेध
किं ते अजिन-साटिया ।	किं दि अयिण-शडिअ ।
अब्भन्तरं ते गहनं	अदर गहग कित्व
बाहिरं परिमज्जसि ॥ ३९४ ॥	बाहिरे परिमजसि ॥ २ ॥

१२. John Brough—The Gandhari Dhammapada, Oxford University Press, p. 62.

ह्या ग्रंथाच्या उपलब्ध झालेल्या प्रतीत आरंभीच दिलेल्या चार चरणांत **धर्मपद** असे नाव आहे व बुधवर्म व बुधणदि अशी दोन व्यक्ति-नामे आहेत. ते चरण असे आहेत—

बुधवर्मस षमणस	बुद्धनन्दीचा जो सार्धविहारी (चेला)
बधणदि-सर्धवयरिस	श्रमण बुद्धवर्म त्याचे हे
इद धर्मपदस पोस्तक	'धर्मपद' (नावाचे) पुस्तक
धर्मुयणे लिखिद अरंनि	धर्म-उद्यान (नावाच्या) अरण्यात लिहिले गेले.

उपाध्यायाच्या बरोबर राहणाऱ्या चेल्यास सार्धविहारी–पालि सद्धि-विहारी ही संज्ञा दिलेली विनयात (१, ४५–५३) आढळते. तेव्हा बुद्धवर्म हे नाव ह्या धर्मपदाच्या प्रतीच्या मालकाचे नाव असावे असा जॉन ब्रफचा तर्क आहे, व ही प्रत धर्म-उद्यानात लिहिली गेलेली आहे. ते असेही मान्य करतात की, कदाचित हे सर्व लिखाण मूळ प्रतीचीच हुबेहुब नक्कल असल्यास बुधवर्म हे नाव धर्मपदाच्या संकलन-काराचेही असणे संभवनीय नाही असे नाही. पण त्यांना ते तसे वाटत नाही.

धम्मपदाचे सर्वसामान्य स्वरूप

पाली धम्मपद ह्या ग्रंथाचे २६ वर्ग असून त्यांत एकंदर ४२३ गाथा संकलित केलेल्या आहेत. ह्या ग्रंथातील हे वर्ग विषयवार बनविलेले असले तरी त्यात संकलनकाराने काटेकोरपणा पाळलेला दिसत नाही. कारण, एकाच विषयावरच्या गाथा निरनिराळ्या वर्गांत आढळून येतात. उदाहरणार्थ, गाथा ७४–७५, २६६–६७ व २७१–७२ ह्या भिक्षूसंबंधीच्या असूनही भिक्खु-वग्गात न येता बाहेर इतर वग्गात आलेल्या आहेत. प्रत्येक वर्गातील गाथांच्या संख्येला निर्बंध नसल्यामुळे भिक्खु-वग्गात घालण्याला काही अडचण होती असेही नाही. तसेच गाथा २८३–८४ तृष्णेसंबंधी आहेत. त्या तण्हा-वग्गात का जाऊ नयेत? तशीच गाथा २१६ ही तृष्णेसंबंधीची आहे. ती ही तण्हा-वग्गात जाण्याला काहीच हरकत दिसत नाही. गाथा २५८ ही पंडितासंबंधीची आहे. ती पंडित-वग्गात जास्त संयुक्तिक दिसली असती. गाथा ४७ व गाथा २८७ ह्यांतील शेवटले तीन चरण तंतोतंत सारखे असून, ४७ व्या गाथेतील पहिला चरण फुला-संबंधीचा म्हणून ती गाथा पुप्फवग्गात घातली. गाथा २३६ व २३८ ह्यांमधील फरक केवळ शेवटल्या चरणात आहे. गाथा ८० व गाथा १४५ ह्यांमधील फरक गाथांमधील फक्त शेवटच्या शब्दातच आहे. ह्या गाथांचा विषय 'दमन' आहे. म्हणून १४५ वी गाथा दण्डवग्गात घातली हे ठीकच आहे. ८० वी

मि०–मिलिन्दपञ्ह; ट्रेन्कनर (Trenckner)–संपादित. ह्या ग्रंथाच्या पानांचे आकडे प्रो. वाडेकरांनी संपादिलेल्या ग्रंथात कंसात दिलेले सापडतील.

रा०–राहुल सांकृत्यायन यांनी संपादिलेले धमंपद.

रो०–रोमन लिपीत छापलेले.

विन०–विनय (ओल्डनबर्ग संपादित), भाग व पृष्ठ.

सं०–संस्कृत.

संयु०–संयुत्त-निकाय (पा० टे० सो०) ; भाग व पृष्ठ.

संयु० अ०–संयुत्त-निकाय अट्ठकथा (पा० टे० सो०).

सि०–सियामी किंवा थाय लिपित छापलेले.

सी०–सीहली म्हणजे सीलोनी लिपीत छापलेले.

सु० नि०–सुत्तनिपात; गाथांचे आकडे.

सुब्रह्मण्य०–प्रा. के. ए. सुब्रह्मण्य ऐयर–A Few Observations on the Trimeter verses of the Rāmāyana and the Mahābhārata. (Proceedings and Transactions of the Third Oriental Conference; Madras, 1924.)

सूय०–सूयगडंग (सूत्रकृतांग).

JA.—Journal Asiatique (Paris).

JRAS—Journal of the Royal Asiatic Society of Great Britain and Ireland (London).

Winternitz—History Indian Literature, Part II (English Translation); Calcutta University, Calcutta 1933.

पुप्फानि हेव पचिनन्तं..... (ध. ४७–४८) आणि तं पुत्तपसु–संमत्तं..... (ध. २८७)–ह्यांचे साम्य खालील महाभारतातील श्लोकांशी कसे आहे ते पहा–

तं पुत्रपशुसंमत्तं व्यासक्तमनसं नरं।
सुप्तं व्याघ्र महौघो वा मृत्युरादाय गच्छति॥
संचिन्वानमेवैकं कामानामवितृप्तकम्।
व्याघ्रः पशुमिवादाय मृत्युरादाय गच्छति॥ (१२.१६९; १७.१८)

जैन वाङमयातही समान-अर्थी श्लोक सापडतात. उदाहरणार्थ, मासे मासे कुसग्गेन...... कलं अग्घति सोळसिं (ध. ७०) व जैन उत्तराध्ययन सूत्रांतील (९–४४) कल्पना व शब्दसाम्य किती आहे ते पहा––

मासे मासे तु जो बालो कुसग्गेणं तु भुञ्जए।
न सो सुयक्खाय-धम्मस्स कलं अग्घइ सोळसिं॥

तसेच यो सहस्सं सहस्सेन... (ध. १०३) ही गाथा व उत्तराध्ययन–सूत्रांतील ९.३४ ही गाथा किती समान आहे ते पहा––

जो सहस्सं सहस्साणं संगामे दुज्जए जिणे।
एगं जिणेज्ज अप्पाणं एस मे परमो जउं॥

त्याचप्रमाणे को नु हासो किमानन्दो (ध. १४६) व का अरति के आणन्दे (आया ०.१.३.३.८); किच्छो मनुस्स-पटिलाभो (ध. १८२) व माणुस्सं खु सुद्दलहं (उत्त २०.११) ह्यातील साम्य पहा.

जैनधर्म व बौद्धधर्म हे दोन्ही श्रामण्यपर असल्यामुळे त्यांच्या वाङमयात साम्य आढळल्यास नवल नाही. उभय वाङमयांत अनेक दृष्टांन्त, उपमाही समान दिसतात. वाऱ्याने न हलणारा पर्वत (ध. ८१; उत्त. २१.१९; आया. २२.५.३), मालुवा वेली (ध. १६२; सूयं १.३.२.१०), लोकांच्या गाई मोजणारा गुराखी (ध. २०; उत्त. २२.४५), राखेत लपलेला अग्नी (ध. ७१; उत्त. २५.१८), बेटासारखे स्थिर (ध. २५, आया. १.६.५.५) वगैरे शेकडो उदाहरणे देता येतील. भिक्षूंच्या आहार-विहाराबद्दलची वाक्ये, शब्दयोजना वगैरेत पुष्कळच साम्य केवळ धम्मपदातच नव्हे तर इतर पालि ग्रंथ व जैन प्राकृत ग्रंथांत आढळून येते.[१३]

---

१३. जिज्ञासूंनी माझा अन्यत्र छापलेला 'सर आशुतोष स्मारक' (Sir Asutosh Memorial Volume) ग्रंथातील लेख 'A Comparative Study of a few Jain Ardhamāgadhi texts with the texts of the Buddhist Pali Canon.' (पाटणा, १९२७) पहावा. त्यांत धम्मपदांशी साम्य असलेल्या जैन वाङमयातील अनेक उताऱ्यांचा उल्लेख केलेला आहे.

धम्मपदाचा अर्थ

'धम्मपद' ह्या नावाचा अर्थ काय? धम्म शब्दाचे अनेक अर्थ आहेत, तसे 'पद' शब्दाचेही आहेत. हे नाव एका गाथासंग्रहाचे आहे हे ध्यानात ठेवले आणि त्या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे नीतिपर धार्मिक-जीवन कसे जगता येईल हे सांगणाऱ्या वचनांचा स्फुट-संग्रह असे स्वरूप ध्यानात ठेवले म्हणजे ह्या नावाचा अर्थ समजण्यास मदत होईल. पुप्फवग्गामधील पहिल्या दोन गाथां (४४–४५) मध्ये 'धम्मपद' हा शब्द वापरण्यात आला आहे. त्याला फुलांची उपमा दिलेली आहे. ज्याप्रमाणे कुशल माळी फुले गोळा करून त्यांतून सुंदर माळ बनवितो, त्याप्रमाणे 'शैक्ष्य (सेख)' संज्ञा प्राप्त झालेला बुद्धानुयायी नैतिक–धार्मिक वचनांचा, गौतम बुद्धानेच ही वचने वेळोवेळी उपदेशिलेली आहेत असा दृढ विश्वास बाळगून, संग्रह करतो. ह्याच अर्थी 'धम्मपद' शब्द गाथा १०२ मध्ये वापरलेला आहे. गाथा १०१–०२ मध्ये ह्याच धर्तीवर 'अत्थपद', 'गाथापद' ह्या शब्दांची योजना केलेली आहे. 'पद' ह्याचा अर्थ–शब्द, वाक्य, वचन. धार्मिक जीवना-संबंधीची वचने असाच अर्थ घेणे स-युक्तिक होईल. अशी वचने अनेक ठिकाणी विखुरलेली असतात. 'महावस्तु-अवदान' ह्या बौद्ध संस्कृत ग्रंथात ह्या शब्दाचा बहुवचनी प्रयोग केला असल्याचे आपण वर (पृ. १७) पाहिलेच आहे. ह्यावरूनही 'धम्मपद' हा धार्मिक, नीतिपर वचनांचा, धार्मिक सूक्तींचा किंवा सुभाषितांचा संग्रह आहे हे म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाही.

धम्मपदातील काही विवाद्य शब्द

धम्मपद हा छोटासा अत्यंत लोकप्रिय व बौद्धजनतेत नित्य पाठांतराचा ग्रंथ असला, तरी त्यांतील काही गाथांतील काही शब्दांच्या अर्थाबद्दल एक-वाक्यता नाही. उदाहरणार्थ, असे तीन शब्द घेतले आहेत. त्याचे निरनिराळ्या लोकांनी दिलेले अर्थ तपासून बरोबर कोणचा अर्थ आहे ते पाहू. प्रथम 'नेक्खम्म' शब्द घेऊ—

	ध. १८१ नेक्खम्मूपसम	ध. २७२ नेक्खम्म-सुख
मॅक्सम्यूलर	Repose of retirement (from the world) (संसार-निवृत्तीचे स्वास्थ्य)	Happiness of release (मुक्तीचे सुख)

राधाकृष्णन्	Peace of emancipation (from desire) (तृष्णा-मोक्षापासून मिळणारी शांती)	Happiness of release (मुक्तीचे सुख)
प. ल. वैद्य	Repose of retirement (निवृत्तीचे स्वास्थ्य)	the peace (शांतता)
ए. पी. बुद्धदत्त	Calm of renunciation (प्रव्रज्येची शांतता)	bliss of renunciation (प्रव्रज्येचा आनन्द)
सिरि सीवलि	peace of renunciation (प्रव्रज्येची शांतता)	bliss of renunciation (प्रव्रज्येचा आनन्द)
धम्मजोति	tranquility of renunciation (प्रव्रज्येची शांतता)	bliss of renunciation (प्रव्रज्येचा आनन्द)
अ. रा. कुलकर्णी	निष्काम-कर्मात रममाण	नैष्कर्म्य-सुख
कुंदर दिवाण	नैष्क्रम्योपशम	नैष्क्रम्य-सुख
श्री. भा. वर्णेकर	निष्काम	नैष्कर्म्याचे सुख
कोसंबी-पाठक (गुजराती)	नैष्कर्म्य अने उपशम	नैष्कर्म्य-सुख
अवध-नारायण	शान्त निर्वाण (नैष्क्रम्य)	नैष्कर्म्य-सुख
कान्छेदीलाल गुप्त	निष्काम कर्मके द्वारा शान्ति	नैष्कर्म्य-सुख
चारुचन्द्र बसु (बंगाली)	नैष्कर्म्योपशम (=वैराग्य)	नैष्क्रम्य-सुख
राहुल सांकृत्यायन	नैष्कर्मता और उपशम	नैष्कर्म्य-सुख
महावस्तु (३.४२२)		नैष्क्रम्य-सुख

वरील सर्व यादीवरून दिसून येईल की पालि 'नेक्खम्म' शब्दाची निरनिराळी स्पष्टीकरणे दिली गेली आहेत. 'नेक्खम्म' हा शब्द निरनिराळ्या तीन संस्कृत शब्दांबद्दल येऊ शकतो. नैष्काम्य, नैष्क्रम्य किंवा नैष्कर्म्य--ह्या तिन्ही संस्कृत शब्दांबद्दल 'नेक्खम्म' हा पालि शब्द येऊ शकतो. वरील भाषांतरात जरी काही भाषांतरकारांनी ध. १८१ मध्ये 'निष्काम' असा अर्थ दिला असला तरी ध. २७२ मध्ये त्याच शब्दाबद्दल नैष्कर्म्य असाच अर्थ दिला आहे. बऱ्याचशा इंग्रजी व भारतीय भाषांतील भाषांतरात, 'नैष्क्रम्य' हाच शब्द 'नेक्खम्म' ह्याचा संस्कृत पर्याय आहे असे समजून, ही भाषांतरे झाली आहेत. ह्या सर्व

चुकीच्या भाषांतरांचे मूळ बौद्ध संस्कृत वाङ्मयामध्ये आढळते. कारण बौद्ध संस्कृत वाङ्मयात 'नैष्क्रम्य' ह्राच शब्द सर्वत्र आढळतो.

पालि त्रिपिटकांतील जुन्या ग्रंथांत 'नेक्खम्म' हा शब्द 'काम' ह्या शब्दाच्या विरुद्धार्थी वापरलेला आहे. 'कामानं आदीनवो, नेक्खम्मे आनिसंसो (दी. १.११०, १४८); म्हणजे कामातील धोके व नैष्काम्यामधील फायदे. 'कामानमेतं निस्सरणं यदिदं नेक्खम्मो' (दी. ३.२७५); म्हणजे कामापासून निसटून जाणे हेच नेक्खम्म (नैष्काम्य). नंतरच्या पालि त्रिपिटक ग्रंथांत उदाहरणार्थ, बुद्धवंस (२.१२८), चरिया पिटक (२.४.१-२) हृया सारख्या ग्रंथांत 'नेक्खम्म' ह्याचा अर्थ घरातून निघून जाणे म्हणजे प्रव्रज्या घेणे आणि हृया उत्तरकालीन अर्थालाच अनुसरून बौद्ध संस्कृत वाङ्मयात 'नैष्क्रम्य' (निस+क्रम् पासून आलेला) वापरला गेला आहे. पालि-प्राकृतपासून संस्कृत रूपान्तरे होऊ लागली त्यावेळी नैष्काम्य हा अर्थ मागे पडून नैष्क्रम्य म्हणजे प्रवज्या ह्राच अर्थ रूढ झाला. आणि ज्या ठिकाणी 'नैष्काम्य' हा अर्थ लागू आहे त्या ठिकाणी देखील बौद्ध-संस्कृत ग्रंथकार, मूळ व्युत्पत्ति विसरून, सर्रास 'नैष्क्रम्य' असा शब्द चुकीने वापरू लागले. 'निक्कामिनो गोतम-सासनस्मिं' (सु. नि. २२८) हृयाबद्दल 'नैष्क्रम्णिो गौतम-शासनस्मिं' हे चरण महावस्तूत (१.२९३) वापरलेले आढळते. वेदान्तादि तत्त्वग्रंथात 'नैष्कर्म्य' शब्द वारंवार येत असल्यामुळे 'नेक्खम्म' हा शब्द ह्याच अर्थी वापरला असावा अशीही कित्येकांची भूल झाली. पण पालि ग्रंथात हा अर्थ सहसा आढळत नाही. गाथा १८१ मध्ये उपशम हा नैष्काम्यामुळेच येणारा आहे. नैष्क्रम्य किंवा प्रव्रज्या हृयामुळे उपशम येईलच अशी खात्री नसते. कारण घर-दार सोडून प्रव्रज्या घेतलेला मनुष्य देखील 'कामा' पासून मुक्त असेलच असे नाही. आणि काम-पीडित असल्यास त्यास उपशम किंवा शान्ती कोठून मिळणार? अट्ठकथाकारानेही येथे स्पष्टच म्हटले आहे की, हृया ठिकाणी प्रव्रज्या-अर्थी नेक्खम्म शब्द घेऊ नये. हृया ठिकाणी क्लेशांचा व्युपशम म्हणजे निर्वाण-रति अभिप्रेत आहे. चिनी भाषेतील सर्वांत जुन्या, चिनी १ संस्करणातही हृया शब्दा-बद्दल वु यु (**, निस्+काम) हाच अर्थ दिलेला आहे. गाथा २७२ मध्ये सामान्य माणसाला न मिळणारे असे हे नैष्काम्य-सुखच होय. कारण प्रव्रज्या-सुख हे घर सोडून जाणाऱ्या कोणा सामान्य माणसालाही मिळविता येते.

वरील सविस्तर चर्चेवरून दिसून येईल की दोन्हीही ठिकाणी 'नैष्काम्य' हाच अर्थ अभिप्रेत आहे व तोच आम्ही स्वीकारलेला आहे.

अशाच आणखी दोन शब्दांचा विचार करू.

	ध. ६ यमामसे	ध. २६६ विस्सं धम्म
मॅक्सम्यूलर	We must all come to an end (आपणा सर्वांचा अंत होणारच आहे)	Who adopts the whole Law (सर्वधर्म पाळणारा)
राधाकृष्णन् ,	,,	,,
प. ल. वैद्य	,,	,, (विश्वक्)
ए. पी. बुद्धदत्त	All of us shall one day die (आपण सर्व एक दिवस मरणारच आहोत)	by adopting offensive means दुर्वर्तन करणारा
सिरिसीवलि	We come to an end here (येथे आपला अंत होणार आहे)	by adopting offensive means दुष्ट आचार पाळणारा
धम्मजोति	Let us restrain (आत्मसंयमन करू या)	Who observes evil practices (दुष्ट आचार पाळणारा
अ. रा. कुलकर्णी	आपणा सर्वांना येथून जावे लागणार आहे.	विश्वातील बाह्य अवडंबर.
धुंदर दिवाण	आम्ही तों आवरूं आपणा इथें	धर्म-संकट
श्री. भा. वर्णेकर	निश्चित् प्रयाण यमलोकीं	(अर्थ दिला नाही)
कोसंबी-पाठक (गुजराती)	अमे आमां संयम करीशुं	विषम धर्म
अवध नारायण	यहांसे कूच करना है	सारे (विश्व) धर्म
कान्छेदीलाल गुप्त	मृत्युको प्राप्त होजावेंगे	समस्त (विश्व) धर्म
चारुचन्द्र बसू (बंगाली)	आमरा चिरकाल इह संसारे याकिब ना	समग्र (विश्व) धर्म
चिनी १	{ दोन्ही संस्करणात शरीर झिजणे किंवा मृत्यूची कल्पना आहे.	श्येन् झिग् यिन्पि (लैंगिक दुराचार)
२		मिथ्या आचार; श्येन् शिग् (मिथ्या आचार, दुराचार)

तिबेटी	(उपलब्ध नाही)	ग्रोङ्-बॉऽ छोस् [ग्राम (? म्य) धर्म]
बौद्ध संस्कृत	उद्यमामहे (गिल् गित्, विनयवस्तु) ३. २. १८३ परिश्रम करू या	वेश्यान् (?) धर्मान् (उदानवर्ग)
प्राकृत	(उपलब्ध नाही)	वेश्म धर्म
महावस्तु (३.४२२)	,, ,,	विषमान् धर्मान्.

ह्या ठिकाणी 'यमामसे' ह्या शब्दाचे निरनिराळे अर्थ दिलेले आहेत. (१) अन्त होणे, मृत्यूच्या ताब्यात जाणे ; (२) आत्मसंयमन करणे ; आणि (३) प्रयत्न करणे (उद्यमामहे). पालि भाषा ही वैदिक भाषेशी जवळ आहे. कारण तीत अनेक वैदिक भाषांची वैशिष्टये, जी अभिजात संस्कृतमध्ये आढळत नाहीत अशी आढळतात. वैदिक भाषेतील शब्दांचे किंवा धातूंचे अर्थ जे अभिजात संस्कृतमध्ये आढळत नाहीत असे पालित आढळतात.[१४] यम् धातूचा वैदिक भाषेत अंकित होणे, ताब्यात जाणे हा अर्थ आहे. पाणिनीच्या धातु-पाठात [२३.१५; (९८४)) यम् धातूचा अर्थ 'उपरम' (यम -उपरमे) असा दिला आहे. अट्ठकथा काराने हाच अर्थ स्वीकारला आहे. 'उपरमाम, मच्चसन्तिक गच्छाम' म्हणजे 'अन्ताकडे जातो, मृत्यूकडे जातो' असा अर्थ दिलेला आहे. हा अर्थ कालांतराने विसरून मग 'संयमन' किंवा 'प्रयत्न' हे अभिजात संस्कृतवरून आलेले अर्थ काही भाषांतरकारांनी स्वीकारलेले दिसतात. पण वर दिलेल्या यादीत पारंपरिक अर्थही बऱ्याच भाषांतरकारांनी स्वीकारला आहे.

'विस्स' शब्दाचे संस्कृत पर्याय विस्र व विश्व (विश्वक्) होतात. बौद्ध संस्कृत उदानवर्गात 'वेश्यान्* धर्मान् व प्राकृत धर्मपदात 'वेश्म' असे पर्याय दिलेले आढळतात. वरील यादीत 'विश्व' असा अर्थ बऱ्याच भाषांतरकारांनी घेतला आहे. त्याच्या उलट 'विस्र' ह्या शब्दाचा वाईट, दुर्गंधी, असाही अर्थ आहे आणि तोच या ठिकाणी स-युक्तिक दिसतो. हाच अर्थ पाली अट्ठकथाकार

---

१४. ह्या संबंधी जास्त माहिती माझ्या खाली नमूद केलेल्या लेखात जिज्ञासूंनी पहावी—Vedicism in Pali (Siddheshvar Varma Felicitation Volume : Siddha-bhāratī Part I, pp. 74–88; V. V. Research Institute, Hoshiarpur, Punjab, 1950).

*पण 'जपानी अध्ययनात' 'वेश्म धर्म' असाच पाठ घेतला आहे.

चिनी, तिबेटी भाषान्तरकार, पालि अट्ठकथेला अनुसरणारे सिंहली भाषान्तरकार देतात. बौद्ध संस्कृत व प्राकृत ग्रन्थही 'विश्व' हा अर्थ घेत नाहीत तर भिक्षु धर्माला न मानवणारा, प्रतिकूल असा अर्थ घेतात. हा विस्र शब्द अद्यापही बंगालीत 'वाईट' 'प्रतिकूल' ह्या अर्थी प्रचारात आहे. आम्हीही वाईट, दुर्गंध-युक्त असाच अर्थ स्वीकारला आहे.

अंतरंग–परीक्षण

एका सिंहली लिपीत प्रसिद्ध झालेल्या धम्मपदाच्या छोटयाशा प्रस्तावनेत संपादकाने म्हटले आहे—"इमस्मिं (धम्मपदे) सकलंऽपि सत्थु-सासनं संखेपेन समोधानं गतं" ह्या (धम्मपदात) शास्ता (बुद्ध) ह्याची सर्व शिकवण संक्षेपाने अंतर्भूत झालेली आहे." ह्या छोटयाशा ग्रंथात बुद्धाचे सारभूत (१) तत्त्वज्ञान, (२) धर्ममार्ग, (३) नीतिपर शिकवण, व (४) जागतिक व्यवहारात आढळून येणारी सनातन सत्ये ही सर्व आढळतात. आणि त्याहून विशेष म्हणजे ही सर्व वचने हृदयाला भिडतील अशा उपमा, दृष्टान्त, रूपकादि अलंकारांनी मण्डित झाल्याकारणाने प्रत्येक व्यक्तीला–मग तो बौद्ध असो की बौद्धेतर असो–पटतील अशी आहेत. आणि म्हणूनच बौद्धेतर जगामध्येही हा ग्रंथ मान्यता पावलेला आहे.

(१) तत्त्वज्ञान—विश्वातील सर्व चराचर वस्तू, म्हणजे अनेक घटकांच्या समवायाने म्हणजे एकत्र येण्याने तयार झालेले संस्कार हे अनित्य आहेत, आज आहेत उद्या नाहीत, म्हणजे नश्वर आहेत. आणि हे नश्वर आहेत म्हणजेच ज्यांच्याजवळ ह्या वस्तू आहेत त्या त्यांच्याजवळच्या नाहीशा झाल्या म्हणजे त्यांना दुःख हे होणारच. त्या नाहीशा झाल्या म्हणून ते शोक करीत बसतात म्हणून हे सर्व संस्कार परिणामी दुःखकारक आहेत. आता, ज्या वस्तू दुःख-कारक आहेत, त्याबद्दल आपलेपणा कोणीही शहाणा माणूस बाळगत नाही. ही वस्तू माझी आहे, माझे ह्या वस्तूशी तादात्म्य आहे, व जो नित्य, ध्रुव, शाश्वत आणि अ-विपरिमाणधर्मी असा मानला गेलेला, 'आत्मा' ह्या नावाने संबोधिला गेला आहे, तो ह्या वस्तूंत आहे असे कोणी शहाणा माणूस समजणार नाही. कारण सर्व वस्तू पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे, मृगजलाप्रमाणे अनित्य व नश्वर आहेत (२५५), असे त्याला जगाच्या अनुभवाने कळले आहे. म्हणून सर्व संस्कार अनित्य, दुःखकारक व अनात्मीय आहेत, असा त्रि-लक्षणी सिद्धान्त सांगितलेला आहे.

जेथे आत्म्यालाच स्थान नाही, तेथे परमात्मा, परमेश्वर ह्यालाही स्थान नसावे हे ओघाने आलेच. असे असले तरी 'देव' ह्या नावाचे सत्त्व किंवा प्राणी असल्याची श्रद्धा आहे. देव, गंधर्व इत्यादी मनुष्य-योनीला उपकारक असे प्राणी विश्वात आहेत. मघवा (इंद्र), ब्रह्मदेव, आभास्वर वगैरे देवांचा उल्लेख आढळतो (३०,१०५,२००). तसेच मनुष्य योनीला त्रास देणारा मार (४०,५७,३३७) ह्याचाही वरचेवर उल्लेख येतो. जगातील वस्तूंचे विलोभनीय रूप पाहून भुलून न जाता त्यांची दुसरी बाजू घृणा उत्पन्न करणारी असते तीही लक्षपूर्वक पाहणाऱ्यास माराचे भय राहत नाही (७–८).

कर्मावर विश्वास आहे व आपल्या चांगल्या किंवा वाईट कर्मामुळे सु-गती किंवा स्वर्ग अथवा दुर्गती किंवा निरय मरणानंतर प्राप्त होतो असा समज आहे (१७४,२४०,३१६–१९). ह्या जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून सुटका करून घ्यावयाची असल्यास 'अविद्या', जी एक माणसाला अत्यंत मालिन्य आणणारी आहे(२४३), तिचा नाश केला पाहिजे. म्हणजे जगातील वस्तुस्थितीचे अज्ञान झटकून टाकले पाहिजे. धम्मपदात अविद्येपासून पुढे संसारचक्र कसे सुरू होते हे विशद करणाऱ्या प्रतीत्य-समुत्पाद (पालि-पटिच्च-समुप्पाद) ह्या तत्त्वाचे विशदीकरण किंवा स्पष्ट उल्लेख नसला तरी ह्या संसार-चक्राच्या बुडाशी असलेल्या अविद्येचा नाश करण्यास सांगितले आहे (२४३). अविद्येचा नाश करून खरे ज्ञान संपादन केले पाहिजे. ह्या जगात सगळीकडे पाहिले असता (१) सर्वत्र दुःख आहे ह्याची जाणीव झाली पाहिजे. नंतर (२) दुःखाचे मूळ तृष्णेत आहे हेही जाणले पाहिजे. ज्या एखाद्या गोष्टीला काही कारण असते, ती गोष्ट कारण नष्ट झाल्यावर आपोआपच नष्ट होते, हा सिद्धांत जाणून दुःखाला जर मूळ आहे तर ते मूळ नष्ट झाल्यावर दुःखही नष्ट होणार. म्हणजे (३) दुःखाचा निरोध, शेवट, हा निश्चित्पणे होणार. जर दुःखाचा निरोध होणारच आहे तर त्या निरोधाप्रत नेणारा (४) मार्गही आहे. ह्या चार प्रकारच्या जाणीवांना चार आर्य सत्यांचे ज्ञान असे म्हणतात. दुःखाचा नाश करण्याच्या मार्गाला आर्य अष्टांगिक मार्ग म्हणतात. (१९०–९१). दुःख नाहीसे करावयाचे म्हणजे तृष्णेचा नाश करावयास पाहिजे (३३७). तृष्णेचा नाश करण्याकरिता राग (म्हणजे अनुराग, आसक्ति) द्वेषादी क्लेशांचा नायनाट करून तत्त्ववेत्त्यांच्या ठिकाणी दिसून येणाऱ्या उपेक्षा वृत्तीची उपासना केली पाहिजे. सुख झाले किंवा दुःख झाले म्हणून पंडित पुरुष चलित न होता आपली स्थिरता ढळू देत नाही (८३). ह्याकरिता सदैव दक्ष राहून प्रमादाला थारा देता उपयोगी नाही. असे झाले म्हणजे माणसाला अधःपाताची भीती नाही व तो निर्वाणाच्या परिसरात आलेला असतो (३२). रागद्वेष-

मोहाचा नाश होऊन दुसऱ्यांनी अपकार केला तरी त्याचा प्रतिकार करण्याची वृत्ती जाणूनबुजून उत्पन्न होऊ द्यावयाची नाही. ही विचारसरणी बाळगली म्हणजे निर्वाण प्राप्त झाल्यासारखेच आहे (१३३–३४).

(२) **धर्ममार्ग**—ज्याचा आपण विचार करीत आहो तो 'धम्मपद' हा ग्रंथ सनातनी थेरवादी (स्थविरवादी) बौद्धांचा ग्रंथ असल्यामुळे त्यांच्या विचारसरणीचे समर्थन आपणांस ह्या ग्रंथात दिसते. ह्यात बुद्धालाच महत्त्व आहे. आपल्या सत्कृत्यांनी पुढे बुद्ध होऊ पाहणाऱ्या महायान-पंथीयांच्या बोधिसत्त्वाला महत्त्व नाही. म्हणून दुसऱ्यांच्या हित-सुखाकरिता आपल्या ध्येयापासून आपण च्युत न होता आपण आपले ध्येय गाठावे (१६६) हीच विचारसरणी धम्मपदात आहे.

सर्व पापांपासून दूर राहणे, कुशल गोष्टी संपादन करणे व स्वतःच्या चित्ताची परिशुद्धी करणे (१८३) हीच ज्यांना ज्ञान प्राप्त झाले आहे अशा सर्व बुद्धांची शिकवण आहे. ही सर्वसाधारण भाषा झाली. तपशिलात शिरावयाचे म्हणजे घरदार सोडून जो प्रव्रजित होतो त्यालाच बुद्धाची शिकवण पूर्णपणे अमलात आणता येईल. त्याच्या ठिकाणी क्षमाशील वृत्ती असावी. कोणाला त्रास देण्याची किंवा इजा करण्याची प्रवृत्ती नसावी. गावाच्या बाहेर, परिसरातील वनामध्ये राहून ध्यान-समाधी कार्यात मन गुंतलेले असावे. निर्वाणाच्या श्रेष्ठतेबद्दल श्रद्धा असावी. आहारात मितता ठेवून प्रातिमोक्ष ग्रंथात सांगितलेल्या नियमानुसार सद्वर्तन असावे (१८४–८५).

बुद्ध, धर्म व संघ ह्या त्रयीला शरण जाऊन, त्यांच्या गुणांचे परिशीलन करून (२९६–९८) वर उल्लेखिलेल्या चार आर्य सत्यांचे ज्ञान संपादन करावे (१९०). चौथे आर्य सत्य म्हणजेच आर्य अष्टांगिक मार्ग होय. हाच सर्व मार्गांमध्ये श्रेष्ठ मार्ग होय, ह्या श्रद्धेने व ह्याच्याच मदतीने कायेवर, वाणीवर व मनावर संवर प्राप्त करून घ्यावा. अशा रीतीने सर्व दृष्टीने संवृत असा भिक्षू आत्मानंदात दंग असतो. (३६०–६२) इंद्रियांवरील संयम व प्रातिमोक्षात सांगितलेला संवर हा प्रज्ञावान् भिक्षूंचा पहिला गुण होय (३७५). थेरवादी बौद्ध धर्माने स्वतः कष्ट करण्यावर फारच भर दिला आहे. दुसऱ्याच्या मेहेरबानीने आपले श्रेयस् संपादन करता येत नाही. खुद्द तथागत किंवा बुद्धही तुम्हाला वाटाड्यापेक्षा जास्त काही मदत देऊ शकत नाही. ज्याने आपली उन्नती स्वतः करून घेतली पाहिजे (२७६). 'उद्धरेदात्मनात्मानम्' या भगवद्गीतेतील (६.५) उक्तीप्रमाणे येथेही असेच म्हटले आहे की आपणच आपले नाथ म्हणजे घडविणारे मालक आहोत

(६२, १६०,३८०). दुसरा कोण नाथ असू शकेल? (१६०). शुद्धी-अशुद्धीच्या बाबतीत दुसरा कोणी तुम्हांला शुद्ध किंवा अशुद्ध करू शकत नाही (१६५). सदा सच्छील राहून ध्यान-समाधीच्या मार्गाने मनावर ताबा मिळवावा. श्रद्धा, स्मृती, वीर्य, समाधी व प्रज्ञा ह्यांच्या सहाय्याने नैतिकबल संपादन करावे व त्या बलाच्या जोरावर जगातील दुःखाचा अंत करावा (१४४). समाधी किंवा ध्यान हे साधन आहे, साध्य नव्हे. ध्यान-समाधीचा उपयोग केवळ चित्ताची एकाग्रता मिळविण्याकरिता आहे. चित्त स्थिर व एकाग्र झाले म्हणजे चार आर्य-सत्यांचा साक्षात्कार होण्याला मदत होते. म्हणून प्रज्ञेच्या मानाने जरी गौणत्व असले तरी ध्यान व प्रज्ञा ह्यांची सांगड घातलेली काही ठिकाणी दिसते. ज्याच्या ठिकाणी ध्यान व प्रज्ञा आहे तो निर्वाणाच्या जवळच आहे (३७२). तरी पण आस्रवांचा किंवा क्लेशांचा नाश प्रज्ञेनेच होतो. तो आस्रवांचा नाश झाल्याखेरीज केवळ समाधी-लाभाने नैष्काम्य प्राप्त होत नाही आणि नैष्काम्य प्राप्त झाले तरच अर्हत्व प्राप्त होते (२७१. २७२).

थेरवादाचे अर्हत्व हेच ध्येय आहे व ते प्राप्त करून घेणे म्हणजेच बुद्धत्व प्राप्त करून घेणे होय. अर्हत्वाचा प्रत्यक्ष साक्षात्कार झाल्यावर माणसाला श्रद्धेच्या शिडीची जरूरी नाही. अर्हत्व म्हणजेच बुद्धत्व. जे कोणी घडवून तयार केलेले नाही (अ–कत) असे निर्वाण-पद प्राप्त झाले म्हणजे पुनर्जन्म नाही; म्हणजे दोन जन्मांमधील साखळी तुटली गेली आहे (संधि-छेद) असा जो पुरुष तो उत्तम पुरुष आहे (९७). ह्या ध्येयाप्रत नेणाऱ्या मार्गावर पहिला टप्पा म्हणजे स्रोता-पत्ति-फल होय. हे प्राप्त झालेला मनुष्य ध्येयांकडे नेणाऱ्या स्रोत-प्रवाहावरील पहिल्या टप्प्यावर पोहोचलेला आहे. हे फल पृथ्वीच्या एकछत्री-राज्यापेक्षा, सर्व विश्वाच्या आधिपत्यापेक्षा, किंवा स्वर्गप्राप्तीपेक्षा श्रेष्ठ होय (१७८). श्रामण्य हे जर योग्य रीतीने पाळले गेले तरच ते सुखकारक आहे (३३२). पण जर ते व्यवस्थित रीतीने ग्रहण केले गेले नाही तर, कुश-दर्भाची काडी जर व्यवस्थित रीतीने पकडली नाही तर जशी हात कापते, तसे व्यक्तीच्या नाशास कारणीभूत होऊन निरयाप्रत नेते (३११). शंकास्पद आयुष्य असलेले श्रामण्य हे केव्हाही विशेषफल देणारे असत नाही (३१२). Ceasor's wife must be above suspicion (सीझरची बायको संशयातीत असली पाहिजे)—ह्या इंग्रजीतील उक्तीप्रमाणे श्रामण्य हे सदैव शंकातीतच असले पाहिजे. ह्यात ढिलेपणा आला म्हणजे तो प्रव्रजित केवळ आपल्या भोवती प्रवादांची राळच उडवतो (३१३). तेव्हा सामान्यजनांना अप्राप्य असलल्या नैष्काम्याचे सुख मिळविण्याकरिता तो सतत प्रयत्नशील असला पाहिजे. हे सुख केवळ शील-व्रतांच्या पालनाने, किंवा

विद्वत्तेने, किंवा समाधी मिळविण्याने प्राप्त होत नसते, तर सर्व आस्रवांचा, क्लेशांचा, नाश झाला तरच ते मिळणारे आहे (२७१–७२). अशा रीतीने जागृत, बुद्ध झालेला माणूस पाप-पुण्याच्या पलीकडे गेलेला असतो (३९, २६७, ४१२). मन मात्र शुद्ध ठेवावे. कारण मन शुद्ध असले तर सुख प्राप्त होईल. द्वेषाने भारला गेल्यामुळे मन अशुद्ध असले तर दुःखच प्राप्त होईल (१–२). 'सात्त्विक दृष्टीच्या विशुद्धीचा हाच एकटा मार्ग आहे' (२७४) व 'ह्या बौद्धधर्माच्याबाहेर खरा श्रमण नाही' (२५४–५५)—ह्यासारखी अपवादात्मक काही वचने सोडली तर बौद्धेतरांनाही आक्षेपार्ह वाटण्याजोगे असे फारसे दिसत नाही.

(३) **नैतिक शिकवण**—अशा रीतीने भिक्षु-धर्म सांगितला असतानाही गृहस्था-श्रमीयांची उपेक्षा केली असे नाही. त्यांच्याकरिताही सामान्य नीति-नियम सांगितलेले आहेत व हे भिक्षूंनाही लागू आहेतच. जो प्राण्यांची हिंसा करतो, खोटे बोलतो, कोणीही उचलून न दिलेला असा जिन्नस घेतो म्हणजे चोरी करतो, परदारागमन करतो व सुरा-मेरयादि मादक पदार्थांचे सेवन करतो असा माणूस आपल्याच पायाखालची माती खणून काढतो (२४६–४७). म्हणून पापापासून दूर राहणेच सुखकर आहे (१२३, १३३). प्रत्येक जन्मलेल्या माणसाने खूपसे कुशल कर्म करावे (५३). म्हणजे पापकारक मित्रांची संगत सोडून कल्याणकारक मित्रांची संगती धरावी (७८). असा कल्याणकारक मित्र न मिळाला तर एक-परी एकटे राहावे (३३०), पण पापी, मूर्ख माणसांची संगत नसावी; कारण मूर्ख माणसांची संगती कधीच फलदायी नसते (६१).

नेहमी सत्य बोलावे. रागावू नये. कोणी आपल्या जवळच्या पदार्थांपैकी काही मागितले तर ते पदार्थ थोडे असले तरी त्यातूनच अल्पसा भाग तरी द्यावा (२२४). अ-क्रोधाने क्रोधावर जय मिळवावा, दुष्ट (अ-साधु) माणसांशी देखील सौजन्याने साधुत्वाने वागावे. कद्रू माणसावर त्यालाच काही देऊन मात करावी व खोटे बोलणाराला सत्य बोलून वरमायला लावावे (२२३). उद्देश हा की, वरमून गेल्याने तो आपण होऊन आपणालाच पराभूत मानेल. कुशल कर्म करण्याचे बाबतीत दिरंगाई करू नये, कारण न जाणो मन केव्हा बदलेल व कुशल कर्माच्या ऐवजी हातून पाप घडेल (२१६). पाप हातून घडणारच नाही अशी ग्वाही कोणी देऊ शकणार नाही (१२१). आपणाला स्वतःला कोणी जीवे मारले तर ते आपल्याला आवडणार नाही हे जाणून आपण कोणाची हत्या किंवा घातपात करू नये (१३०). एखादे पापकर्म हातून घडलेच तर लगेच उलट कुशल कर्म करून पाप पुसून टाकावे. अशा रीतीने वागणारा ढगातून बाहेर पडलेल्या चंद्राप्रमाणे प्रकाशमान होतो (१७२).

थेरवादी बौद्ध-धर्माने बाह्यशुद्धीपेक्षा अन्तःशुद्धीवरच भर दिला आहे. बाह्य अवडंबरापेक्षा खऱ्या अन्तःस्थ शुद्धीलाच महत्त्व दिले आहे. डोक्यावरील जटा वाढवून, पांघरण्याकरिता मृगाजिन वापरूनही अन्तःकरणात जर पापी विचारांचे जंगल माजलेले असेल, तर बाह्य शरीराचे परिमार्जन करून काय उपयोग? (३९४). नग्न-चर्या, जटा-धारण, अंग मातीने माखणे, अनशन (न खाणे), स्थण्डिलावर निजणे, अंगावर भस्माचे पट्टे ओढणे किंवा उकिडवे बसून तपश्चर्या करणे वगैरेंनी, ज्याच्या मनातील शंका-कुशंकांचे जाळे नाहीसे झाले नाही अशा माणसाची शुद्धी होत नाही (१४१). वैर प्रतिवैराने नष्ट होत नाही. अ-वैराने, प्रेमाने वागल्यानेच नष्ट होते, हा सनातन धर्म आहे (३). कारण प्रति-वैर करून जय मिळविणारा पराजिताच्या मनात, जरी तो पराभूत होऊन निपचित पडला असला तरी, वैरबुद्धीच उत्पन्न करतो (२०१). म्हणून मनाचा समतोल-पणाच ठेवावा. पृथ्वीप्रमाणे प्रतिकूल परिस्थितीतदेखील क्षमाशीलवृत्ती बाळगावी. सुख असो वा दुःख असो, शहाणा माणूस त्यामुळे डुरळून किंवा कष्टी होऊन मनाचा समतोलपणा ढळू देत नाही (८१). सच्छीलवृत्तीने रहावे. कारण सच्छीलाचा गंध सगळीकडे, वाऱ्याच्या उलट दिशेला देखील, पसरतो (५४). शंभर वर्षेपर्यंत अग्नीत आहुती टाकून अग्नीची पूजा करण्यापेक्षा ज्याने आपणास ध्यानादी भावनेने पुनीत केले आहे अशा माणसाची एक मुहूर्तपर्यंतच सेवा केली तरी ती जास्त श्रेयस्कर आहे (१०७).

जुने शब्द घेऊन त्याचा अर्थ नव्या रीतीने, नैतिक दृष्ट्या लावला जातो. केस केवळ पांढरे झाले म्हणून कोणी 'थेर' (वृद्ध बाबा) होत नाही, तर त्याच्या ठिकाणी सत्य, धर्म, अहिंसा, संयम हे आंतरिक गुण असून त्याने अशुद्धता झुगारून दिली असेल तरच तो खरा थेर होतो (२३०). मौन बाळगण्याने काही कोणी 'मुनिबाबा' होत नाही, तर हातांत तराजू घेऊन कुशल-अकुशल तोलून अकुशलाचा त्याग करून कुशलाचा जो स्वीकार करतो, किंवा इहलोक व परलोक ह्यांची तुलना करून इष्ट तेच स्वीकारतो तो खरा मुनी होय (२६८–६९). केवळ डोक्याचे मुण्डन केले म्हणून श्रमण होत नाही, तर सर्व पापांचे शमन केल्याने (२६४–६५) किंवा सम-वृत्ती ठेवल्याने (३८८) श्रमण होतो. ब्राह्मण कुलात जन्मला म्हणून ब्राह्मण होत नाही (३९५), तर सर्व पापे ज्याने वाहवून दिली आहेत (वाहेत्वा), तो खरा ब्राह्मण होय (२८८). केवळ भिक्षा मागतो म्हणून भिक्षू होत नाही. भिक्षा मागणारा जर दुर्गंधी, दुर्गुण-संपन्न असेल, तर तो भिक्षा मागत असला तरी भिक्षू होऊ शकत नाही (२६६).

(४) **सनातन सत्ये**—ह्या छोटयाशा ग्रंथात सनातन सत्ये जागोजाग विखुरलेली आहेत, व ती सर्वांनाच पटतात. उदाहरणार्थ, माणसाने इतरांस उपदेश करण्यापूर्वी आपले आपणच त्याप्रमाणे वागावे व त्यानंतरच इतरांस उपदेश करावा (१५८–५९). दुसऱ्यांचे दोष शोधून काढण्यापेक्षा आपली आपणच केलेली दुष्कृत्ये किंवा आपले दोष व न पार पाडलेली कर्तव्ये ह्यांची दखल घ्यावी (५०,२५२). कारण साधारणपणे आपले दोष लपवून ठेवण्याची व इतरांचे दोषांबद्दल त्यांचे वाभाडे काढण्याची वृत्ती सर्वत्र दिसते (२५२).

एखादा माणूस तो केवळ बडबडया आहे म्हणून काही तो पण्डित किंवा धर्माचा अवतार होऊ शकत नाही (२५८–५९). तसेच, एखाद्या माणसाने भारा-भर ग्रंथ वाचले पण त्यांतील उपदेशाप्रमाणे त्याने आपले वर्तन ठेवले नसेल तर तो केवळ पढतमूर्खच होय. लोकांच्या गायी राखायला नेणारा गुराखी जसा त्या गाईंचा मालक बनत नाही, त्याप्रमाणे हा माणूस श्रामण्याचा वाटेकरी होत नाही (१९). ह्या जगात स्वतःलाच 'आपला' असे म्हणता येत नाही, (कारण, संयम नसल्याने आपले आपण नको तेथे भरकटत असतो) तर 'पुत्र माझा', 'धन माझे' असे कसे म्हणता येईल? (६२) 'पुत्र माझा', 'धन माझे', 'असे म्हणणारा मूर्ख कष्टीच होतो (६२). म्हणून प्रथम आपण स्वतःलाच जिंकणे श्रेयस्कर होय (१०४). हे जग दुःखाने पेटलेले असताना, हास्याचे फवारे व आनंदाच्या उकळ्या फुटणे कितपत शहाणपणाचे आहे? (१४६). पण हे जग आंधळ्या माणसांनीच भरलेले आहे. येथे योग्य दृष्टी ठेवणारी माणसेच विरळा! (१७४). नदीच्या पलीकडे जाणारे थोडेच; बाकीचे सामान्य लोक तीरावरच इकडून तिकडे धावणारे (८५). म्हणून शहाण्या माणसाने दुर्लभ अशा मानव-जन्माचा सदुपयोग करून घेतला पाहिजे (१८२). पापकर्माचा त्याग करून जे चांगले व हितकारक असेल ते संपादन केले पाहिजे (११६). हातून घडलेले एखादे पाप छोटेसेच आहे त्याची मला बाधा होणार नाही असे समजून त्याबद्दल तुच्छता बाळगून उपयोगी नाही; कारण एकेक थेंब पडून पाण्याचा घडा भरतोच (१२१). मराठीत म्हण आहेच—'थेंबे थेंबे तळे साचे!' हावरेपणा सोडून दिला पाहिजे. कारण कार्षापणांसारख्या नाण्यांचा माणसावर वर्षाव झाला तरी त्याची तृप्ती होत नाही (१८६). तेव्हा आपल्याच अन्तर्यामी असणारा मळ जर काढून टाकला नाही तर लोखंडापासूनच उत्पन्न होणारा गंज जसा लोखंडालाच खाऊन टाकतो (२४०), किंवा दगडापासून उत्पन्न झालेला हिरा जसा दगडालाच कापतो (१६१), त्याप्रमाणे तो आपला नाश करील हे निश्चित! स्वतःच कष्ट करून आपली शुद्धी करून घ्यावी; कारण शुद्धि-अशुद्धीच्या बाबतीत कोणीही इतरांना

मदत करू शकत नाही. (१६५). अशी शुद्धी करून घेतली नाही आणि स्वतःच्या ठिकाणी असलेल्या पापाला वाव दिला तर ह्या अखिल विश्वामध्ये असे कोणचेही स्थान नाही की ज्या ठिकाणी लपून बसले असता त्या पापापासून सुटका होईल (१२७). त्याचप्रमाणे असे कोणतेही विश्वात स्थान नाही की जेथे बसले असता मृत्यू टळेल (१२८). आणि ह्या जगात अंत करणारा (अन्तक) मृत्यू आला असता त्यातून सुटका करून देण्यास मदत करणारा कोणीही नातेवाईक उपयोगी पडणार नाही (२८८). म्हणून वेळीच जागे होऊन ह्या विश्वाचे यथातथ्य ज्ञान संपादन करण्याकरिता कंबरा कसाव्यात. कारण, आळशी माणसाला ज्ञानाचा मार्ग सापडत नसतो. माणसाने हेही ध्यानात ठेवावे की ह्या जगात कोणीही मनुष्य निन्देतून सुटलेला नाही. मौन धारण करणाऱ्याची, मितभाषण करणाऱ्याची किंवा लांबलचक भाषणे करणाऱ्या बडबड्याचीही निन्दा केली जाते (२२७–२२८)! तेव्हा आपल्याला जो मार्ग श्रेयस्कर दिसत असेल त्या मार्गाने जावे.

असली कितीतरी वचने सादर करता येतील. असो.

सामाजिक परिस्थिती

ह्या गाथांच्या लेखन काली (संकलनकाली नव्हे—लेखन-काल हा संकलन-कालाच्या किती तरी वर्षे आधीचा असला पाहिजे). सामाजिक परिस्थिती काय होती ह्याची कल्पना देणाऱ्या थोड्याच गाथा आहेत. अग्निपूजा समाजातील काही थरात चालू होती (१०७). यज्ञ व त्यात अग्नीमध्ये आहुती देणे चालू होते (१०७–०८). हे यज्ञ महिन्या-महिन्याने होत असत (१०६). देहदण्डनाचा स्वीकार करणाऱ्यांत अनशनाची (१४१), किंवा महिन्यातून एकदाच कुश-गवताच्या काडीच्या टोकाने अन्न ग्रहण करण्याची (७०), वस्त्रविरहित हिंडण्याची किंवा डोक्यावर जटाभार वाढवून अंग मातीने किंवा राखेने माखण्याची किंवा उकिडवे बसून तपश्चर्या करण्याची (१४१) प्रथा चालू होती असे दिसते. तसेच बुद्धाच्या समकालीन आजीवक व निर्ग्रन्थ-पन्थीयांच्या विशिष्ट वागण्याच्या पद्धतीची हेटाळणी करणारी एक गाथा आढळते—ज्याबद्दल दोष, भीती किंवा लाज वाटावयास नको त्याबद्दल ह्या लोकांना दोष, लाज व भीती वाटते; व ज्याबद्दल दोष, भीती व लाज वाटावयास पाहिजे, त्याबद्दल दोष, भीती किंवा लाज वाटत नाही (३१६–१८). हा नावाचा उल्लेख न करता प्रथेचा उल्लेख केला आहे. रस्त्यांतून हिंडतांना विवस्त्र होऊन हिंडणारे पण भिक्षापात्रावर मात्र कपडा टाकून ते भिक्षा-पात्र आच्छादणारे काही पाखंडी लोक असत. हा उल्लेख अट्ठकथाकाराच्या मते

निर्ग्रन्थी-जैन-लोकांना उद्देशून असावा."[15] तापलेल्या लोखंडाचा लहानसा गोळा खावयास लावणे हा शारीरिक शिक्षा करण्याच्या अनेक अघोर प्रकारांपैकीच एक प्रकार असावा अशी शंका येण्यास जागा आहे."[16] (३०८, ३७१).

लेखन व संकलन शैली

धम्मपदातील सु-विचार प्रदर्शित करण्याची एक विशिष्ट अलंकारयुक्त शैली आहे. ह्या अलंकारांनी नटल्यामुळे धम्मपदाचे विचारसौंदर्य जास्तच खुलून दिसते. ह्या अलंकार-सौंदर्याने ते विचार मनात पक्के बिंबतात. हे अलंकार म्हणजे भिन्न-वस्तूतील विरोध, किंवा भिन्न-वस्तूत साम्य दाखविणाऱ्या उपमा, उपमेय हे जणू काही उपमानच असे सांगणाऱ्या उत्प्रेक्षा, उपमा व उपमेय ह्यांतील अभेद दाखविणारी रूपके, शब्दांची निरनिराळ्या रीतीने फोड करून भिन्न अर्थ दाखविणारे श्लेष व निरनिराळ्या घटनांतील किंवा विचारांतील सादृश्य दाखविणारे दृष्टान्त किंवा दाखले, अतिशयोक्ती वगैरे.

आता आपण धम्मपदातील ह्या निरनिराळ्या अलंकारांचे निरीक्षण करू. प्रथम आपण विरोध घेऊ व त्याच्याच अनुषंगाने संकलन-काराने गाथांच्या जोड्या किंवा गट कसे पाडले आहेत तेही पाहू—

(१) **विरोध व गट-योजना**—धम्मपदाच्या पहिल्याच वर्गाला 'यमक वग्ग' असे नाव दिले आहे. ह्या वग्गात दोन दोन गाथांच्या १० जोड्या आहेत पहिल्या गाथेतील काही शब्दांत फेरफार करून बरोबर उलट शब्दांची योजना दुसऱ्या गाथेत केलेली आहे. ह्या परस्परविरोधी गाथा एकदम मनाची पक्कड घेतात. तराजूच्या दोन तव्यांत निरनिराळ्या विरोधी शब्दांच्या गाथा घालून त्या तोलल्या जात आहेत असा भास निर्माण होतो. शहाणा माणूस ह्यांतील योग्य त्याचीच निवड करतो. शिवाय खालील जोड्या लक्षणीय आहेत—३१-३२, ४२-४३, ५१-५२, ६७-६८, ११७-११८, २६०-६१, ३१८-३१९, इत्यादी.

---

१५. भिक्षा मागत असताना चाण्डाळाचे दर्शन झाल्यास—त्याची दृष्ट लागू नये ह्या उद्देशानेही कदाचित असेल—भिक्षापात्रावर कपडा टाकण्याच्या प्रथेचा उल्लेख विमुत्तिमग्गातही आहे. पहा—Vimuttimagga and Visuddhimagga पृ. २३.

१६. असल्या अघोरी शिक्षा-प्रकारांची यादी मज्झिमनिकायातील महा-दुक्खक्खन्धसुत्तात (क्रमसंख्या १३; म. नि. १.८७) दिली आहे. त्यांत 'राहु-मुख' नावाचा एक प्रकार सांगितला आहे. ह्या प्रकाराचे अट्ठकथेप्रमाणे पर्यायी स्पष्टीकरण असे आहे—'अणकुचीदार सळईने तोंड उघडून त्या तोंडात दिवा पेटवणे.' ह्या प्रकारापासून तोंडात लाल तापलेला लोखंडाचा लहानसा गोळा सक्तीने घालणे हा पर्याय काही फारसा दूर नाही.

हा विरोध दोन नजिकच्या गाथांमधूनच आढळतो असे नाही. तर एकाच गाथेत पहिल्या दोन चरणांत व शेवटच्या दोन चरणांतही दिसून येतो. उदाहरणार्थ, गाथा २१, २६, २७, ७५, ७८, २२७, इ.

मात्र सर्व जोडयांत विरोधच असतो असेही नाही. काही शब्दांत फेरफार करून, दोन गाथांचा, तीन गाथांचा, चार किंवा अधिक गाथांचे गटही आहेत. उदा., दोन गाथांच्या जोडया ९-१०, २६-२७, ४७-४८, ६६-६७, ७६-७७, १७२-७३, १८६-८७, २०३-०४, २१९-२२०, २६८-६९, ३४५-४६, इ. तीन गाथांचे गट १००-०२, २७७-८०, ३५६-५८. चार किंवा अधिक गाथांचे गट ३-६, ११०-११५, १९७-२००, २१२-२१६. काही काही शब्दांचा पुनरुच्चार करणे ह्यामुळेच वाचकाच्या मनावर परिणाम होऊन मन त्या शब्दाची व त्यामागील कल्पनांची पकड घेते. हाच परिणाम शेवटल्या ब्राह्मणवर्गात गाथा ३९५-४२३ मध्ये शेवटले चरण ' तमहं ब्रूमि ब्राह्मणं ' हे ध्रुपद सर्वत्र वापरल्याने वाचकांच्या मनावर होतो.

ह्या जोडया किंवा गटांच्या बाबतीत आणखी एक जो विशेष दिसून येतो तो असा की ह्या जोडया किंवा हे गट जसेच्या तसेच त्याच क्रमात पूर्वकालीन त्रिपिटक ग्रंथात किंवा उत्तरकालीन त्रि-पिटक किंवा त्रि-पिटकेतर वाङ्मयात वापरलेले दिसून येतात. आणि हे गट कित्येक वेळा अनेक ठिकाणी दिसून येतात. ह्यावरून ह्या गाथा-जोडयांची किंवा गाथा-गटांची लोकप्रियताच निदर्शनास येते. उदाहरणार्थ :

ध०	म० नि०	सं० नि०	अंगु० नि०	निद्देस	जा० किंवा जा० अ०
३.६	३.१५४	..	...	...	३.११२,४८८
२६–२७	२.१०५	..	...	...	...
३५–३९	..	..	...	...	१.४००
५४–९६	..	..	...	...	३.२९१
६६–६७, ६९	..	..	...	...	३.२९१
८५–८९	..	५.२४	५.२३२,२५३	...	...
१७२–१७३	२.१०४	..	...	...	...
१८६–१८७	..	..	...	...	२.३१३
२६८–२६९	..	..	...	१.२४३	...
३२१–३२३	..	..	...	१.५८,३३६	...
३२८–३३०	३.१५४	..	...	...	३.४८८

ह्या धम्मपदातील गाथा इतक्या लोकप्रिय झाल्या की धर्मोपदेशकाला अत्यंत सहाय्यक अशा 'नेत्ती' नावाच्या ग्रंथात त्या गाथा जागोजागी अवतरल्या आहेत. तसेच जातक-अट्ठकथाकारानेही ह्या गाथांचा किंवा गाथागटांचा मनमुराद उपयोग केलेला आहे. परिशिष्ट ४ पहा (पृ. २००–२०९).

धम्मपदाच्या गाथांच्या किंवा गाथांशाच्या समानार्थक पालि-वाङमयातील उतारे पूर्वकालीन किंवा उत्तरकालीन वाङमयात आढळतात. त्यासंबंधी परिशिष्ट ४ पहावे (पृ. २००–२०९). ह्यांतील निकायासारखे ग्रंथ, सुत्तनिपात किंवा थेरगाथे सारखे गाथासंग्रह हे धम्मपदातील गाथांची मूलस्थाने होणे अगदी शक्य आहे.

(२) दृष्टान्त किंवा दाखले—धम्मपदात जागोजागी दिलेले दृष्टान्त किंवा दाखले हे अत्यंत समर्पक व हृदयाशी भिडणारे आहेत. हे दाखले जगातील नित्याच्या अनुभवातले असल्यामुळे सर्वांना पटतात. धर्मोपदेशकाला हे दाखले म्हणजे आपले म्हणणे श्रोत्यांच्या गळी उतरावयाचे प्रभावी साधन आहे. बौद्धांच्या त्रि-पिटक वाङमयात याचा भरपूर उपयोग केलेला आहे. मिलिंद-पञ्ह ह्या ग्रन्थात तर नागसेन भिक्षूने आपले म्हणणे मिलिन्द राजाला पटवून देण्याकरिता ह्याच प्रभावी अस्त्राचा उपयोग केला आहे व नागसेनाचे चातुर्य-युक्त दृष्टान्त ऐकून मिलिन्द राजा अत्यंत खुष झाला होता. आधुनिक कीर्तनकार देखील समर्पक दृष्टान्त देऊन आपल्या श्रोत्यांकडून वाहवा मिळवितात. धम्मपदात दृष्टांताचा खूपच भरणा आहे. त्यांचा आपण आता विचार करू.

भिक्षूचे गावातील लोकांशी किंवा तेथील घडामोडींशी कसे संबंध असावेत हे एका सुन्दर दृष्टान्ताने विशद केले आहे. ज्याप्रमाणे भुंगा फुलाच्या रंगाला किंवा रसाला बाधा न आणता त्यांतील रसाचा आस्वाद घेऊन पळून जातो, त्याप्रमाणे भिक्षूने गावात जाऊन तेथील राजकारणात न पडता मिळेल ती भिक्षा घेऊन गावाच्या बाहेर पडावे (४९). तसेच, मूर्ख माणूस पण्डिताजवळ राहून त्याने जन्मभर जरी त्या पण्डिताची सेवा केली तरी त्याला धर्माचे ज्ञान होणे नाही. ज्याप्रमाणे रश्श्यात किंवा सारात टाकलेली पळी कितीही वेळ त्यात राहू दिली, तरी तिला रश्श्याचा किंवा साराचा स्वाद कळू शकत नाही (६४). त्याच्या उलट, शहाणा माणूस एक क्षणभर जरी पंडिताच्या सेवेत राहिला तरी त्याला धर्माचे ज्ञान ताबडतोब होते, जसे जिव्हेवर रश्श्याचा किंवा साराचा एक थेंब जरी टाकला तरी खारट की आंबट ही चव जिव्हेला ताबडतोब कळते (६५). एखाद्या शुद्ध निष्पाप, भल्या माणसाचा द्वेष केला तर त्यापासून त्याला काहीही अपाय न होता, तो द्वेष करणाराच पस्तावतो. जसे वाऱ्याच्या उलट दिशेने धूळ फेकली तर ती

ज्याच्यावर फेकली त्याला कोणच्याही रीतीने बाधा न आणता उलट ज्याने फेकली त्याच्याच अंगावर येऊन पडते.[१७] (१२५).

एखाद्या उकिरड्यावर कधी कधी सुंदर फूल उमललेले दिसते; तसे उकिरड्या-प्रमाणे त्याज्य अशा सामान्यजनांत कधीकाळी एखादा जाणकार सम्यक्संबुद्धाचा शिष्य उत्पन्न होऊन तो आपल्या प्रज्ञेने सर्वांना मागे सारतो (५८–५९). एखादा माणूस आपल्या संसारात रमून जीवितातील सुखरूपी पुष्पे वेचीत असतानाच मृत्यू त्याच्यावर झडप घालून खेचून घेऊन जातो. हे कशाप्रमाणे आहे असे म्हटले तर झोपी गेलेला गावचा गाव महापूर वाहून नेतो त्याप्रमाणे (४७,२८७). अडी-अडचणी आल्या तर दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वतःच बाहेर पडा. जसे गाळात रुतलेला हत्ती स्वतःच खटपट करून, स्वतःच्याच बळावर विसंबून राहून गाळातून बाहेर पडतो.

असे किती तरी दृष्टान्त आहेत. सर्व देण्याची जरुरी नाही.

(३) **उपमा**––आता काही उपमा घेऊ. कायेला कुंभाची किंवा समुद्रफेसाची उपमा देऊन ती शाश्वत नसल्याचे दाखविले आहे (४०,४६). मृतदेहाला निरर्थक लाकडाच्या तुकड्याची उपमा आहे (४१). प्रतिकार न करणारा माणूस पृथ्वीप्रमाणे किंवा इन्द्रकीला[१८] प्रमाणे आहे (९५). अज्ञानी माणूस केवळ बैलासारखा आहे. कारण त्याच्या देहातील मांस तेवढे वाढत असते प्रज्ञा मात्र वाढत नाही (१५२). मृत-देहाच्या पांढऱ्या हाडांना शरदृऋतूत फेकून दिलेल्या भोपळ्याची उपमा दिली आहे (१४९). कोणच्याही ऐहिक विषयांत लिप्त न होणारा ब्राह्मण हा चांभाराच्या आरीच्या टोकाला चिकटून न राहणाऱ्या सरसूप्रमाणे[१९] अलिप्त आहे (४०१,४०७). आधाशी पण आळशी माणूस हा मुद्दाम तयार केलेल्या भाताच्या जमिनीतील धान्यावर पुष्ट झालेल्या मोठ्या डुकराप्रमाणे आहे (३२५). ह्या चित्रविचित्र जगाला रंग देऊन

१७. दुसऱ्या एका पालि ग्रन्थात (सं. १. १६१) असाच एक दृष्टान्त आहे. दान करणाऱ्या माणसाचे दान जर एकाद्याने स्वीकारले नाही तर ते दान दान देणाऱ्या माणसांकडेच परत येते. तसेच शिव्या देणाऱ्या माणसाच्या शिव्या, ज्याला दिल्या त्याने स्वीकारल्या नाहीत तर, परत शिव्या देणाऱ्या माणसाकडेच येतील.

१८. इन्द्रकील-पालि इन्दखील. गाथा ९५ वरील टिप्पणी पहा (पृ. १२१).

१९. सरसू (सर्षप)—एक प्रकारचे गळित धान्य आहे. बिहार, बंगाल वगैरे उत्तर हिंदुस्थानातील मुलखात ह्याचे तेल काढून आपल्या गोड्या तेला-सारखा खाण्यात उपयोग करतात.

सुशोभित केलेल्या राजरथाची उपमा दिलेली आहे (१७१). संसाराची ओढ असलेल्या माणसाला आईचे दूध पिणाऱ्या व त्यामुळे आईकडे ओढ घेणाऱ्या वासराची उपमा दिलेली आहे (२८४). नमुन्यादाखल एवढी दिलेली उदाहरणे पुरेशी आहेत.

(४) उत्प्रेक्षा—उत्प्रेक्षा ह्या अलंकाराची फारशी उदाहरणे आढळत नाही. प्रमादाच्या बाबतीत बोलताना कवी म्हणतो—प्रमत्त लोक हे जणू काही मेलेलेच आहेत (२१).

(५) रूपके—शहाण्या माणसाने स्वतःला द्वीप म्हणजे बेट बनवावे (२५, २३६, २३८) ह्यात स्वतःची व समुद्रातील बेटाची अभिन्नता निर्दशित केलेली आहे. बेट जसे खोल रुजलेले असते व त्यामुळे समुद्राच्या लाटांनी वाहवून न जाता निश्चल राहते, त्याप्रमाणे स्वतःला निश्चल बनवावे. गाथा १५४ मध्ये माराला गृहकारक जसे संबोधिले आहे. क्रोध आवरून धरणाऱ्या माणसाला सारथी असे म्हटलेले आहे (२२२). माता, पिता, दोन राजे किंवा दोन विद्वान ब्राह्मण ह्यांना मारणाऱ्या ब्राह्मणाला कोणचीही बाधा होत नाही असा धक्का देणारा विचार मांडला (२९४–९५) म्हणजे साहजिकच शंका येते की ह्यांत काही तरी गर्भित अर्थ आहे व तो गर्भित अर्थ अट्ठकथाकाराने स्पष्ट केला आहे. लोकांचे लक्ष वेधण्याकरिता धक्के देणारी वचने बेधडकपणे वापरण्याची प्रथा इतरत्रही[२०] दिसते. गाथा ३५६–५९ मध्ये राग, द्वेष, मोह

---

२०. हठयोगप्रदीपकेतील (३.४७) हे वचन पहा—

गो-मांसं भक्षयेन्नित्यं पिबेदमरवारुणीम् ।
कुलीनं तमहं मन्ये इतरे कुलघातकाः ।।

ह्यात गो म्हणजे जिव्हा व तिचा तालूत प्रवेश म्हणजे गोमांस-भक्षण. जिव्हेचा तालूत प्रवेश झाल्यावर त्यातून उत्पन्न होणाऱ्या अग्नीच्या उष्णतेमुळे स्रवणारा द्रव म्हणजे अमर-वारुणी (दारु)—अशी फोड पुढील दोन श्लोकात केली आहे.

खुद्द पुण्यात १९१७–१८ च्या सुमारास एक फकीर रात्रीच्या वेळेस हातात कंदील घेऊन व डोक्याकडील कानाच्या वरच्या बाजूस जळत्या तोंडाच्या उदबत्त्या खुपसून "एक पैसा लेऊंगा, सौ गाल्या देऊंगा" असे मोठ्याने ओरडत जाणारा ह्या लेखकाप्रमाणे पुष्कळांनी पाहिला व ऐकला असेल. ही समाजास धक्का देणारी चिकित्सा-पद्धती असल्याचे कित्येकांचे मत आहे. पहा—2500 Years of Buddhism (2nd reprint, 1964) पृ. ३२४. पृ. ३३१ पासूनचे Shock Therapy चे समर्थन वाचा.

व इच्छा ह्यांना प्रजेतील दोष किंवा त्रुटी असे वर्णिले आहे. "हे भिक्षू, तू आपल्या नावेत साचलेले पाणी काढून टाक" असे म्हटले आहे (३६९). ह्या ठिकाणी भिक्षूच्या व्यक्तित्वाला नाव म्हटले आहे; आणि साचलेले पाणी काढून टाक ह्या म्हणण्याने अन्तस्थ मलाचा किंवा क्लेशाचा नाश कर हेच सूचित केले आहे.

(६) श्लेष—"अस्सद्धो अकतञ्ञू च सन्धिच्छेदो च यो नरो" (९७) ह्या गाथेत श्लेष आहे. अस्सद्ध म्हणजे श्रद्धा नसलेला. ह्याचे दोन अर्थ—(१) श्रद्धा मुळीच न बाळगणारा; (२) प्रत्यक्ष साक्षात्कार झाल्यामुळे श्रद्धेची गरज नसणारा. अकतञ्ञूचे दोन अर्थ—(१) अ-कृतज्ञ; दुसऱ्याने केलेल्या उपकारांचे स्मरण न ठेवणारा; (२) अ-कृत-ज्ञ म्हणजे जे कोणी केलेले नाही किंवा घडविले नाही असे जे निर्वाण ते जाणणारा. सन्धिच्छेदाचेही दोन अर्थ—घरांचे सांधे, कोपरे फोडून बिळे पाडून आत प्रवेश करणारा चोर; (२) सन्धि म्हणजे प्रतिसन्धि दोन जन्मांना जोडणारी गर्भावस्था; हिचे छेदन करणारा, नाश करणारा अर्हत. ह्यांतील पहिल्या वरपांगी अर्थाकडेच पाहिले तर श्रद्धा न बाळगणारा, केलेले उपकार स्मरण न करणारा आणि घरांच्या भिंतींतून भोसके पाडून आत शिरणारा चोर—हा उत्तम पुरुष होय. अशा रीतीने अर्थ केल्यास ते पटण्याजोगे नाही. तेव्हा ह्यात दुसरा काही गर्भित अर्थ निश्चित असला पाहिजे. तो म्हणजे असा—प्रत्यक्ष साक्षात्कार झाल्यामुळे ज्याला इतःपर श्रद्धेची गरज राहिली नाही; जो न घडविलेले आहे असे निर्वाण जाणतो आणि ज्याने पुनर्जन्म नष्ट केल्या कारणाने प्रतिसन्धीचा नाश केला आहे असा माणूस उत्तम होय. हे वर्णन बौद्ध धर्माच्या शिकवणीला अनुसरूनच आहे. आणि गर्भितार्थ येथे घेतला तरच समर्पक अर्थ त्यातून निघतो. ब्राह्मणाला अ-कत-ञ्ञू असे जे म्हटले आहे (३८३) ते ह्या गर्भितार्थीच घेतले पाहिजे. तसेच 'पुञ्ञपाप-पहीनस्स' (३९) ह्याचा अर्थ 'पुण्य व पाप' ह्यांची क्षिति न बाळगणारा असा अर्थ न घेता, जो पुण्य व पाप ह्यांच्या पलीकडे गेल्यान त्यांतून मुक्त असलेला (पुञ्ञं च पापं च बाहेत्वा २६७), त्यांच्याशी कोणताही संबंध न ठेवणारा (उभो संगमुपच्चगा ४१२) असाच अर्थ घेणे स-युक्तिक. गाथा २८३ मध्ये आलेल्या 'वन' शब्दात श्लेष आहे. एक अर्थ (१) झाडांचा समुदाय, अरण्य, जंगल; दुसरा (२) तृष्णा, लोभ. गाथा ९-१० मध्ये कसाव (कषाय) आणि कासाव (काषाय वस्त्र) हे दोन्ही संलग्न शब्द. कषाय म्हणजे काढा. काढ्याचा रंग तपकिरी आणि त्यापासून प्राप्त होणारा 'मलिन' हा अर्थ. ह्या गाथेत दोन्ही अर्थ लागू होतात ते असे—अनिक्कसावो म्हणजे ज्याच्या ठायींचे मालिन्य नाहीसे झाले नाही तो मनुष्य कासाव म्हणजे काषाय, तपकिरी, पिवळसर रंगाचे वस्त्र वापरण्यास पात्र नाही.

(७) **अतिशयोक्ती**—बोलण्याचे भरात एकादे वेळेस माणूस अतिशयोक्ती करून जातो. त्यात त्यास जाणून-बुजून ही अतिशयोक्ती करावी अशी इच्छा नसते. पण एखाद्या गोष्टीबद्दलच्या उत्साहामुळे भावनावेगाने तो तसे करून जातो. उदाहरणार्थ गाथा २१ मध्ये अप्पमाद म्हणजे सावधानता. इचे गुणगान करण्याच्या भरात कवि भावनावेगात 'अप्रमत्त लोक मरत नाहीत' असे अतिशयोक्तिचे वचन बोलून जातो. पण भावनेचा आवेग ओसरल्यानंतर त्यालाच आपले विधान कदाचित पटणार नाही. कारण तो जाणतो की मृत्युपासून कोणाचीही सुटका नाही (१२८).

(८) **कोडी**—काही ठिकाणी कोडी-वजा शब्दांचा उपयोग केलेला आहे; व ह्याचा नक्की अर्थ काय हे परंपरेखेरीज कळणे कठिण झाले. उदाहरणार्थ, गाथा ३७०. पञ्च छिन्दे, पञ्च जहे, पञ्च च उत्तरि भावये.... इ. ह्या पञ्च शब्दाने कोणत्या पाच गोष्टी सूचित केल्या आहेत हे परंपरागत आलेल्या अट्ठकथेतील स्पष्टीकरणानेच कळणार आहे. आम्हीही ह्या परम्परागत अर्थावरच विसंबून आहोत.

व्याकरणातील आर्षप्रकार

वैदिक भाषेत ज्याप्रमाणे लिंग-वचनांचा, अभिजात संस्कृतप्रमाणे, काटेकोर विचार नसतो तसेच धम्मपदामध्येही लिंगाचा काटेकोरपणा न बाळगता लवचिक पणा दाखविणारी काही स्थळे सापडतात. उदाहरणार्थ,

तं **भूमि** रामणेय्यक (९८)—ह्या ठिकाणी 'भूमि' हा शब्द स्त्रीलिंगी न घेता नपुंसकलिंगी घेतलेला आहे.

अत्ता हवे **जितं** सेय्यो (१०४)—ह्या चरणात 'अत्ता' हा शब्द पुल्लिंगी असून त्याचे भूतकालवाचक धातु-साधित विशेषण—'जित' हे पुल्लिंगात न वापरता न-पुंसक लिंगी आहे. ह्या लिंगविपर्यासाचा उल्लेख अट्ठकथेतही केला आहे.

एवं **धम्मानि** सुत्वान विप्पसीदन्ति पण्डिता (८२)—ह्या ठिकाणी धम्म न-पुंसकलिंगी वापरलेला आहे. गाथा २६१ मध्ये तो पुल्लिंगी आहे. ऋग्वेदात (१.६४) तानि धर्माणि प्रथमान्यासन्—ह्या ठिकाणी न-पुंसकलिंगीच आहे.

बहु वे सरणं यन्ति **पब्बतानि** वनानि च (१८८)—ह्यात 'पर्वत' शब्द न-सपुंकलिंगी आहे. गाथा ३०४ मध्ये मात्र ती पुल्लिंगी आहे.

अनुट्ठान **घरा** (२४१), दुरावासा **घरा** दुखा (३०२)—ह्यात 'घरा' शब्दाचे प्रथमेचे बहुवचन अ-कारान्त पुल्लिंगी शब्दाच्या बहुवचनाप्रमाणेच केले

आहे. वेदांत 'गृहः' असा पुल्लिंगी शब्द आहे. पालिभाषेत अ-कारान्त न-पुंसकलिंगी शब्दाच्या प्रथमेच्या बहु-वचनात फला, फलानि अशी दोन्ही वैकल्पिक रूपे आहेत, ते असल्याच उदाहरणांमुळे असावे.

अप्पो सग्गाय गच्छति (१७४)—ह्या ठिकाणी द्वितीयेचे रूप 'सग्गं' च्या ऐवजी चतुर्थीचे रूप 'सग्गाय' असे वापरले आहे. हे ऋग्वेदातील 'पञ्च मित्राय येमिरे' (३–५९–८) ह्या धर्तीवर दिसते.

न सक्का पुञ्ञं संखातुं इममेत्तमिति केन चि (१९६)—ह्या ठिकाणी इमं आणि एत्तं ह्या शब्दांचा सन्धि झाला असून इमं हा शब्द (मूळ पुल्लिंगी द्वितीयेच्या एकवचनातील) इदं बद्दल (नपुंसकलिंगी प्रथमेच्या एकवचनाबद्दल) वापरलेला दिसतो.

काही चमत्कारिक शब्दही आढळतात. उदाहरणार्थ, 'सामञ्ञ' च्या ऐवजी 'सामञ्ञता' (३३२). हा शब्द 'ब्रह्मञ्ञता' (३३२) च्या धर्तीवर आहे. वेदामध्ये असे प्रकार आहेत. उदाहरणार्थ, पुरुषत्वता[२१] (ऋ ४.५४.३; ५.४८.५), इषितत्वता... (ऋ. १०.१३२.२). त्याचप्रमाणे आनृण्यता हा शब्द रामायणातही आढळतो (२.२४.३२; २.९४.१७).

मत्तेय्यता, पेत्तेय्यता (३३२) हे चमत्कारिक शब्द वापरलेले आहेत.

सुग्गति (३१९) हा शब्द दुग्गतीच्या (३१८) धर्तीवर तयार केलेला आहे.

तसिणा व तण्हा (३४२, ३३५) अशी दोन्ही रूपे संस्कृत 'तृष्णा' शब्दाबद्दल वापरलेली आहेत.

छन्दोरचना

धम्मपदातील छन्दोरचना उत्तरकालीन अभिजात संस्कृतातील गण-वृत्त पद्धतीची नसून वैदिक छन्द-पद्धतीवर आधारलेली आहे. ह्या पद्धतीत चरणातील अक्षरांच्या संख्येवरच भर दिला जातो. पारशी लोकांच्या अवेस्ता ग्रन्थातही हीच पद्धती अवलंबिलेली आहे. धम्मपदात अनुष्टुभ्, त्रिष्टुभ् व जगती हे तीन वैदिक छन्द आढळतात. अनुष्टुभ् गाथा ही प्रत्येक चरणात आठ अक्षरे अशी साधारणपणे चार चरण असलेली गाथा. त्रिष्टुभ् गाथा म्हणजे प्रत्येक चरणात अकरा अक्षरे अशी साधारणपणे चार चरणे असलेली गाथा. जगती म्हणजे प्रत्येक

---

२१. ह्या शब्दांबद्दल मी, प्राध्यापक माधव वासुदेव पटवर्धन, फर्ग्युसन कॉलिज, पुणे, येथील संस्कृतचे सेवानिवृत्त प्राध्यापक, ह्यांचा ऋणी आहे.

चरणात बारा अक्षरे अशी साधारणपणे चार चरण असलेली गाथा, अशी साधारण पद्धती आहे. पण ह्या अक्षरांच्या संख्येतही वैदिक छन्दाप्रमाणे[२२] काटेकोरपणा नाही. एखाद-दुसरे कमी-जास्त होण्याची नेहमीच शक्यता असते. "निरंकुशाः कवयः !". तसेच चरणातील लघु-गुरु अक्षरांच्या क्रमालाही गणवृत्तातील अक्षरांच्या प्रमाणे काटेकोरपणा नसतो. ह्या बाबतीत ही वैदिक छन्दाप्रमाणे धम्मपदातील छन्दांची स्थिती आहे. अलिकडे वैदिक विद्वानांनी[२३] हे दाखवून दिले आहे की वैदिक छन्दातही चरणाच्या एका विशिष्ट भागात नियम-बद्धता दिसते. तशीच परिस्थिती धम्मपदातीलही काही गाथांचे पृथक्करण केले असताना दिसून येते.

धम्मपदात बहुसंख्य गाथा अनुष्टुभ् छन्दात आहेत व त्यातील काही गाथात सहा चरणही आढळतात (१, २, ७, ८, ३६१, ३८५ इ.). अनुष्टुभ् छन्दात एका चरणात चार चार अक्षरांचे दोन विभाग (dimeter) होतात.

त्रिष्टुभ् छन्दात अकरा अक्षरांच्या एका चरणात तीन विभाग (trimeter) कल्पिलेले आहेत. पहिल्या विभागात पहिली चार किंवा पाच अक्षरे, नंतर यती (पाठांतर करताना थांबण्याचे स्थान), दुसऱ्या विभागात तीन किंवा दोन अक्षरे (सातव्या अक्षराअखेर व छोटा यती) व तिसऱ्या विभागात चार अक्षरे—अशी साधारण प्रथा आहे. त्रिविभागीय चरण असलेल्या गाथांमध्येच शेवटी एक बारावे अक्षर जोडले म्हणजे जगती छन्द होतो त्यावेळी अकरावे अक्षर मात्र लघुन असेल. धम्मपदात त्रि-विभागीय चरणांच्या गाथा थोड्या[२४] (४९) आहेत त्यातील, क्रम २८१, ३२६ व ३३८ च्या गाथा बारा अक्षरी चरणाच्या जगती छन्दातील आहे. बाकीच्या बहुसंख्य अनुष्टुभ् छन्दात आहेत.

---

२२. अर्नोल्ड–पृ. ७, §§२०-२१; मॅक्–पृ. ४३८, §२ (ए); ४४२. ६ (बी) ए.

२३. अर्नोल्ड–पृ. ९§३४.

२४. प्रो. के. ए. सुब्रह्मण्य ऐयर—A few observations on the trimeter verses of the Ramayana & Mahabharata, पृ. ९३ (Proceedings and Transactions of the Third Oriental Conference, Madras, 1924).

वैदिक छन्दांपैकी अनुष्टुभ् व त्रिष्टुभ् गाथांत चरणाच्या शेवटल्या चार अक्षरांत त्यातल्या त्यात थोडीशी नियमबद्धता दिसते. अनुष्टुभ् छन्दात चरणाच्या शेवटल्या चार अक्षरात लघु-गुरु लघु-गुरु (किंवा लघु) (⏑ – ⏑ ⏓)[२५] असा क्रम साधारणपणे अपेक्षित असतो. शेवटचे अक्षर गुरु किंवा लघु—कोणतेही असू शकेल. हा क्रम जरी कधी पाळण्यात आला नाही तरी चरणातील अक्षरांचा तोल सांभाळण्याकरिता त्यात दोन लघु व दोन गुरु अक्षरे आढळतात. अर्थात् ह्या नियमालाही अपवाद नसतात असे नाही. धम्मपदातील काही गाथा घेऊन त्यांचे पृथक्करण करून पाहू—

अप्पमादो अ म त प दं
⏑ ⏑ ⏑ –
पमादो म च्चु नो प दं ।
⏑ – ⏑ –
अप्पमत्ता न मी य न्ति
⏑ – – ⏑
ये पमत्ता य था म ता ॥ (२१)
⏑ – ⏑ –

अ-चरित्वा ब्र ह्म च रि यं
⏑ ⏑ ⏑ –
अलद्धा यो ब्ब ने, ध नं ।
⏑ – ⏑ –
सेन्ति चापा।ऽ ति खी णा व
⏑ – – ⏑
पुराणानि अ नु त्थु नं ॥ (१५६)
⏑ – ⏑ –

सब्ब पापस्स अ क र णं
⏑ ⏑ ⏑ –
कुसलस्स उ प सं प दा ।
⏑ – ⏑ –
स-चित्त-परि यो द प नं
– ⏑ ⏑ –
एतं बुद्धा न सा स नं ॥ (१८३)
⏑ – ⏑ –

ततो मला म ल त रं
⏑ ⏑ ⏑ –
अविज्जा प र मं म लं
⏑ – ⏑ –
एतं मलं प ह त्वा न
⏑ – – ⏑
निम्मला हो थ भि क्ख वो ॥ (२४३)
⏑ – ⏑ –

---

२५. पाश्चात्य विद्वानांच्या मते अनुष्टुभ्, त्रिष्टुभ् व जगती ह्या तिन्ही छन्दांत चरणाच्या शेवटचे अक्षर लघु किंवा गुरु कोणचेही असू शकते. तसेच अनुस्वारयुक्त किंवा विसर्गयुक्त चरणाच्या शेवटचे ऱ्हस्व अक्षरही ते लघुच मानतात.

पहा मॅक्—पृ. ४३९, ४४१, ४४२;

अर्नोल्ड—पृ. १४९, §१८२ (i), १८५ §२०८;

क्यूनो (Dr. Richard Kühnu) पृ. ५४, ९९–१००, १४७(२०), १६३.

संस्कृत कोशकार प्रि. वामन शिवराम आपटे व हायर संस्कृत ग्रामर (Higher Sanskrit Grammar) चे कर्ते मो. रा. काळे हेही म्हणतात की, चरणाच्या शेवटचे अक्षर स्वभावतः ऱ्हस्व किंवा दीर्घ कसेही असले तरी आवश्यकतेप्रमाणे छन्दाकरिता लघु किंवा गुरु मानता येते. [आपटे कोश, परिशिष्ट पृ. १०३५, रकाना २; काळे, परिशिष्ट, छन्दःशास्त्र (Prosody) पृ. १–२ §५]

वरील चारही गाथांपैकी गाथा २१, १८३ व १५६ मधील पहिल्या चरणात नऊ-नऊ अक्षरे आहेत. गाथा २४३ च्या पहिल्या चरणात आठच अक्षरे आहेत; पण ह्या चारही गाथांतील पहिल्या चरणातून शेवटल्या चारही अक्षरांचा क्रम लघु-लघु-लघु-गुरु (⏑⏑⏑–) असा आढळतो. हा आपण अपवादात्मक[26] समजू. पण बाकीच्या चरणांतून लघु-गुरु लघु-गुरु, किंवा लघु-गुरु गुरु-लघु, असाच, आढळतो. म्हणजे वर सांगितल्याप्रमाणे वैदिक साच्यात बसतो.

आता आणखी काही गाथा पाहू—

सिञ्च भिक्खु इ मं ना वं
⏑ – – –
सित्वा ते ल हु मे स्स ति ।
⏑ – ⏑ ⏑
छेत्वा रागं च दो सं च
⏑ – – ⏑
ततो निब्बा ण मे हि सि ।। (३६९)
⏑ – ⏑ ⏑

यं एसा स हु ती ज म्मी
⏑ – – –
तण्हा लोके वि स त्ति का ।
⏑ – ⏑ –
सोका तस्स प व ड्ढ न्ति
⏑ – – ⏑
अभिवुट्ठ व बी र णं ।। (३३५)
⏑ – ⏑ –

वरील दोनही गाथांतील पहिल्या चरणातील शेवटची चार अक्षरे (⏑– – –) अशा क्रमाची आहेत, ती आपण अपवादात्मक[27] समजू. गाथा ३६९ मधील दुसऱ्या व चौथ्या चरणांतील व ३३५ मधील तिसऱ्या चरणातील शेवटचे अक्षर लघु असले तरी अन्त्य असल्याकारणाने गुरु समजता येईल किंवा चरणाच्या शेवटचे अक्षर, वर म्हटल्याप्रमाणे, लघु किंवा गुरु असू शकते. हे मान्य केले म्हणजे लघु-गुरु लघु-लघु (किंवा गुरु) किंवा लघु-गुरु गुरु-लघु (किंवा गुरु) ह्या साच्यात सर्व चरणे बसतात. पण ह्या दोन गाथांत आणखी एक वैशिष्ट्य, नवीन असे दिसते, ते हे— ह्या गाथांत पहिल्या व तिसऱ्या चरणांतील सातवी अक्षरे ही गुरु आहेत तर दुसऱ्या व चौथ्या चरणांतील हीच अक्षरे लघु आहेत.

---

२६. अर्नोल्ड—पृ. १६४; १५६(डी); मॅक् पृ. ४३८, टीप ३.

२७. ह्या अपवादाची दखल घेतलेली आहे. पहा अर्नोल्ड पृ. १६८, §१९९ मधील कोष्टक (खालून ६ वी ओळ).

हे वैशिष्ट्य ऋग्वेदातील उत्तरकालीन [२८] सूक्तात, अथर्ववेदात, महाभारत-रामायण व अभिजात संस्कृतातील काव्यात आढळते.

आता आपण अकरा अक्षरी त्रिष्टुभ्‌ची उदाहरणे घेऊ—

फेणूपमं कायमिमं विदित्वा — ⏑ — —	अलंकतो चेऽपि समं चरेय्य — ⏑ —
मरीचिधम्मं अभिसंबुधानो । — ⏑ — —	सन्तो दन्तो नियतो ब्रह्मचारी । — ⏑ — —
छेत्वान मारस्स पपुप्फकानि — ⏑ — ⏑	सब्बेसु भूतेसु निधाय दण्डं — ⏑ — —
अदस्सनं मच्चुराजस्स गच्छे ॥ (४६) — ⏑ — —	सो ब्राह्मणो सो समणो स भिक्खु ॥ (१४२) — ⏑ — ⏑

वैदिक त्रिष्टुभ् छन्दात ८ व्यापासून तो ११ व्यापर्यंतची अक्षरे गुरु-लघु-गुरु-लघु (किंवा गुरु) (— ⏑ — ⏓) [२९] अशा क्रमात असतात. वरील ४६ व्या गाथेतील चरण १, २ व ४ ची व गाथा १४२ च्या दुसऱ्या व तिसऱ्या चरणांची, शेवटली अक्षरे गुरु आहेत. बाकीच्या चरणांची शेवटली अक्षरे लघुच आहेत. शेवटले अक्षर लघु किंवा गुरु असू शकते. तेव्हा ह्या पाली गाथाही वैदिक त्रिष्टुभ्‌च्या साच्यात बसतात असे दिसेल. तसेच यतीही चौथ्या व सातव्या किंवा पाचव्या व सातव्या अक्षरानंतर येतात. ह्यातील नववे अक्षर सर्वत्र लघु आहे व दहावे उपान्त्य अक्षर गुरु आहे. त्रिष्टुभ् गाथेत पुष्कळ वेळा चौथा चरण

---

२८. मॅक्.—पृ. ४३९ बी (a); अर्नोल्ड, पृ. १०–११ §४१. अर्नोल्डच्या म्हणण्याप्रमाणे दुसऱ्या व चौथ्या चरणांतील तिसरे अक्षर लघु असते. पण आपण ह्या सर्व ठिकाणी पहिल्या चार अक्षरांचा विचार करीतच नाही. अभिजात संस्कृतमधील श्लोकांची लक्षणे सांगितली आहेत तीच परिस्थिती ह्या ठिकाणी दिसून येते. ती लक्षणे अशी——

श्लोके षष्ठं गुरुर्ज्ञेयं सर्वत्र लघु पञ्चमम् ।
द्वि-चतुः पादयोर्ह्रस्वं सप्तमं, दीर्घमन्ययोः ॥

म्हणजे प्रत्येक चरणांतील शेवटल्या चार अक्षरांचा साचा असा होतो—

चरण १...... ⏑ — — ⏓
चरण २...... ⏑ — ⏑ ⏓
चरण ३...... ⏑ — — ⏓
चरण ४...... ⏑ — ⏑ ⏓

२९. अर्नोल्ड, पृ. १८५ §२०८.

बारा अक्षरी आढळतो. पण त्यातील लघु-गुरु क्रम हा त्रिष्टुभ् गाथेचे अनुकरण करतो, उदा., न उच्चावचं पण्डिता द स्स य न्ति (८३), त्याचप्रमाणे ३४६–४७, ३३८ मधील शेवटची चरणे.

आता आपण बारा अक्षरांच्या जगतीचे उदाहरण घेऊ—.

वाचानुरक्खी मनसा सु-सं वु तो
⏑ – ⏑ –
कायेन च अकुसलं न क यि रा।
⏑ ⏑ ⏑ –
एते तयो कम्मपथे वि सो ध ये
⏑ – ⏑ –
आराधये मग्गमिसि-प्प वे दि तं ॥ (२८१)
⏑ – ⏑ –

इदं पुरे चित्तमचा रि चा रि क
⏑ – ⏑ –
येनिच्छकं यत्थकामं य था सु खं।
⏑ – ⏑ –
तदज्जहं निग्गहेस्सामि यो नि सो
⏑ – ⏑ –
हत्थिप्पभिन्नं विय अं कु स ग्ग हो ॥ (३२६)
⏑ – ⏑ –

गाथा २८१ मध्ये दुसऱ्या चरणातील दहावे अक्षर 'क' हे लघु आहे ते अपवादात्मक मानावे लागेल. बाकीच्या सर्व चरणांत आपण शेवटल्या चार अक्षरांत लघु-गुरु लघु-गुरु (⏑ – ⏑ –)[३०] हा क्रम पाहतो. चरणातील ८ वे अक्षर दीर्घ व ११ वे अक्षर लघु आहे. [३१]त्रिष्टुभ् छन्दाप्रमाणे चौथ्या किंवा पाचव्या अक्षरानंतर मोठा व सातव्या अक्षरानंतर छोटा यती आहे.

त्रिष्टुभ् छन्दातील काही गाथा सहा चरणांच्या आहेत (२०,१४४). शिवाय अक्षरांच्या संख्येतही अनियमितपणा दिसतो. २० व्या गाथेत पाचव्या चरणात १२ अक्षरे तर सहाव्या चरणात १० च आहेत. १४४ व्या गाथेत तिसऱ्या चौथ्या व पाचव्या-सहाव्या चरणांमध्ये बारा-बारा अक्षरे आहेत. विस्तारास्तव परिशिष्ट ३ पहा (पृ. १९८–९९). चार चरणे असलेल्या १८४ व्या गाथेतही हा अनियमितपणा दिसून येतो. ह्या गाथेतील पहिल्या चरणात १०, दुसऱ्या व तिसऱ्या चरणात ११, व चौथ्या चरणात बारा अक्षरे आहेत. गाथा २०८ मध्ये पहिल्या व तिसऱ्या चरणांत ११ अक्षरे आहेत तर दुसऱ्या व चौथ्या चरणांत १२ आहेत. गाथा ३६२ मध्ये पहिल्या चरणात १०, दुसऱ्यात ११, तिसऱ्यात ९, तर चौथ्यात ११ आहेत. गाथा ३७१ मध्ये तर पहिल्या चरणात ९ अक्षरे, दुसऱ्यात

३०. टीप २९ प्रमाणे.

३१. ऋग्वेद प्रातिशाख्यात (१७–२२) पुढील नियम दिला आहे—"गायत्री व जगती ह्यांच्या पादांतील उपान्त्य अक्षर लघु असते. उलट विराज् व त्रिष्टुभ् ह्यांचे पादांत ते गुरु असते"—असे डॉ. पु. द. नवाथे (प्रगत संस्कृत शिक्षण केंद्र, पुणे विद्यापीठ) हे कळवतात. ह्या माहितीबद्दल मी त्यांचा आभारी आहे

११, तिसऱ्यात १०, चौथ्यात १२ अक्षरे आहेत. गाथा ३८८ मध्येही पहिल्या चरणात ९ अक्षरे आहेत, तिसऱ्यात ८, दुसऱ्यात १२ व चौथ्यात १० आहेत.

अशा रीतीने अनियमितपणा जरी पुष्कळ ठिकाणी दिसत असला तरी वर दिलेल्या गाथांच्या पृथक्करणावरून अनेक गाथांतून वैदिक छन्दांतून आढळणारी वैशिष्टयेही दिसतात.

ह्या द्विविभागीय अनुष्टुभ् छंद व त्रि-विभागीय त्रिष्टुभ् व जगती छन्दांचा संमिश्र उपयोग व गाथांच्या चरणातून दिसून येणारी अ-नियमितता ह्यावरूनही ह्या गाथांचे प्राचीनत्व सिद्ध होते असे काही विद्वानांनी म्हटले आहे.[३२]

धम्मपदाचा संकलन-काल

धम्मपदाच्या सर्व वर्गांचा अंतर्भाव पहिल्या चिनी संस्करणात झाला असल्याचे आपण वर (पृ. २२) पाहिलेच आहे. हे पहिले चिनी संस्करण इ. स. तिसऱ्या शतकाच्या पहिल्या चरणात[३३] (२२४) झालेले आहे. पालि धम्मपदातील कित्येक

---

३२. सुब्रह्मण्य ऐयर (Prof. K. A. Subrahmanya Iyer) :—

"A composition in which the verses invariably remain within this system (of dimeter-trimeter) must belong, if not to the Vedic period, at least to a period in which the distinct features of the classical period had not yet developed themselves. See for instance, *Kathopanisad*... and *Mundakopasad* where the verses are dimeter or trimeter and never contain more than 12 syllables each. To take an illustration from Pali literature, 49 out of 423 stanzas of the *Dhammapada* are composed of trimeter verses and the rest of dimeter verses. This is enough to show that a composition not being Vedic, must be considered to be ***old***, if all its poetry comes within the dimeter-trimeter systems". p. 93.

पुढे महाभारतासंबंधी असे म्हटले आहे—

"Another interesting feature of thse stanzas of the Mahābhārata is that they can be divided into two main classes. The first is composed of regular and symmetrical verses of the Rāmāyana type and the other of irregular and unsymmetrical verses, akin to those found in some of the Upanisads and in Pali literature" p. 94.

३३. नान्जो (Nanjio) कॅटलॉग, पृ. ३०५, अनुक्रम १३६५.

गाथा, काही ठिकाणी धम्मपदाच्या नावाचा प्रत्यक्ष उल्लेख करून, इ. स. पहिल्या शतकातील मिलिन्द-पञ्ह[३४] ह्या ग्रंथात सापडतात. तसेच वर म्हटल्याप्रमाणे (पृ. १७) पालि त्रि-पिटकात अंतर्भूत झालेल्या कथावत्थु व निद्देस (महानिद्देस व चूलनिद्देस) ह्या ग्रंथातही धम्मपदातील काही गाथा[३५] सापडतात. इ. स. पूर्व सुमारे दुसऱ्या ते तिसऱ्या शतकांच्या[३६] सुमारास तयार झालेल्या–निदान मूळ गाभ्याच्या स्वरूपात–"महवस्तु-अवदान"‡ ह्या बौद्ध संस्कृत ग्रंथातही धर्मपदे, धर्मपदेषु, धर्मपदां (? पदान्) व त्यातील सहस्रवर्ग ह्यांचा प्रत्यक्ष नामनिर्देश आहे हेही आपण वर पाहिले आहे (पृ. १७).

थेरवादी-बौद्ध परपरेप्रमाणे इ. स. पूर्व तिसऱ्या शतकाच्या मध्याचे सुमारास सम्राट अशोक ह्याच्या कारकिर्दीत पाटलिपुत्र येथे तिसरी बौद्ध संगीती भरली होती. त्यावेळी 'कथावत्थु' नावाचा ग्रंथ तयार झाला. त्यावेळी बौद्ध समाजात उपस्थित झालेल्या अनेक विवाद्य तात्त्विक मुद्यांची चर्चा ह्या ग्रंथात आहे. अशा तऱ्हेने हा ग्रंथ तिसऱ्या संगीतीत तयार झाल्याकारणाने ह्या ग्रंथाला

३४.

धम्मपद	ट्रेंकनर (Trenckner) आवृत्ती	वाडेकर आवृत्ती
२८	३८७	३८०
३२*	४०८*	३९९*
५४–५६	३३३	३२६
८१	३८६	३७९
१२७	१५०	१५२
१२९	—	—
१५०	३९१	३८४
१६८(अ)	२१३	२१०(§३)
३२७*	३७९*	३७२*
३५०	३९१	३८४
३६१	३९९	३९१
४०४	३८६	३७९

*(ह्या गाथा धम्मपदाचे नाव घेऊन मिलिंद-पञ्हात अंतर्भूत केलेल्या आहेत.)

३५. पृ. १७ वरील टीप २ पहा.

३६. Winternitz, History of Indian Literature, vol. ii (English translation) p. 247 (University of Calcutta, 1933).

‡Mahāvastu-Avadāna, vol. i. Introd. xvi edited by Radhagovind Basak with Bengali translation, Calcutta Sanskrit College Research Series, No. XXI, Sanskrit College, Calcutta, 1963.

'बुद्धवचन' म्हणावे की नाही असा प्रश्न उपस्थित झाला होता हे अट्ठसालिनी[३७]–अभिधम्मातील पहिला ग्रंथ 'धम्मसंगणि' ह्यावरील अट्ठकथा–ह्या ग्रंथावरून स्पष्ट आहे. ह्या इ.स.पूर्व तिसऱ्या शतकाच्या मध्याचे सुमारास तयार झालेल्या ग्रंथातही धम्मपदाचा नाम-निर्देश न करता, केवळ भगवान् बुद्धाचे वचन म्हणून निदान सहा ‡ गाथा उद्धृत केलेल्या आहेत. ह्यावरून ह्याकाली सामान्य धर्म-नीतिपर वचने गाथांच्या स्वरूपात प्रचलित होती व ती बुद्ध-वचने म्हणून श्राविकां-कडून मानली जात होती असे दिसते. महावस्तु-अवदानातही धर्मपदांचा बहुवचनी प्रयोग आलेला आहे. निद्देस व कथावत्थु ह्या ग्रंथांत जरी धम्मपदातील गाथा आल्या असल्या तरी तेवढ्यावरून त्या गाथा धम्मपदाचा नाम-निर्देश न करता धम्मपदावरूनच घेतल्या असतील असे समजण्याचे कारण नाही. कदाचित धम्मपदानेही ह्या ग्रंथावरून घेतल्या असतील. किंवा त्याहीपेक्षा हे म्हणणे संयुक्तिक होईल की धम्मपद व हे दोन्ही ग्रंथ ह्यांनी तिसऱ्याच तत्कालीन प्रचलित असलेल्या धर्म-नितीपर गाथा-संग्रहातून घेतलेल्या असतील. ह्या काळी ह्या गाथा-संग्रहास धर्मपद हे सामान्य नाव म्हणून प्रचलित असावे.

इ.स.पूर्व तिसऱ्या शतकाच्या मध्यापर्यंत हे सामान्य धर्मपद-गाथासंग्रह बौद्ध समाजात प्रचलित होते असे मानले तर त्या सामान्य गाथा-संग्रहातून पुढील शे-पन्नास वर्षांत निरनिराळ्या बौद्ध संप्रदायांनी आपापल्या गरजेप्रमाणे 'धर्मपद' किंवा 'धम्मपद' हे विशेषनाम देऊन आपापल्या संप्रदायाकरिता हे संग्रह तयार केले. हे सर्व इ.स.पूर्व दुसऱ्या शतकाच्या मध्यापर्यंत झाले असावे असे मानले तर वावगे होईलसे वाटत नाही.

पालि धम्मपदांतील गाथांची मूलस्थाने पालि त्रिपिटक ग्रंथांतून कोठे कोठे आहेत ह्या संबंधीचा शोध अद्याप पूर्ण झालेला नाही. तूर्त निम्म्यापेक्षा अधिक गाथांची मूलस्थाने आढळली आहेत[३८] कदाचित सर्व गाथांची मूलस्थाने सापडल्यानंतर धम्मपदाच्या व त्यातील गाथांच्या कालनिर्णयाला मदत होईल.

---

३७. १.५.७ (देवनागरी आवृत्ती) भाण्डारकर ओरिएन्टल सीरीज, ३ पुणे ४, १९४२. ‡पृ. ३१ वरील टीप २ पहा.

३८. फाउसब्यल (Fausböll) च्या धम्मपदाच्या द्वितीय आवृत्तीत आणखी १३१ गाथांची मूलस्थाने दिली आहेत असे प्रो. ऱ्हिस डेविड्स म्हणतात. त्यांनी आणखी काही (६९) मूलस्थाने दाखवून दिली आहेत. पहा **JRAS. 1900**, पृ. ५५९ पासून पुढे; Winternitz. Hist. of Ind. Lit. पृ. ८३. परिशिष्ट ४ पहा (पृ. २००–२०९).

धम्मपद-अट्ठकथा

धम्मपदावर धम्मपद-अट्ठकथा नावाचा भाष्यवजा ग्रंथ आहे. ह्यात प्रत्येक गाथा किंवा गाथा-समूह कोठे व कोणास उद्देशून भगवंताने म्हटला आहे, हे निवेदन करण्याकरिता कथानके दिली आहेत. ह्यात काही कथानके बुद्ध व त्याचे शिष्य-शिष्यिणी संबंधीची जशी आहेत, तशी काही ऐतिहासिक किंवा पौराणिक स्वरूपाची आहेत. देवदत्त, आनन्द, विसाखा, अनाथपिण्डिक, लिच्छवी, पसेनदि कोसल राजा, सुन्दरी परिव्राजिका, उत्पलवर्णा भिक्षुणी, वंगीस थेर सारख्या ज्या व्यक्तींचा बुद्धाशी संबंध आला, त्या व्यक्तींची कथानके आहेत, एवढेच नव्हे तर विडूडभ, चण्डप्रद्योत, उदयन, वासुलदत्ता (वासवदत्ता) सारख्या बुद्धकालीन ऐतिहासिक व्यक्तींच्याही कथा प्रसंगानुरूप दिल्या आहेत. विडूडभाने शाक्य कुलाचा नाश केल्याचे कथानक आहे; पण त्या प्रसंगाला धरूनच ४७ वी गाथा म्हटली गेली असेल असे खात्रीने सांगता येईल का? शंका वाटते.

ह्यातील काही कथा ऐतिहासिक प्रसंगाला उद्देशून आहेत. उदाहरणार्थ, गाथा १५३-५४ ह्या बुद्धाने माराला उद्देशून म्हटलेल्या आहेत हे आपणांस अट्ठकथा सांगते. तसेच सब्बाभिभू सब्बविदूऽहमस्मि (३५३) हे बुद्धाने स्वतः विषयीच म्हटले आहे हे मज्झिम-निकायातील अरिय-परियेसन सुत्त (अनुक्रम २६) पाहिले म्हणजे अट्ठकथाकाराच्या म्हणण्याला पुष्टी मिळते.

कथानकाच्या रूपाने गाथा म्हणण्याचा प्रसंग सांगितल्यानंतर त्या गाथेतील शब्दांचा अर्थही दिलेला असतो. पारंपारिक अर्थ, श्लेषांतील गर्भित अर्थ, किंवा रूपकांची किंवा कोड्यांची स्पष्टीकरणे समजण्यास अट्ठकथा फारच उपयोगी आहे. उदाहरणार्थ, अस्सद्धो अकतञ्ञू च (९७), मातरं पितरं हन्त्वा (२९४-९५), अ-लज्जिताये लज्जन्ति (३१६), किंवा पञ्च छिन्दे पञ्च जहे (३७०)—ह्या गाथांची फोड अट्ठकथेवाचून कशी होणार? तसेच 'विस्सं गन्धं' (२६६) चा अर्थ अनेक भाषांतरकारांनी बरोबर दिलेला नाही पण त्याचा खरा अर्थ 'वाईट (विस्र) गंध', 'दुर्गंध' हा अट्ठकथाकाराने बरोबर दिलेला आहे व ह्याचेच समर्थन तिबेटी व पहिल्या चीनी संस्करणाने केलेले आहे. दीघनिकाय-अट्ठकथेवरील दीघनिकाय-टीकेत (४४९) ही 'दुग्गन्धं विस्सगन्धं वायति' असे वचन आढळते.

पालि परंपरेप्रमाणे धम्मपद-अट्ठकथेचा कर्ता बुद्धघोषच समजला जातो. कोणच्या एखाद्या ग्रंथाचा अट्ठकथाकार निश्चितपणे माहीत नसला की घाल ती अट्ठकथा बुद्धघोषाच्या नावावर! आपल्याकडे वचन आहेच—व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्—असाच प्रकार येथेही आहे! अट्ठसालिनी हा ग्रंथही बुद्धघोषानेच

लिहिला व तो विसुद्धिमग्ग वगैरे ग्रंथ लिहिण्याच्या पूर्वी लिहिला अशी ही पारंपरिक समजूत आहे. पण ह्या पारंपरिक समजुतीला धक्का देणारी गोष्ट म्हणजे खुद्द अट्ठसालिनीत विसुद्धिमग्गाचा नामोल्लेख अनेक ठिकाणी[३९] आलेला आहे. शिवाय अट्ठसालिनीतील स्पष्टीकरणे बुद्धघोषाच्या इतर ग्रंथातील स्पष्टीकरणापेक्षा भिन्न असतात. बुद्धघोषाचे अर्थ किंवा स्पष्टीकरणे पर्यायी किंवा 'अपरो नयो' असे म्हणून उद्धृत केलेली आहेत. ह्यावरून ही पारंपरिक समजूत चिकित्सक दृष्टीला मान्य होण्याजोगी नाही हे निश्चित्[४०]. विसुद्धिमग्ग व दीघ-मज्झिम-संयुक्त-अंगुत्तर निकाय ह्यांवरील अट्ठकथा एवढ्याच बुद्धघोषाने निश्चित् लिहिलेल्या असाव्यात. अंगुत्तरनिकायाच्या अट्ठकथेचे नाव 'मनोरथ-पूरणी' असे आहे. त्यावरून ह्या अट्ठकथेच्या लेखकाने निकायांवरील अट्ठकथा लिहिण्याचा बुद्धघोषाचा संकल्प पुरा झाला म्हणून मनोरथ (संकल्प) पूरे करणारी अट्ठकथा ती 'मनोरथ-पूरणी'[४१] असे सार्थ नाव दिले असावे. शिवाय धम्मपद-अट्ठकथेची लेखनशैली व वर्णनशैली बुद्धघोषाच्या वर निर्दिष्ट केलेल्या अट्ठकथांच्या शैलीशी न जुळता ती जातक-अट्ठकथेच्या शैलीशी जुळते हे पाश्चात्त्य विद्वानांनीही मान्य केलेले आहे.[४२]

---

३९. अट्ठसालिनी–१.२; ३.३३९, ३७७, ३८६, ३८८, ३८९, ३९२, ३९४, ३९९ इ०

४०. अट्ठसालिनी, प्रस्तावना पृ० ३५–३९.

४१. विसुद्धिमग्ग–धर्मानंद कोसंबी-संपादित. प्रस्तावना १७–१८. जिज्ञासूंनी ह्या विषयावरील प्रा. धर्मानंद कोसंबी ह्यांचा 'आचार्य बुद्धघोष' हा लेख पहावा. (फर्ग्युसन कॉलेज मॅगेझिन, १९१३ सप्टेंबर, पृ० ९७–१०४.)

४२. Burlingame—Buddhist Legends, part i. 60 :—
"Buddhaghosa is not the author of the Jataka Commentary or the Dhammapada-Commentary. Their authors are unknown".
Winternitz Hist. of Ind. Lit. pp. 197–97.

धम्मपद

१

[यमकवग्गो]

१ मनोपुब्बंगमा धम्मा मनोसेट्ठा मनोमया।
मनसा चे पदुट्ठेन भासति वा करोति वा।
ततो नं दुक्खमन्वेति चक्कं' व वहतो पदं ।।१।।

[यमकवर्ग]

१ (सर्व) धर्मांत-पदार्थांतमन पुढे जाणारे आहे (म्हणजे धर्म पुढे जाणाऱ्या मनाच्या मागोमाग येतात); त्यांत मन श्रेष्ठ आहे; ते धर्म मनोमयच आहेत. जर कोणी प्रदुष्ट मनाने बोलतो किंवा वागतो, तर वाहून ओढणाऱ्या [बैलाच्या] पावलामागे जसे चाक लागते तसे दुःख त्याच्यामागे लागते.

१ मनाच्या अन्वयें येती धर्म ते कीं मनोमय।
मन धर्मीं श्रेष्ठ, बोले वागे दुष्ट मनें कुणी।
त्यामागें दुःखे ये, चाक वाहकामागुनी जसें ।।१।।

२ मनोपुब्बंगमा धम्मा मनोसेट्ठा मनोमया।
मनसा चे पसन्नेन भासति वा करोति वा।
ततो नं सुखमन्वेति छाया' व अनपायिनी ।।२।।

२ (सर्व) धर्मांत-पदार्थांत मन पुढे जाणारे आहे (म्हणजे धर्म पुढे जाणाऱ्या मनाच्या मागोमाग येतात); त्यांत मन श्रेष्ठ आहे; ते (धर्म) मनोमयच आहेत. जर कोणी प्रसन्न मनाने बोलतो किंवा वागतो, तर सोडून न जाणाऱ्या छायेप्रमाणे सुख त्याच्या मागोमाग फिरते.

२ मनाच्या अन्वयें येती धर्म ते कीं मनोमय।
मन धर्मीं श्रेष्ठ, बोले वागे मनीं प्रसन्न जो।
सुख त्यामागुती चाले सोडीना सावली जशी ।।२।।

३ अक्कोच्छि मं अवधि मं अजिनि मं अहासि मे ।
ये तं उपनय्हन्ति वेरं तेसं न सम्मति ।।३।।

३ मला शिव्या दिल्या; मला मारले; मला जिंकले; माझे हरण केले——यांची जे (मनात) गाठ बांधतात, त्यांचे वैर शमन पावत नाही.

३ मारिलें, जिंकिले, गाळी दिल्या, मातें लुबाडिलें।
यांची मनीं गांठ बांधी, वैर त्याचें शमेचिना ॥३॥

४ अक्कोच्छि मं अवधि मं अजिनि मं अहासि मे ।
ये तं न उपनय्हन्ति वेरं तेसूपसम्मति ।।४।।

४ मला शिव्या दिल्या; मला मारले; मला जिंकले; माझे हरण केले——यांची जे (मनात) गाठ बांधीत नाहीत, त्यांचे वैर पूर्ण शमन पावते.

४ मारिलें, जिंकिलें, गाळी दिल्या, मातें लुबाडिलें।
यांची मनीं गांठ नेदी, वैर त्यांचें शमेचि कीं ॥४॥

५ न हि वेरेन वेरानि सम्मन्तीध कुदाचनं ।
अवेरेन च सम्मन्ति एस धम्मो सनन्तनो ।।५।।

५ या जगात वैराने वैरे कधीही शमन पावत नाहीत; अवैराने शमन पावतात. हा सनातन धर्म आहे.

५ या जगीं वैर वैरानें कदाकाळीं शमेचिना।
शमे परि अवैरानें हाच धर्म सनातन ॥५॥

६ परे च न विजानन्ति मयमेत्थ यमामसे* ।
ये च तत्थ विजानन्ति ततो सम्मन्ति मेधगा ।।६।।

६ दुसरे (म्हणजे प्रतिपक्षी) तर जाणत नाहीत की आम्ही या जगात विनाशाकडे (मृत्यूकडे) जात आहोत. आणि जे त्या प्रसंगी असे जाणतात, त्यांजकडून कलह शमन पावतात.

---

*यमामसे ति उपरमाम, नस्साम, सततं समितं मच्चुसन्तिकं गच्छाम ; सर्वांत जुने चिनी १ संस्करण ह्याच अर्थाचे समर्थन करते. शिवाय, पहा—विश्वबंधु—संपादित (१९५०) "सिद्धभारती" भाग १, पृष्ठ ७५ (३); धातुपाठ ९८४—यम उपरमे.

६ जाणती न वुजे साचि आम्ही येथें विनाशतों।
आणि जे जाणती तेथें मिटे तंटा तयांमुळें ॥६॥

७ सुभानुपस्सिं विहरन्तं इन्द्रियेसु असंवुतं।
भोजनम्हि अमत्तञ्ञुं कुसीतं हीनवीरियं।
तं वे पसहति मारो वातो रुक्खं · व दुब्बलं ॥७॥

७ जो (शरीर) शुभ मानून वागतो, इन्द्रिये ताब्यात ठेवीत नाही, भोजनात मर्यादा जाणत नाही, जो सुस्त व उत्साहहीन असतो, त्याचा मार पाडाव करतो, ज्याप्रमाणे वारा दुर्बल झाड [पाडून टाकतो].

७ इन्द्रियां नावरी, देहा शुभ लेखूनि वर्ततो।
राखीना भोजनीं मात्रा, सुस्त उत्साहहीन जो।
मार त्या पाडितो जैसें झाड दुर्बल मारुत ॥७॥

८ असुभानुपस्सिं विहरन्तं इन्द्रियेसु सुसंवुतं।
भोजनम्हि च मत्तञ्ञुं सद्धं आरद्धवीरियं।
तं वे नप्पसहति मारो वातो सेलं. व पब्बतं ॥८॥

८ जो (शरीर) अशुभ मानून वागतो, इन्द्रिये चांगली ताब्यात ठेवितो, भोजनात मर्यादा जाणतो, जो श्रद्धावान् आणि वीर्योत्साही असतो, त्याचा मार पाडाव करू शकत नाही, ज्याप्रमाणे शिलामय पर्वताला वारा [पाडू (हलवू) शकत नाही].

८ इन्द्रियां आवरी, देहा अशुभ लेखूनि वर्ततो।
भोजनीं राखितों मात्रा, श्रद्धा-उत्साह-शील तो।
पाडूं शकेना त्या मार जैसा मारुत पर्वता ॥८॥

९ अनिक्कसावो कासावं यो वत्थं परिदहेस्सति।
अपेतो दमसच्चेन न सो कासावमरहति ॥९॥

९ ज्याच्या मनातून (रागद्वेषादी) कषाय म्हणजे विकारांचा मल गेला नाही; जो दम आणि सत्य यांपासून (अजून) दूर आहे, त्याने जरी काषाय वस्त्र परिधान केले, तरी तो त्या काषाय वस्त्राला पात्र नाही.

९ विकार-रंग ना टाकी वस्त्रीं काषाय रंगला।
पारखा दम-सत्यांना, काषायास न पात्र तो ॥९॥

१० **यो च वन्तकसावस्स सीलेसु सुसमाहितो ।**
उपेतो दमसच्चेन स वे कासावमरहति ।।१०।।

१० आणि ज्याने कषाय (म्हणजे रागद्वेषादी विकारांचा दोष) ओकून टाकला आहे, ज्याची वृत्ति शीलाच्या नियमांनी सुस्थित झाली आहे, दम आणि सत्य ज्याने जोडले आहेत, तोच खरोखर काषायवस्त्राला पात्र होय.

१० **विकारां वमिलें, झाला शीलांत सुसमाहित ।**
जोडिलें दम-सत्यांना, काषाया पात्र तो खरा ।।१०।।

११ **असारे सारमतिनो सारे चासारदस्सिनो ।**
ते सारं नाधिगच्छन्ति मिच्छासङ्कप्पगोचरा ।।११।।

११ असार (वस्तूंत) सारबुद्धी ठेवणारे आणि सार (वस्तूंत) असार पहाणारे —(अशा) मिथ्या संकल्पात वावरणाऱ्या (लोकांना) सार मिळत नाही.

११ **असार तें सार मानी, देखी सारीं असार जो ।**
त्या नरा सार लाभेना, मिथ्या संकल्पि जो भ्रमे ।।११।।

१२ **सारं च सारतो ञत्वा असारं च असारतो ।**
ते सारं अधिगच्छन्ति सम्मासङ्कप्पगोचरा ।।१२।।

१२ सारातील सार व असारातील असार जाणून जे सम्यक् (चांगल्या) संकल्पात वावरतात ते सार मिळवितात.

१२ **सारांत सार जो जाणी, असारांत असार ही ।**
तयाला सार लाभें जो सत्य संकल्पि वावरे ।।१२।।

१३ **यथा अगारं दुच्छन्नं वुट्ठि समतिविज्झति ।**
एवं अभावितं चित्तं रागो समतिविज्झति ।।१३।।

१३ ज्याप्रमाणे वाईट (अव्यवस्थित) रीतीने शाकारलेल्या (आच्छादिलेल्या) घरात (पावसाची) वृष्टी घुसते, त्याप्रमाणे राग म्हणजे काम [ध्यान-ज्ञानाने] संस्कारित न झालेल्या चित्तात घुसतो.

१३ **आच्छादिलें न जें नीट घुसे वृष्टी घरांत त्या ।**
घुसे काम अशा चित्तीं [ध्यान-ज्ञानें] न संस्कृत ।।१३।।

१४ यथा अगारं सुच्छन्नं वुट्ठि न समतिविज्झति।
एवं सुभावितं चित्तं रागो न समतिविज्झति ॥१४॥

१४ ज्याप्रमाणे उत्तम रीतीने शाकारलेल्या (आच्छादिलेल्या) घरात (पावसाची) वृष्टी घुसत नाही, त्याप्रमाणे [ध्यान-ज्ञानाने] संस्कारित झालेल्या चित्तात काम शिरत नाही.

१४ आच्छादिलें असे नीट वृष्टी त्या न घुसे घरीं।
घुसेना काम चित्तीं जें [ध्यान-ज्ञानें] सु-संस्कृत ॥ १४ ॥

१५ इध सोचति पेच्च सोचति पापकारी उभयत्थ सोचति।
सो सोचति सो विहञ्ञति दिस्वा कम्मकिलिट्ठमत्तनो ॥ १५ ॥

१५ पाप करणारा या लोकी शोक करतो; परलोकी शोक करतो; उभय लोकी शोक करतो. आपले मलिन कर्म पाहून तो शोक करतो, आघात पावतो.

१५ इह शोक करी, परत्रही, शोक पापी उभयत्रही करी।
आघात तया घडे, रडे, वेखोनी मळिण स्वकर्म तो ॥ १५ ॥

१६ इध मोदति पेच्च मोदति कतपुञ्ञो उभयत्थ मोदति।
सो मोदति सो पमोदति दिस्वा कम्मविसुद्धिमत्तनो ॥ १६ ॥

१६ ज्याने पुण्य केले आहे तो या लोकी आनंद पावतो; परलोकी आनंद पावतो; उभय लोकी आनंद पावतो. तो आपले विशुद्ध कर्म पाहून मुदित होतो, प्रमुदित होतो.

१६ इह मोदे नि परत्र मोदतो, मोदे तो उभयत्र पुण्यवान्।
तो मोद करी, प्रमोदतो, वेखोनी निजकर्म शुद्ध तें ॥ १६ ॥

१७ इध तप्पति पेच्च तप्पति पापकारी उभयत्थ तप्पति।
पापं मे कतं . ति तप्पति भिय्यो तप्पति दुग्गतिं गतो ॥१७॥

१७ ज्याने पाप केले आहे तो या लोकी ताप पावतो; परलोकी ताप पावतो; उभयलोकी ताप पावतो. मी पाप केले म्हणून (तो) ताप पावतो; दुर्गतीला जाऊन तो आणखी ताप पावतो.

१७ इह ताप घडे, परत्रही, ताप पाप्या उभयत्रही घडे।
केलें पाप म्हणून पोळतो, पोळे पावुन दुर्गती पुनः ॥ १७ ॥

एन ४१८१—५अ

१८ इध नन्दति पेच्च नन्दति कतपुञ्ञो उभयत्थ नन्दति ।
पुञ्ञं मे कतं ' ति नन्दति भिय्यो नन्दति सुग्गतिंगतो ॥१८॥

१८ ज्याने पुण्य केले आहे तो या लोकी आनंद पावतो; परलोकी आनंद पावतो; उभयलोकी आनंद पावतो. मी पुण्य केले आहे म्हणून (तो) आनंद पावतो, सुगतीला जाऊन तो आणखी आनंद पावतो.

१८ इह हर्ष करी, परत्रही, हर्षे तो उभयत्र पुण्यवान् ।
केलें पुण्य म्हणून हर्षतो, हर्षे पावुन स्वर्गती पुनः ॥ १८ ॥

१९ बहुंऽपि चे सहितं भासमानो न तक्करो होति नरो पमत्तो ॥
गोपो ' व गावो गणयं परेसं न भागवा सामञ्ञस्स होति ॥१९॥

१९ पुष्कळ संहिता जरी (कोणी) बोलत असला पण तो प्रमादी माणूस त्याप्रमाणे करीत (चालत) नसेल तर, परक्यांच्या गाई मोजणाऱ्या गुराख्याप्रमाणे, तो श्रमणधर्माचा वाटेकरी होत नाही.

१९ बहु जरी संहिता पाठ बोले तर प्रमादी न तसाच चाले।
गाई गुराखी गणि कीं दुज्यांच्या वांटा न धर्मी श्रमणाचिया त्या ॥ १९ ॥

२० अप्पंऽपि चे सहितं भासमानो धम्मस्स होति अनुधम्मचारी ।
रागं च दोसं च पहाय मोहं सम्मप्पजानो सुविमुत्तचित्तो ।
अनुपादियानो इध वा हुरं वा स भागवा सामञ्ञस्स होति ॥२०॥

यमकवग्गो पठमो ।

२० थोडी संहिता जरी (कोणी) बोलत असला पण धर्माचे तंतोतंत आचरण करतो, राग, द्वेष आणि मोह (ज्याने) त्यागिले आहेत, चांगल्या ज्ञानाने (जो) सावध (किंवा) जागरूक राहातो, ज्याचे चित्त सुविमुक्त आहे, या लोकात किंवा परलोकात ज्याला कशाचीच आसक्ती नाही, तो श्रमणधर्माचा वाटेकरी होतो.

२० थोडी जरी संहिता पाठ बोले। धर्माप्रमाणे परि नीट चाले।
सोडूनिया द्वेष नि राग मोह। ज्ञानें सदा सावध मुक्तचित्त।
मागे न कांहीं इह वा परत्र। वांटा स्वधर्मी श्रमणाचिया त्या ॥ २० ॥

पहिला यमकवर्ग समाप्त.

२

[अप्पमादवग्गो]

२१ अप्पमादो अमतपदं पमादो मच्चुनो पदं ।
अप्पमत्ता न मीयन्ति ये पमत्ता यथा मता ॥१॥

[अप्रमादवर्ग]

२१ अप्रमाद म्हणजे सावधान असणे हा अमृताचा (अमरत्वाचा) मार्ग (अथवा स्थान) आहे; प्रमाद म्हणजे बेसावधपणा हा मृत्यूचा मार्ग (अथवा स्थान) आहे. जे अप्रमत्त आहेत ते मरत नाहीत; जे प्रमत्त आहेत ते मृतवत्‌च (जणू काय मृतच) आहेत.

२१ अमृताचें अप्रमाद प्रमाद पद मृत्युचें ॥
मरती ना अप्रमादी, प्रमादी मृतवत् खरे ॥ १ ॥

२२ एतं विसेसतो ञत्वा अप्पमादम्हि पण्डिता ।
अप्पमादे पमोदन्ति अरियानं गोचरे रता ॥ २ ॥

२२ अप्रमादातील हा विशेष जाणून, आर्यांच्या क्षेत्रात वावरणारे (मार्गात रमून गेलेले) पण्डितजन अप्रमादात आनंद पावतात.

२२ अप्रमादांत जाणोनी हा विशेषचि पण्डित ।
आर्यांच्या रमती क्षेत्रीं अप्रमादीं सुखावती ॥ २ ॥

२३ ते झायिनो साततिका निच्चं दळ्हपरक्कमा ।
फुसन्ति धीरा निब्बानं योगक्खेमं अनुत्तरं ॥ ३ ॥

२३ ते ध्यान करणारे (ध्यानरत), सतत परिश्रम करणारे, नित्य दृढ पराक्रमी, धीर निर्वाण पावतात; जे निर्वाण बंधनापासून मुक्त असून त्यापेक्षा श्रेष्ठ असे काही नाही.

२३ ध्यानी, परिश्रमी नित्य, सदा दृढ पराक्रमी ।
निर्वाणा पावती श्रेष्ठ, योगक्षेम हि जें असे ॥ ३ ॥

२४ उट्ठानवतो सतिमतो सुचिकम्मस्स निसम्मकारिनो ।
संयतस्स च धम्मजीविनो अप्पमत्तस्स यसोऽभिवड्ढति ।। ४ ।।

२४ उत्साहवान्, स्मृति जागरूक राखणारा, शुचिकर्म करणारा, विवेकाने आचरण करणारा, संयमाने वागणारा, आणि धर्माप्रमाणे [कर्तव्य–] कर्म करणारा (असा जो) अप्रमत्त त्याचे यश वाढते.

२४ उत्साह उभा, स्मृती खडी, करि सत्कर्म, विवेक आचरी ।
संयमी, धरि धर्म जीवनीं, अप्रमत्त स्व-यशास वाढवी ।। ४ ।।

२५ उट्ठानेनऽप्पमादेन संयमेन दमेन च ।
दीपं* कयिराथ मेधावी यं ओघो नाभिकीरति ।। ५ ।।

२५ उत्साहाने, अप्रमादाने, संयमाने आणि दमाने मेधावी (शहाण्या) माणसाने (आपल्या मनाचे) असे एक बेट* बनवावे की जे (कामतृष्णादिकांचा) ओघ तोडून विखरून टाकणार नाही.

२५ दम-संयम-उत्साहें अप्रमादेंहि पण्डितें ।
करावें बेट* ऐसें जें ओघ वाहून नेइना ।। ५ ।।

२६ पमादमनुयुञ्जन्ति बाला दुम्मेधिनो जना ।
अप्पमादं च मेधावी धनं सेट्ठं व† रक्खति ।। ६ ।।

२६ अज्ञानी आणि दुर्बुद्ध माणसे प्रमादात रंगतात. सुबुद्ध (सुज्ञ) माणूस अप्रमादाचे जणू काय श्रेष्ठ धनसे रक्षण (जतन) करतो.

२६ रंगतात प्रमादांत मूढ दुर्बद्ध माणसें ।
अप्रमादा जपे सुज्ञ जणूं कीं श्रेष्ठ तें धन ।। ६ ।।

२७ मा पमादमनुयुञ्जेथ मा कामरति-सन्थवं ।
अप्पमत्तो हि झायन्तो पप्पोति विपुलं सुखं ।।७।।

---

*सं०-द्वीपं [JAS 20–1912, Sept.-Oct. पृ. २४०] ; ति०–ग्लिङ; जुन्या युरोपियन भाषांतरकारांना अनुसरून पुष्कळांनी 'दीप' ह्या शब्दाचा 'दिवा' असा चुकीचा अर्थ केलेला आहे. 'अत्तदीप in Pali Literature, हा संपादकाचा लेख पहा. (Sino-Indian Studies; Liebenthal Festschrift, पृ. ११–१३).

† प्रा०–धनशेठि व रक्षदि। तिबेटी भाषांतरही ह्याच प्राकृत पाठाचे समर्थन करते. चिनी १ वर–दिलेला पाठच स्वीकारते.

२७ प्रमादात रंगून जाऊ नका. काम-रतीशी सलगी ठेवू नका; कारण ध्यानरत (असा) अप्रमत्त (माणूस) विपुल सुख पावतो.

२७ रंगूं नका प्रमादीं वा संगीं काम-रतींचिया।
अप्रमत्त ध्याननिष्ठ जोडितो विपुला सुखा॥ ७॥

२८ पमादं अप्पमादेन यदा नुदति पण्डितो।
पञ्ञा-पासादमारुय्ह असोको सोकिनिं पजं।
पब्बतट्ठो 'व भुम्मट्ठे धीरो बाले अवेक्खति॥ ८॥

२८ जेव्हा पण्डित (पुरुष) अप्रमादाने प्रमादाला दूर सारतो (तेव्हा) प्रज्ञा-(रूपी) प्रासादावर चढून (तो) शोक-रहित असा शोकमग्न लोकांना व धीर असा अज्ञांना पाहतो; जसा पर्वतावर उभा राहिलेला जमिनीवरील लोकांकडे पाहतो.

२८ प्रमादा अप्रमादानें सुज्ञ दूर करी जधीं।
प्रज्ञा-प्रासादिं आरूढ धीर देखे अ-शोक तो।
अज्ञां शोकार्त लोकां कीं पर्वतस्थचि भूगतां॥ ८॥

२९ अप्पमत्तो पमत्तेसु सुत्तेसु बहुजागरो।
अबलस्सं 'व सीघस्सो हित्वा याति सुमेधसो॥ ९॥

२९ जसा जलद धावणारा घोडा दुबळ्या घोड्यास मागे टाकतो, तसा प्रमत्तांमधील अप्रमत्त, आणि निजलेल्यातील जागणारा (जागृत) (असा) बुद्धिवान् पुरुष त्यांना मागे टाकून पुढे जातो.

२९ अप्रमत्त प्रमत्तांस निद्रिस्तां बहु जागृत।
मागें टाकी सुज्ञ, जैसा रोड घोड्यांस तेजवान्॥ ९॥

३० अप्पमादेन मघवा देवानं सेट्ठतं गतो।
अप्पमादं पसंसन्ति पमादो गरहितो सदा॥ १०॥

३० मघवा म्हणजे इन्द्र अप्रमादाने देवात श्रेष्ठत्व पावला. अप्रमादाची स्तुती करतात; प्रमाद सदा गर्ह्य समजतात.

३० इन्द्र तो ही अप्रमादें श्रेष्ठ देवांत जाहला।
वाखाणिती अप्रमादा सदा गर्ह्य प्रमादतो॥ १०॥

३१ अप्पमादरतो भिक्खु पमादे भयदस्सि वा ।
संयोजनं अणुं थूलं डहं अग्गीव गच्छति ।। ११ ।।

३१ अप्रमादात रत असलेला वा प्रमादात भय पाहणारा भिक्षु (पेटलेल्या) आगीप्रमाणे लहानमोठी संयोजने म्हणजे बंधनें जाळीत जातो.

३१ अप्रमादीं रमे भिक्षु प्रमादीं वा भें ज्या दिसे।
बंधनें तो सान थोर जाई जाळित अग्निसा॥ ११॥

३२ अप्पमादरतो भिक्खु पमादे भयदस्सि वा ।
अभब्बो परिहानाय निब्बानस्सेव सन्तिके ।। १२ ।।

अप्पमादवग्गो दुतियो ।

३२ अप्रमादात रत असलेला वा प्रमादात भय पाहणारा भिक्षु च्युत (पतित) होऊ शकत नाही; (तो) निर्वाणापाशीच आहे.

३२ अप्रमादीं रमे भिक्षु प्रमादीं वा भें ज्या दिसे।
च्युत होऊं शकेना तो निर्वाणापासची वसे॥ १२॥

दुसरा अप्रमादवर्ग समाप्त.

३

[चित्तवग्गो]

३३ फन्दनं चपलं चित्तं दुरक्खं दुन्निवारयं ।
उजुं करोति मेधावी उसुकारो · व तेजनं ।। १ ।।

[चित्तवर्ग]

३३ (सारखे) स्फुरण पावणाऱ्या, चपल, रक्षण करण्यास व निवारण करण्यास कठीण अशा चित्ताला सुज्ञ (माणूस) ऋजु म्हणजे सरळ करतो, जसे बाण करणारा (कारागीर) बाणास (सरळ करतो).

३३ चपल स्फुरतें चित्त दुर्निवार न राखवे।
करी सरळ त्या सुज्ञ बाणकार जसा शरा॥ १॥

३४ वारिजो · व थले खित्तो ओकमोकत उब्भतो ।
परिफन्दति · दं चित्तं मारधेय्यं पहातवे ।। २ ।।

३४ पाण्याच्या निवासातून बाहेर काढलेला (व) जमिनीवर फेकलेला मासा जसा तडफडतो, तसे हे चित्त माराचे लक्ष्य बनणे टाळण्याकरिता तडफडते.

३४ जलावासांतुनी मासा खेंचिला भूइ फेंकिला।
तैसें तडफडे चित्त माराचें लक्ष्य टाळण्यां ॥ २ ॥

३५ दुन्निग्गहस्स लहुनो यत्थकामनिपातिनो।
चित्तस्स दमथो साधु चित्तं दन्तं सुखावहं ॥ ३ ॥

३५ निग्रह करण्यास कठीण, हलके, जिकडे इच्छा वळेल तिकडे जाऊन पडणारे (असे जे) चित्त त्याचे दमन करणे चांगले. [कारण] चित्त दमन केले असता सुखावह होते.

३५ रोखाया हलकें ये ना वाटेल तिकडे उडे।
बरवा दम चित्ताचा दमिलें चित्त दे सुख ॥ ३ ॥

३६ सुदुद्दसं सुनिपुणं यत्थकामनिपातिनं।
चित्तं रक्खेथ मेधावी चित्तं गुत्तं सुखावहं ॥ ४ ॥

३६ दिसण्यास फार कठीण, अतिसूक्ष्म, जिकडे इच्छा वळेल तिकडे जाऊन पडणारे, असे जे चित्त त्याचे बुद्धिवान (माणूस) रक्षण करतो. रक्षिलेले चित्त सुखावह होते.

३६ अतिसूक्ष्म, दिसेना जें, वाटेल तिकडे उडे।
रक्षितो सुज्ञ चित्ता त्या, रक्षिलें चित्त दे सुख ॥ ४ ॥

३७ दूरङ्गमं एकचरं असरीरं गुहासयं।
ये चित्तं सञ्यमेस्सन्ति मोक्खन्ति मारबन्धना ॥ ५ ॥

३७ दूर जाणारे, एकटे संचार करणारे, अशरीरी, हृदयात दडलेले (असे जे) चित (त्याचा) जे संयम करतात ते माराच्या बंधनातून मुक्त होतात.

३७ एकटें फिरतें दूर, अशरीरी हृदीं दडे।
चित्ता संयमितां होती मार-बन्धन-मुक्त ते ॥ ५ ॥

३८ अनवट्ठितचित्तस्स सद्धम्मं अविजानतो।
परिप्लवपसादस्स पञ्ञा न परिपूरति ॥ ६ ॥

३८ ज्याचे चित्त स्थिर झाले नाही, ज्याने सद्धर्म जाणिला नाही, ज्याचा प्रसाद (प्रसन्नता) तरंगता आहे, त्याची प्रज्ञा परिपूर्ण होत नाही.

३८ स्थिर चित्त नसे झालें, सद्धर्म न च जाणिला।
प्रसाद तरळे, त्याची प्रज्ञा न परिपूर्ण हो ॥ ६ ॥

३९ अनवस्सुतचित्तस्स अनन्वाहतचेतसो।
पुञ्ञपापपहीनस्स नत्थि जागरतो भयं ॥ ७ ॥

३९ ज्याच्या चित्तांतून [काम-] आस्रव (काम-विकार) श्रवत नाहीत, ज्याच्या चित्तावर आघात होत नाहीत; पाप आणि पुण्य यातून तो मुक्त झाला आहे, त्या जागरूक असलेल्या माणसास भय नाही.

३९ कामार्त जो नसे चित्तीं, आघात न घडे जया।
पुण्य-पापांतुनी मुक्त जागरूका न त्या भय ॥ ७ ॥]

४० कुम्भूपमं कायमिमं विदित्वा
नगरूपमं चित्तमिदं ठपेत्वा।
योधेथ मारं पञ्ञायुधेन
जितं च रक्खे अनिवेसनो सिया ॥ ८ ॥

४० ह्या कायेला (म्हणजे शरीराला) कुंभाप्रमाणे [नश्वर] जाणुन चित्ताला [सुरक्षित] नगराप्रमाणे स्थापून, माराशी प्रज्ञारूपी आयुधाने युद्ध करावे. जे (माराकडून) जिंकिले त्याचे रक्षण करावे. (रण-तळावरील) तंबूत (मुळीच) [विसावा] घेऊ नये.

४० कुंभोपम काय [खरा] गणून
स्थापून चित्ता नगरासमान।
प्रज्ञायुधें मार लढून, राखा
जें जिंकिलें घेउं नका विसांवा ॥ ८ ॥

४१ अचिरं वतऽयं कायो पठविं अधिसेस्सति।
छुद्धो अपेतविञ्ञाणो निरत्थं · व* कलिङ्गरं ॥ ९ ॥

४१ अहो! लवकरच ही काया, विज्ञान (चेतना) निघून गेलेली, फेकून दिलेली, निरुपयोगी लाकडाच्या तुकड्याप्रमाणे, पृथ्वीवर पडणार आहे!

४१ काया लवकरी ही कीं पडेल धरणीवरी।
फेंकिली चेतना जातां निस्सार ढलपा जणूं ॥ ९ ॥

---

*अ०—'निरत्थं कट्ठखण्डं' असे स्पष्टीकरण आहे.
स०—'निरस्तं वा कडङ्गर–' फेकून दिलेल्या टरफला किंवा भुस्कुटाप्रमाणे.

४२ दिसो दिसं यं तं कयिरा वेरी वा पन वेरिनं ।
मिच्छापणिहितं चित्तं पापियो नं ततो करे ॥१०॥

४२ द्वेष्टा द्वेष्टयाला जे करतो किंवा वैरी वैऱ्याला जे करतो त्याजपेक्षा जास्त अकल्याण मिथ्या मार्गांत लागलेले (स्वतःचे) चित्त करील.

४२ द्वेष्टा द्वेष्टयास वैरी वा वैऱ्या अहित जें करी ।
त्याहूनही करी चित्त मिथ्या संकल्पि लाविलें ॥१०॥

४३ न तं माता पिता कयिरा अञ्ञे वाऽपि च ञातका ।
सम्मापणिहितं चित्तं सेय्यसो न ततो करे ॥११॥

चित्तवग्गो ततियो ।

४३ माता, पिता, किंवा दुसरे नातेवाईक जे करणार नाहीत त्याजपेक्षा जास्त कल्याण सम्यक् प्रणिधान केलेले (स्वतःचे) चित्त करील.

४३ श्रेय माता पिता जें वा नातेवाईक ना करी ।
त्याहूनही करी चित्त सम्यक् संकल्पि लाविले ॥११॥

तिसरा चित्तवर्ग समाप्त.

४

[पुप्फवग्गो]

४४ को इमं पठविं विजेस्सति* यमलोकं च इमं सदेवकं ।
को धम्मपदं सुदेसितं कुसलो पुप्फमिव पचेस्सति ॥१॥

(पुष्पवर्ग)

४४ ही पृथ्वी आणि देव-(लोका) सहित यमलोक यांना कोण जिंकील? कुशल (माणूस) जसे फूल वेचितो तसे चांगल्या प्रकारे धर्मपद कोण वेचील ?

४४ पृथ्वी ही जिंकीलचि कोण लोकीं
तैसे यमाच्यासह देवलोकां ।

*रो०, सी०—'विजिस्सति' हाच पाठ अट्ठकथाकाराने घेतलेला आहे. ति०, चि०, सं०—'विचेस्सति'.

स्वाख्यात-धर्मवचनेंहि कोण
वेचील पुष्पेंचि सुजाण जैसा? ॥१॥

४५ सेखो पठवि विजेस्सति* यमलोकं च इमं सदेवकं ।
सेखो धम्मपदं सुदेसितं कुसलो पुप्फमिव पचेस्सति ॥२॥

४५ ही पृथ्वी आणि देव-(लोका) सहित यमलोक [यमलोक आणि देवलोक] यांना [बुद्ध-] शिष्य जिंकील. कुशल (माणूस) जसे फूल वेचितो, तसे चांगल्या प्रकारे उपदेशिलेले धर्मपद शिष्य वेचील.

४५ पृथ्वी ही जिंकीलचि [बुद्ध-] शिष्य
तैसें यमाच्या सह देवलोकां ।
स्वाख्यात-धर्मवचनें हि शिष्य
वेंचील पुष्पेंचि सुजाण जैसा ॥२॥

४६ फेणूपमं कायमिमं विदित्वा
मरीचिधम्मं अभिसम्बुधानो ।
छेत्वान मारस्स पपुप्फकानि
अदस्सनं मच्चुराजस्स गच्छे ॥३॥

४६ ही काया फेसाप्रमाणे (आहे असे) समजून (तिची) स्थिती मृगजलवत् आहे हे यथार्थ जाणणारा माराचे पुष्प (बाण) छेदून मृत्युराजाच्या दृष्टीला पडत नाही.

४६ काया जणूं फेसचि मानुनी ही
जाणून धर्मा मृगतृष्णिकेच्या ।
मारचिये छेदुन पुष्पबाण
दृष्टी पडे मृत्युराजाचिये ना ॥३॥

४७ पुप्फानि हेव पचिनन्तं ब्यासत्तमनसं नरं ।
सुत्तं गामं महोघो'व मच्चु आदाय गच्छति ॥४॥

४७ ज्याचे मन आसक्तीने व्याकुळ झाले आहे अशा माणसाला जणू काय पुष्पे वेचीत असतानाच, निजलेल्या गावाला जसा महापूर ओढून नेतो तसा, मृत्यु ओढून घेऊन जातो.

---

*४४ वरील टीप पहा.

४७ वेचितांनाचि पुष्पे कीं नरा आसक्तमानसा ।
मृत्यु घेऊन जाई तो ग्रामा निद्रिस्त पूरसा ।।४।।

४८ पुप्फानि हे व पचिनन्तं ब्यासत्तमनसं नरं ।
अतित्तं येवँ कामेसु अन्तको कुरुते वसं ।।५।।

४८ ज्याचे मन आसक्तीने व्याकुळ झाले आहे, अशा माणसाला, कामना अतृप्त राहिल्या असतानाच, जणू काय पुष्पे वेचीत असताना मृत्यु वश करतो.

४८ वेचितांनाचि पुष्पें कीं नरा आसक्त-मानसा ।
अतृप्त असतां काम कृतान्त करितो वश ।।५।।

४९ यथाऽपि भमरो पुप्फं वण्णगन्धं अहेठयं ।
पलेति रसमादाय एवं गामे मुनी चरे ।।६।।

४९ भ्रमर जसा पुष्पाचे, (त्याच्या) वर्णाची व गन्धाची हानि (खराबी) केल्याशिवाय, (केवळ) रसग्रहण करून पळतो, तसे मुनीने गावात (भिक्षेसाठी) फिरावे.

४९ जेवीं भ्रमर पुष्पाच्या वर्णगन्धां न बाधितां ।
पळतो रस घेवोनी गांवीं मुनि फिरो तसा ।।६।।

५० न परेसं विलोमानि न परेसं कताकतं ।
अत्तनो'व अवेक्खेय्य कतानि अकतानि च ।।७।।

५० परक्यांनी जे केले (किंवा) न केले, (किंवा) विपरीत केले, ते न बघता आपणच जे केले किंवा केले नाही ते बघावे.

५० परें केल न केल जे विपरीत बघूं नये ।
बघावें जें न केल वा केल आपणची स्वयें ।।७।।

५१ यथाऽपि रुचिरं पुप्फं वण्णवन्तं अगन्धकं ।
एवं सुभासिता वाचा अफला होति अकुब्बतो ।।८।।

५१ ज्याप्रमाणे शोभिवंत पुष्प रंग असून सुवास नसला तर ते निरुपयोगी होते, त्याप्रमाणे [बोलांसारखे] आचरण न करणाऱ्याचे सुभाषित बोल निरर्थक ठरतात.

५१ व्यर्थ तें पुष्प वर्णी जें शोभे गन्ध परी नसे ।
सुभाषित तसे बोल व्यर्थ ते जो न आचरी ।।८।।

५२ यथाऽपि रुचिरं पुप्फं वण्णवन्तं सगन्धकं ।
एवं सुभासिता वाचा सफला होति सकुब्बतो ॥९॥

५२ ज्याप्रमाणे शोभिवंत पुष्प रंग असून सुवासही असला तर ते सफल होते त्याप्रमाणे बोलांसारखे आचरण करणाऱ्याचे सुभाषित बोल सफल ठरतात.

५२ सार्थ तें पुष्प शोभे जें वर्णीं गन्धहि त्या असे ।
सुभाषित तसे बोल सार्थ ते जो हि आचरी ॥९॥

५३ यथाऽपि पुप्फरासिम्हा कयिरा मालागुणे बहू ।
एवं जातेन मच्चेन कत्तब्बं कुसल बहुं ॥१०॥

५३ ज्याप्रमाणे पुष्पराशीतून माळांचे अनेक सर करावेत त्याप्रमाणे जन्माला आलेल्या मर्त्य माणसाने अनेक कुशल कर्मे करावीत.

५३ करावें सर माळांचे पुष्पराशींतुनी बहू ।
तेवी मर्त्यें करावीं कीं कर्में कुशलची बहू ॥१०॥

५४ न पुप्फगन्धो पटिवातमेति
न चन्दनं तगर-मल्लिका वा ।
सतं च गन्धो पटिवातमेति
सब्बा दिसा सप्पुरिसो पवाति ॥११॥

५४ पुष्पाचा सुगन्ध व चन्दन, तगर, मोगरा (यांचा सुगन्ध) वाऱ्याच्या विरुद्ध [दिशेने] जात नाही. सत्पुरुषाचा सुगन्ध मात्र वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने [ही] जातो. सत्पुरुष सर्व दिशांना सुगन्ध पसरवितो.

५४ न गन्ध जाई पवनाविरुद्ध
तो मोगरा-तगरा-चन्दनाचा ।
सर्वां दिशीं सज्जन-गन्ध वाहे
वाऱ्याविरुद्ध प्रसरीत राहे ॥११॥

५५ चन्दनं तगरं वाऽपि उप्पलं अथ वस्सिकी ।
एतेसं गन्धजातानं सीलगन्धो अनुत्तरो ॥१२॥

५५ चन्दन, तगर किंवा कमळ, तसेच जाई या (सर्वांच्या) गन्धसमूहापेक्षा शीलगन्ध श्रेष्ठ आहे.

५५ जाई-तगर तैसेंही पद्म-चन्दन यांचिया ।
समूहीं, श्रेष्ठ शीलाचा गन्ध सर्वां वरिष्ठ हा ॥१२॥

५६ अप्पमत्तो अयं गन्धो यायं तगरचन्दनी।
योच सीलवतं गन्धो वाति देवेसु उत्तमो ॥१३॥

५६ जो हा तगराचा किंवा चन्दनाचा गंध आहे तो फार अल्प (हलका) आहे; पण जो शीलवान् माणसांचा गंध आहे तो उत्तम असून देवांमध्ये पसरतो.

५६ अल्पमात्र असे गन्ध जो यां तगरचन्दनां।
गन्ध तो शीलवंतांचा वाहे देवांत उत्तम ॥१३॥

५७ तेसं संपन्नसीलानं अप्पमादविहारिनं।
सम्मदञ्ञा-विमुत्तानं मारो मग्गं न विन्दति ॥१४॥

५७ (जे) शीलसंपन्न आहेत, अप्रमादाने वागतात, सम्यक् ज्ञान झाल्यामुळे विमुक्त झाले आहेत त्यांचा माग माराला सापडत नाही.

५७ शीलसंपन्न होवोनी अप्रमादेंचि वर्तुनी।
सम्यक्-ज्ञानें विमुक्तांचा मारा माग न सांपडे ॥१४॥

५८ यथा सङ्कारधानस्मिं उज्झितस्मिं महापथे।
पदुमं तत्थ जायेथ सुचिगन्ध मनोरमं ॥१५॥

५८ ज्याप्रमाणे मोठ्या रस्त्यावरील, ज्यात संकार म्हणजे कचरा टाकतात अशा उकिरड्यावर, ज्याचा गंध शुचि आहे (व जे) मनोरम आहे असे कमळ (फूल) उगवते.

५८ उकिरडा रस्त्यांतील कचरा टाकिती जिथें।
तें पद्मं उगवे जैसें शुचिगन्ध मनोरम ॥१५॥

५९ एवं सङ्कारभूतेसु अन्धभूते पुथुज्जने।
अतिरोचति पञ्ञाय सम्मासम्बुद्धसावको ॥१६॥

पुप्फवग्गो चतुत्थो।

५९ त्याप्रमाणे उकिरड्यासम बनलेल्या व अन्ध झालेल्या सामान्य जनात सम्यक्-संबुद्धाचा श्रावक प्रज्ञेने झळकतो.

५९ उकिरडा जणूं झाल अन्ध सामान्य जे जन।
प्रज्ञेनें दिपवी त्यांना सम्यक्-संबुद्ध-शिष्य तो ॥१६॥

चौथा पुष्पवर्ग समाप्त.

५
[बालवग्गो]

६० दीघा जागरतो रत्ति, दीघं सन्तस्स योजनं।
दीघो बालानं संसारो सद्धम्मं अविजानतं ॥१॥

[बालवर्ग]

६० जो जागत राहिला आहे त्याला रात्र लांब वाटते. जो थकला आहे त्याला योजन लांब वाटते. सद्धर्म न जाणणाऱ्या मूर्खांचा संसार फार लांब होतो (म्हणजे संपत नाही).

६० जागत्या रात्र ती लांब श्रान्ताला दीर्घ योजन।
मूर्खांचा लांब संसार जे सद्धर्म न जाणती ॥१॥

६१ चरं चे नाधिगच्छेय्य सेय्यं सदिसमत्तनो।
एकचरियं दळ्हं कयिरा नत्थि बाले सहायता ॥२॥

६१ संचार करीत असता जर आपल्यापेक्षा श्रेयस्कर किंवा आपणा सदृश असा [सोबती] मिळाला नाही तर एकटेच फिरण्याचा दृढ [निश्चय] करावा. मूर्खांशी संगती नको.

६१ आपणा योग्य वा श्रेष्ठ मिळे न फिरतां जरी।
निश्चयें एकटें हिंडा मूर्खांशीं संगती नको ॥२॥

६२ पुत्ता मत्थि धनं मत्थि इति बालो विहञ्ञति।
अत्ता हि अत्तनो नत्थि कुतो पुत्ता कुतो धनं ॥३॥

६२ पुत्र माझे आहेत, धन माझे आहे या कल्पनेने मूर्ख मारला जातो. जर आपणच मुळी आपले नाही तर कुठचे पुत्र आणि कुठचे धन ?

६२ पुत्र माझे वित्त माझें मूर्ख यांनेंच मारिला।
पुत्र कैंचे वित्त कैंचे नाहीं आपण आपला ॥३॥

६३ यो बालो मञ्ञति बाल्यं पण्डितो वाऽपि तेन सो।
बालो च पण्डित-मानी स वे बालो'ति वुच्चति ॥४॥

६३ जो मूर्ख (आपला) मूर्खपणा मान्य करतो, तेवढ्यानेच तो पण्डित होतो. पण मूर्ख असून जो आपणास पण्डित मानतो त्याला [खरा] मूर्ख म्हणतात.

६३ मूर्खता आपुली मानी मूर्ख पण्डित होत तें।
म्हणती त्या (खरा) मूर्ख मानी ज्ञानी जो आपणां ॥४॥

६४ यावजीवंऽपि चे बालो पण्डितं पयिरुपासति।
न सो धम्मं विजानाति दब्बी सूपरसं यथा ॥५॥

६४ मूर्खाने जरी पण्डिताची यावज्जीव पर्युपासना केली तरी त्याला धर्माचे ज्ञान होत नाही, जसे पळीला आमटीच्या स्वादाचे ज्ञान होत नाही.

६४ यावज्जीव जरी मूर्खें पण्डिता पर्यूपासिलें।
नाकळे धर्म त्या, स्वाद आमटीचा पळी न घे ॥५॥

६५ मुहुत्तमपि चे विञ्ञू पण्डितं पयिरुपासति।
खिप्पं धम्मं विजानाति जिव्हा सूपरसं यथा ॥६॥

६५ सुज्ञाने जरी मुहूर्तमात्र पण्डिताची पर्युपासना केली तरी त्याला तात्काळ धर्माचे ज्ञान होते, जसे जिभेला आमटीच्या स्वादाचे ज्ञान होते.

६५ मुहुर्तं पर्युपासोनी पण्डिता सुज्ञ घे त्वरें।
धर्मज्ञान, जसा स्वाद आमटीचा जिभेस ये ॥६॥

६६ चरन्ति बाला दुम्मेधा अमित्तेनेव अत्तना।
करोन्ता पापकं कम्मं यं होति कटुकप्फलं ॥७॥

६६ आपले आपणच स्वतःचे शत्रू होऊन दुर्बुद्ध मूर्ख (माणसे) वावरत असतात, व ज्यांचे फळ कडू आहे अशी पापकर्मे करीत असतात.

६६ वावरे मूर्ख दुर्बुद्धी आपला शत्रु आपण।
करीत पापकर्मे तो कटु ज्यांचे असे फळ ॥७॥

६७ न तं कम्मं कतं साधु यं कत्वा अनुतप्पति।
यस्स अस्सुमुखो रोदं विपाकं पटिसेवति ॥८॥

६७ ते कर्म करणे चांगले नव्हे की जे करून (करणारा) पश्चाताप पावतो, व ज्याचा परिणाम रडत रडत आसवे गाळीत (तो) भोगतो.

६७ बरें न कर्म तें केलें पस्तावे जें करूनिया।
रडतां अश्रू गाळीत ज्याचा भोगी विपाक तो ॥८॥

६८ तं च कम्मं कतं साधु यं कत्वा नानुतप्पति।
यस्स पतीतो सुमनो विपाकं पटिसेवति ॥९॥

६८ आणि ते कर्म करणे चांगले की जे करून (करणारा) पश्चात्ताप पावत नाही, व ज्याचा परिणाम संतुष्ट होऊन व प्रसन्न मनाने (तो) अनुभवतो.

६८ **बरें तें कर्म केलेलें न पस्तावे करून जें ।**
तोष पावून सुमनें ज्याचा सेवी विपाक तो ।।९।।

६९ **मधु वा* मञ्ञती बालो याव पापं न पच्चति ।**
यदा च पच्चती पापं (अथ) बालो दुक्खं निगच्छति ।।१०।।

६९ जोपर्यंत पाप परिपक्व होत नाही (तोपर्यंत) मूर्ख त्याला मधाप्रमाणे (गोड) मानतो. पण जेव्हा पाप परिपक्व होते तेव्हा (तो) मूर्ख दुःख पावतो.

६९ **मधुसें मानितो पाप जों न तें परिपक्व हो ।**
परिपक्व परी होतां मूर्ख दुःखास पावतो ।।१०।।

७० **मासे मासे कुसग्गेन बालो भुञ्जेथ भोजनं ।**
न सो सङ्खतधम्मानं कलिं अग्घति सोळसिं ।।११।।

७० मूर्ख जरी दर महिन्यास (एकदा) कुशाग्रावर मावेल इतकेच अन्न घेत राहिला तरी ज्यांनी धर्म जाणिला आहे त्यांच्या सोळाव्या कलेची देखील त्याला पावता येणार नाही.

७० **कुशाग्राइतुकें अन्न मासोमासींहि मूर्ख घे ।**
धर्मज्ञांच्या परी पात्र सोळाव्या न कलेस तो ।।११।।

७१ **न हि पापं कतं कम्मं सज्जु खीरं ' व मुच्चति ।**
डहन्तं बालमन्वेति भस्मच्छन्नो ' व पावको ।।१२।।

७१ जसे दूध तत्काळ फाटत नाही तसे वाईट (पाप) केलेले कर्म तत्काळ फळत नाही. राखेत झाकलेल्या अग्नीप्रमाणे ते जाळीत जाळीत मूर्खामागून येते.

७१ **कर्म वाईट केलेलें फाटेना दूधसें क्षणीं ।**
मागुते जाळिते मूर्खा अग्नि कीं भस्मिं झांकिला ।।१२।।

७२ **यावदेव अनत्थाय ञत्तं बालस्स जायति ।**
हन्ति बालस्स सुक्कंसं मुद्धमस्य विपातयं ।।१३।।

७२ मूर्खाला शिकविलेले सगळे काही अनर्थावहच होते. (व ते) त्याचे मस्तक फोडीत त्याच्या पुण्याईचा नाश करते.

---

*अ० — वा = इव.

७२ मूर्खा शिकविलें सारें अनर्थावह होतसे ।
मूर्खाच्या त्या शुभांशाला डोकें फोडीत नाशितें ।।१३।।

७३ असतं भावनमिच्छेय्य पुरेक्खारं च भिक्खुसु ।
आवासेसु च इस्सरियं पूजा परकुलेसु च ।।१४।।

७३ जी ध्यानभावना (आपण साधिली) नाही ती आहे असे म्हणण्याची, भिक्षूत पुढारी होण्याची, विहारात वर्चस्वाची (मुख्य होण्याची) व परकुलात (गृहस्थांच्या घरी) पूजा मिळविण्याची इच्छा (मूर्ख भिक्षु) धरतो.

७३ भिक्षूंमाजीं पुढारीत्व, नाहीं ती ध्यानभावना ।
विहारीं प्रभुता मूर्ख इच्छी पूजा दुज्या घरीं ।।१४।।

७४ ममेव कत मञ्ञन्तु गिही पब्बजिता उभो । ।
ममेवातिवसा अस्सु किच्चाकिच्चेसु किस्मिचि ।
इति बालस्य सङ्कप्पो इच्छा मानो च वड्ढति ।।१५।।

७४ गृहस्थ आणि प्रव्रजित दोघेही मीच केलेले मानोत. कोणतेही कृत्य किंवा अकृत्य असेल त्यांत ते मलाच पूर्ण वश असोत, असा मूर्ख (भिक्षूचा) संकल्प असतो. त्यामुळे केवळ इच्छा व मान (अहंकार) वाढतो.

७४ मानो माझेंच केलेलें गृहस्थ भिक्षुही तसें ।
कृत्याकृत्यीं कोणत्याही मलाच वश होउं दे ।
ऐसा संकल्प मूर्खाचा इच्छा मानहि वाढवी ।।१५।।

७५ अञ्ञा हि लाभूपनिसा अञ्ञा निब्बानगामिनी ।
एवमेतं अभिञ्ञाय भिक्खु बुद्धस्स सावको ।
सक्कारं नाभिनन्देय्य विवेकमनुब्रूहये ।।१६।।

बालवग्गो पञ्चमो ।

७५ लाभापाशी जाणे (बसणे) निराळे, (व) निर्वाणाप्रत जाणे निराळे, हे असे जाणून बुद्धाचा श्रावक असलेल्या भिक्षूने सत्काराचे स्वागत करू नये; विवेक म्हणजे एकांत वाढवावा.

७५ वेगळा मार्ग लाभाचा निर्वाणाचाहि वेगळा ।
ऐसें जाणून भिक्षूनें बुद्धाच्या श्रावकें पुरें ।
एकांत नित्य सेवावा सत्कारा आदरूं नये ।।१६।।

पाचवा बालवर्ग समाप्त.

६

[पण्डितवग्गो]

७६ निधीनं · व पवत्तारं यं पस्से वज्जदस्सिनं ।
निग्गय्हवादिं मेधाविं तादिसं पण्डितं भजे ।
तादिसं भजमानस्स सेय्यो होति न पापियो ।।१।।

[पंडितवर्ग]

७६ जणू काय निधी म्हणजे गुप्तधन दाखविणाऱ्या [व्यक्ती] प्रमाणे (सांगणाऱ्या [व्यक्ती] प्रमाणे), आपणांत जे वर्ज्य ते दाखविणारा, [वाईटापासून] मागे खेचून उपदेश करणारा असा कोणी बुद्धिवान् जर भेटला तर तशा प्रकारच्या पंडिताला भजावे. त्याच्यासारख्याला भजल्याने श्रेय होईल, अकल्याण होणार नाही.

७६ **प्राज्ञ जो दावितो दोष दावी गुप्त धना जणूं ।**
खेंचून मागुती बोले ऐसा पंडित भेटल्या ।
त्या भजावें, भजूनी त्या श्रेय पावे, न पाप कीं ।।१।।

७७ ओवदेय्यानुसासेय्य असब्भा च निवारये ।
सतं हि सो पियो होति असतं होति अप्पियो ।।२।।

७७ उपदेश करावा; शिकवणूक द्यावी; असभ्य [वर्तना] पासून निवारण करावे. असे करणारा सज्जनांना प्रिय होतो, दुर्जनांना अप्रिय होतो.

७७ **"वारा असभ्यापासून, शिकवा, उपदेश द्या"—**
ऐसें करी, सज्जनां तो प्रिय, अप्रिय दुर्जनां ।।२।।

७८ न भजे पापके मित्ते न भजे पुरिसाधमे ।
भजेथ मित्ते कल्याणे भजेथ पुरिसुत्तमे ।।३।।

७८ पापी मित्रांना भजू नये, पुरुषाधमांना भजू नये, कल्याण (-कारक) मित्रांना भजावे, पुरुषोत्तमांना भजावे.

७८ **भजूं नये मित्र पापी, न भजा पुरुषाधमां ।**
भजा कल्याणमित्रांना, भजावे पुरुषोत्तमां ।।३।।

७९ धम्मपीति सुखं सेति विप्पसन्नेन चेतसा ।
अरियप्पवेदिते धम्मे सदा रमति पण्डितो ।।४।।

७९ ज्याची धर्मावर प्रीति आहे, तो सुखाने (आणि) अतिशय प्रसन्न चित्ताने झोपतो. आर्यांनी उपदेशिलेल्या धर्मात (तो) पण्डित सदा रममाण होतो.

७९ धर्मी प्रीती जया, झोंपे सुप्रसन्न मनें सुखें ।
रमे पंडित तो धर्मी आर्यांनीं उपदेशिल्या ।।४।।

८० उदकं हि नयन्ति नेत्तिका*
उसुकारा नमयन्ति तेजनं ।
दारुं नमयन्ति तच्छका
अत्तानं दमयन्ति पण्डिता ।।५।।

८० कालवे किंवा पाट काढणारे पाण्याला (मार्ग) काढून पाणी नेतात. बाण करणारे शराला वाकवितात. सुतार तासून लाकूड वाकवितात. पण्डित स्वतःचे दमन करतात.

८० उदका वळवीत पाट-कार
शर वांकवितात बाणकार ।
नित वांकवि लांकुडा सुतार
आत्म्याला दमितात जाणकार ।।५।।

८१ सेलो यथा एकघनो वातेन न समीरति
एवं निन्दापसंसासु न समिञ्जन्ति पण्डिता ।।६।।

८१ ज्याप्रमाणे घनतेत संलग्न होऊन एक झालेला डोंगर वाऱ्याने हालत नाही, त्याप्रमाणे निन्दा किंवा प्रशंसा केली असता पंडित कंप पावत नाहीत.

८१ वातें न हाले जैसा कीं एकत्वें घन पर्वत ।
तैसा निंदाप्रशंसांनीं कंप पावे न पंडित ।।६।।

८२ यथापि रहदो गंभीरो विप्पसन्नो अनाविलो ।
एवं धम्मानि सुत्वान विप्पसीदन्ति पण्डिता ।।७।।

८२ ज्याप्रमाणे डोह सखोल, सुप्रसन्न (असतो) व गढूळ नसतो, त्याप्रमाणे धर्मवाक्ये ऐकून पंडित सुप्रसन्नता पावतात.

८२ गंभीर डोह कीं जेवीं सुप्रसन्न, गढूळ ना ।
धर्माच्या श्रवणें तेवीं पंडिता ये प्रसन्नता ।।७।।

*गाथा १४५ पहा.

८३ सब्बत्थ वे सप्पुरिसा चजन्ति
न कामकामा लपयन्ति सन्तो ।
सुखेन फुट्ठा अथ वा दुखेन
न उच्चावचं पण्डिता दस्सयन्ति ।।८।।

८३ सत्पुरुष सर्वत्र त्याग करतात; कामांच्या कामनेने साधुजन विलाप करीत नाहीत. सुखाने अथवा दुःखाने स्पर्श केला असता पंडित वर-खाली झालेले दाखवीत नाहीत.

८३ सर्वत्र कीं त्याग करीत संत
न कामकामी करिती विलाप ।।
दुःखें सुखें पंडितां स्पर्शिल्या, ते
झालें न खालीं-वर दाखवीती ।।८।।

८४ न अत्तहेतु न परस्स हेतु
न पुत्तमिच्छे न धनं न रट्ठं ।
धन इच्छेय अधम्मेन समिद्धिमत्तनो
स सीलवा पञ्ञवा धम्मिको सिया ।।९।।

८४ आपणाकरिता अगर दुसऱ्याकरिता पुत्र, धन, राष्ट्र (राज्य) यांची इच्छा करू नये. अधर्माने आपली स्वतःची समृद्धी इच्छू नये. (त्याने) शीलवान, प्रज्ञावान् व धार्मिक व्हावे.

८४ कीं आपणाला परक्या तसेंही
इच्छूं नये पुत्र धनें नि राज्य ।
इच्छी अधर्मे न स्वतः समृद्धि
तो शीलवान् प्राज्ञ धार्मीक होई ।।९।।

८५ अप्पका ते मनुस्सेसु ये जना पारगामिनो ।
अथायं इतरा पजा तीरमेवानुधावति ।।१०।।

८५ जे (तरून) पार जाणारे (आहेत) अशी माणसे मनुष्यांत फारच थोडी असतात. आणि हे इतरेजन तीराच्या कडेनेच धावत असतात.

८५ विरळा ते मनुष्यांत पार जाती तरून जे ।
तीराच्या बाजुनें लोक हे कीं इतर धांवती ।।१०।।

८६ ये च खो सम्मदक्खाते धम्मे धम्मानुवत्तिनो ।
ते जना पारमेस्सन्ति मच्चुधेय्यं सुदुत्तरं ॥११॥

८६ परंतु जे खरोखर धर्म सम्यक् उपदेशिला असता (त्या) धर्माप्रमाणे वर्तन करतात, ती माणसे मृत्यूच्या सुदुस्तर अशा लक्ष्याच्या (क्षेत्राच्या) पार जातात.

८६ सु-उपदिष्ट धर्मी जे धर्ममार्गेच वर्तती ।
मृत्यूच्या दुस्तर क्षेत्रा-पार जातात ते नर ॥११॥

८७ कण्हं धम्मंविप्पहाय सुक्कं भावेथ पण्डितो ।
ओका अनोक आगम्म विवेके यत्थ दूरमं ॥१२॥

८८ तत्राभिरतिमिच्छेय्य हित्वा कामे अकिचञ्नो ।
परियोदपेय्य अत्तानं चित्तक्लेसेहि पण्डितो ॥१३॥

८७-८८ पंडिताने कृष्णधर्म सोडून शुक्लधर्माची भावना करावी (म्हणजे शुक्लधर्म आत्मसात् करावा). घरांतून बाहेर घर नसलेल्या स्थितीत यावे. (व) जेथे रमणे कठीण अशा एकान्तात सुख मानावे; कामना सोडून अकिंचन होऊन पंडिताने चित्ताच्या मलांपासून आपणांस स्वच्छ करावे.

८७ वाढवावा शुक्लधर्म कृष्ण टाकून पंडितें ।
गृहांतूनी अगृहांत एकान्तांतचि जें रमे ॥१२॥

८८ चित्त तें आवडी ठेवी; काम सोडी; अकिंचनें
मळांपासून चित्ताच्या करावें स्वच्छ आपणां ॥१३॥

८९ येसं सम्बोधि-अङ्गेसु सम्मा चित्तं सुभावितं ।
आदानपटिनिस्सग्गे अनुपादाय ये रता ।
खीणासवा जुतीमन्तो ते लोके परिनिब्बुता ॥१४॥

पण्डितवग्गो छट्ठो ।

८९ संबोधीची जी अंगें त्यांची ज्यांनी चित्तात उत्तम प्रकारे भावना केली आहे, जे काहीही न घेता, घेतलेले सोडण्यातच रममाण (मग्न) झाले आहेत, ज्यांचे आस्रव म्हणजे विकार क्षीण झाले आहेत असे जे तेजस्वी ते या जगीं (खरे) परिनिर्वाण पावले आहेत.

८९ भावित चित्त ज्यांचें कीं संबोध्यंगांत उत्तम ।
अनासक्त ते रमले स्वी-कृताच्या विसर्जनीं ।
तेजस्वी ते क्षीणदोष परिनिर्वाण पावल ।।१४।।

सहावा पंडितवर्ग समाप्त.

७

[अरहन्तवग्गो]

९० गतद्धिनो विसोकस्स विप्पमुत्तस्स सब्बधि ।
सब्बगन्थप्पहीनस्स परिळाहो न विज्जति ।।१।।

(अर्हन्तवर्ग)

९० ज्याचा (प्रवास-) मार्ग संपला आहे, जो शोकरहित (व) सर्व प्रकारे (बाजूंनी) विमुक्त झाला आहे, ज्याच्या सर्व गाठी तुटल्या (सुटल्या) आहेत, त्याला परिदाह म्हणजे संताप होत नाही.

९० प्रवास संपे, ना शोक, सर्व बाजूंस मुक्त जो
तुटल्या सर्वही गांठी परिदाह न त्या घडे ।।१।।

९१ उय्युञ्जन्ति सतीमन्तो न निकेते रमन्ति ते ।
हंसा 'व पल्ललं हित्वा ओकमोकं जहन्ति ते ।।२।।

९१ ते स्मृति (जागृत) ठेवणारे उद्योगात दक्ष असतात; घरात रमत नाहीत. हंस जसे पल्वल सोडून निघून जातात, तसे ते वसतीमागून वसती सोडतात.

९१ उद्युक्त स्मृति राखूनी, न घरीं रमती खरे ।
वस्ती बदलिती जैशी हंस पल्वल सोडुनी ।।२।।

९२ येसं संनिचयो नत्थि ये परिञ्ञात-भोजना ।
सुञ्ञतो अनिमित्तो च विमोक्खो यस्स गोचरो ।
आकासे व सकुन्तानं गति तेसं दुरन्नया ।।३।।

९२ ज्यांच्यापाशी संग्रह नाही, ज्यांनी भोजनाचा अर्थ जाणलेला आहे, शून्य आणि अनिमित्त (म्हणजे ओळखता येईल असे लक्षण किंवा चिन्ह नसलेला) असा मोक्ष ज्यांचे दृष्टिपथात आहे, त्यांची गती आकाशातील पक्ष्याच्या गतीप्रमाणे शोधणे कठीण आहे.

९२ भोजनीं मर्म जाणती, संचया न करीत जे ।
देखीती मोक्ष, जो शून्य, लक्षणीं जो न वर्णवे ।
आकाशीं गति पक्ष्याची, तशी त्यांची न जाणवे ॥३॥

९३ यस्सासवा परिक्खीणा आहारे च अनिस्सितो ।
सुञ्ञतो अनिमित्तो च विमोक्खो यस्स गोचरो ।
आकासे · व सकुन्तानं पदं तस्स दुरन्नयं ॥४॥

९३ ज्याचे आश्रव (विकार) क्षीण झाले आहेत, आहाराविषयी जो अनासक्त आहे, शून्य आणि अनिमित्त (म्हणजे ओळखता येईल असे लक्षण किंवा चिन्ह नसलेला) असा मोक्ष ज्याचे दृष्टिपथात आहे, त्याचा मार्ग आकाशातील पक्ष्याच्या मार्गाप्रमाणे शोधणे कठीण आहे.

९३ आहारीं जो अनासक्त क्षीण ज्याचे विकारही ।
देखितो मोक्ष, तो शून्य, लक्षणीं जो न वर्णवे ।
आकाशीं मार्ग पक्ष्याचा, तसा त्याचा न जाणवे ॥४॥

९४ यस्सिन्द्रियानि समथं गतानि
अस्सा यथा सारथिना सुदन्ता ।
पहीनमानस्स अनासवस्स
देवाऽपि तस्स पिहयन्ति तादिनो ॥५॥

९४ सारथ्याने उत्तम रीतीने वश (तयार) करून ताब्यात ठेवलेल्या घोड्याप्रमाणे ज्याची इन्द्रिये शम पावली आहेत, ज्याने अभिमान सोडला आहे, व ज्याचे आश्रव म्हणजे विकार नाहीसे झाले आहेत, अशा पुरुषाचा देव देखील हेवा करतात.

९४ जें इन्द्रियें कीं शम पावतात
सूतें जणूं अश्व वशींहि नेले ।
जो मान सोडी नि विकार नाशी
हेवा तयाचा करती हि देव ॥५॥

९५ पठवीसमो नो विरुज्झति
इन्दखीलूपमो तादि सुब्बतो ।
रहदो · व अपेतकद्दमो
संसारा न भवन्ति तादिनो ॥६॥

९५ जो पृथ्वीप्रमाणे कोणाचा प्रतिकार करीत नाही, जो नगरद्वारासमोरच्या स्तंभाप्रमाणे स्थिर असा सुव्रत, जो चिखल नाहीसा झालेल्या डोहाप्रमाणे (निर्मल), त्याच्यासारख्याला संसार नाही.

९५ पृथ्वी जसा जो न करी विरोध
कीं इन्द्रखील स्थिर सुव्रतीं जो ।
कीं डोहसा कादव जेथ नाहीं
संसार त्याच्या सरिख्यास नाहीं ॥६॥

९६ सन्तं तस्स मनं होति सन्ता वाचा च कम्म च ।
सम्मदञ्ञा-विमुत्तस्स उपसन्तस्स तादिनो ॥७॥

९६ सम्यक्-ज्ञान झाल्यामुळे जो विमुक्त (आणि) उपशान्त झाला आहे अशासारख्याचे मन शान्त होते, वाचा शान्त होते आणि कर्म शान्त होते.

९६ मन त्याचें शान्त वाचा शान्त कर्म नि शान्तही
सम्यक्-ज्ञानें मुक्त होतां उपशान्तहि जो असा ॥७॥

९७ अस्सद्धो अकतञ्ञू च सन्धिच्छेदो च यो नरो ।
हतावकासो वन्तासो स वे उत्तमपोरिसो ॥८॥

९७ अश्रद्ध (श्रद्धेची जरूरी नसलेला, पक्षी श्रद्धा नसलेला), अकृतज्ञ (जे घटित नाही ते जाणणारा, पक्षी कृतज्ञ नसलेला), सन्धिच्छेद (सर्व संबंध तोडणारा पक्षी घरफोड्या चोर) हतावकाश (अवकाश म्हणजे पुनर्जन्माची सन्धी ज्याची सरली आहे, पक्षी ज्याने (दिलेल्या) सन्धी गमाविल्या आहेत, वन्ताश, (ज्याने आशा सोडिल्या आहेत, पक्षी जेवलेले ओकून टाकिले आहे) असा जो पुरुष तोच उत्तम पुरुष होय.

९७ अश्रद्ध जो अकृतज्ञ, संधिच्छेदक जो नर ।
हतावकाश, वान्ताश तो खरा पुरुषोत्तम ॥८॥

९८ गामे वा यदि वाऽरञ्ञे निन्ने वा यदि वा थले ।
यत्थारहन्तो विहरन्ति तं भूमिं रामणेय्यकं ॥९॥

९८ ग्रामात किंवा अरण्यात, खोलगटात किंवा उंचवटयावर, जेथे अर्हन्त राहतात, त्यालाच भूमीची रमणीयता म्हणतात (म्हणजे ती भूमि रमणीय होते).

९८ ग्रामीं किंवा अरण्यांत उंच खोलगट स्थळीं ।
विहरे जेथ अर्हन्त ती भूमी-रमणीयता ॥९॥

९९ रमणीयानि अरञ्ञानि यत्थ न रमती जनो ।
वीतरागा रमिस्सन्ति न ते कामगवेसिनो ॥१०॥

अरहन्तवग्गो सत्तमो ।

९९ जी अरण्ये रमणीय आहेत; जेथे (सामान्य) जन रमत नाहीत (तेथे) वीतराग (पुरुष) रमतात, (कारण) ते कामाच्या मागे लागले नाहीत—कामसुखें शोधीत नाहीत.

९९ रमणीयें अरण्यें जें सामान्य जन ना रमे ।
रमती ही वीतराग न कामसुख शोधिती ॥१०॥

सातवा अर्हन्तवर्ग समाप्त.

८

[सहस्सवग्गो]

१०० सहस्समपि चे वाचा अनत्थपदसंहिता ।
एकं अत्थपदं सेय्यो यं सुत्वा उपसम्मति ॥१॥

(सहस्रवर्ग)

१०० अर्थ नसलेल्या पदांनी गुंफिलेली हजार वचने जरी असली तरी अर्थयुक्त एक पद (शब्द) त्याहून श्रेयस्कर, जे ऐकल्याने (माणूस) उपशम पावतो.

१०० हजार असुं दे वाचा अनर्थपदसंहिता ।
भलें अर्थपद एक, जें ऐकूनि निवे मन ॥१॥

१०१ सहस्समपि चे गाथा अनत्थपदसंहिता ।
एकं गाथापदं सेय्यो यं सुत्वा उपसम्मति ॥२॥

१०१ अर्थ नसलेल्या पदांनी गुंफिलेल्या हजार गाथा जरी असल्या तरी अर्थयुक्त एक गाथा-पद त्याहून श्रेयस्कर, जे ऐकिल्याने (माणूस) उपशम पावतो.

१०१ हजार असुं दे गाथा अनर्थपदसंहिता ।
भलें गाथापद एक, जें ऐकूनि निवे मन ॥२॥

१०२ यो च गाथासतं भासे अनत्थपदसंहिता ।
एकं धम्मपदं सेय्यो यं सुत्वा उपसम्मति ॥३॥

१०२ अर्थ नसलेल्या पदांनी गुंफिलेल्या शंभर गाथा जरी कोणी बोलला तरी एक धर्मपद श्रेयस्कर जे ऐकून (माणूस) उपशम पावतो.

१०२ गाथा-शत जरी बोलें अनर्थपदसंहित ।
भलें धर्मपद एक जें ऐकूनी निवे मन ॥३॥

१०३ यो सहस्सं सहस्सेन सङ्गामे मानुसे जिने ।
एकं च जेय्यमत्तानं स वे सङ्गामजुत्तमो ॥४॥

१०३ संग्रामात हजार पटीने हजार माणसांना जिंकतो त्यापेक्षा एकट्या आपणाला जो जिंकतो, तो संग्राम जिंकणाऱ्यात उत्तम (श्रेष्ठ) होय.

१०३ हजारपटिनें जिंकी सहस्र नर जो रणीं ।
आपणां एकट्या जिंकी श्रेष्ठ तो रणजित् परी ॥४॥

१०४ अत्ता हवे जितं सेय्यो या चायं इतरा पजा ।
अत्तदन्तस्स पोसस्स निच्चं संयतचारिनो ॥५॥

१०५ नेव देवो न गन्धब्बो न मारो सह ब्रह्मुना
जितं अपजितं कयिरा तथारूपस्स जन्तुनो ॥६॥

१०४-१०५ इतरेजनावर (इतर प्रजेवर) जय मिळविण्यापेक्षा स्वतःवर जय मिळविणे हे खरोखर अधिक श्रेयस्कर होय. तशा प्रकारच्या आत्मदमन केलेल्या, नित्य संयमाने आचरण करणाऱ्या पुरुषाने मिळविलेल्या जयाचा देव, गंधर्व किंवा मार, त्यांना ब्रह्मदेव साहाय झाला तरी सुद्धा, अपजय करू शकत नाहीत.

१०४ अन्य लोकांहूनी साच आपणां जिंकिणें बरें ।
करुनी आत्मदमन वागे जो नित्य संयमें ॥५॥

१०५ या नराच्या जयाचा कीं देव-गन्धर्व-मारही
करिती ना अपजय, ब्रह्मा साहाय त्यां जरी ॥६॥

१०६ मासे मासे सहस्सेन यो यजेथ सतं समं ।
एकं च भावितऽत्तानं मुहुत्तमपि पूजये ।
सा एव पूजना सेय्यो यञ्चे वस्ससतं हुतं ॥७॥

१०६ हजार खर्च करून दर महिन्याला एक यज्ञ असे शंभर वर्षेपर्यंत कुणी यज्ञ करील आणि भावितात्मा असलेल्या एकाच पुरुषाची जर केवळ मुहूर्तभर पूजा करील तर त्या शंभर वर्षे केलेल्या हवनापेक्षा ती पूजाच अधिक श्रेयस्कर होय.

१०६ प्रतिमासीं सहस्त्रानें शत वर्षें यजी जरी ।
एकाच भावितात्म्याला मुहूर्तभर पूजिलें ।
तीच पूजा श्रेष्ठ यज्ञां-पेक्षां वर्ष-शताचिया ।।७।।

१०७ यो च वस्ससतं जन्तु अग्गि परिचरे वने ।
एकं च भावितऽत्तानं मुहुत्तमपि पूजये ।
सा एव पूजना सेय्यो यञ्चे वस्ससतं हुतं ।।८।।

१०७ जर कोणी माणूस शंभर वर्षेपर्यंत वनात अग्नीची परिचर्या करील, आणि भावितात्मा असलेल्या एकाच पुरुषाची जर केवळ मुहूर्तभर पूजा करील तर त्या शंभर वर्षे केलेल्या हवनापेक्षा ती पूजाच अधिक श्रेयस्कर होय.

१०७ अग्नी उपासिला कोणी शतवर्षे जरी वनीं ।
एकाच भावितात्म्याला मुहूर्तभर पूजिलें ।
पूजा ती हवनाहूनी श्रेष्ठ वर्ष-शताचिया ।।८।।

१०८ यं किञ्चित यिट्ठं · व हुतं · व लोके
संवच्छरं यजेथ पुञ्ञऽपेक्खो ।
सब्बं पि तं न चतुभागमेति
अभिवादना उज्जुगतेसु सेय्यो ।।९।।

१०८ पुण्याच्या अपेक्षेने या लोकी वर्षभर जे काही हवन केले असेल त्या सगळ्यालाही ऋजु चालणाऱ्या सत्पुरुषांच्या वंदनाच्या चवथ्या भागाइतके ही महत्त्व नाही; ते वंदन (च) श्रेयस्कर होय.

१०८ लोकीं यजी जें हुत इष्ट कांहीं
वर्षांत, ठेवून पुण्यीं अपेक्षा ।
तुळे न तें सर्व चतुर्थ भागा
जी वंदना श्रेष्ठ ऋजू जनांची ।।९।।

१०९ अभिवादन-सीलिस्स निच्चं वद्धापचायिनो ।
चत्तारो धम्मा वड्ढन्ति—आयु वण्णो सुखं बलं ।।१०।।

१०९ अभिवादन हे ज्याचे शील आहे, जो नित्य वृद्धांना सन्मान देतो, त्याचे चार गुणधर्म वाढतात—आयुष्य, वर्ण म्हणजे कांति, सुख [आणि] बल.

१०९ अभिवादन ज्या शील, वृद्धां सन्मान नित्य दे ।
वाढती चार–आयुष्य, बल, कान्ति नि सौख्य त्या ।।१०।।

११० यो च वस्ससतं जीवे दुस्सीलो असमाहितो ।
एकाहं जीवितं सेय्यो सीलवन्तस्स झायिनो ॥११॥

११० दुःशील [आणि] असमाहित जरी शंभर वर्षे जगला तरी त्यापेक्षा शीलवन्ताचे [व] ध्यानरत माणसाचे एक दिवस जगणे श्रेयस्कर होय.

११० जगे शंभर वर्षे जो दुःशील असमाहित ।
ध्यानी जो शीलवान् त्याचें दिनैक जगणें बरें ॥११॥

१११ यो च वस्ससतं जीवे दुप्पञ्ञो असमाहितो ।
एकाहं जीवितं सेय्यो पञ्ञावन्तस्स झायिनो ॥१२॥

१११ जो दुष्प्रज्ञ (म्हणजे ज्याची दुष्ट प्रज्ञा आहे) आणि असमाहित (आहे तो जरी) शंभर वर्षे जगला तरी त्यापेक्षा जो प्रज्ञावान् आणि ध्यानरत आहे त्याचे एक दिवस जगणे श्रेयस्कर.

१११ जगे शंभर वर्षे जो दुर्बुद्धी असमाहित ।
ध्यानी सुबुद्ध जो त्याचें दिनैक जगणें बरें ॥१२॥

११२ यो च वस्ससतं जीवे कुसीतो हीनवीरियो ।
एकाहं जीवितं सेय्यो विरियमारभतो दळ्हं ॥१३॥

११२ जो सुस्त आणि उत्साहहीन [आहे, तो जरी] शंभर वर्षे जगला, तरी त्यापेक्षा जो दृढवीर्योत्साही आहे त्याचे एक दिवस जगणे श्रेयस्कर.

११२ जगें शंभर वर्षें कीं सुस्त उत्साहहीन जो ।
वीर्योत्साही दृढ त्याचें दिनैक जगणें बरें ॥१३॥

११३ यो च वस्ससतं जीवे अपस्सं उदयब्ययं ।
एकाहं जीवितं सेय्यो पस्सतो उदयब्ययं ॥१४॥

११३ जो उदय म्हणजे जन्मास येणे आणि व्यय म्हणजे मरणे ह्यांची दखल न घेता शंभर वर्षे जरी जगला, तरी त्यापेक्षा ज्याने जन्म-मरणाची दखल घेतली आहे, त्याचे एक दिवस जगणे श्रेयस्कर.

११३ जगे शंभर वर्षें जो उदयास्त न पाहतां ।
उदयास्ता पाहत्याचें दिनैक जगणें बरें ॥१४॥

११४ यो च वस्ससतं जीवे अपस्सं अमतं पदं।
एकाहं जीवितं सेय्यो पस्सतो अमतं पदं ॥१५॥

११४ जो अमरत्वाचे पद म्हणजे स्थान ह्याची दखल न घेता शंभर वर्षे जरी जगला, तरी त्यापेक्षा अमरत्वाचे पदाची दखल घेणाऱ्याचे एक दिवस जगणे श्रेयस्कर होय.

११४ जगे शंभर वर्षे जो नेणतां पद अमृत।
पद अमृत जाणे तो दिनैक जगणें बरें ॥१५॥

११५ यो च वस्ससतं जीवे अपस्सं धम्ममुत्तमं।
एकाहं जीवितं सेय्यो पस्सतो धम्ममुत्तमं ॥१६॥

सहस्सवग्गो अट्ठमो।

११५ जो उत्तम धर्माची दखल न घेता शंभर वर्षे जरी जगला तरी त्यापेक्षा उत्तम धर्माची दखल घेणाऱ्याचे एक दिवस जगणे बरे.

११५ जगे शंभर वर्षे जो नेणतां धर्म उत्तम।
धर्म उत्तम जाणे तो दिनैक जगणें बरें ॥१६॥

आठवा सहस्रवर्ग समाप्त.

९

पापवग्गो

११६ अभित्थरेथ कल्याणे पापा चित्तं निवारये।
दन्धं हि करोतो पुञ्ञं पापस्मि रमती मनो ॥१॥

[पापवर्ग]

११६ पुण्य करण्याची त्वरा करावी; पापापासून चित्ताचे निवारण करावे. कारण मंदपणे किंवा संथपणे पुण्य करणाऱ्याचे मन पापात रमते.

११६ वारा पापाहुनी चित्त, जोडा पुण्य त्वरें बरें।
पुण्य संपादनीं मंद पापीं त्याचें रमे मन ॥१॥

११७ पापं चे पुरिसो कयिरा न तं कयिरा पुनप्पुनं।
न तम्हि छन्दं कयिराथ दुक्खो पापस्स उच्चयो ॥२॥

११७ माणसाने जर पाप केले तर ते पुनःपुनः करू नये. त्याचा (पापाचा) छंद घेऊ नये. पापाचा समुच्चय दुःखकारक आहे.

११७ नरें जरी पाप केलें, करावें न पुनः पुनः।
घेऊं नये छंद त्याचा दुःख दे पापसंचय ॥२॥

११८ पुञ्ञं चे पुरिसो कयिरा कयिराथेनं पुनप्पुनं।
तम्हि छन्दं कयिराथ सुखो पुञ्ञस्स उच्चयो ॥३॥

११८ माणसाने जर पुण्य केले तर ते पुनःपुनः करावे. त्याचा (पुण्याचा) छंद घ्यावा. पुण्याचा समुच्चय सुखकारक आहे.

११८ नरें कधीं पुण्य केलें करावें तें पुनः पुनः।
धरावा छंद त्याचाच, सुख दे पुण्यसंचय ॥३॥

११९ पापोऽपि पस्सति भद्रं याव पापं न पच्चति।
यदा च पच्चति पापं अथ पापो पापानि पस्सति ॥४॥

११९ जोपर्यंत पाप परिपक्व झाले नाही तोपर्यंत पापी माणसाला देखील मंगलच दिसते. परंतु जेव्हा पाप परिपक्व होते, तेव्हा पापी माणसाला पापाची जाण होते.

११९ पापीही शुभ पाहातो पक्व पाप न जोंवरी।
पाप जें पक्व होतें तें पापी पापचि पाहतो ॥४॥

१२० भद्रोऽपि पस्सति पापं याव भद्रं न पच्चति।
यदा च पच्चति भद्रं अथ भद्रो भद्रानि पस्सति ॥५॥

१२० जोपर्यंत शुभ (कृत्य) परिपक्व झाले नाही तोपर्यंत शुभकृत्य करणाऱ्याला देखील पापच दिसते. परंतु जेव्हा शुभकृत्य परिपक्व होते, तेव्हा शुभकृत्य करणाऱ्याला शुभाची जाण होते.

१२० अशुभा शुभकारीहि पाहे, ना शुभ पक्व जों।
शुभ जेव्हां पक्व होतें, शुभकारी शुभा बघे ॥५॥

१२१ माऽप्पमञ्ञेथ पापस्स न मं तं आगमिस्सति।
उदबिन्दुनिपातेन उदकुम्भो पि पूरति।
पूरति बालो पापस्स थोकथोकंऽपि आचिनं ।।६।।

१२१ पाप अल्प आहे, ते मजकडे येणार नाही (त्याचा माझ्यावर परिणाम होणार नाही) असे मानू नये. पाण्याचे थेंब थेंब पडून पाण्याचा घडा देखील पूर्ण भरतो. थोडे थोडेही (पाप) गोळा करणारा (जमविणारा) मूर्ख पापाने पूर्ण भरून जातो.

१२१ पाप अल्प, न येई तें माझ्या वाटे म्हणूं नये।
थेंबे थेंबेंहि पाण्याच्या घडाही भरतो पुरा।
मूर्ख पापें भरे थोडें-थोडेंही जमवीत तो ।।६।।

१२२ माऽप्पमञ्ञेथ पुञ्ञस्स न मं तं आगमिस्सति।
उदबिन्दुनिपातेन उदकुम्भो पि पूरति।
पूरति धीरो पुञ्ञस्स थोकथोकंऽपि आचिनं ।।७।।

१२२ पुण्य अल्प आहे, ते मजकडे येणार नाही (त्याचा माझ्यावर काय परिणाम होणार आहे) असे मानू नये. पाण्याचे थेंब थेंब पडून पाण्याचा घडा देखील पूर्ण भरतो. थोडे थोडेही (पुण्य) गोळा करणारा (जमविणारा) धीर पुरुष पुण्याने पूर्ण भरून जातो.

१२२ पुण्य अल्प, न येई तें माझ्यापाशीं म्हणूं नये।
थेंबें थेंबेंही पाण्याच्या घडाही भरतो पुरा।
धीर पुण्यें भरे थोडें-थोडेंही जमवीत तो ।।७।।

१२३ वाणिजो ˙व भयं मग्गं अप्पसत्थो महद्धनो।
विसं जीवितुकामो ˙व पापानि परिवज्जये ।।८।।

१२३ ज्याच्यापाशी खूप धन आहे व साथी थोडे आहेत असा वणिक् जसा धोक्याचा रस्ता टाळतो, जगू इच्छिणारा जसे विष टाळतो, तसे पापास टाळावे.

१२३ धोक्याचा मार्ग वाणी ज्या साथी थोडें, बहु धन।
विषा जगूं इच्छिणारा टाळी, पापा तसें त्यजा ।।८।।

१२४ पाणिम्हि चे वणो नास्स हरेय्य पाणिना विसं।
नाब्बणं विसमन्वेति नत्थि पापं अकुब्बतो ।।९।।

एन ४१८१—७

१२४ हाताला जर व्रण (जखम) नसेल तर (स्व-) हस्ताने विष घ्यावे. व्रण नसलेल्याला विष लागत नाही. न करणाऱ्याला पाप लागत नाही.

१२४ नसे व्रण जरी हाता, त्या हातें विष नेइजे।
अ-व्रणा विष बाधेना अकर्त्या पाप ना तसें ॥९॥

१२५ यो अप्पदुट्ठस्स नरस्स दुस्सति
सुद्धस्स पोसस्स अनङ्गणस्स।
तमेव बालं पच्चेति पापं
सुखुमो रजो पटिवातं . व खित्तो ॥१०॥

१२५ अप्रदुष्ट, शुद्ध व निर्मळ अशा माणसाला जो दोष देतो (त्याच्यावर दोषारोप करतो) त्या मूर्खावर पाप उलटते, जसे वाऱ्याच्याविरुद्ध दिशेने फेकलेले सूक्ष्म रजःकण उलटतात.

१२५ जो अप्रदुष्टास नरास दोष
शुद्धासही देइल निर्मळास।
मुर्खावरी त्या उलटेल पाप
कीं फेकिली वायुविरुद्ध धूळ ॥१०॥

१२६ गब्भमेके उप्पज्जन्ति निरयं पापकम्मिनो।
सग्गं सुगतिनो यन्ति परिनिब्बन्ति अनासवा ॥११॥

१२६ काही पापकर्मी [मानव-] गर्भात पडतात (तर) काही नरकात पडतात ज्यांना सुगती मिळते ते स्वर्गात जातात. जे निर्विकार झाले आहेत ते परिनिर्वाण पावतात.

१२६ गर्भांत पडती कांहीं, पापी ते नरकीं दुजे।
जाती स्वर्गा सद्गती ज्यां, निर्वाणा निर्विकार जे ॥११॥

१२७ न अन्तलिक्खे न समुद्दमज्झे
न पब्बतानं विवरं पविस्स।
न विज्जती सो जगतिप्पदेसो
यत्थट्ठितो मुञ्चेय्य पापकम्मा ॥१२॥

१२७ न अंतरिक्षात, न समुद्राच्या मध्यभागी, न पर्वतांच्या गुहात शिरून —जगतात असा कोणताही प्रदेश नाही की ज्या ठिकाणी राहिले असता माणूस पापकर्मातून मुक्त होईल.

१२७ न अंतरिक्षीं न समुद्रमध्यीं
न पर्वतांच्या विवरीं शिरून –।
प्रवेश नाहीं जगतांत, जेथे
राहून पापांतुनि मुक्त होई ।।१२।।

१२८ न अन्तलिक्खे न समुद्दमज्झे
न पब्बतानं विवरं पविस्स।
न विज्जती सो जगतिप्पदेसो
यत्थट्ठितं नप्पसहेथ मच्चु ।।१३।।

पापवग्गो नवमी।

१२८ न अंतरिक्षात, न समुद्राच्या मध्यभागी, न पर्वतांच्या गुहात शिरून–जगतात असा कोणताही प्रदेश नाही की जिथे राहिले असता मृत्यू घाला घालणार नाही.

१२८ न अंतरिक्षीं न समुद्रमध्यीं
न पर्वतांच्या विवरीं शिरून।
प्रवेश नाहीं जगतांत, जेथें
कीं राहिल्या मृत्यु घाली न घाला ।।१३।।

नववा पापवर्ग समाप्त.

१०

[दण्डवग्गो]

१२९ सब्बे तसन्ति दण्डस्स सब्बे भायन्ति मच्चुनो।
अत्तानं उपमं कत्वा न हनेय्य न घातये ।।१।।

[दण्डवर्ग]

१२९ दण्डाला सर्व घाबरतात; मृत्यूला सर्व भितात. (म्हणून) आपल्याप्रमाणे दुसऱ्यांना जाणून कोणाची हिंसा करू नये किंवा करवू नये.

१२९ दण्डाला कांपती सर्व, भिती मृत्यूस सर्वही।
मारा न मारवा, जाणा आपणासारिखा दुजा ।।१।।

१३० सब्बे तसन्ति दण्डस्स सब्बेसं जीवितं पियं ।
अत्तानं उपमं कत्वा न हनेय्य न घातये ।।२।।

१३० दण्डाला सर्व घाबरतात; सर्वांना जीवित प्रिय आहे. (म्हणून) आपल्या-प्रमाणे दुसऱ्यांना जाणून कोणाची हिंसा करू नये किंवा करवू नये.

१३० दण्डाला कांपती सर्व, प्रिय सर्वांस जीवित ।
मारा न मारवा, जाणा आपणासारिखा दुजा ।।२।।

१३१ सुखकामानि भूतानि यो दण्डेन विहिंसति ।
अत्तनो सुखमेसानो पेच्च सो न लभते सुखं ।।३।।

१३१ सुखाची इच्छा करणाऱ्या भूतांची जो दण्डाने हिंसा करतो, तो आपले सुख शोधीत असला तरी परलोकी सुख पावत नाही.

१३१ सुख भूतें इच्छितात दण्डें जो त्यांस हिंसितो ।
आपुलें सुख शोधी, त्या परत्र न मिळे सुख ।।३।।

१३२ सुखकामानि भूतानि यो दण्डेन न हिंसति ।
अत्तनो सुखमेसानो पेच्च सो लभते सुखं ।।४।।

१३२ सुखाची इच्छा करणाऱ्या भूतांची जो दण्डाने हिंसा करीत नाही, तो आपल्या सुखाचा शोध करणारा परलोकी सुख पावतो.

१३२ सुख भूतें इच्छितात, दण्डें जो त्यां न हिंसितो ।
आपुलें जो सुख शोधी त्या परत्र मिळतें सुख ।।४।।

१३३ माऽवोच फरुसं कञ्चि वुत्ता पटिवदेय्यु तं ।
दुक्खा हि सारम्भकथा पटिदण्डा फुसेय्यु तं ।।५।।

१३३ कोणाला कठोर बोलू नकोस. ज्यांना तू तसे बोलशील ते तुला प्रत्युत्तर देतील. संतापाचे बोल दुःखदायक असतात. उलट–दिलेले दण्ड तुला लागतील.

१३३ कुणा कठोर ना बोल प्रत्युत्तर मिळे तुला ।
क्रोधाचा बोल दे दुःख, टोला ये उलटा तुला ।।५।।

१३४ सचे नेरेसि अत्तानं कंसो उपहतो यथा ।
एस पत्तोऽसि निब्बानं सारम्भोते न विज्जति ।।६।।

१३४ फुटलेले काशाचे (पात्र) जसे कंप पावून ध्वनी देत नाही (खणखण वाजत नाही, बदबद वाजते) तसा जर तू आघात झाला असता कंप पावून (खणखण बोलला) नाहीस, तर हा तू निर्वाण पावलास. संरंभ म्हणजे संक्षोभात्मक प्रत्युत्तर तुजजवळ नाही.

१३४ **कांसें कीं फुटलें, तैसा जो न कंपवि आपणा ।**
निर्वाण तूं पावलासि देशीना तूं प्रत्युत्तर ॥६॥

१३५ **यथा दण्डेन गोपालो गावो पाचेति गोचरं ।**
एवं जरा च मच्चु च आयुं पाचेन्ति पाणिनं ॥७॥

१३५ ज्याप्रमाणे गुराखी गुरांना दांडयाने हाकीत कुरणात नेतो, त्याप्रमाणे जरा आणि मृत्यू प्राण्यांच्या आयुष्याला हाकीत असतात.

१३५ **नेई गोचरणा दंडें गुरें हांकीत गोवळ ।**
प्राण्यांचेंही जरा मृत्यु तसें आयुष्य हांकिती ॥७॥

१३६ **अथ पापानि कम्मानि करं बालो न बुज्झति ।**
सेहि कम्मेहि दुम्मेधो अग्गिदड्ढो व तप्पति ॥८॥

१३६ [आरंभी] पापकर्मे करिताना मूर्ख बोध पावत नाही (जागा होत नाही). (पण पुढे) आपल्या कर्मांनी तो दुर्मेध अग्नीने जाळल्याप्रमाणे ताप पावतो.

१३६ **करितांना पापकर्मे जागा होई न मूर्ख कीं ।**
ताप पावे स्वकर्मांनीं अग्नीनें जणुं जाळिला ॥८॥

१३७ **यो दण्डेन अदण्डेसु अप्पदुट्ठेसु दुस्सति ।**
दसन्नमञ्ञतरं ठानं खिप्पमेव निगच्छति--॥९॥

१३७ जे दण्डाला पात्र नाहीत, जे निर्दोषी आहेत, अशाना जो दण्डाने त्रास देतो, तो (खालील) दहांपैकी एखाद्या स्थितीला तावडतोब पावतो.

१३७ **अदण्डय तैसे निर्दोषी छळी दण्डें तयास जो ।**
एखादी तो दहांपैकीं स्थिति शीघ्रचि पावतो— ॥९॥

१३८ **वेदनं फरुसं जानिं सरीरस्स च भेदनं ।**
गरुकं वाऽपि आबाधं चित्तक्खेपं व पापुणे ॥१०॥

१३८ तीव्र वेदना; संपत्तीचा अपहार (हानि); शरीराचे [सांधे इत्यादी] मोडणे; किंवा मोठा रोग; चित्ताचा विक्षेप म्हणजे वेड (प्राप्त होते).

१३८ वेदना तीव्र हानी वा, देहाचे भाग मोडती।
मोठी त्याला होय बाधा, लागे वा वेड त्याजला ॥१०॥

१३९ राजतो वा उपस्सग्गं अब्भक्खानं व दारुणं।
परिक्खयं व ञातीनं भोगानं व पभङ्गुरं* ॥११॥

१३९ राजापासून उपसर्ग; दारुण असा मिथ्या-आरोप; नातलगांचा क्षय; संपत्तीचा नाश.

१३९ उपसर्ग करी राजा, ये मिथ्यारोप दारुण।
क्षय नातलगांचा वा, संपत्तीभोग लोपती ॥११॥

१४० अथ वस्स अगारानि अग्गि डहति पावको।
कायस्स भेदा दुप्पञ्ञो निरयं सो · पपज्जति ॥१२॥

१४० किंवा त्याची घरे पावक अग्नी जाळतो. शरीर नाश पावल्यानंतर तो दुर्बुद्धी नरकात जातो.

१४० किंवा त्याची घरें-दारें जाळी अग्नीहि पावक।
देहान्तानंतरी जाई दुर्बुद्धी नरकास तो ॥१२॥

१४१ न नग्गचरिया न जटा न पङ्का
नानासका थण्डिलसायिका वा।
रजो च जल्लं उक्कुटिकप्पधानं
सोधेन्ति मच्चं अवितिण्णकंखं ॥१३॥

१४१ नागवे राहाणे, जटा, चिखल (माखणे), अनशन किंवा उपवास, स्थण्डिलावर शय्या करणे (हे व्रत), धुळीने अंग भरून घेणे, उकिडवे बसणे—ह्या गोष्टी ज्याच्या शंका दूर झाल्या नाहीत (जो शंका तरून पार गेला नाही) अशा मर्त्याला शुद्ध करीत नाहीत.

१४१ न हिंडणें नग्न, न जटा, न पंक
न स्थंडिलीं नीज न वा उपोषण।
न धूळ वा आसन तें उकीडवें
दे शुद्धि, शंका न तरून गेल्या ॥१३॥

*रो०—पभङ्गनं; अ०—पभङ्गुरं'ति पभङ्गुभावं पूतिभावं.....।

१४२ अलङ्कतो चेऽपि समं चरेय्य
सन्तो दन्तो नियतो ब्रह्मचारी।
सब्बेसु भूतेसु निधाय दण्डं
सो ब्राह्मणो सो समणो स भिक्खु।। १४ ।।

१४२ आणि जरी अलंकार घातलेले असले तरी जो समभावाने वागतो, जो शान्त, दान्त, नियमाने वागणारा, श्रेष्ठ धार्मिक जीवनाचा अंगीकार केलेला, सर्व भूतांचे बाबतीत ज्याने दण्ड म्हणजे हिंसा सोडून दिली आहे —तो ब्राह्मण, तो श्रमण, तो भिक्षू होय.

१४२ चाले समें शान्त असो विभूषित
जो दान्त नेमस्तहि ब्रह्मचारी।
सर्वांहि भूतीं न उगारि दण्ड
तो सर्व भिक्षु-श्रमण-ब्राह्मणादि ।। १४ ।।

१४३ हिरीनिसेधो पुरिसो कोचि लोकस्मि विज्जति।
यो निन्दं अप्पबोधति अस्सो भद्रो कसामिव।। १५ ।।

१४३ मनाच्या लाजेचा निषेध मानणारा पुरुष जगात क्वचितच असतो, जो (लोकांच्या) निन्देची कुणकुण लागल्याबरोबर वेळीच सावध होतो, जसा चांगला घोडा [चाबूक लागण्याची चिन्हे दिसताच] सावध होतो.

१४३ निषेध आत्मलाजेचा मानी तो विरळा नर।
निंदा आधींच जाणी कीं तेजस्वी अश्व चाबुका ।। १५ ।।

१४४ अस्सो यथा भद्रो कसानिविट्ठो
आतापिनो संवेगिनो भवाथ।
सद्धाय सीलेन च विरियेन च
समाधिना धम्मविनिच्छयेन च।
सम्पन्न-विज्जाचरणा पटिस्सता
पहस्सथ दुक्खमिदं अनप्पकं ।। १६ ।।

१४४ चाबुकाने स्पर्श केलेल्या चांगल्या घोड्याप्रमाणे उत्साही व संवेगी व्हा श्रद्धेने, शीलाने, वीर्याने, समाधीने आणि धर्मविनिश्चयाने विद्याचरण-संपन्न होऊन स्मृती सावध ठेवून हे महान् दुःख तुम्ही त्यागू शकाल.

१४४ कीं लागल्या चाबुक अश्व तेजी
उत्साह-संवेग-भरें स्फुरें तूं।
श्रद्धा तसें शील नि वीर्य यांनीं
समाधिनें धर्मविनिश्चयें तसें।
संपन्न विद्याचरणीं नि सावध
होऊन हें दुःख त्यजाल मोठें ॥ १६ ॥

१४५ उदकं हि नयन्ति नेत्तिका*
उसुकारा नमयन्ति तेजनं।
दारुं नमयन्ति तच्छका
अत्तानं दमयन्ति सुब्बता ॥ १७ ॥

दण्डवग्गो दसमो।

१४५ कालवे किंवा पाट काढणारे पाण्याला (मार्ग काढून) नेतात. बाण करणारे शराला वाकवितात. सुतार तासून लाकूड वाकवितात. जे सुव्रत पुरुष आहेत ते स्वतःचे दमन करतात.

१४५ जळ ने वळवीत पाट-कार
शर वांकवितात बाण-कार।
नित वांकवि लांकुडा सुतार
आत्म्याला दमितात सुव्रती जे ॥ १७ ॥

दहावा दण्डवर्ग समाप्त.

११

[जरावग्गो]

१४६ को नु हासो किमानन्दो निच्चं पज्जलिते सति।
अन्धकारेन ओनद्धा पदीपं न गवेसथ ॥ १ ॥

[जरावर्ग]

१४६ (सभोवताली) सगळे सदोदित पेटले असता कसले हास्य आणि कसला आनंद? अंधकाराने (तुम्हांस) वेष्टिले असता दिव्याचा शोध का करीत नाही?

---

*गाथा ८० पहा.

१४६ कैंचे हास्य नि आनन्द पेटलें नित्य भोंवतीं।
अन्धकारें वेष्टिलेले प्रदीपा कां न शोधितां? ।। १ ।।

१४७ पस्स चित्तकतं बिम्बं अरुकायं समुस्सितं।
आतुरं बहुसङ्कप्पं यस्स नत्थि धुवं ठिति ।। २ ।।

१४७ पहा ही विचित्र मूर्ती! व्रणांनी युक्त असून उभारलेली! रोगट, (तरी) तिच्याविषयी अनेक संकल्प बांधले जातात; जी शाश्वत आणि स्थायिक नाही!*

१४७ पहा विचित्र ही मूर्ति व्रणी रोगी वरी उठे।
निर्मिली बहुसंकल्पीं नाहीं जी ध्रुव ना स्थिर* ।। २ ।।

१४८ परिजिण्णमिदं रूपं रोगनिड्डं पभङ्गुरं।
भिज्जति पूतिसंदेहो मरणन्तं हि जीवितं ।। ३ ।।

१४८ हे रूप परिजीर्ण झाले आहे; हे रोगाचे घरटे होय; (हे) क्षणभंङ्गुर आहे. घाणीचा हा गोळा भंगून जातो. मरण हाच जीविताचा अंत आहे.

१४८ रोगाचें घरटें देह जीर्ण होईल भंगुर।
घाणीचा भंगतो गोळा, मरणान्तचि जीवित ।। ३ ।।

१४९ यानिमानि अपत्थानि अलापूनेव सारदे।
कापोतकानि अट्ठीनि तानि दिस्वान का रति ।। ४ ।।

१४९ शरद ऋतूत फेकून दिलेल्या भोपळ्याप्रमाणे जी ही कपोतवर्ण हाडे (अस्थी) [आहेत]. ती पाहून (तुम्हांला) त्यांजविषयी आवड कशी?

१४९ शरदीं फेंकिलेलीं कीं जणूं तुम्बीफळें अशीं।
कपोतवर्ण हीं हाडें बेखोनी आवडी कशी? ।। ४ ।।

---

*कै. लाडांच्या मते, एका दृष्टीने या श्लोकात श्लेष आहेत–भाषांतर खालीलप्रमाणे होईल—
पहा चित्रांतले (पक्षी-विचित्र) बिम्ब म्हणजे मूर्ती (पक्षी देह). हे अरुकाय म्हणजे सूर्यासारखे (पक्षी देहात व्रण असलेले), समुच्छ्रित म्हणजे उठावदार (सूर्य-बिम्बासारखे वर येणारे), आतुर–इच्छेने आतुर (पक्षी रोगी), बहुसंकल्प–पुष्कळ कल्पनेने रचिलेले (पक्षी) बहु-संकल्प असणारे.
[संपादकाला हा ओढून ताणून आणलेला अर्थ वाटतो.]

१५० अट्ठीनं नगरं कतं मंसलोहितलेपनं।
यत्थ जरा च मच्चु च मानो मक्खो* च ओहितो ॥ ५ ॥

१५० हे अस्थीचे नगर केले आहे; मांस आणि रक्त यांनी ते लिंपिले आहे; त्यात जरा, मृत्यू, मान, म्रक्ष (म्हणजे दुसऱ्याचे सद्‌गुण माखून नष्ट करणे) यांस ठेविले आहे.

१५० केलें नगर हाडांचे मांसें, रक्तेंहि लिंपिलें।
मान-म्रक्ष जरा मृत्यू यांना वसविलें जिथें ॥ ५ ॥

१५१ जीरन्ति वे राजरथा सुचित्ता
अथो सरीरंऽपि जरं उपेति।
सतं च धम्मो न जरं उपेति
सन्तो हवे सब्भि पवेदयन्ति ॥ ६ ॥

१५१ सुशोभित राजरथ जीर्ण होतात. त्याप्रमाणे शरीरास देखील जरा प्राप्त होते. पण सज्जनांच्या धर्माला जरा प्राप्त होत नाही. संत संतांनाच तो सांगत असतात.

१५१ ये जीर्णता राजरथां सुचित्रां
तशी शरीरासहि ये जरा ती।
संतांचियां येइ जरा न धर्मा
संतांस तो संतचि सांगताती ॥ ६ ॥

१५२ अप्पस्सुतायं पुरिसो बलिवद्दों व जीरति।
मंसानि तस्स वड्ढन्ति पञ्ञा तस्स न वड्ढति ॥ ७ ॥

१५२ हा अल्पश्रुत पुरुष बैलाप्रमाणे वयाने मोठा होत आहे. त्याचे मांसच वाढते; त्याची प्रज्ञा वाढत नाही.

१५२ बैलाप्रमाणें वाढे की हा अल्पश्रुत मानव।
मांसचि वाढतें त्याचें परी प्रज्ञा न वाढतें ॥ ७ ॥

---

*म० नि० अ०––'किं मय्हं तुम्हेहि कतं' ति तेसं सुकतकरणं विनासेति; तस्स एसो सुकतकरण-विनासनो मक्खो। (म० नि० सुत्त ७ वरील भाष्य). तसेच, परगुणमक्खन-लक्खणो मक्खो, तेसं विनासनरसो, तदवच्छादनपच्चुपट्ठानो (म० नि० सुत्त ३ वरील भाष्य).

१५३ अनेक-जाति-संसारं सन्धाविस्सं अनिब्बिसं।
गहकारकं गवेसन्तो दुक्खा जाति पुनप्पुनं ॥८॥

१५३ [हे] घर करणाऱ्याचा शोध करीत असता अनेक जन्मींच्या संसारात, तो न सापडता (फुकट), धावत राहिलो. पुनः पुनः जन्म दुःखकारक झाला.

१५३ अनेक जन्मजन्मींच्या संसारीं व्यर्थ धावलों।
शोधीत गृहकारा, दे दुःख जन्म पुनःपुनः ॥८॥

१५४ गहकारक दिट्ठोऽसि पुन गेहं न काहसि।
सब्बा ते फासुका भग्गा गहकूटं विसंखतं।
विसंखारगतं चित्तं तण्हानं खयमज्झगा ॥९॥

१५४ [हे] घर करणाऱ्या! (तुला आता मी) पाहिले आहे. तू पुन्हा घर करणार नाहीस. तुझे सर्व वासे (पक्षी-फासळ्या) मोडले आहेत. घराच्या [गोलाकार छप्पराचे] वरचे टोक (पक्षी कपाळाची कवटी) विस्कळीत झाले आहे. संस्काररहित स्थितीला पोचलेले चित्त तृष्णांच्या क्षयाला पावले आहे

१५४ गृहकारा! दिसलाशी, पुनः न करिसी घर।
वांसळ्या मोडल्या सर्व भग्न हें गृहकूट कीं।
संस्कारहीन हें चित्त तृष्णांचा क्षय पावलें ॥९॥

१५५ अचरित्वा ब्रह्मचरियं अलद्धा योब्बने धनं।
जिण्णकोञ्चा ' व झायन्ति खीणमच्छे ' व पल्लले ॥१०॥

१५५ श्रेष्ठ धार्मिक जीवनाचे आचरण न करिता यौवनात धन न मिळविता हे आता म्हातारपणी ध्यान करितात—जणू काय मासे नाहीसे झालेल्या डबक्याच्या काठी म्हातारे बगळेच!

१५५ नाचरीलें ब्रह्मचर्या नार्जिलें धन यौवनीं।
निर्मत्स्य पल्वलीं ध्यानीं वृद्ध हे बगळे उभे ॥१०॥

१५६ अचरित्वा ब्रह्मचरियं अलद्धा योब्बने धनं।
सेन्ति चापाऽतिखीणा . व* पुराणानि अनुत्थुनं ॥११॥

जरावग्गो एकादसमो।

---

*अ०—चापातो अतिखीणा, चापा विनिम्मुत्ता.... सरा म्हणजे धनुष्यापासून सोडलेले बाण, असा हा निराळा अर्थ दिला आहे. तिबेटी व चिनी गाथांत 'चाप' ह्या पाठाचे समर्थन करणारे शब्द नाहीत. संस्कृत व प्राकृत गाथाही काही प्रकाश पाडीत नाहीत.

१५६ श्रेष्ठ धार्मिक जीवनाचे आचरण न करिता, यौवनात धन न मिळविता हे आता (म्हातारपणी) पडून राहिले आहेत–जणू काय अतिजीर्ण धनुष्येच जुन्या टणत्कारांचा निनाद आठवीत आहेत.

१५६ नाचरीलें ब्रह्मचर्या, नार्जिलें धन यौवनीं।
शोची जुन्या टणत्कारां पडले जीर्ण चापसे ।।११।।

अकरावा जरावर्ग समाप्त.

१२

[अत्तवग्गो]

१५७ अत्तानं चे पियं जञ्ञा रक्खेय्य नं सुरक्खितं।
तिण्णमञ्ञतरं यामं पटिजग्गेय्य पण्डितो ।।१।।

[आत्मवर्ग]

१५७ स्वतःला जर प्रिय मानिले तर त्याला सुरक्षित राखावे. तीन यामांपैकी –प्रहरांपैकी–एक प्रहरभर पण्डिताने त्याची निगा राखावी.

१५७ आपण प्रिय जें वाटे राखावें त्या सुरक्षित।
तिहींतल्या एक यामीं राखावी पंडितें निगा ।।१।।

१५८ अत्तानमेव पठमं पतिरूपे निवेसये।
अथऽञ्ञमनुसासेय्य न किलिस्सेय्य पण्डितो ।।२।।

१५८ आधी आपण स्वतःला योग्य अशा गोष्टीत गुंतवून घ्यावे. मग दुसऱ्यांना उपदेश करावा. [असे वागणाऱ्या] पंडिताला क्लेश होऊ शकत नाहीत.

१५८ आधीं आपण पाळावा धर्म तो योग्य जो असे।
दुज्यांना मग सांगावा, येणें क्लेशे न पण्डित ।।२।।

१५९ अत्तानं चे तथा कयिरा यथञ्ञमनुसासति।
सुदन्तो वत दमेथ अत्ता हि किर दुद्दमो ।।३।।

१५९ जसा दुसऱ्यांस उपदेश करितो तसेच आपण स्वतः करावे. चांगले दमन ज्याचे झालेले आहे त्यानेच इतरांचे दमन करावे. [कारण] स्वतःचे दमन होणे हेच खरे कठिण आहे.

१५९ उपदेशी बुज्यां जैसें करावें कीं स्वतः तसें।
सुदान्त दमवी अन्यां, आत्मदहन दुष्कर ॥३॥

१६० अत्ता हि अत्तनो नाथो को हि नाथो परो सिया।
अत्तना हि सुदन्तेन नाथं लभति दुल्लभं ॥४॥

१६० आपणच आपले स्वामी आहोत. दुसरा कोण स्वामी असणार? स्वतःचे जर चांगले दमन केलेले असेल तर दुर्लभ असा स्वामी आपणांस लाभतो.

१६० आपणा आपण स्वामी, कोण स्वामी दुजा असे?।
आत्मदहन-सिद्धिनें स्वामी दुर्लभ कीं मिळें ॥४॥

१६१ अत्तना·व कतं पापं अत्तजं अत्तसंभवं।
अभिमन्थति दुम्मेधं वजिरं·वऽम्हमयं मणिं ॥५॥

१६१ आपण केलेले, आपणापासून जम्मलेले, आपण घडविलेले पापच दुर्बुद्धी पुरुषास घासून घासून त्याचे तुकडे करिते, जसा (कापावयाचा) हिरा (स्वतः दगडी असून) दगडी रत्ने (हिरे पाचूसारखी) घासून कापतो.

१६१ आपणें पाप केलें जें आत्मसंभव आत्मज।
कापी घांसोनि दुर्बुद्धा हिऱ्या हिरकणी जशी ॥५॥

१६२ यस्स अच्चन्त–दुस्सील्यं मालुवा सालमिवोततं।
करोति सो तथत्तानं यथा नं इच्छती दिसो ॥६॥

१६२ जशी शालवृक्षावर मालुवा वेल, तसे ज्याचे अत्यंत दुःशील पसरत जाते, तो तसे बनवितो की जसे त्याचे द्वेषी इच्छितात.

१६२ सालावरी मालुवेली दुःशील पसरे तसें।
स्वयं आपणा बनवी जसा शत्रूच वांछितो ॥६॥

१६३ सुकरानि असाधूनि अत्तनो अहितानि च।
यं वे हतं च साधुं च तं वे परमदुक्करं ॥७॥

१६३ अ-साधू म्हणजे वाईट आणि आपणाला अहितकारक अशी कर्मे करणे सुकर आहे. जे हितकारक आणि चांगले आहे ते करणे परमदुष्कर होय

१६३ वाईट कर्मे सुकर जीं कीं अहित आपणां।
चांगलें हितकारी तें खरें परम दुष्कर ॥७॥

१६४ यो सासनं अरहत अरियानं धम्मजीविनं।
पटिक्कोसति दुम्मेधो दिट्ठिं निस्साय पापिकं।
फलानि कट्ठकस्सेव अत्तघञ्ञाय* फल्लति ॥८॥

१६४ धर्माप्रमाणे जीवन ठेवणाऱ्या आर्यांचे अर्हतांचे जे शासन (शिकवण) त्याची जो दुर्बुद्धी माणूस पापी दृष्टीला अनुसरून निंदा करितो, तो वेळूप्रमाणे आपल्याच नाशासाठी फलित होतो.

१६४ **आर्य-अर्हन्त-धर्मे जे वर्तती, त्यांचियां बघे।**
शासना पापदृष्टीनें, दुर्बुद्धी देइ त्या शिव्या।
फळे वेळूप्रमाणें तो नाशासाठींच आपुल्या ॥८॥

१६५ अत्तना·व कतं पापं अत्तना संकिलिस्सति।
अत्तना अकतं पापं अत्तना·व विसुज्झति।
सुद्धि असुद्धि पच्चत्तं नाञ्ञो अञ्ञ विसोधये ॥९॥

१६५ आपणच केलेले पाप असते, आपणालाच (त्याचा) क्लेश भोगावा लागतो. आपण न केलेले पाप (असते), (त्यामुळे) आपणच विशुद्ध होतो. शुद्धी आणि अशुद्धी ही स्वतः पुरतीच लागू असतात. एक दुसऱ्याला शुद्ध करू शकत नाही.

१६५ **आपण करितों पाप दोषी होऊंचि आपण।**
आपण न करी पाप शुद्धि होईच आपुली।
शुद्धयशुद्धि आत्मनिष्ठ, कोणी शुद्धि दुजा न दे ॥९॥

१६६ अत्त-द-त्थं परत्थेन बहुनाऽपि न हापये।
अत्त-द-त्थमभिञ्ञाय स-द-त्थपसुतो सिया ॥१०॥

अत्तवग्गो द्वादसमो।

१६६ बहुत परार्थासाठी सुद्धा स्वतःच्या अर्थाची हानी करू नये. स्वतःचा अर्थ चांगला जाणून निजार्थी वृत्ती जोडावी.

१६६ **हानी करीं न आत्मार्थी परार्थ बहु साधण्या।**
आत्मार्थ जाणुनी नीट निजार्थी लय लाव त्या ॥११॥

बारावा आत्मवर्ग समाप्त.

---

*अ०–अत्तनो घातऽत्थमेव फलेति।

१३

[लोकवग्गो]

१६७ हीनं धम्मं न सेवेय्य पमादेन न संवसे।
मिच्छादिट्ठिं न सेवेय्य न सिया लोकवद्धनो* ।।१।।

[लोकवर्ग]

१६७ हीन धर्म सेवू नये; प्रमादाशी सहवास ठेवू नये. मिथ्यादृष्टी सेवू नये. इहलोकीचा प्रपंच वाढविणारा होऊ नये.

१६७ नको संग प्रमादाशीं हीन धर्मा न सेविजे।
मिथ्यादृष्टी न ठेवावी, प्रपंचा वाढवू नये ।।१।।

१६८ उत्तिट्ठे नप्पमज्जेय्य धम्मं सुचरितं चरे।
धम्मचारी सुखं सेति अस्मि लोके परम्हि च ।।२।।

१६८ उठावे (खडे असावे), प्रमाद करू नये. चांगल्या कर्मांनी धर्म आचरावा. धर्मचारी इहलोकी आणि परलोकी सुखाने झोपतो.

१६८ उठा, प्रमाद न करा, आचरा धर्म चांगला।
धर्मचारी सुखें झोंपे इहलोकीं परत्रही ।।२।।

१६९ धम्मं चरे सुचरितं न तं दुच्चरितं चरे।
धम्मचारी सुखं सेति अस्मिं लोके परम्हि च ।।३।।

१६९ चांगल्या कर्मांनी धर्माचे आचरण करावे, त्याचे वाईट कर्मांनी आचरण करू नये. धर्मचारी इहलोकी आणि परलोकी सुखाने झोपतो.

१६९ दुष्कर्मे नाचरी धर्मा सुकर्मे धर्म आचरी।
धर्मचारी सुखें झोंपे इहलोकीं परत्रही ।।३।।

१७० यथा बुब्बुलकं पस्से यथा पस्से मरीचिकं।
एवं लोकं अवेक्खन्तं मच्चुराजा न पस्सति ।।४।।

१७० जसे बुडबुड्याकडे बघावे, जसे मृगजळाकडे बघावे, त्यासारखेच जो लोकाकडे (जगाकडे नश्वर ह्या दृष्टीने) बघतो, त्याच्याकडे मृत्युराजा दृष्टी टाकीत नाही.

---

*रो०—लोकवड्ढनो.

१७० देखे बुडबुडा जैसें, देखे मृगजळा जसें ।
तेवीं हा लोक जो देखे, मृत्युराजा न त्या बघे ।।४।।

१७१ एथ पस्सथिमं लोकं चित्तं राजरथूपमं ।
यत्थ बाला विसीदन्ति नत्थि संगो विजानतं ।।५।।

१७१ या, राजरथाप्रमाणे चितारलेल्या ह्या लोकाला (जगाला) बघा. मूर्ख जेथे बुडतात (गुरफटून जातात), ज्ञानी त्याशी संग ठेवीत नाहीत.

१७१ चितारिल्या राजरथा ऐसा हा लोक या बघा ।
जेथें विसावती मूर्ख ज्ञानी संग न ठेविती ।।५।।

१७२ यो च पुब्बे पमज्जित्वा पच्छा सो नप्पमज्जति ।
सो· मं लोकं पभासेति अब्भा मुत्तो· व चन्दिमा ।।६।।

१७२ जो पूर्वकाळी प्रमादाने वागला असता पश्चात् (मागाहून)प्रमाद करीत नाही, तो अभ्रांपासून मुक्त झालेल्या चंद्राप्रमाणे ह्या लोकाला प्रकाशित करतो.

१७२ प्रमादें वागुनी पूर्वी प्रमाद न करी पुढें ।
प्रकाशवी लोक हा तो कीं अभ्रें मुक्त चंद्रमा ।।६।।

१७३ यस्स पापं कतं कम्मं कुसलेन पिथीयति ।
सो. मं लोकं पभासेति अब्भा मुत्तो. व चन्दिमा ।।७।।

१७३ ज्याचे केलेले पापकर्म कुशल (कर्माने) झाकले जाते, तो अभ्रांपासून मुक्त झालेल्या चंद्राप्रमाणे ह्या लोकाला प्रकाशित करितो.

१७३ ज्यांची केलीं पापकर्मे झांकलीं कुशलेंचि कीं ।
प्रकाशवी लोक हा तो अभ्रांनी मुक्त चंद्रसा ।।७।।

१७४ अन्धभूतो अयं लोको तनुकेत्थ विपस्सति ।
सकुन्तो जालमुत्तो· व अप्पो सग्गाय गच्छति ।।८।।

१७४ हा लोक (हे जग) आंधळा झाला आहे. इथे पाहणारा विरळा. जाळ्यातून मुक्त झालेल्या पक्ष्याप्रमाणे विरळाच कोणी स्वर्गाला जातो.

१७४ आंधळा लोक हा झाला, द्रष्टा तो विरळा इथें ।
जालमुक्त खगा ऐसा स्वर्गा जाई क्वचित् कुणी ।।८।।

१७५ हंसादिच्चपथे यन्ति आकासे यन्ति इद्धिया ।
नीयन्ति धीरा लोकम्हा जेत्वा मारं सवाहिनिं ।।९।।

१७५ आदित्य-मार्गाने हंस जातात; ऋद्धींच्या बळाने (योगी) आकाशात संचार करितात. जे धीर आहेत ते माराला (त्याच्या) सैन्यासह जिंकून या लोकापलीकडे जातात.

१७५ सूर्यमार्गें हंस जाती ऋद्धिवान् फिरती नभीं।
मारा ससैन्य जिंकोनी धीर जाती जगापुढें ॥९॥

१७६ एकं धम्मं अतीतस्स मुसावादिस्स जन्तुनो।
वितिण्णपरलोकस्स नत्थि पापं अकारियं ॥१०॥

१७६ ज्याने [सत्य हा जो] एकच धर्म त्याचे उल्लंघन केले, जो खोटे बोलतो, जो परलोकाच्या पलीकडे गेला म्हणजे परलोक मानीत नाही, त्याला करू नये असे कोणतेच पाप नाही.

१७६ उल्लंघी जो एकधर्मा, खोटें जो बोलतो नर।
मानीना परलोका, त्या पाप नाहीं अकार्य जें ॥१०॥

१७७ न वे कदरिया देवलोकं वजन्ति
बाला हवे नप्पसंसन्ति दानं।
धीरो च दानं अनुमोदमानो
तेनेव सो होति सुखी परत्थ ॥११॥

१७७ कृपण लोक देवलोकाला जात नाहीत. मूर्ख काही दानाची प्रशंसा करीत नाहीत. धीर पुरुष दानाच्या आनंदात सहभागी होऊन तेवढ्यानेच परत्र (परलोकी) सुखी होतो.

१७७ कद्रू कधीं देवलोका न जाती
प्रशंसिती मूर्ख दाना कधीं ना।
जो धीर दानीं अनुमोद घेतो
तेणेंचि तो होई सुखी परत्र ॥११॥

१७८ पथव्या एकरज्जेन सग्गस्स गमनेन वा।
सब्बलोकाधिपच्चेन सोतापत्तिफलं वरं ॥१२॥

लोकवग्गो तेरसमो।

१७८ पृथ्वीच्या एकराज्यापेक्षा, स्वर्गाला जाण्यापेक्षा, सर्व लोकांच्या आधिपत्यापेक्षा स्रोतापत्तिफल श्रेष्ठ होय.

१७८ पृथ्वीचें तें एकराज्य, सर्व लोकाधिपत्य वा।
स्वर्गती–याहुनी श्रेष्ठ स्रोतापत्तीचियें फल ।।१२।।

तेरावा लोकवर्ग समाप्त.

१४

[बुद्धवग्गो]

१७९ यस्स जितं नावजीयति
जितमस्स नो याति कोचि लोके।
तं बुद्धमनन्तगोचरं
अपदं केन पदेन नेस्सथ ।।१।।

[बुद्धवर्ग]

१७९ ज्याचे जिंकिलेले पराभव करून काढून घेतले जात नाही; ज्याने जिंकिलेले लोकात (जगात) कुठेही नाहीसे होत नाही; ज्याचे गोचर (कार्यक्षेत्र) अनंत आहे; ज्याचे पद [गवसत] नाही; अशा बुद्धाला कोणत्या पदाने म्हणजे मार्गाने तुम्ही न्याल ?

१७९ जित त्याचें कोणी न घेई
तत्-जित लोकीं कुठें न जाई।
तो बुद्ध अनन्त गोचर
अपदा न्यालपदें कुण्या तया ।।१।।

१८० यस्स जालिनी विसत्तिका
तण्हा नत्थि कुहिञ्चि नेतवे।
तं बुद्धमनन्तगोचरं
अपदं केन पदेन नेस्सथ ।।२।।

१८० जाळे असलेली व अडकवून टाकणारी तृष्णा ज्याला कोठेही नेण्याला [समर्थ] राहिली नाही, ज्याचे गोचर अनन्त आहे, ज्याचे पद [गवसत] नाही, अशा बुद्धाला कोणत्या पदाने म्हणजे मार्गाने तुम्ही न्याल ?

१८० जाळ्यात धरील ती नुरे
तृष्णा ज्यास कुठेहि न्यावया।
बुद्धास अनन्त गोचरा
अपदा न्याल पदे कुण्या तया ॥२॥

१८१ ये झानपसुता धीरा नेक्खम्मूपसमे* रता
देवाऽपि तेसं पिहयन्ति सम्बुद्धानं सतीमतं ॥३॥

१८१ ज्याचे ध्यानाकडे लक्ष लागलेले आहे असे धीर, जे नैष्काम्याच्या उपशमात रममाण झाले आहेत, जे स्मृतिमान् आणि संबुद्ध आहेत अशांचा देव देखील हेवा करितात.

१८१ ध्यानप्रवृत्त जे धीर नैष्काम्योपशमीं रत।
संबुद्ध स्मृतिमान् त्यांचा हेवा करिति देवही ॥३॥

१८२ किच्छो मनुस्सपटिलाभो किच्छं मच्चान जीवितं।
किच्छं सद्धम्मसवणं किच्छो बुद्धानमुप्पादो ॥४॥

१८२ मनुष्यजन्म हा दुष्प्राप्य आहे, मर्त्यांचे जीवित कष्टमय आहे, सद्धर्माचे श्रवण दुर्मिळ आहे. बुद्धांचा जन्मही दुर्लभ असतो.

१८२ मानव-जन्म दुष्प्राप्य कष्टयुक्तचि जीवन।
धर्मश्रवण दुर्मीळ बुद्धजन्म हि दुर्लभ ॥४॥

१८३ सब्बपापस्स अकरणं कुसलस्स उपसम्पदा।
सचित्तपरियोदपनं एतं बुद्धान सासनं ॥५॥

१८३ कोणचेही पाप न करणे, कुशल संपादन करणे, स्वचित्त स्वच्छ (शुद्ध) करणे, हेच बुद्धांचे अनुशासन (म्हणजे शिकवणूक) आहे.

१८३ न करा सर्वथा पाप, जोडा कीं कुशला बरें।
करा शुद्ध स्वचित्ताला, बुद्धांचे हेंच शासन ॥५॥

१८४ खन्ती परमं तपो तितिक्खा
निब्बानं परमं वदन्ति बुद्धा।
न हि पब्बजितो परूपघाती
समणो होति परं विहेठयन्तो ॥६॥

---

*सं०—नैष्क्रम्योपशमे रताः। पण,

अ०—एत्थ पब्बज्जानेक्खम्मं न गहेतब्बं, किलेसूपसमन-निब्बानरतिं पन सन्धाय एतं वुत्तं॥

१८४ तितिक्षा (नावाची जी) क्षान्ती तीच परम तप होय, निर्वाण परम होय असे बुद्धांचे म्हणणे आहे. दुसऱ्याचा घात करणारा, दुसऱ्याला उपद्रव करणारा प्रव्राजक श्रमण होऊ शकत नाही.

१८४ तितिक्षा-क्षान्ती थोरचि तप हें
निर्वाण परमसें बुद्धचि सांगे।
श्रमण प्रव्रजिता नयेच होता
परघाती जर तो परास पीडी ।।६।।

१८५ अनूपवादो अनूपघातो पातिमोक्खे च संवरो।
मत्तञ्ञुता च भत्तस्मि पन्तं च सयनासनं।
अधिचित्ते च आयोगो एतं बुद्धान सासनं ।।७।।

१८५ निंदा न करणे, घात (नुकसान) न करणे, प्रातिमोक्षाच्या नियमांप्रमाणे संयम राखणे, जेवणात मिती ठेवणे, गावापासून दूर निजणे—बसणे, चित्त समाधीत युक्त ठेवणे—हीच बुद्धांची शिकवणूक आहे.

१८५ संयम प्रातिमोक्षाचा, निंदा-घातांस त्यागिणें।
निजणें बसणें दूर एकान्तीं, भोजनीं मिती।
ध्यानांत योजिणें चित्ता—बुद्धांचे हेच शासन ।।७।।

१८६ न कहापणवस्सेन तित्ति कामेसु विज्जति।
अप्पस्सादा दुखा कामा इति विञ्ञाय पण्डितो ।।८।।

१८७ अपि दिब्बेसु कामेसु रतिं सो नाधिगच्छति।
तण्हक्खयरतो होति सम्मासम्बुद्धसावको ।।९।।

१८६–१८७ कार्षापणांच्या वर्षावाने देखील कामोपभोगात तृप्ती होत नाही. काम हे अल्पास्वाद असून दुःखद आहेत असे जाणून जो पण्डित आहे त्याला दिव्य कामातसुद्धा रती लाभत नाही. तो सम्यक्संबुद्धाचा श्रावक तृष्णेच्या क्षयात रत होतो.

१८६ कार्षापण-प्रवृष्टीनें तृप्ति कामीं न होतसे।
स्वाद अल्प असे कामीं दुःख थोर कळुन हें ।।८।।

१८७ लाभेना दिव्यही कामीं पण्डितास रती कधीं।
रमे तृष्णाक्षयीं नित्य सम्यक्संबुद्ध शिष्य तो ।।९।।

१८८ बहुं वे सरणं यन्ति पब्बतानि वनानि च।
आरामरुक्खचेत्यानि मनुस्सा भयतज्जिता ॥१०॥

१८९ नेतं खो सरणं खेमं नेतं सरणमुत्तमं।
नेतं सरणमागम्म सब्बदुक्खा पमुच्चति ॥११॥

१९० यो च बुद्धञ्च धम्मञ्च सङ्घञ्च सरणं गतो।
चत्तारि अरियसच्चानि सम्मप्पञ्ञाय पस्सति ॥१२॥

१९१ दुःखं दुक्ख-समुप्पादं दुक्खस्स च अतिक्कमं।
अरियञ्चऽट्ठङ्गिकं मग्गं दुक्खूपसमगामिनं ॥१३॥

१९२ एतं खो सरणं खेमं एतं सरणमुत्तमं।
एतं सरणमागम्म सब्बदुक्खा पमुच्चति ॥१४॥

१८८, १८९, १९०, १९१ व १९२ भयाने त्रस्त झालेली माणसे पर्वत, वने, आराम, वृक्ष, चैत्य–ह्यांचा आसरा घेतला. हा आसरा खरोखर क्षेमदायक नाही; हा आसरा उत्तम नाही. हा आसरा घेतला असता (माणूस) सर्व दुःखातून मुक्त होत नाही. पण जो बुद्धाला, धर्माला आणि संघाला शरण जातो; दुःख, दुःखाचा समुदय, दुःखाचा निरोध आणि दुःखाच्या निरोधाप्रत नेणारा आर्य अष्टांगिक मार्ग–ही [चार] आर्यसत्ये चांगली जाणून पाहतो, त्याला हा आसरा खरोखर क्षेमदायक आहे; हा आसरा उत्तम आहे, हा आसरा घेतला असता सर्व दुःखांतून तो मुक्त होतो.

१८८ वन-पर्वत-आराम-वृक्ष-चैत्यचि आसरे।
बहु घेतात भीतीनें त्रस्त होऊन माणसें ॥१०॥

१८९ आसरा हा क्षेमदायी न खरोखर, उत्तम।
घेतां हा आसरा, मुक्ती सर्व दुःखांतुनी न ये ॥११॥

१९० दुःख, दुःखसमुत्पाद, जाणें दुःखापलीकडे।
दुःखोपशम जो दावी आर्य अष्टांग-मार्ग–हीं ॥१२॥

१९१ आर्यसत्यें चार देखे ज्ञानें उत्तम जाणुनी।
बुद्धाचा धर्म-संघांचा आसरा घेत जो परी ॥१३॥

१९२ आसरा कीं क्षेमदायी हा खरोखर, उत्तम।
घेता हा आसरा मुक्ती सर्व दुःखांतुनी मिळे ॥१४॥

१९३ दुल्लभो पुरिसाजञ्ञो न सो सब्बत्थ जायति।
यत्थ सो जायती धीरो तं कुलं सुखमेधति ॥१५॥

१९३ कुलीन पुरुष दुर्लभ असतो,; तो सर्वत्र जन्मास येत नाही. जेथे तो धीर (पुरुष) जन्मास येतो ते कुल सुख पावते.

१९३ न ये जन्मास सर्वत्र, कुलीन विरळा नर।
धीर तो जन्मतो जेथें सुख लाधे तया कुळा ॥१५॥

१९४ सुखो बुद्धानं उप्पादो सुखा सद्धम्म–देसना।
सुखा सङ्घस्स सामग्गी समग्गानं तपो सुखो ॥१६॥

१९४ बुद्धांची उत्पत्ती सुखकर होय; सद्धर्माचा उपदेश सुखकर होय. संघाची एकी सुखकर होय; एकीने वागणाऱ्यांची तपश्चर्या सुखकर होय.

१९४ बुद्धोत्पत्ती सुखा देई सद्धर्मादेश दे सुख।
सुख दे ऐक्य संघाचें तप एकींत दे सुख ॥१६॥

१९५ पूजारहे पूजयतो बुद्धे यदि व सावके।
पपञ्चसमतिक्कन्ते तिण्णसोकपरिद्दवे ॥१७॥

१९६ ते तादिसे पूजयतो निब्बुते अकुतोभये।
न सक्का पुञ्ञं सङ्खातुं इममेत्तमपि केनचि ॥१८॥

बुद्धवग्गो चुद्दसमो।

१९५-१९६ जे प्रपंचाच्या पलीकडे गेले आहेत, शोक व विलाप यांतून उत्तीर्ण झाले आहेत, जे निर्वाण पावले आहेत, ज्यांना कोठूनही भय राहिले नाही अशासारख्या पूजार्ह बुद्धांची किंवा श्रावकांची जो पूजा करतो त्याच्या पुण्याची 'हे इतके आहे' अशी कोणालाही गणना करता येत नाही.

१९५ पूजार्हां पूजितो बुद्धां किंवा जो श्रावकांसही।
शोका विलापा तरुनी प्रपंचा पार पावले ॥१७॥

१९६ ऐशांना पूजितो जो कीं निर्वृत्तां अकुतोभयां।
पुण्य हें इतुकें त्याचें हें न कोणी गणुं शके ॥१८॥

चौदावा बुद्धवर्ग समाप्त.

१५

[सुखवग्गो]

१९७ सुसुखं वत जीवाम वेरिनेसु अवेरिनो।
वेरिनेसु मनुस्सेसु विहराम अवेरिनो ॥१॥

[सुखवर्ग]

१९७ वैऱ्यांमध्ये अ-वैरी (असे) आम्ही खरोखर फार सुखाने राहू या; वैरी माणसांत अवैरी (असे आम्ही) विहरू या.

१९७ अहो! सुखानें राहूं या अवैरी वैरियांमधें।
वैरी मनुष्यांमाजीं कीं अवैरीं विहरूं सुखें ॥१॥

१९८ सुसुखं वत जीवाम आतुरेसु अनातुरा।
आतुरेसु मनुस्सेसु विहराम अनातुरा ॥ २ ॥

१९८ रोगातीत अरोगी असे आम्ही फार सुखाने राहू या. रोगार्त माणसांत अरोगी असे आम्ही विहरू या.

१९८ अहो! सुखानें राहूं या अरोगी रोगियांमधें।
रोगी मनुष्यांमाजीं कीं अरोगी विहरूं सुखें ॥२॥

१९९ सुसुखं वत जीवाम उस्सुकेसु अनुस्सुका।
उस्सुकेसु मनुस्सेसु विहराम अनुस्सुका ॥ ३ ॥

१९९ उत्सुकांत अनुत्सुक असे आम्ही फार सुखाने राहू या. उत्सुक माणसांत अनुत्सुक असे आम्ही विहरू या.

१९९ अहो! सुखानें राहूं या उत्सुकांत अनुत्सुक।
उत्सुकां माणसांमाजीं विहरूं या अनुत्सुक ॥३॥

२०० सुसुखं वत जीवाम येसं नो नत्थि किञ्चनं।
पीतिभक्खा भविस्साम देवा आभस्सरा यथा ॥४॥

२०० जे आम्ही अ-किंचन झालो ते (आता) फार सुखाने राहू या. आभास्वर देवांप्रमाणे प्रीती हेच ज्यांचे भक्ष्य आहे असे आम्ही होऊ या.

२०० अहो! सुखानें राहूं या झालों आम्ही अकिंचन।
प्रीतीच भक्षुनी राहूं आभास्वर जणूं सुर ॥४॥

२०१ जयं वेरं पसवति दुःखं सेति पराजितो।
उपसन्तो सुखं सेति हित्वा जयपराजयं ।। ५ ।।

०१ जेता वैराला जन्म देतो. पराजित माणूस दुःखात झोपतो. जय आणि पराजय त्यागून उपशान्त माणूस सुखात झोपतो.

०१ जयी वैरा जन्म देतो, दुःखें झोंपे पराजित।
उपशान्त सुखें झोंपे त्यागी जय-पराजयां ।। ५ ।।

२०२ नत्थि रागसमो अग्गि नत्थि दोससमो कलि।
नत्थि खन्धादिसा दुक्खा नत्थि सन्तिपरं सुखं ।।६।।

२०२ रागासारखी आग नाही; द्वेषासारखी हार नाही; स्कंधांसारखे दुःख नाही; शान्तीपरते सुख नाही.

२०२ रागासम नसे आग द्वेषासम न हार कीं।
स्कंधांसम नसे दुःख न शान्तीपरतें सुख ।।६।।

२०३ जिघच्छापरमा रोगा सङ्खारा परमा दुखा।
एतं ञत्वा यथाभूतं निब्बाणं परमं सुखं ।। ७ ।।

२०३ बुभुक्षा हा परम रोग होय; संस्कार हे परम दुःखद होत. हे यथार्थतया जाणून निर्वाण परम सुख आहे (असे जाणावे).

२०३ बुभुक्षा रोग परम, संस्कार अति दुःखद।
जाणावें हे यथार्थानें निर्वाण सुख उत्तम ।। ७ ।।

२०४ आरोग्यपरमा लाभा सन्तुट्ठी परमं धनं।
विस्सासपरमा ञाती निब्बाणं परमं सुखं ।। ८ ।।

२०४ आरोग्य हा परम लाभ होय. संतोष हे परम धन होय. विश्वास हाच परम आप्त होय. निर्वाण हेच परम सुख होय.

२०४ आरोग्य हा श्रेष्ठ लाभ, संतुष्टी श्रेष्ठ तें धन।
विश्वास हा खरा आप्त, निर्वाण सुख उत्तम ।। ८ ।।

२०५ पविवेकरसं पीत्वा रसं उपसमस्स च।
निद्दरो होति निप्पापो धम्मपीतिरसं पिबं ।। ९ ।।

२०५ एकान्तवासाचा आणि उपशमाचा रस पिऊन धर्मप्रीतीचे रसपान करीत (माणूस) निर्भय आणि निष्पाप होतो.

२०५ एकान्ताच्या रसा पीता रसा उपशमाचिया।
धर्मप्रीतिरसा पीत होई निष्पाप नीडर ॥९॥

२०६ साहु दस्सनमरियानं सन्निवासो सदा सुखो।
अदस्सनेन बालानं निच्चमेव सुखी सिया ॥१०॥

२०६ आर्यांचे दर्शन चांगले होय; त्यांचा संनिवास सदैव सुखदायी असतो. मूर्खांचे दर्शन होऊ न देता आपण नित्य सुखी व्हावे.

२०६ बरें दर्शन आर्यांचें संगती सुख दे सदा।
अदर्शनेंच मूर्खांच्या सुखी व्हावें सदैवही ॥१०॥

२०७ बालसङ्गतचारी हि दीघमद्धान सोचति।
दुक्खो बालेहि संवासो अमित्तेनेव सब्बदा।
धीरो च सुखसंवासो ञातीनं . व समागमो ॥११॥

२०७ कारण मूर्खांच्या संगतीत फिरणारा दीर्घकालपर्यन्त शोक करितो मूर्खांचा सहवास, शत्रूंच्या सहवासासारखा, सर्वदा दुःखदायक आहे. पण धीराचा सहवास नातेवाइकांच्या समागमाप्रमाणे सुखदायी असतो.

२०७ मूर्खासंगें फिरे तो की शोकीं दूरवरी पडे।
मूर्खांशीं संग दे दुःखा जेवीं शत्रूसवें सदा।
धीरांचा सुख दे संग आप्तांचा कीं समागम ॥ ११ ॥

तस्माच्च

२०८ धीरं च पञ्ञं च बहुस्सुतं च
धोरय्हसीलं वतवन्तमरियं।
तं तादिसं सप्पुरिसं सुमेधं
भजेथ नक्खत्तपथं . व चन्दिमा ॥१२॥

सुखवग्गो पण्णरसमो।

म्हणून

२०८ चंद्र जसा नक्षत्रपथाबरोबर असतो तसे जो धीर, प्राज्ञ, बहुश्रुत, शीलाची धुरा वाहणारा, व्रतवान्, आर्य आहे त्यासारख्या सुबुद्ध सत्पुरुषाच्या संगतीत असावे.

२०८ धीरा भजा प्राज्ञ-बहुश्रुताही
आर्यव्रती शीलधुरा धरी जो।
त्या सारिख्या सत्पुरुषा सुबुद्धा
जसाहि नक्षत्रपथास चंद्रमा ॥१२॥

पंधरावा सुखवर्ग समाप्त.

१६

[पियवग्गो]

२०९ अयोगे यु-जमत्तानं योगस्मिं च अयोजयं।
अत्थं हित्वा पियग्गाही पिहेतऽत्तानुयोगिनं ॥१॥

[प्रियवर्ग]

२०९ ज्या ठिकाणी स्वतःला गुंतवून घेऊ नये त्या ठिकाणी जो स्वतःला गुंतवून घेतो; ज्या ठिकाणी गुंतवून घ्यावे त्या ठिकाणी गुंतवून घेत नाही, हितकारक गोष्टी सोडून (अहितकारक पण) प्रिय गोष्टी ग्रहण करतो, तो योग्य ठिकाणी स्वतःला गुंतवून घेणाऱ्या माणसाचा हेवा करतो.

२०९ योजी अयोग्यीं, योजीना योग्यीं, स्वयं धरी प्रिय।
श्रेया टाकून, त्या वाटें—व्हावें आपण योगवान् ॥१॥

२१० मा पियेहि समागञ्छि अप्पियेहि कुदाचनं।
पियानं अदस्सनं दुक्खं अप्पियानं च दस्सनं ॥२॥

२१० प्रियांचा संग ठेवू नका आणि अप्रियांचा कदापिही. प्रियांचे अदर्शन आणि अप्रियांचे दर्शन दुःखकारक होते.

२१० प्रियाशीं अप्रियाशींही कधीं संग करूं नका।
प्रियां न देखतां दुःख दुःख अप्रियदर्शनीं ॥२॥

२११ तस्मा पियं न कयिराथ पियापायो हि पापको।
गन्था तेसं न विज्जन्ति येसं नत्थि पियाप्पियं ॥३॥

२११ म्हणून कशालाही प्रिय असे लेखू नका; कारण प्रिय दूर होणे हे दुःखकारक होते. ज्यांना प्रियाप्रियच नाही त्यांना गाठी (बंधने) राहात नाहीत.

२११ प्रिय गेल्या दुःख होतें–प्रिय ऐसें करूं नका।
प्रियाप्रियच ज्यां नाहीं त्यांचे बंध न राहती ।।३।।

२१२ पियतो जायती सोको पियतो जायती भयं।
पियतो विप्पमुत्तस्स नत्थि सोको कुतो भयं ।।४।।

२१२ प्रियापासून शोक होतो; प्रियापासून भय होते. प्रियापासून जो मुक्त झाला त्याला शोक होत नाही, (मग) भय कुठचे ?

२१२ प्रियापासून हो शोक प्रियापासून हो भय।
कैंचें भय, नसे शोक, प्रियापासून मुक्त त्या ।।४।।

२१३ पेमतो जायती सोको पेमतो जायती भयं।
पेमतो विप्पमुत्तस्स नत्थि सोको कुतो भयं ।।५।।

२१३ प्रेमापासून शोक होतो; प्रेमापासून भय होते. प्रेमापासून जो मुक्त झाला त्याला शोक होत नाही, (मग) भय कुठचे ?

२१३ प्रेमापासून हो शोक प्रेमापासून हो भय।
कैंचें भय, नसे शोक, प्रेमापासून मुक्त त्या ।।५।।

२१४ रतिया जायती सोको रतिया जायती भयं।
रतिया विप्पमुत्तस्स नत्थि सोको कुतो भयं ।।६।।

२१४ रतीपासून शोक होतो, रतीपासून भय होते. रतीपासून जो मुक्त झाला त्याला शोक होत नाही, (मग) भय कुठचे ?

२१४ रतीपासून हो शोक, रतीपासून हो भय।
कैंचें भय, नसे शोक, रतीपासून मुक्त त्या ।।६।।

२१५ कामतो जायती सोको कामतो जायती भयं।
कामतो विप्पमुत्तस्स नत्थि सोको कुतो भयं ।।७।।

२१५ कामापासून शोक होतो; कामापासून भय होते. कामापासून जो मुक्त झाला, त्याला शोक होत नाही, (मग) भय कुठचे ?

२१५ कामापासून हो शोक, कामापासून हो भय।
कैंचें भय, नसे शोक, कामापासून मुक्त त्या ।।७।।

२१६ तण्हाय जायती सोको तण्हाय जायती भयं ।
तण्हाय विप्पमुत्तस्स नत्थि सोको कुतो भयं ॥८॥

२१६ तृष्णेपासून शोक होतो, तृष्णेपासून भय होते. तृष्णेपासून जो मुक्त झाला, त्याला शोक होत नाही, (मग) भय कुठचे?

२१६ तृष्णेपासून हो शोक, तृष्णेपासून हो भय ।
कैचें भय, नसे शोक, तृष्णेपासून मुक्त त्या ॥८॥

२१७ सीलदस्सनसम्पन्नं धम्मट्ठं सच्चवादिनं ।
अत्तनो कम्म कुब्बानं तं जनो कुरुते पियं ॥९॥

२१७ शील आणि दर्शन यांनी जो संपन्न आहे, जो सत्य जाणणारा आहे, जो आपले कर्म करीत असतो अशा धर्माप्रमाणे वागणाऱ्याला (धर्मात ज्याचे अधिष्ठान आहे अशाला) जनता प्रिय करिते.

२१७ शीलदर्शनसंपन्ना धर्मस्था सत्य जाणत्या ।
करी जो आपुलें कर्म जन त्या करिती प्रिय ॥९॥

२१८ छन्दजातो अनक्खाते मनसा च फुटो सिया ।
कामेसु च अप्पटिबद्धचित्तो उद्धंसोतो ति वुच्चति ॥१०॥

२१८ अवर्णनीय असे जे निर्वाण त्याचा ज्याला छंद लागला आहे, ज्याचे मन उमलले आहे, कामात ज्याचे चित्त बांधले गेले नाही, त्याला 'ऊर्ध्वस्रोत' असे म्हणतात.

२१८ मन ज्याचे उमललें अनिर्वाच्यांत गुंगला ।
चित्त ना गुंतलें कामीं तो 'ऊर्ध्वस्रोत' बोलिला ॥१०॥

२१९ चिरप्पवासिं पुरिसं दूरतो सोत्थिमागतं ।
ञाति-मित्ता सुहज्जा च अभिनन्दन्ति आगतं ॥११॥

२२० तथेव कतपुञ्ञंऽपि अस्मा लोका परं गतं ।
पुञ्ञानि पटिगण्हन्ति पियं ञाती व आगतं ॥१२॥

पियवग्गो सोळसमो ।

२१९ ज्याप्रमाणे चिरकालचा प्रवास संपवून दुरहून सुखरूप आलेल्या पुरुषाचे, आप्त, मित्र व सुहृद आनन्दाने स्वागत करतात.

२२० त्याप्रमाणे, ज्याने पुण्य केले आहे तो या लोकातून परलोकास गेला असता आप्त जसे प्रिय माणूस आले असता [स्वागत] करितात, तसे त्याची पुण्यकृत्ये स्वागत करतात.

२१९ चिरप्रवासी नर जो दुरूनीसुखरूप ये।
करिती स्वागता त्याच्या जेवीं आप्तेष्टमित्रही ॥ ११ ॥

२२० तेवींच पुण्यवान् जातां परलोका इथून त्या।
प्रिय आल्या आप्त जैसे पुण्यें येतात भेटण्या ॥ १२ ॥

सोळावा प्रियवर्ग समाप्त.

१७

[कोधवग्गो]

२२१ **कोधं जहे विप्पजहेय्य मानं**
संयोजनं सब्बमतिक्कमेय्य।
तं नामरूपस्मि असज्जमानं
अकिञ्चनं नानुपतन्ति दुक्खा ॥ १ ॥

(क्रोधवर्ग)

२२१ क्रोध सोडावा; मान टाकावा (त्यागावा); सर्व बंधनांच्या पलीकडे जावे. नामरूपास न चिकटणाऱ्या, अकिंचन झालेल्या त्या पुरुषाच्या मागे दुःखे लागत नाहीत.

२२१ क्रोधा त्यजा मान समूळ टाका
ओलांडुनी सर्व बंधां पुढें जा।
जो नामरूपांत असक्त त्याच्या
मागें न ये दुःख अकिंचनाच्या ॥ १ ॥

२२२ **यो वे उप्पतितं कोधं रथं भन्तं . व धारये।**
तमहं सारथिं ब्रूमि रस्मिग्गाहो इतरो जनो ॥ २ ॥

२२२ जो उसळलेल्या क्रोधाला भरकटलेल्या रथाप्रमाणे (आवरून) धरून ठेवू शकतो, त्यालाच मी [खरा] सारथी म्हणतो. इतर माणसे नुसती (लगामाच्या) दोऱ्या धरणारी होत.

२२२ धरी उसळल्या क्रोधा रथा उधळल्या जसा।
म्हणें मी सारथीं त्याला बोऱ्याचि धरिती दुजे ॥ २ ॥

२२३ अक्कोधेन जिने कोधं असाधुं साधुना जिने।
जिने कदरियं दानेन सच्चेनालीकवादिनं ॥ ३ ॥

२२३ अक्रोधाने क्रोधाला जिंकावे, असाधूना साधूत्वाने जिंकावे; कद्रूला (कृपणाला) दानाने जिंकावे; खोटे बोलणाऱ्याला सत्याने जिंकावे.

२२३ अ-क्रोधें क्रोध जिंकावा साधुत्वें कीं असाधुला।
सत्यें असत्यवाद्याला कद्रू दानेंच जिंकिजे ॥ ३ ॥

२२४ सच्चं भणे, न कुज्झेय्य, दज्जाऽप्पस्मिंऽपि याचितो।
एतेहि तीहि ठानेहि गच्छे देवान सन्तिके ॥ ४ ॥

२२४ खरे बोलावे; क्रोध करू नये; कुणी याचक आला असता, आपणांपाशी थोडे जरी असले तरी त्यातून द्यावे. याच तीन गोष्टींनी देवाच्या जवळ माणूस जाईल.

२२४ खरें बोलें, न रागावें, तुझ्या अल्पांतलेंही दे।
याचका-या तिहीं मार्गी देवासन्निध पावशी ॥ ४ ॥

२२५ अहिंसका ये मुनयो निच्चं कायेन संवुता।
ते यन्ति अच्चुतं ठानं यत्थ गन्त्वा न सोचरे ॥ ५ ॥

२२५ जे अहिंसक मुनी कायेने नित्य संयमित राहतात ते अशा अच्युत स्थानाला जातात की जेथे गेल्यावर त्यांना शोक करण्याचा प्रसंग येत नाही.

२२५ अहिंसक मुनी नित्य काया संयमिं राखिती।
जाती ते अच्युतस्थाना शोका स्थान जिथें नुरे ॥ ५ ॥

२२६ सदा जागरमानानं अहोरत्तानुसिक्खिनं।
निब्बानं अधिमुत्तानं अत्थं गच्छन्ति आसवा ॥ ६ ॥

२२६ जे सदोदित जागरूक असतात, अहोरात्र (स्वतःस) शिकवीत असतात, ज्यांचा निर्वाणात लय लगलेला असतो (ज्यांची निर्वाणावर श्रद्धा असते) त्यांचे आश्रव (विकार) अस्ताला जातात.

२२६ अहोरात्र स्वतःला जे शिकविती, नित्य जागती।
निर्वाणीं राखिती श्रद्धा, अस्त पावति आश्रव ॥ ६ ॥

२२७ पोराणमेतं अतुल नेतं अज्जतनामिव ।
निन्दन्ति तुण्हीमासीनं निन्दन्ति बहुभाणिनं ।
मितभाणिनंऽपि निन्दन्ति नत्थि लोके अनिन्दितो ।। ७ ।।

२२७ हे अतुला ! ही जुनीच (गोष्ट) आहे, आजकालची (गोष्ट) नव्हे मुकाट्याने बसणाऱ्याची निंदा करतात; बहु बोलणाऱ्याची निंदा करतात मित बोलणाऱ्याची देखील निंदा करतात. या लोकांत अनिन्दित असा कोणीच नाही.

२२७ जुनेंच अतुला ! हें कीं आजचेंच न हें जणूं ।
निंदिती स्तब्ध जो बैसे, बहुभाषीही निंदिती ।
निंदिती मितभाषीही अ-निंदित नसे जगीं ।। ७ ।।

२२८ न चाहु न च भविस्सति न चेतरहि विज्जति ।
एकन्तं निन्दितो पोसो एकन्तं वा पसंसितो ।। ८ ।।

२२८ असा कोणी झाला नाही, होणार नाही, किंवा सध्या नाही की ज्याची लोकांनी सर्वथैव निन्दा किंवा सर्वथैव प्रशंसा केली आहे.

२२८ झाला नाहीं, नसे सध्यां, पुढें होणारही नसे ।
सर्वथा निंदिती ज्याला सर्वथा वा प्रशंसिती ।। ८ ।।

२२९ यं चे विञ्ञूपसंसन्ति अनुविच्च सुवे सुवे ।
अच्छिद्दवुत्तिं मेधाविं पञ्ञासीलसमाहितं ।। ९ ।।

२३० नेक्खं जम्बोनदस्सेव को तं निन्दितुमरहति ।
देवाऽपि नं पसंसन्ति ब्रह्मुनाऽपि पसंसितो ।। १० ।।

२२९–२३० पण जाम्बूनद सोन्याच्या निष्काप्रमाणे ज्याची सुज्ञ दररोज पारख करून प्रशंसा करतात, ज्याच्या वागण्यात छिद्र म्हणजे दोष नसतो, जो प्रज्ञेने व शीलाने समाहित अशा मेधावी पुरुषाची निंदा कोण करू शकेल ? देव देखील त्याची प्रशंसा करतात; ब्रह्मा देखील त्याची प्रशंसा करतो.

२२९ प्रशंसिती सुज्ञ ज्यातें पारखून दिनीं दिनीं ।
निर्दोषवृत्ती मेधावी प्रज्ञाशीली समाहित ।। ९ ।।

२३० नाणे जाम्बूनदाचें कीं कोण निंदील त्याजला ।
प्रशंसिती देवही त्या ब्रह्माही त्या प्रशंसितो ।। १० ।।

२३१ कायप्पकोपं रक्खेय्य कायेन संवुतो सिया।
कायदुच्चरितं हित्वा कायेन सुचरितं चरे ॥ ११ ॥

२३१ कायेच्या प्रकोपापासून (आपले) रक्षण करावे; कायेचा संयम करावा, कायेची दुश्चरिते त्यागून कायेने सुचरिते आचरावीत.

२३१ काया-प्रकोपा सांभाळा, कायेनें संयमी बना।
काया-दुश्चरितें त्यागा काया-सुचरितें करा ॥ ११ ॥

२३२ वचीपकोपं रक्खेय्य वाजाय संवुतो सिया।
वचीदुच्चरितं हित्वा वाचाय सुचरितं चरे ॥ १२ ॥

२३२ वायेच्या प्रकोपापासून (आपले) रक्षण करावे. वाचेचा संयम करावा. वाचेची दुश्चरिते त्यागून वाचेने सुचरिते आचरावीत.

२३२ वाचा-प्रकोपा सांभाळा, वाचेनें संयमी बना।
वाचा-दुश्चरितें त्यागा, वाचा-सुचरितें करा ॥ १२ ॥

२३३ मनोपकोपं रक्खेय्य मनसा संवुतो सिया।
मनोदुच्चरितं हित्वा मनसा सुचरितं चरे ॥ १३ ॥

२३३ मनाच्या प्रकोपापासून [आपले] रक्षण करावे. मनाचा संयम करावा, मनाची दुश्चरिते त्यामागून मनाने सुचरिते आचरावीत.

२३३ मनः-प्रकोपा साभाळा, मनानें संयमी बना।
मनोदुश्चरितें त्यागा, मनःसुचरिते करा ॥ १३ ॥

२३४ कायेन संवुता धीरा अथो वाचाय संवुता।
मनसा संवुता धीरा ते वे सुपरिसंवुता ॥ १४ ॥

कोधवग्गो सत्तरसमो।

२३४ कायेचा संयम करणारे, तसेच वाचेचा संयम करणारे, मनाचा संयम करणारे धीर पुरुषच खरोखर सुसंयमी होत.

२३४ कायेनें संयमी धीर वाचेनें संयमी तसे।
मनानें संयमी धीर ते खरेच सुसंयमी ॥ १४ ॥

सतरावा क्रोधवर्ग समाप्त.

१८

[मलवग्गो]

२३५ पण्डुपलासो·व दानिऽसि
यमपुरिसाऽपि च तं उपट्ठिता।
उय्योगमुखे च तिट्ठसि
पाथेय्यंऽपि च ते न विज्जति ।।१।।

[मलवर्ग]

२३५ तू आता पिकल्या पानाप्रमाणे झाला आहेस. यमाचे दूतसुद्धा तुझ्याजवळ येऊन उभे राहिले आहेत. आणि प्रस्थानाच्या मुखावर तू उभा आहेस; परंतु तुझ्यापाशी पाथेय (शिदोरी) नाही.

२३५ झाळासी पिकलेंच पान तूं
जवळीही यमदूत ठाकले।
प्रस्थानमुखींच तूं उभा।
नाहींही तुजपाशि कीं शिदोरी ।।१।।

२३६ सो करोहि दीपमत्तनो
खिप्पं वायम पण्डितो भव।
निद्धन्तमलो अनङ्गणो
दिब्बं अरियभूमिमेहिसि ।।२।।

२३६ तो तू स्वतःला द्वीप [म्हणजे वाहवून न जाणारे बेट] बनव. तावडतोब मेहनत करून तयार हो; पण्डित हो. ज्याचा [सगळा] मळ फुंकून काढिला आहे, ज्याच्यात हिणकस उरले नाही—असा तू दिव्य आर्यभूमीला पावशील.

२३६ आपणां द्वीप करींच तूं
झटुनी झणि होइं पंडित।
झाल्या निर्मळ निष्कलंकित
जाशीं दिव्यचि आर्यभूमिला ।।२।।

२३७ उपनीतवयो च दानिऽसि
संपयातोऽसि यमस्स सन्तिके।

वासोऽपि च ते नत्थि अन्तरा
पाथेय्यंऽपि च ते न विज्जति ॥३॥

२३७ आता तुझे वय होत चालले आहे. तू यमाच्या संनिध पोहोचला आहेस. मध्यंतरी (वाटेत) तुला निवासस्थान देखील नाही; आणि तुजपाशी शिदोरीही नाही.

२३७ वय आतां होत चाललें कीं
आलासीही यमास संनिध।
वाटेंत मिळे न आसरा
नाहींही तुजपाशिं कीं शिदोरी ॥३॥

२३८ सो करोहि दीपमत्तनो
खिप्पं वायम पण्डितो भव।
निद्धन्तमलो अनङ्गणो
न पुन जातिजरं उपेहिसि ॥४॥

२३८ तो तूं स्वतःला द्वीप [म्हणजे वाहवून न जाणारे बेट] बनव. ताबडतोब मेहनत करून तयार हो. पण्डित हो. ज्याचा सगळा मळ फुंकून काढिला आहे, ज्याच्यात हिणकस उरले नाही असा तू जन्म आणि जरा यांच्यापाशी पुनः जाणार नाहीस.

२३८ आपणां द्वीप करीच तूं
झटुनी झणिं होइं पण्डित।
झाल्या निर्मळ निष्कलंकित
पुनः न जाशीं जरा नि जन्म ॥४॥

२३९ अनुपुब्बेन मेधावी थोकं थोकं खणे खणे
कम्मारो रजतस्सेव निद्धमे मलमत्तनो ॥५॥

२३९ सोनार ज्याप्रमाणे फुंकून फुंकून रुप्याचा मळ म्हणजे हिणकस काढून टाकतो, त्याप्रमाणे मेधावी पुरुषाने क्रमशः थोडा थोडा, क्षणोक्षणी, स्वतःचा मळ फुंकून काढून टाकावा.

२३९ फुंकोनि क्रमशः सुज्ञे थोडा थोडा क्षणोक्षणीं।
रुप्याचा जणुं सोनारें आपुला मळ काढिजे ॥५॥

२४० अयसा · व मलं समुट्ठितं
तदुट्ठाय तमेव खादति ।
एवं अतिधोनचारिनं¶
सानि*कम्मानि नयन्ति दुग्गतिं ।।६।।

२४० ज्याप्रमाणे लोखंडावर चढलेला गंज (मळ) त्यापासून म्हणजे लोखंडापासून उत्पन्न होऊन त्यालाच खाऊन टाकतो, त्याप्रमाणे शहाण्या माणसाच्या आचरणाचे अतिक्रम करणाऱ्याची स्वतःची कर्मेच त्याला दुर्गतीप्रत नेतात.

२४० लोखंडावर येत गंज जो
त्यांतूनच येत त्यास खाई ।
जो प्रज्ञाचरणास गंजवी
नेती दुर्गतिला तया स्वकर्मे ।।६।।

२४१ असज्झायमला मन्ता अनुट्ठानमला घरा ।
मलं वण्णस्स कोसज्जं पमादो रक्खतो मलं ।।७।।

२४१ अ-स्वाध्याय (स्वाध्याय न करणे) हा मंत्रांचा मळ होय; अनुत्साह हा घरातील मळ होय. आळशी बसून राहणे हा कान्तीचा मळ होय. बेसावधपणा हा पहारेकऱ्याचा मळ होय.

२४१ अ-स्वाध्यायें मळे मंत्र अनुत्साह गृही मळ ।
सुस्ती ही मळ कान्तीला प्रमाद मळ रक्षका ।।७।।

२४२ मलित्थिया दुच्चरितं मच्छेरं ददतो मलं ।
मला वे पापका धम्मा अस्मिं लोके परम्हि च ।।८।।

२४२ दुश्चरित हा स्त्रीचा मळ होय; कृपणता हा दात्याचा मळ होय. पापधर्म हे इहलोकी आणि परलोकी खरोखरच मळ होत.

२४२ मळ दुश्चरित स्त्रीस, दात्या कृपणता मळ ।
मळची पाप ते धर्म इहलोकीं परत्रही ।।८।।

२४३ ततो मला मलतरं अविज्जा परमं मलं ।
एतं मलं पहत्वान निम्मला होथ भिक्खवो ।।९।।

¶अ०—धोना . . . पञ्ञा.

*सी०—सकं.

२४३ या सर्व मळांहून अविद्या हा अधिक मलिन असा परममळ होय. भिक्षूंनो ! या मळाला टाकून तुम्ही निर्मळ व्हा.

२४३ **अविद्या मळ मोठा कीं या मळांत मळीणहि ।**
झाडूनी त्या मळा तुम्ही भिक्षूंनो ! व्हा सुनिर्मळ ॥९॥

२४४ **सुजीवं अहिरीकेन काकसूरेन धंसिना**
पक्खन्दिना पगब्भेन संकिलिट्ठेन जीवितं॥१०॥

२४४ निर्लज्ज, कावळ्यासारखा शूर, विनाशी, घुसणारा, धृष्ट आणि दुष्ट अशा माणसाचे जीवित सोपे (सुलभ) असते.

२४४ **निलाजिऱ्या काकशूरा घुसणाऱ्या विनाशका ।**
धीटा, धृष्टा, प्रदुष्टाला सुखाचें होत जीवित ॥१० ॥

२४५ **हिरीमता च दुज्जीवं निच्चं सुचिगवेसिना ।**
अलीनेनऽप्पगब्भेन सुद्धाजीवेन पस्सता ॥११॥

२४५ परंतु ज्याला लाजेची चाड आहे, जो नित्य शुची गोष्टींच्या शोधात असतो, जो सावधान (न गुरफटलेला) व शालीन आहे, जो शुद्ध उपजीविका करतो व जो द्रष्टा आहे, त्याचे जीवित कष्टप्रद असते.

२४५ **सलज्ज, शुचि जो शोधी, नित्य सावध, नम्र, जो ।**
शुद्ध जो राहतो, द्रष्टा, कष्टाचें त्यास जीवित ॥११॥

२४६ **यो पाणमतिपातेति मुसावादं च भासति ।**
लोके अदिन्नं आदियति परदारं च गच्छति ॥१२॥

२४७ **सुरामेरयपानं च यो नरो अनुयुञ्जति ।**
इधेव-मे-सो लोकस्मि मूलं खणति अत्तनो ॥१३॥

२४६–२४७ जो ह्या जगात प्राण्यांची हिंसा करतो, खोटे बोलतो, जे कोणी दिले नाही ते घेतो, परदारागमन करतो, दारूमद्यादिकांच्या पानात रंगलेला असतो तो इहलोकातच आपली मुळे खणीत असतो.

२४६ **जगीं जो हिंसितो प्राणी खोटें जो नर बोलतो ।**
परस्त्रियेकडे जाई, घेई जो न दिलेंचि कीं ॥१२॥

२४७ **सुरामद्यादि पानाच्या मार्गें जो लागला असे ।**
आपुली खणितो मूळें याच लोकीं खराच तो ॥१३॥

२४८ एवं भो पुरिस जानाहि पापधम्मा असञ्ञता।
मा तं लोभो अधम्मो च चिरं दुक्खाय रन्धयुं ।।१४।।

२४८ अशा रीतीने हे माणसा! तू हे जाण की पापधर्मांचा संयम न केल्यास [वरील प्रकार होतात]. लोभाने आणि अधर्माने तुला चिरकाल दुःखात शिजवून घेऊ नकोस.

२४८ ऐसे होते नरा! जाण पापीं संयद जें नसे।
लोभें अधर्में ना घेई चिरदुःखांत रांधुनी ।।१४।।

२४९ ददाति वे यथासद्धं यथापसादनं जनो।
तत्थ यो मंकु भवति परेसं पानभोजने ।।
न सो दिवा वा रत्तिं वा समाधिमधिगच्छति ।।१५।।

२४९ आपल्या श्रद्धेला व प्रसन्नतेला अनुसरून लोक देत असतात (दानधर्म करीत असतात). दुसऱ्यांना मिळालेल्या पानभोजनामुळे जो त्या ठायी चलबिचल होतो, त्याला दिवसा किंवा रात्री समाधी प्राप्त होत नाही

२४९ दान देती लोक त्यांना जशी श्रद्धा प्रसन्नता।
खेद ज्या होतसे अन्यां मिळतां पानभोजन।
दिवसां अथवा रात्रीं समाधी लाधते न त्या ।।१५।।

२५० यस्स चेतं समुच्छिन्नं मूलघच्चं समूहतं।
स वे दिवा वा रत्तिं वा समाधिमधिगच्छति ।।१६।।

२५० परंतु ज्याची ही [भावना] समूळ उपटून टाकून उच्छिन्न झाली आहे, त्यालाच खरोखर दिवसा अथवा रात्री समाधी प्राप्त होते.

२५० खिन्नता ती समुच्छेदी उपटून मुळासह।
दिवसां अथवा रात्रीं समाधी लाधते तया ।।१६।।

२५१ नत्थि रागसमो अग्गि नत्थि दोससमो गहो।
नत्थि मोहसमं जालं नत्थि तण्हासमा नदी ।।१७।।

२५१ रागासारखी आग नाही; द्वेषासारखा ग्राह (नक्र) नाही. मोहासारखे जाळे नाही; तृष्णेसारखी नदी नाही.

२५१ कामासम नसे आग द्वेषासम न नक्र कीं।
मोहासम नसे जाळें तृष्णेसम नदी नसे ।।१७।।

२५२ सुदस्सं वज्जमञ्ञेसं अत्तनो पन दुद्दसं।
परेसं हि सो वज्जानि ओपुनाति यथा भुसं।
अत्तनो पन छादेति कलिं · व कितवा सठो ॥१८॥

२५२ दुसऱ्यांचे दोष सहज दिसतात; आपले दोष मात्र पाहणे कठीण आहे. माणूस दुसऱ्यांचे दोष भुशाप्रमाणे उपणीत असतो. शठ जुगारी जसा खोटा पडलेला फासा लपवितो त्याप्रमाणे आपले दोष मात्र माणूस लपवितो.

२५२ स्वदोष न दिसूं येती परांचे दिसती सुखें।
भूस जैसे उपणितो पराचे दोष कीं नर।
जुगारी शठ जो फांसा खोटा तो लपवी निज ॥१८॥

२५३ परवज्जानुपस्सिस्स निच्चं उज्झानसञ्ञिनो।
आसवा तस्स वड्ढन्ति आरा सो आसवक्खया ॥१९॥

२५३ दुसऱ्याचे दोष पाहणाऱ्याचे व त्यावर नित्य [नापसंतीची] टीका करणाऱ्याचे आश्रव वाढत असतात. आश्रवांच्या क्षयापासून तो दूरच राहातो.

२५३ परदोषैकदृष्टी जो नित्य टीकेंत जाणता।
आश्रव-क्षय त्या दूर त्याचे आश्रव वाढती ॥१९॥

२५४ आकासे पदं नत्थि समणो नत्थि बाहिरे।
पपञ्चाभिरता पजा निप्पपञ्चा तथागता ॥२०॥

२५४ आकाशात पाऊल उमटत नाही (पाय टाकता येत नाही) बुद्ध-शासनाच्या बाहेर श्रमण नाही. प्रजा प्रपंचात गढलेली; तथागत (बुद्ध) निष्प्रपंच होत.

२५४ न कीं श्रमण बुद्धाच्या बाहेर, न नभीं पद।
प्रजा प्रपंचीं गढली निष्प्रपंच तथागत ॥२०॥

२५५ आकासे पदं नत्थि समणो नत्थि बाहिरे।
संखारा सस्सता नत्थि नत्थि बुद्धानमिञ्जितं ॥२१॥

मलवग्गो अट्ठारसमों।

२५५ आकाशात पाऊल उमटत नाही. बुद्धशासनाच्या बाहेर श्रमण नाही. संस्कार शाश्वत नाहीत. बुद्धांना कंप म्हणून होत नाही.

२५५ न कीं श्रमण बुद्धाच्या बाहेर, न नभीं पद।
नाहीं शाश्वत संस्कार, बुद्ध कंप न पावती ।।२१।।

अठरावा मलवर्ग समाप्त.

१९

[धमट्ठवग्गो]

२५६ न तेन होति धम्मट्ठो येन त्थं सहसा नये।
यो च अत्थं अनत्थं च उभो निच्छेय्य पण्डितो ।।१।।
२५७ असाहसेन धम्मेन समेन नयती परे।
धम्मस्स गुत्तो मेधावी धंम्मट्ठो · ति पवुच्चति ।।२।।

[धर्मस्थवर्ग]

२५६ विवाद्य प्रश्नांचा तडकाफडकी निकाल दिल्याने मनुष्य धर्मस्थ होत नाही. जो पंडित अर्थ आणि अनर्थ या दोघांचा निश्चित करून

२५७ शांतपणे, धर्माने व समाने लोकांच्या निवाड्याचे मार्गदर्शन करतो, त्या धर्माचे रक्षण करणाऱ्या (धर्माने रक्षित अशा) बुद्धिवान् पुरुषाला धर्मस्थ असे म्हणतात.

२५६ झणि प्रश्न निकालांत काढी, होई न त्यामुळें।
धर्मस्थचि; करी दोन्ही सत्यासत्य सुनिश्चित ।।१।।
२५७ धर्में समें विवेकें जो न्याय लोकांस देतसे।
धर्मस्थचि म्हणावें त्या सुबुद्धा धर्मरक्षिता ।।२।।

२५८ न तेन पण्डितो होति यावता बहु भासति।
खेमी अवेरी अभयो पण्डितो · ति पवुच्चति ।।३।।

२५८ पुष्कळ बोलतो म्हणून माणूस पण्डित होत नाही. ज्याला क्षेम लाधले आहे, जो वैर करीत नाही, ज्याला भय नाही, त्याला पण्डित असे म्हणतात.

२५८ बहु बोले म्हणूनी कीं नर होई न पण्डित।
अवैरी, निर्भय, क्षेमी त्यास पण्डित बोलती ।।३।।

२५९ न तावता धम्मधरो यावता बहु भासति।
यो च अप्पंऽपि सुत्वान धम्मं कायेन पस्सति।
स वे धम्मधरो होति यो धम्मं नप्पमज्जति ।।४।।

२५९ पुष्कळ बोलतो म्हणून तेवढ्यानेच माणूस धर्मधर होत नाही. थोडे देखील ऐकून जो कायेने धर्म बघतो—म्हणजे प्रत्यक्ष आचरणात आणतो—धर्माचरणात अ-सावध नसतो, तोच धर्मधर होतो.

२५९ बहु बोले तेवढ्यानें न धर्मधर होतसे।
थोडेंही ऐकुनी जो कीं धर्मा प्रत्यक्ष आचरी।
अ-प्रमादीही जो धर्मी तो धर्मधर होतसे ।।४।।

२६० न तेन थेरो सो होति येन स्स फलितं सिरो।
परिपक्को वयो तस्स मोघजिण्णो ' ति वुच्चति ।।५।।

२६० मस्तक पिकले आहे म्हणून कोणी स्थविर (वृद्ध) होत नाही. त्याचे वय (तेवढे) परिपक्व झाले आहे; तो वृथा वृद्ध झाला असे म्हणतात.

२६० डोक्याचे पिकले केस त्यानें वृद्ध न होतसे।
परिपक्व वयें मात्र त्या वृथा-वृद्ध बोलती ।।५।।

२६१ यम्हि सच्चं च धम्मो च अहिंसा संयमो दमो।
स वे वन्तमलो धीरो सो थेरो ' ति पवुच्चति ।।६।।

२६१ परंतु ज्याच्यात सत्य, धर्म, अहिंसा, संयम, दम हे [गुण] आहेत, आणि ज्या धीर पुरुषाने सर्व मल वमून-ओकून टाकले आहेत त्यालाच स्थविर म्हणतात.

२६१ ज्याच्या ठायीं सत्य धर्म अहिंसा दम संयम।
मल वमिले ज्या धीरें त्याला स्थविर बोलती ।।६।।

२६२ न वाक्करणमत्तेन वण्णपोक्खरताय वा।
साधुरूपो नरो होति इस्सुकी मच्छरी सठो ।।७।।

२६३ यस्स चेतं समुच्छिन्नं मूलघच्चं समूहतं।
स वन्तदोसो मेधावी साधुरूपो ' ति वुच्चति ।।८।।

२६२ केवळ चतुर बोलण्याने अथवा पद्मासारख्या कांतीने जो ईर्ष्यालू, मत्सरी आणि शठ आहे तो साधुरूप होत नाही.

२६३ परंतु ज्याचे हे (वरील दोष) मुळासकट उखडून समुच्छिन्न झाले आहेत ज्याने सर्व मळ वमून टाकले आहेत त्या मेधावी पुरुषाला साधुरूप म्हणतात.

२६२ वाणी चतुर, कान्तीहि पद्मासम म्हणूनची।
न कें होई साधुरूप, ईर्ष्यालु मत्सरी शठ ॥७॥

२६३ या विकारां समुच्छेवी उपटून मुळासह।
सुबुद्ध वमितो दोष बोलती साधुरूप त्या ॥८॥

२६४ न मुण्डकेन समणो अब्बतो अलिकं भणं।
इच्छालोभसमापन्नो समणो किं भविस्सति ॥९॥

२६४ केवळ मुंडनामुळें, व्रत न पाळणारा, खोटे बोलणारा माणूस श्रमण होत नाही. इच्छा व लोभ बाळगणारा तो श्रमण कसा होईल?

२६४ व्रतीं चळें, वदे खोटें, हो ना श्रमण मुंडणें।
इच्छालोभांत गुंते जो होई श्रमण तो कसा? ॥९॥

२६५ यो च समेति पापानि अणुं थूलानि सब्बसो।
समितत्ता हि पापानं समणो·ति पवुच्चति ॥१०॥

२६५ जो लहानमोठी पापे सर्वशः शमन करतो, त्यालाच पापे शमन केल्यामुळे श्रमण असे म्हणतात.

२६५ लहानमोठीं जो पापें सर्वशः शमवीतसे।
पापें शमन केल्यानें त्याला श्रमण बोलती ॥१०॥

२६६ न तेन भिक्खु (सो) होति यावता भिक्खते परे।
विस्सं* धम्मं समादाय भिक्खु होति न तावता ॥११॥

२६६ दुसऱ्याकडे भिक्षा मागतो म्हणून तेवढ्याने माणूस भिक्षू होत नाही. दुर्गंधयुक्त धर्माचे जर सेवन करीत असेल तर त्यामुळे भिक्षा मागत असला तरी तो भिक्षू होत नाही.

२६६ भिक्षा मागे परांपाशीं भिक्षु होई न त्यामुळे।
जें ग्राम्यधर्म सेवी तें भिक्षु होई कदापि न ॥११॥

२६७ यो·ध पुञ्ञं च पापं च बाहेत्वा ब्रह्मचरियवा।
संखाय लोके चरति स वे भिक्खूति वुच्चति ॥१२॥

---

*अ०–विसमं, विस्सगन्धं वा। महा–सं० अ०(१.२६६) दुग्गन्धं अकुसलधम्मं; –दी० नि० टीका, पृ० ४४९, दुग्गन्धं विस्सगन्धं वायति। ति० व चि० ह्याच अर्थाचे समर्थन करतात. बंगाली शब्द–बिस्त म्हणजे वाईट. ति०–ग्राम (म्य) धर्मम्. प्रा०–वैश्मान्; तु० सं०–वेश्यान.

२६७ जो इहलोकी पाप व पुण्य यांना बाहेर घालवून श्रेष्ठ धार्मिक जीवन जगतो, लोकांत विवेकाने वागतो त्यालाच भिक्षू म्हणतात.

२६७ ब्रह्मचारी पापपुण्यें घाली बाहेर येथचीं।
विवेकें वागतो लोकीं भिक्षु त्यालाच बोलती ।।१२।।

२६८ न मोनेन मुनि होति मूळ्हरूपो अविद्दसु।
यो च तुलं व पग्गय्ह वरमादाय पण्डितो ।।१३।।

२६९ पापानि परिवज्जेति स मुनी तेन सो मुनी।
यो मुनाति उभो लोके मुनी तेन पवुच्चति ।।१४।।

२६८ केवळ मौनाने मुढरूप अविद्वान् माणूस मुनी होत नाही. जो पण्डित जणू काय तागडी घेऊन चांगल्या गोष्टी तेवढ्या घेतो,

२६९ व पापे टाकून देतो, तो या अशा मापण्यानेच मुनी होतो. तो उभय लोक (तोलून) मापतो त्यामुळे त्याला मुनी म्हणतात.

२६८ मूढरूप अविद्वान् जो मौनानें होइना मुनी।
जणूं तराजू धरुनी चांगलें घेइ पण्डित ।।१३।।

२६९ टाकी पापें, मुनी होतो सदसद् मापुनी असें।
मापी जो उभयां लोकां मुनि तेणेंच बोलला ।।१४।।

२७० न तेन अरियो होति येन पाणानि हिंसति।
अहिंसा सब्बपाणानं अरियो ति पवुच्चति ।।१५।।

२७० प्राण्यांची हिंसा करतो म्हणून त्यामुळे माणूस आर्य होत नाही. सर्व प्राण्यांशी अहिंसेने वागतो म्हणून त्याला आर्य म्हणतात.

२७० प्राण्यांची करतो हिंसा होई आर्य न त्यामुळें।
अहिंसा सर्व प्राण्यांशीं धरी, त्या आर्य बोलती ।।१५।।

२७१ न सीलब्बतमत्तेन बाहुसच्चेन वा पुन।
अथवा समाधिलाभेन विवित्तसयनेन वा ।।१६।।

२७२ फुसामि नेक्खम्मसुखं§ अपुथुज्जनसेवितं।
भिक्खु विस्सासमापादि* अप्पत्तो आसवक्खयं ।।१७।।

धम्मट्ठवग्गो एकूनवीसतिमो।

§अ०—अनागामिसुखं। हे नैष्काम्यानेच मिळणारे आहे. केवळ घर सोडून गेल्याने म्हणजे नैष्कम्याने नव्हे.

*अ०—विस्सासं न आपज्जय्य।

२७१–२७२ हे भिक्षू, जोपर्यंत तुझ्या आस्रवांचा क्षय झाला नाही, तोपर्यंत केवळ शीलाने अथवा व्रताने, बहुश्रुततेने, समाधिलाभाने, एकान्तात शयनाने, सामान्य जनाला अप्राप्य असे नैष्काम्यसुख मिळते असा [खोटा] विश्वास बाळगू नकोस.

२७१ शुद्ध शीलव्रताचारें बहुश्रुतपणें तसें ।
किंवा समाधि–लाभेंही एकान्तीं शयनीं मला ।।१६।।

२७२ नैष्काम्यसुख तें लाभे साध्या लोकां न जे मिळे ।
आस्रवां नाशिल्यावीण, भिक्षु ! विश्वास हा नको ।।१७।।

एकोणिसावा धर्मस्थवर्ग समाप्त.

२०

[मग्गवग्गो]

२७३ मग्गानऽट्ठङ्गिको सेट्ठो सच्चानं चतुरो पदा ।
विरागो सेट्ठो धम्मानं द्विपदानं च चक्खुमा ।।१।।

[मार्गवर्ग]

२७३ मार्गांत अष्टांगिक मार्ग श्रेष्ठ आहे; सत्यांत चार पदे श्रेष्ठ आहेत; (सर्व) धर्मांत विराग श्रेष्ठ आहे; द्विपदांत चक्षुष्मान् (बुद्ध) श्रेष्ठ आहे.

२७३ मार्गांत श्रेष्ठ अष्टांग पदें सत्यांत चार तीं ।
विराग श्रेष्ठ धर्मांत चक्षुष्मान् द्विपदीं तसा ।।१।।

२७४ एसो 'व मग्गो नत्थञ्ञो दस्सनस्स विसुद्धिया
एतम्हि तुम्हे पटिपज्जथ मारस्सेतं पमोहनं ।।२।।

२७४ दर्शनाच्या (दृष्टीच्या, ज्ञानाच्या) विशुद्धीला हाच एक मार्ग आहे; दुसरा नाही. तुम्ही याच मार्गाला अनुसरा. हा माराला भूल पाडणारा आहे.

२७४ दर्शनाच्या विशुद्धीला हाच मार्ग, नसे दुजा ।
याला अनुसरा तुम्ही मारा हा भुलवीतसे ।।२।।

२७५ एतम्हि तुम्हे पटिपन्ना दुक्खस्सऽन्तं करिस्सथ ।
अक्खातो वे मया मग्गो अञ्ञाय सल्लकन्तनं* ।।३।।

२७५ हा (मार्ग) तुम्ही अनुसराल तर दुःखाचा अंत कराल. शल्य काढण्याच्या शस्त्रक्रियेचे ज्ञान झाल्यावर हा मार्ग मी सांगितला आहे.

२७५ कराल अन्त दुःखाचा मार्गा अनुसरून या ।
हा मी सांगितला, शल्य-कर्तन-ज्ञान आणुनी ।।३।।

२७६ तुम्हेहि किच्चं आतप्पं अक्खातारो तथागता ।
पटिपन्ना पमोक्खन्ति झायिनो मारबन्धना ।।४।।

२७६ तुम्हीच प्रयत्न केला पाहिजे; तथागत [केवळ मार्ग] सांगणारे आहेत. या मार्गाला अनुसरणारे जे ध्यानरत आहेत ते माराच्या बन्धनातून मुक्त होतात.

२७६ झटा तुम्हीच उत्साहें बुद्ध केवळ सांगती ।
मार्गे जातात जे ध्यानी मार-बन्धन-मुक्त ते ।।४।।

२७७ सब्बे संखारा अनिच्चा ति यदा पञ्ञाय पस्सति ।
अथ निब्बिन्दति दुक्खे एस मग्गो विसुद्धिया ।।५।।

२७७ सर्व संस्कार अनित्य आहे असे जेव्हा प्रज्ञेने माणूस पाहतो, तेव्हा तो दुःखापासून निर्वेद (वीट) पावतो–हाच विशुद्धीचा मार्ग आहे.

२७७ अनित्य सर्व संस्कार प्रज्ञेनें हे जधीं बघे ।
दुःखीं निर्वेद पावे तं मार्ग हाच विशुद्धिचा ।।५।।

२७८ सब्बे संखारा दुक्खा ति यदा पञ्ञाय पस्सति ।
अथ निब्बिन्दति दुक्खे एस मग्गो विसुद्धिया ।।६।।

२७८ सर्व संस्कार दुःखकारक आहेत असे जेव्हा प्रज्ञेने माणूस पाहतो, तेव्हा तो दुःखापासून निर्वेद (वीट) पावतो–हाच विशुद्धीचा मार्ग आहे.

२७८ दुःखची सर्व संस्कारीं प्रज्ञेनें हें जधीं बघे ।
दुःखीं निर्वेद पावे तं मार्ग हाच विशुद्धिचा ।।६।।

२७९ सब्बे धम्मा अनत्ता ति यदा पञ्ञाय पस्सति ।
अथ निब्बिन्दति दुक्खे एस मग्गो विसुद्धिया ।।७।।

---

*रो०, सी०-सल्लसत्थन ।

२७९ सर्व धर्म अनात्म आहेत असे जेव्हा प्रज्ञेने माणूस पाहतो, तेव्हा तो दुःखापासून निर्वेद (वीट) पावतो–हाच विशुद्धीचा मार्ग आहे.

२७९ अनात्म सर्व संस्कार प्रज्ञेनें हें जधीं बघे।
दुःखीं निर्वेद पावे तें मार्ग हाच विशुद्धिचा ।।७।।

२८० उट्ठानकालम्हि अनुट्ठहानो
युवा बली आलसियं उपेतो।
संसन्न–सङ्कप्पमनो कुसीतो
पञ्ञाय मग्गं अलसो न विन्दति ।।८।।

२८० जवान, बलवान् असून उत्थान करावयासच पाहिजे अशा वेळी न उठणारा, आळसात पडलेला, ज्याचे संकल्प आणि मन खचलेले आहे अशा सुस्त आळशाला प्रज्ञेचा मार्ग सापडत नाही.

२८० उत्थानकालींही उठे न जो कीं।
युवा बळी आळसिं गुंगला जो।
विषण्ण संकल्पमनेंही सुस्त।
प्रज्ञेचिया मार्ग न मंद जोडे ।।८।।

२८१ वाचानुरक्खी मनसा सुसंवुतो
कायेन च अकुसलं न कयिरा।
एते तयो कम्मपथे विसोधये
आराधये मग्गमिसिप्पवेदितं ।।९।।

२८१ वाचेचे रक्षण करावे; मनाने संयमी व्हावे. कायेने अकुशल [कर्म] करू नये. हे तीन कर्मपथ विशुद्ध ठेवावेत; ऋषींनी उपदेशिलेल्या मार्गाने चालावे.

२८१ वाचेस रक्षा, मन संयमीं धरा।
कल्याण कर्मींही शरीर गुंतवा।
ह्या तीन ही कर्मपथां सुधारिजे।
स्वीकारिजे जो ऋषि मार्ग सांगती ।।९।।

२८२ योगा वे जायती भूरि अयोगा भूरिसङ्खयो।
एतं द्वेधापथं ञत्वा भवाय विभवाय च।
तथत्तानं निवेसेय्य यथा भूरि पवड्ढति ।।१०।।

२८२ योगाने खरोखर प्रज्ञा उत्पन्न होते. अ-योग हा प्रज्ञेचा क्षय करतो. भवाचा आणि विभवाचा असे हे दोन मार्ग जाणून जेणेकरून प्रज्ञा वाढेल असे स्वतःला वळवावे.

२८२ योगींच जन्मे प्रज्ञा, ती अयोगीं क्षय पावते।
भवाच्या विभवाच्या त्या द्विधा मार्गास जाणुनी।
तसे आपणां योजावें, प्रज्ञा वाढेल कीं जशीं ॥१०॥

२८३ वनं छिन्दथ मा रुक्खं वनतो जायते भयं।
छेत्वा वनं च वनथं च निब्बना होथ भिक्खवो ॥११॥

२८३ वनाला (तृष्णाक्लेशांच्या जंगलाला) तोडा, वृक्षाला नको. वना (जंगला)-मुळे भय निर्माण होते. वन आणि वनथ (तृष्णा) तोडून, भिक्षूंनो! निर्वन व्हा.

२८३ वना तोडा न वृक्षाला वनें निर्माण हो भय।
वनास वनथा तोडा भिक्षूंनो व्हाच निर्वन ॥११॥

२८४ याव हि वनथो न छिज्जति
अणुमत्तो पि नरस्स नारिसु।
पटिबद्धमनो ‧ व ताव सो
वच्छो खीरपको ‧ व मातरि ॥१२॥

२८४ जोपर्यंत पुरुषाची स्त्रीच्या ठायीची तृष्णा अणुमात्रसुद्धा तोडली जात नाही तोपर्यंत, केवळ दूध पिणाऱ्या वत्साचे जसे आईच्या ठायी, तसे त्याचे मन बांधले जाते.

२८४ तोडीना नर साच जोंवरी
स्त्रीची कीं अणुमात्र कामना।
प्रतिबद्ध-मनेंच तोंवरी
मातेशीं जणुं वत्स दूध-पी ॥१२॥

२८५ उच्छिन्द सिनेहमत्तनो कुमुदं सारदिकं ‧ व पाणिना।
सन्तिमग्गमेव ब्रूहय निब्बानं सुगतेन देसितं ॥१३॥

२८५ जसे शरत्कालाचे कुमुद हाताने तोडतात तसा स्वतःचा-ममत्वाचा-स्नेह तोडून टाक. सुगताने म्हणजे बुद्धाने दाखविलेला शांतिमार्ग म्हणजे निर्वाण त्याची अभिवृद्धी कर.

२८५ आत्म-स्नेह समूळ तोड तूं
शरदींच्या कुमुदा जणूं करें।
निर्वाणासचि-शान्तिमार्ग जो
सुगतें दाखविलाचि–वाढवीं ॥१३॥

२८६ इध वस्सं वसिस्सामि इध हेमन्त–गिम्हिसु ।
इति बालो विचिन्तेति अन्तरायं न बुज्झति ॥१४॥

२८६ येथे वर्षाकाळभर राहीन, येथे हेमंतात (हिवाळ्यात), येथे उन्हाळ्यात [राहीन] असा मूर्ख विचार करतो; (पण) तो अन्तराय जाणत नाही.

२८६ वर्षाकाळीं इथें, येथें हिंवाळ्यात, इथे गिर्मीं।
राहीं, मूर्ख असे चिंती अन्तराय न जाणतो ॥१४॥

२८७ तं पुत्तपसुसम्मत्तं ब्यासत्तमनसं नरं ।
सुत्तं गामं महोघो·व मच्चु आदाय गच्छति ॥१५॥

२८७ त्या पुत्रपशूंनी वेडावून गेलेल्या, मन आसक्त झालेल्या माणसाला, निजलेल्या गावाला जसा महापूर ओढून नेतो, तसा मृत्यू घेऊन जातो.

२८७ जो पुत्रपशूंहीं मोहो नर आसक्त-मानस ।
मृत्यु घेऊन जातो त्या ग्रामा निद्रिस्त पूरसा ॥१५॥

२८८ न सन्ति पुत्ता ताणाय न पिता न पि बन्धवा ।
अन्तकेनाधिपन्नस्स नत्थि ञातीसु ताणता ॥१६॥

२८८ मृत्यूने ज्याच्यावर घाला घातला आहे त्या माणसाचे परित्राण पुत्र करू शकत नाही, ना पिता, ना बान्धव, ना ज्ञाति (परित्राण करू शकतात).

२८८ परित्राण करीना कीं पुत्र, बापही, बान्धव ।
ज्ञातीही ते करीना कीं मृत्यु चालून आलिया ॥१६॥

२८९ एतमत्थवसं ञत्वा पण्डितो सीलसंवुतो।
निब्बानगमनं मग्गं खिप्पमेव विसोधये ॥१७॥

मग्गवग्गो वीसतिमो ।

२८९ या गोष्टीचे असे मर्म जाणून शीलाने संयमी झालेल्या पंडिताने निर्वाणगमनाचा मार्ग ताबडतोब सुधारावा.

२८९ हे मर्म जाणुनी साचि शीलसंयत पंडितें ।
निर्वाणगमनाचा तो शीघ्र मार्ग सुधारिजे ॥१७॥

विसावा मार्गवर्ग समाप्त.

२१

[पकिण्णकवग्गो]

२९० मत्तासुखपरिच्चागा पस्से चे विपुलं सुखं ।
चजे मत्तासुखं धीरो संपस्सं विपुलं सुखं ॥१॥

[प्रकीर्णकवर्ग]

२९० लवलेशाएवढे सुख त्यागून जर विपुल सुख पहावयास मिळेल, तर विपुल सुख पाहणाऱ्या धीराने सुखाचा लवलेश त्यागावा.

२९० त्यागुनी सुखलेशा ये पाहतां विपुला सुखा ।
सुखलेश त्यजो धीर देखे जो विपुला सुखा ॥१॥

२९१ परदुक्खूपधानेन* अत्तनो सुखमिच्छति ।
वेरसंसग्गसंसट्ठो वेरा सो न परिमुच्चति ॥२॥

२९१ दुसऱ्यावर दुःख लादून जो आपल्या सुखाची इच्छा करतो, तो वैराच्या संसर्गात सापडलेला वैरापासून मुक्त होत नाही.

२९१ दुज्या देऊन जो दुःख आपुलें सुख इच्छितो ।
वैर संसर्गि गुंते तो वैरांतून न मुक्त हो ॥२॥

२९२ यं हि किच्चं अपविद्धं अकिच्चं पन कयिरति ।
उन्नलानं पमत्तानं तेसं वड्ढन्ति आसवा ॥३॥

२९२ जे कर्तव्य ते सोडतात, आणि अकर्तव्य ते करतात त्या अशा उनाड व प्रमत्त माणसांचे आश्रव वाढतात.

२९२ कर्तव्या सोडिती तैसें अकर्तव्य करीत जे ।
उनाडांचे प्रमत्तांचे त्यांचे आसव वाढती ॥३॥

*सी०—परदुक्खूपदानेन.

२९३ येसं च सुसमारद्धा निच्चं कायगता सति ।
अकिच्चं ते न सेवन्ति किच्चे सातच्चकारिनो ।
सतानं सम्पजानानं अत्थं गच्छन्ति आसवा ।।४।।

२९३ जे नित्य कायगत स्मृतींची भावना करतात (म्हणजे ती स्मृती चांगली तयार करतात), जे अकर्तव्य करीत नाहीत, पण कर्तव्य सतत करतात त्या स्मृतिमंतांचे आणि विवेकाने वागणाऱ्यांचे आश्रव अस्ताला जातात.

२९३ बरी संपादिती नित्य जे कीं कायगतस्मृती ।
करिती नित्य कर्तव्या अकर्तव्य न सेविती ।
विवेकस्मृतियुक्तांचे अस्तां जातात आश्रव ।।४।।

२९४ मातरं पितरं§ हन्त्वा राजानो द्वे च खत्तिये ।
रट्ठं सानुचरं हन्त्वा अनीघो याति ब्रह्मणो ।।५।।

२९४ आईला (तृष्णेला), बापाला (अहंमन्यतेला), आणि दोन क्षत्रिय राजांना (शाश्वत आणि उच्छेद दृष्टींना) मारून अनुयायांसह [आसक्तीसह] राष्ट्राला (द्वादश आयतनांना) मारून ब्राह्मण निर्दुःख होऊन फिरतो.

२९४ मारून मातापितरां राजे क्षत्रिय दोनही ।
राष्ट्रा सानुचरा, होतें ब्राह्मणा दुःख ना मुळीं ।।५।।

२९५ मातरं पितरं§ हन्त्वा राजानो द्वे च सोत्थिये ।
वेय्यग्घ*-पञ्चमं हन्त्वा अनीघो याति ब्राह्मणो ।।६।।

२९५ आईला (तृष्णेला), बापाला (अहंमन्यतेला), आणि दोन श्रोत्रियांना (शाश्वत आणि उच्छेद दृष्टींना) आणि वैयाघ्र (विचिकित्सा) ज्याचे पाचवे आहे अशी नीवरणे मारून ब्राह्मण निदुःख होऊन फिरतो.

२९५ मारून मातापितरां, राजे श्रोत्रिय दोनही ।
वैयाघ्र-पञ्चमा, होतें ब्राह्मणा दुःख ना मुळीं ।।६।।

२९६ सुप्पबुद्धं पबुज्झन्ति सदा गोतमसावका ।
येसं दिवा च रत्तो च निच्चं बुद्धगता सति ।।७।।

२९६ ज्यांना अहोरात्र (रात्रंदिवस) बुद्धाची नित्य स्मृती असते असे गौतमाचे श्रावक सदैव सुप्रबोधाने जागृत होतात.

---

§कौषी० ब्रा०–३.१; कौषी० उप० ३.१–न मातृवधेन, न पितृवधेन, न स्तेयेन, न भ्रूणहत्यया (लोको मीयते)।

* पहा–छांदो०–५.२.३; ५.१४.१; ५.१५.१ (वैयाघ्र).

२९६ श्रावकां गौतमाच्या ये प्रबोधें नित्य जागृती।
अहोरात्र सदा ज्यांची बुद्धाठायीं वसे स्मृती ॥७॥

२९७ सुप्पबुद्धं पबुज्झन्ति सदा गोतमसावका।
येसं दिवा च रत्तो च निच्चं धम्मगता सति ॥८॥

२९७ ज्यांना अहोरात्र धर्माची नित्य स्मृती असते असे गौतमाचे श्रावक सदैव सुप्रबोधाने जागृत होतात.

२९७ श्रावकां गौतमाच्या ये प्रबोधें नित्य जागृती।
अहोरात्र सदा ज्यांची धर्माठायीं वसे स्मृती ॥८॥

२९८ सुप्पबुद्धं पबुज्झन्ति सदा गोतमसावका।
येसं दिवा च रत्तो च निच्चं संघगता सति ॥९॥

२९८ ज्यांना अहोरात्र संघाची नित्य स्मृती असते असे गौतमाचे श्रावक सदैव सुप्रबोधाने जागृत होतात.

२९८ श्रावकां गौतमाच्या ये प्रबोधें नित्य जागृती।
अहोरात्र सदा ज्यांची संघाठायीं वसे स्मृती ॥९॥

२९९ सुप्पबुद्धं पबुज्झन्ति सदा गोतमसावका।
येसं दिवा च रत्तो च निच्चं कायगता सति ॥१०॥

२९९ ज्यांची अहोरात्र कायगत–स्मृती नित्य असते असे गौतमाचे श्रावक सदैव सुप्रबोधाने जागृत होतात.

२९९ श्रावकां गौतमाच्या ये प्रबोधें नित्य जागृती।
अहोरात्र सता ज्यांची असे कायगत स्मृती ॥१०॥

३०० सुप्पबुद्धं पबुज्झन्ति सदा गोतमसावका।
येसं दिवाच रत्तो च अहिंसाय रतो मनो ॥११॥

३०० ज्यांचे मन अहोरात्र अहिंसेत रमलेले असते असे गौतमाचे श्रावक सदैव सुप्रबोधाने जागृत होतात.

३०० श्रावकां गौतमाच्या ये प्रबोधें नित्य जागृती।
अहोरात्र सदा ज्यांचे अहिंसेत रमे मन ॥११॥

३०१ सुप्पबुद्धं पबुज्झन्ति सदा गोतमसावका।
येसं दिवा च रत्तो च भावनाय रतो मनो ॥१२॥

३०१ ज्यांचे मन अहोरात्र समाधिभावनेत रमलेले असते असे गौतमाचे श्रावक सदैव सुप्रबोधाने जागृत होतात.

३०१ श्रावकां गौतमाच्या ये प्रबोधें नित्य जागृती।
अहोरात्र सदा ज्यांचें भावनेंत रमे मन ॥१२॥

३०२ दुप्पब्बज्जं दुरभिरमं दुरावासा घरा दुखा।
दुक्खो समान-संवासो दुक्खानुपतितऽद्धगू।
तस्मा न च द्धगू न च दुक्खानुपतितो सिया ॥१३॥

३०२ जी प्रव्रज्या वाईट प्रकारे पाळलेली आहे त्या प्रव्रज्येत मन रमणे कठीण; [घरात राहणाऱ्यांच्याही काही जबाबदाऱ्या असल्यामुळे] घरात राहणेही कठीण व दुःखदायक; असमान (भलत्याच) माणसाशी सहवास ठेवणे कठीण; प्रवाशांच्या मागे दुःख ठेवलेलेच; म्हणून (प्रपंचाचा) प्रवासी होऊ नये आणि दुःख मागे लावून घेऊ नये.

३०२ प्रव्रज्या नावडे दुष्ट घरेंही दुःखदायक।
अ-समीं संग दे दुःख, पांथामागेंच दुःख ये।
व्हावें न पांथ, दुःखाला द्यावें मागें न यावया ॥१३॥

३०३ सद्धो सीलेन संपन्नो यसो-भोग-समप्पितो।
यं यं पदेसं भजति तत्थ तत्थेव पूजितो ॥१४॥

३०३ श्रद्धा ठेवणारा, शीलाने संपन्न, आणि किर्ती व ऐश्वर्य यांनी समन्वित असा पुरुष ज्या ज्या प्रदेशात जातो तेथे तेथे तो पूज्य होतो.

३०३ श्रद्धाळू शीलसंपन्न यशैश्वर्यसमन्वित।
ज्या ज्या प्रदेंशी जाई तो पूजिती त्या तिथें तिथें ॥१४॥

३०४ दूरे सन्तो पकासन्ति हिमवन्तो · व पब्बतो।
असन्तेत्थ न दिस्सन्ति रत्तिखित्ता यथा सरा ॥१५॥

३०४ हिमालय पर्वताप्रमाणे सन्त दूर असतानाही प्रकाशतात. पण असन्त रात्रीच्या वेळी फेकलेल्या बाणाप्रमाणे दिसत नाहीत.

३०४ दुरूनही प्रकाशीती सन्त ते हिमवंतसे।
बाणसे फेंकिले रात्रीं असन्त दिसती न ते ॥१५॥

३०५ एकासनं एकसेय्यं एको चरमतन्दितो।
एको दमयमत्तानं वन न्ते रमितो सिया ॥१६॥

पकिण्णकवग्गो एकवीसतिमो।

३०५ एकाकी आसन, एकाकी शय्या, अतंद्रित एकाकी संचार असावा; स्वतःला एकटेच दमन करीत वनान्तांत रमून असावे.

३०५ एकासनी एकसेजी एकचारी अतंद्रित।
एकला आत्मदमनें वनान्तीं रमिजेचि कीं ॥१६॥

एकविसावा प्रकीर्णकवर्ग समाप्त.

२२

[निरयवग्गो]

३०६ अभूतवादी निरयं उपेति
यो चापि कत्वा न करोमि चाह।
उभो पि ते पेच्च समा धवन्ति
निहीनकम्मा मनुजा परत्थ ॥१॥

[निरयवर्ग]

३०६ जे घडले नाही ते सांगणारा नरकाला (निरयाला) जातो; तसेच तोही (निरयाला जातो), जो करून केले नाही म्हणून सांगतो. ते दोघे हीनकर्म मानव मरणानंतर परलोकी समान होतात.

३०६ वदे न झालें निरयीं पडे तो
करून केलें न म्हणेच तोही।
मरून ते होत समान दोघे
कीं हीनकर्मी नर ते परत्र ॥१॥

३०७ कासावकण्ठा बहवो पापधम्मा असंयता।
पापा पापेहि कम्मेहि निरयं ते उपपज्जरे ॥२॥

३०७ गळ्यात कापायवस्त्र अडकविलेले पापधर्मी असंयत असे पुष्कळ पापी मानव [आपल्या] पापकर्मांनी निरयाला जातात.

३०७ काषाय धरिती कंठीं पापधर्मी असंयत।
पापी जाती पापकर्में निरयाप्रत ते बहु ॥२॥

३०८ सेय्यो अयोगुळो भुत्तो तत्तो अग्गिसिखूपमो।
यञ्चे भुञ्जेय्य दुस्सीलो रट्ठपिण्डं असंयतो ॥३॥

३०८ असंयमी दुःशील माणसाने राष्ट्राचे अन्न खाण्यापेक्षा अग्नीच्या ज्वाळे-प्रमाणे तापलेला लोखंडाचा गोळा खाणे श्रेयस्कर.

३०८ बरें खाणें लोहगोळ तप्त अग्निशिखेसम।
राष्ट्रांचे अन्न ना खावें दुःशीलानें असंयतें ॥३॥

३०९ चत्तारि ठानानि नरो पमत्तो
आपज्जति परदारूपसेवी –।
अपुञ्ञलाभं न निकामसेय्यं
निन्दं ततियं निरयं चतुत्थं ॥४॥

३०९ परदारागमन करणाऱ्या प्रमत्त माणसास या चार गोष्टी प्राप्त होतात– अ-पुण्याचा म्हणजे पापाचा लाभ; इच्छेप्रमाणे शय्या न मिळणे; तिसरी निन्दा; चवथा निरय.

३०९ सेवी परस्त्री नर जो प्रमत्त
भोगीत तो चार गोष्टींस सत्य–।
अपुण्य-प्राप्ती, न यथेच्छ सेज,
निंदा तिजी, कीं निरया चतुर्थ ॥४॥

३१० अपुञ्ञलाभो च गती च पापिका
भीतस्स भीताय रती च थोकिका।
राजा च दण्डं गरुकं पणेति
तस्मा नरो परदारं न सेवे ॥५॥

३१० अ-पुण्याचा म्हणजे पापाचा लाभ; पापगती; भ्यालेल्या (पुरुषाची) भ्यालेल्या (स्त्रीशी) रति (सुख) ही थोडीच; आणि राजा मोठा दंड करतो. म्हणून माणसाने परदारागमन करू नये.

३१० अपुण्य लाभे गति होय पापी
भीतास भीतेंशि रतीच थोडी।
राजा करी दंडही थोर मोठा
सेवूं नये ती म्हणनी परस्त्री ॥५॥

३११ कुसो यथा दुग्गहितो हत्थमेवानुकन्तति
सामञ्ञं दुप्परामट्ठं निरयायुपकड्ढति ।।६।।

३११ ज्याप्रमाणे नीट न धरलेला दर्भ हातालाच कापतो त्याप्रमाणे नीट न आचरिलेले श्रामण्य नरकाकडे ओढून नेते.

३११ दर्भ ना धरिला नीट कापी हातासची जसा ।
तैसें दूषित–श्रामण्य नेतेंचि नरकास तें ।।६।।

३१२ यं किञ्चि सिथिलं कम्मं संकिलिट्ठं च यं वतं ।
सङ्कस्सर*–ब्रह्मचरियं न तं होति महप्फलं ।।७।।

३१२ जे काही शिथिल कर्म, डागाळलेले जे व्रत आणि शंकित असे जे ब्रह्मचर्य– ते महत्फलदायक होत नाही

३१२ जें कांहीं कर्म शिथिल, व्रत डागाळलें तसें ।
शंकित जें ब्रह्मचर्य न तें देई महत्फलें ।।७।।

३१३ कयिरा चे कयिराथेनं दळ्हमेनं परक्कमे ।
सिथिलो हि परिब्बाजो भिय्यो आकिरते रजं ।।८।।

३१३ जर काही करावयाचे असेल तर दृढ पराक्रमाने (उत्साहाने) करावे. शिथिल परिव्राजक (आपल्या भोवती) खूप धूळ उडवितो.

३१३ करायाचें असे तें कीं करा दृढ पराक्रमें ।
धूळची उडवी जास्त परिव्राट् शिथिलोद्यम ।।८।।

३१४ अकतं दुक्कतं सेय्यो पच्छा तपति दुक्कतं ।
कतं च सुकतं सेय्यो यं कत्वा नानुतप्पति ।।९।।

३१४ दुष्कृत्य न केलेलेच बरे ! (का की) दुष्कृत्याचा पश्चात् ताप होतो. जे केले असता पश्चात्ताप होत नाही ते सुकृत केलेले बरे !

३१४ बरें दुष्कृत्य ना केलें पश्चात्तापचि देत जें ।
बरें सुकृत केलेलें पस्तावे ना करून जें ।।९।।

३१५ नगरं यथा पच्चन्तं गुत्तं सन्तरबाहिरं ।
एवं गोपेथ अत्तानं खणो वे माउपच्चगा ।
खणातीता हि सोचन्ति निरयम्हि समप्पिता ।।१०।।

---

*अ०–सङ्काय सरितब्बं....अत्तनो आसङ्काहि सरितं उसाङ्कितं परिसङ्कितं ।
पहा––संशितव्रताः (म० भा०, शान्तिपर्व २७०.५).

३१५ आत बाहेर सुरक्षित ठेवलेल्या सरहद्दीवरील नगराप्रमाणे स्वतःला सुरक्षित ठेवावे. मिळालेला क्षण वाया दवडू नये. कारण क्षण वाया घालविणारे नरकात पडून शोक करतात.

३१५ सीमापुरी जशी ऐसे आंत बाहेर रक्षित।
तैसे आपणां रक्षावें, क्षण वायां न घालवा।
जावूं देती क्षणा जे कीं नरकीं शोक त्यां घडे ।।१०।।

३१६ अलज्जिताये लज्जन्ति लज्जिताये न लज्जरे।
मिच्छादिट्ठिसमादाना सत्ता गच्छन्ति दुग्गतिं ।।११।।

३१६ जेथे न लाजावे तेथे लाजणारे, लाजावे तेथे न लाजणारे, मिथ्यादृष्टी ग्रहण करणारे प्राणी दुर्गतीला जातात.

३१६ लाजूं नये लाजती तें लाजावें तें न लाजती।
मिथ्यादृष्टीस सेवोनी प्राणी दुर्गति पावती ।।११।।

३१७ अभये भयदस्सिनो भये चाभयदस्सिनो।
मिच्छादिट्ठिसमादाना सत्ता गच्छन्ति दुग्गतिं ।।१२।।

३१७ अभयात भय पाहणारे, भयात अभय पाहणारे, मिथ्यादृष्टीचे ग्रहण करणारे प्राणी दुर्गतीला जातात.

३१७ अभयीं भय पाहाती भयीं अभय देखिती।
मिथ्यादृष्टीस सेवोनी प्राणी दुर्गति पावती ।।१२।।

३१८ अवज्जे वज्जमतिनो वज्जे चावज्जदस्सिनो।
मिच्छादिट्ठिसमादाना सत्ता गच्छन्ति दुग्गतिं ।।१३।।

३१८ अवर्ज्याला वर्ज्य मानणारे, वर्ज्यात अवर्ज्य पाहणारे, मिथ्या (खोटी) दृष्टी ग्रहण करणारे प्राणी दुर्गतीला जातात.

३१८ अवर्ज्यं मानिती वर्ज्य वर्ज्य ना-वर्ज्य देखिती।
मिथ्यादृष्टीस सेवोनी प्राणी दुर्गति पावती ।।१३।।

३१९ वज्जं च वज्जतो ञत्वा अवज्जं च अवज्जतो।
सम्मादिट्ठिसमादाना सत्ता गच्छन्ति सुग्गतिं ।।१४।।

निरयवग्गो बावीसतिमो।

३१९ वर्ज्याला वर्ज्य जाणून, अवर्ज्याला अवर्ज्य असे जाणून सम्यक् दृष्टी ग्रहण करणारे प्राणी सुगतीला जातात.

३१९ वर्ज्यास वर्ज्य जाणोनी अवर्ज्यास अवर्ज्य ही।
सम्यक् दृष्टीस सेवोनी प्राणी सद्‌गति पावती ॥१४॥

बाविसावा निरयवर्ग समाप्त.

२३

[नागवग्गो]

३२० अहं नागो व सङ्गामे चापातो पतितं सरं।
अतिवाक्यं तितिक्खिस्सं दुस्सीलो हि बहुज्जनो ॥१॥

[नागवर्ग]

३२० नाग (हत्ती) जसा संग्रामात धनुष्यापासून सुटलेले बाण सहन करतो तसे मी तीक्ष्ण वाक्ये सहन करीन. कारण (या जगातील) बरेचसे लोक दुःशील आहेत.

३२० संग्रामांत जसा हत्ती धनुष्ये टाकिले शर।
साहीन तीक्ष्ण वाक्यें मी दुःशील बहुलोक हे ॥१॥

३२१ दन्तं नयन्ति समितिं दन्तं राजाऽभिरूहति।
दन्तो सेट्ठो मनुस्सेसु योऽतिवाक्यं तितिक्खति ॥२॥

३२१ दमन केलेल्या [हत्तीला] समाजात नेतात; दमन केलेल्या हत्तीवर राजा आरूढ होतो. तीक्ष्ण वचन सहन करणारा दान्त पुरुष मनुष्यांत श्रेष्ठ होय.

३२१ दान्त हत्तीवरी राजा बसे, नेती समाजि त्या।
दान्त श्रेष्ठ मनुष्यांत साही तीक्ष्णहि वाक्य जो ॥२॥

३२२ वरमस्सतरा दन्ता आजानीया च सिन्धवा।
कुञ्जरा च महानागा अत्तदन्तो ततो वरं ॥३॥

३२२ दमन केलेली खेचरे चांगली; दमन केलेले कुलवंत सिन्धू देशातील घोडे चांगले; (तसेच दमन केलेले) महानाग कुञ्जर चांगले. या सर्वांहून आत्मदमन केलेला पुरुष चांगला.

३२२ श्रेष्ठ कीं खेचरें दान्त सिन्धी घोडे कुलीन ही।
कुञ्जर-नाग हे श्रेष्ठ त्याहुनी आत्म-संयमी ॥३ ॥

३२३ न हि एतेहि यानेहि गच्छेय्य अगतं दिसं।
यथत्तना सुदन्तेन दन्तो दन्तेन गच्छति ॥४॥

३२३ कारण की स्वतःचे चांगले दमन केलेला दान्त पुरुष जसा (आत्म-) दमन-[याना]ने अगत दिशेला जातो तसा या [वर उल्लेख केलेल्या] यानांनी तेथे कोणी जाऊ शकत नाही.

३२३ वाहनांनीं न या कोणी जाईल अगता दिशे।
जैसा सु-दान्त एखादा दमनें दान्त जातसे ॥४॥

३२४ धनपालको नाम कुञ्जरो
कटुकप्पभेदनो दुन्निवारयो।
बद्धो कवलं न भुञ्जति
सुमरति नागवनस्स कुञ्जरो ॥५॥

३२४ धनपालक नावाचा हत्ती, ज्याचा कटू मद वाहतो आहे (आणि जो) दुर्निवार झाला आहे तो बांधून टाकला असता कवळ खात नाही. त्या हत्तीला नागवनाची आठवण होते.

३२४ धनपालक नाम कुञ्जर
कटु गळतां मद दुर्निवार जो।
खाई कवळा न, बांधिला
गज नागवनास आठवी ॥५॥

३२५ मिद्धी यदा होति महग्घसो च
निद्दायिता सम्परिवत्तसायी।
महावराहो · व निवापपुट्ठो
पुनप्पुनं गब्भमुपेति मन्दो ॥६॥

३२५ जेव्हा माणूस खूप खातो, आळशी होतो, निजून असतो व लोळत पडतो, जणू काय पिंडांवर पोसलेला मोठा डुक्करच! तो मूढ पुनःपुन्हा गर्भवासात पडतो.

३२५ होई जधीं आळशि फार खाई
निद्रा करी लोळतची पडे जो।
मोठा जणूं डुक्कर पिंड-पुष्ट
पुनः पुनः गर्भि पडेच मूढ ॥६॥

३२६ इदं पुरे चित्तमचारि चारिकं
येनिच्छकं यत्थ-कामं यथासुखं ।
तदज्जऽहं निग्गहेस्सामि योनिसो
हत्थिप्पभिन्नं विय अंकुसग्गहो ।।७।।

३२६ पूर्वी हे चित्त इच्छेप्रमाणे, मर्जी लागेल तिकडे, आणि सुख वाटेल तसे संचार करीत असे. त्याला आज मुळातच मी निग्रह करीन; जसा अंकुश ग्रहण करणारा (माहुत) मदोन्मत्त हत्तीचा निग्रह करतो.

३२६ संचार हें चित्त करीतसे पुरा
इच्छी जसें कामही जें, यथासुख ।
मुळांत मी आज तयास निग्रहीं
कीं अंकुशें मत्त गजास माहुत ।।७।।

३२७ अप्पमादरता होथ सचित्तमनुरक्खथ
दुग्गा उद्धरथऽत्तानं पङ्के सन्नो 'व * कुञ्जरो ।।८।।

३२७ अप्रमादांत रत व्हा, स्वचित्ताचे रक्षण करा. चिखलांत रुतलेल्या हत्तीप्रमाणे स्वतःस कठीण परिस्थितीतून वर काढा (स्वतःचा उद्धार करा).

३२७ रत व्हा अप्रमादांत सांभाळा चित्त आपुलें ।
पंकीं सक्त करी जैसा करा स्वोद्धार संकटीं ।।८।।

३२८ सचे लभेथ निपकं सहायं
सद्धिं-चरं साधुविहारिधीरं ।
अभिभुय्य सब्बानि परिस्सयानि
चरेय्य तेनत्तऽमनो सतीमा ।।९।।

३२८ जर आपणाबरोबर चालणारा, कुशल (निपुण), चांगल्या रीतीने वागणारा, धीर साथी मिळेल तर, कोणचीही विघ्ने आड येऊ न देता त्याचेबरोबर स्मृतिमान् होऊन (सावधानपणे) व मुदित मनाने संचार करावा.

३२८ मिळेल साथी जरि कीं प्रवीण
सद्वर्तनी धीर सवें फिरे जो ।
विघ्नें तरी दूर करून सर्व
फिरा सवें सावध हृष्ट चित्तें ।।९।।

*सी०–सत्तो. व

३२९ नो चे लभेथ निपकं सहायं
सद्धि-चरं साधुविहारिधीरं ।
राजा·व रट्ठं विजितं पहाय
एको चरे मातङ्गरञ्ञे·व नागो ॥१०॥

३२९ पण जर आपणाबरोबर चालणारा, कुशल (निपुण), चांगल्या रीतीने वागणारा धीर साथी मिळत नसेल, तर राजा जसे जिंकिलेले राष्ट्र सोडून जातो, तद्वत् मातंग-अरण्यात जसा हत्ती फिरतो [illegible] संचार करावा.

३२९ मिळे न साथी जरि कीं प्रवीण
सद्वर्तनी धीर सवें फिरे जो।
सोडी जसें जिंकिलें राष्ट्र राजा
मातङ्गरानीं गज एकसा फिरे ॥१०॥

३३० एकस्स चरितं सेय्यो
नत्थि बाले सहायता ।
एको चरे न च पापानि कयिरा
अप्पोस्सुक्को मातङ्गऽरञ्ञे·व नागो ॥११॥

३३० एकाकी राहणे (फिरणे) श्रेयस्कर; मूर्खाची संगती नको. अल्पोत्सुक होऊन मातंगाच्या अरण्यातील हत्तीप्रमाणे एकटे फिरावे; पाप करू नये.

३३० एकटें फिरणें श्रेय
मूर्खाशी संगती नको ।
अल्पोत्सुकें त्वां करणें न पाप
मातङ्गरानीं गज एकसा फिरे ॥११॥

३३१ अत्थम्हि जातम्हि सुखा सहाया
तुट्ठी सुखा या इतरीतरेन* ।
पुञ्ञं सुखं जीवित-संखयम्हि
सब्बस्स दुक्खस्स सुखं पहानं ॥१२॥

३३१ जेव्हा काही कार्य उत्पन्न होते तेव्हा सहाय (मित्र) सुख देतात; जे काही थोडे बहुत मिळेल त्याने संतुष्ट होणे हे सुखावह होते; जीविताचा अंत आला असता पुण्य सुखदायक होते. सर्व दुःखांचा नाश (प्रहाण) सुखदायक होय.

---

*अ०–इतरीतरेन परित्तेन वा बहुलेन वा।

३३१ सहाय देती सुख कार्य येतां
जें जें मिळे तुष्टि तयेंच दे सुख।
ते जीवितान्तीं सुख पुण्य देतें
अन् सर्व दुःखे मिटतांचि हो सुख ।।१२।।

३३२ सुखा मत्तेय्यता* लोके अथो पेत्तेय्यता* सुखा।
सुखा सामञ्ञता लोके अथो ब्रह्मञ्ञता सुखा ।।१३।।

३३२ मातृभक्ती सुखकर आहे; आणि पितृभक्ती सुखकर आहे. श्रमणभक्ती सुखकर आहे; आणि ब्राह्मणभक्ती सुखकर आहे.

३३२ सुख दे मातृभक्ती ती पितृभक्तीही दे सुख।
सुख श्रमणभक्ती दे ब्रह्मभक्तीही दे सुख ।।१३।।

३३३ सुखं याव जरा सीलं सुखा सद्धा पतिट्ठिता।
सुखो पञ्ञाय पटिलाभो पापानं अकरणं सुखं ।।१४।।

नागवग्गो तेवीसतिमो।

३३३ म्हातारपण (जरा) जोवर आले नाही तोवर केलेले शीलाचे पालन सुखकर होय; सुप्रतिष्ठित श्रद्धा सुखकर होय. पापांचे अ-करण सुखकर होय.

३३३ जरे-आधील दे शील सुखा, श्रद्धाहि सुस्थिर।
प्रज्ञालाभ सुखा देई पापें ना करणें तसें ।।१४।।

तेविसावा नागवर्ग समाप्त

२४

[तण्हावग्गो]

३३४ मनुजस्स पमत्तचारिनो
तण्हा वड्ढति मालुवा विय।
सो प्लवति हुराहुरं
फलमिच्छं ' व वनस्मि वानरो ।।१।।

*अ०–मातरि सम्मा-पटिपत्ति, पितरि....पब्बजितेसु....बाहितपापेसु बुद्ध-पच्चेकबुद्ध-सावकेसु सम्मापटिपत्ति।

[तृष्णावर्ग]

३३४ प्रमादाने वागणाऱ्या माणसाची तृष्णा मालुवा लतेप्रमाणे वाढते. बनातील वानराप्रमाणे फलाची इच्छा धरून तो या जन्मातून त्या जन्मात उड्या मारीत असतो.

३३४ नर आचरि जं प्रमाद तं
तृष्णा वाढत मालुवा जशी।
मारीत उड्याचि जन्मोजन्मीं
रानीं जणुं फलेच्छु वानर ॥१॥

३३५ यं एसा सहती जम्मी तण्हा लोके विसत्तिका
सोका तस्स पवड्ढन्ति अभिवुट्ठं* · व बीरणं ॥२॥

३३५ वाळ्याचे गवत, वृष्टी झाली असता जसे वाढते, तद्वत् या लोकी आसक्तिरूप द्वाड तृष्णा ज्याच्यावर मात करते त्याचे शोक वाढतात.

३३५ तृष्णा द्वाड जया व्यापी लोकीं आसक्तिरूप जी।
वाढती शोक त्याचे कीं वाळ्याचे तृण वृष्टिनें ॥२॥

३३६ यो चेतं सहती जम्मिं तण्हं लोके दुरच्चयं।
सोका तम्हा पपतन्ति उदबिन्दू · व पोक्खरा ॥३॥

३३६ पण जो या लोकी ओलांडून जाण्यास कठीण अशा द्वाड तृष्णेचा पराभव करतो त्याचेपासून, पद्मावरून खाली पडणाऱ्या पाण्याच्या बिंदूप्रमाणे, शोक गळून पडतात.

३३६ जिंकी जो द्वाड तृष्णेला लोकी या जी न सांडुं ये।
पडती शोक त्याचे कीं पद्मावरून बिंदुसे ॥३॥

३३७ तं वो वदामि भद्दं वो यावन्तेत्थ समागता।
तण्हाय मूलं खणथ उसीरत्थो · व बीरणं।
मा वो नळं · व सोतो · व मारो भञ्जि पुनप्पुनं ॥४॥

३३७ जेवढे तुम्ही येथे आला आहांत त्यांचे कल्याण असो; त्या तुम्हांला मी सांगतो की जसा वाळ्याची इच्छा करणारा वाळ्याचे गवत खणून काढतो त्याप्रमाणे तृष्णेची मुळे खणून काढा. (नदीचा) ओघ जसा बोरूंना मोडून टाकतो तसे तुम्हांला मार पुनः पुन्हा भंगून न टाको.

*सिया०–अभिवड्ढं; रो०–अभिवट्टं.

३३७ जेवढे येथ आलां, त्यां असो कल्याण, सांगतों।
तृष्णा-मूळें खणा जेवीं वाळ्यासाठींच बीरण।
पुनः पुनः तुम्हा मार ना भंगो ओघसा नळा ।।४।।

३३८ यथाऽपि मूले अनुपद्दवे दळ्हे
छिन्नोऽपि रुक्खो पुनरेव रूहति।
एवंऽपि तण्हानुसये अनूहते
निब्बत्तती दुक्खमिदं पुनप्पुनं ।।५।।

३३८ ज्याप्रमाणे मुळे दुखावली नसतील व दृढ असतील तर वृक्ष तोडला असतासुद्धा पुन्हा वाढतोच. त्याप्रमाणे तृष्णेचे अनुशय (अनुबंध) जर उखडून काढले नसतील तर दुःख पुनःपुन्हा उत्पन्न होते.

३३८ मुळें जरी घट्टचि, ना दुखावलीं
तें तोडिला वृक्ष फुटे पुनः भरे।
तृष्णानुबंधास न नाशितां पुरे
जन्मेल हें दुःख तसें पुनःपुनः ।।५।।

३३९ यस्स छत्तिंसती सोता मनापस्सवना भुसा।
वाहा वहन्ति दुद्दिट्ठिं सङ्कप्पा रागनिस्सिता ।।६।।

३३९ ज्याचे ठिकाणी आवडीच्या गोष्टी खूप स्रवणारे छत्तीस स्रोत (ओढे) असतात, त्या दुर्दृष्टी माणसाला रागावर (अनुरागावर) आधारलेले संकल्परूपी प्रवाह वाहून नेतात.

३३९ ज्याचें छत्तीस कीं स्रोत पुष्कळ स्रविती प्रियां।
तो रागयुक्त संकल्पीं दुर्दृष्टी जात वाहत ।।६।।

३४० सवन्ति सब्बधी सोता लता उब्भिज्ज तिट्ठति।
तं च दिस्वा लतं जातं मूलं पञ्ञाय छिन्दथ ।।७।।

३४० स्रोत सर्व बाजूंनी स्रवत आहेत; (त्यांतून) लता अंकुर फुटून वर येते. त्या उत्पन्न झालेल्या लतेला पाहून प्रज्ञेने तिचे मूळ तोडा.

३४० सर्वत्र वाहती स्रोत लता अंकुरुनी उठे।
लता देखून फुटली प्रज्ञेनें मूळ तोडिजे ।।७।।

३४१ सरितानि सिनेहितानि च
सोमनस्सानि भवन्ति जन्तुनो ।
ते सातसिता सुखेसिनो
ते वे जातिजरूपगा नरा ।।८।।

३४१ स्मरण केलेल्या प्रेमाच्या गोष्टी माणसाचे मन सुखवितात. तेच भोगाश्रित, सुखाची हाव धरणारे लोक जन्म आणि जरा पावतात.

३४१ स्नेहाचें स्मरतां प्रसंग कीं
प्राण्याचें मन ते सुखावितीं।
भोगाश्रित त्यां सुखार्थियां
बाधे जन्म-जरा नरा तयां ।।८।।

३४२ तसिणाय पुरक्खता पजा
परिसप्पन्ति ससो · व बाधितो ।
संयोजनसङ्गसत्ता दुक्ख-
मुपेन्ति पुनप्पुनं चिराय ।।९।।

३४२ तृष्णेने पछाडलेली ही प्रजा [शिकाऱ्यांनी] त्रास दिलेल्या सशाप्रमाणे पळत असते. तिच्या बंधनांनी जखडून टाकिलेली (ती प्रजा) पुनः पुन्हा चिरकाल दुःख पावते.

३४२ तृष्णा पाठिस लागतां जन
पळती कीं जणुं त्रासिले ससे।
बंधांनीं जखडून टाकिले सदा
दुःखा पावत ते पुनः पुनः ।।९।।

३४३ तसिणाय पुरक्खता पजा
परिसप्पन्ति ससो · व बाधितो ।
तस्मा तसिणं विनोदये
भिक्खु आकंखी विरागमत्तनो ।।१०।।

३४३ तृष्णेने पछाडलेली ही प्रजा [शिकाऱ्यांनी] त्रास न दिलेल्या सशाप्रमाणे पळत असते. म्हणून आपल्या वैराग्याची आकांक्षा धरणाऱ्या भिक्षूने तृष्णेला दूर करावे.

३४३ तृष्णा पाठिस लागतां जन
पळती कीं जणुं त्रासिले ससे।
'तृष्णे दूर!' म्हणून काढितो तो
वैराग्या निज वांछि भिक्षु जो कीं ।।१०।।

३४४ **यो निब्बनथो वनाधिमुत्तो**
वनमुत्तो वनमेव धावति
तं पुग्गलमेव पस्सथ
मुत्तो बन्धनमेव धावति ।।११।।

३४४ जो निब्बनथ (तृष्णामुक्त) झाला असता [तपो-]वनात रमतो, तो तृष्णेच्या जंगलातून मुक्त झाला असता पुनः तृष्णारूपी जंगलाकडेच धावतो. ह्या त्या पुरुषालाच पहा. तो मुक्त झाला असता बंधनाकडेच धावत आहे.

३४४ जो निब्बनथ रमे वनींही
वन सोडून वनींच धावतो।
ह्या त्या पुरुषा बघा, पुनः
धावे बन्धनिं, मुक्त होउनी ।।११।।

३४५ **न तं दळ्हं बन्धनमाहु धीरा।**
यदायसं दारुजं बब्बजं च।
सारत्तरत्ता मणिकुण्डलेसु
पुत्तेसु दारेसु च या अपेक्खा ।।१२।।

३४६ **एतं दळ्हं बन्धनमाहु धीरा**
ओहारिनं सिथिलं दुप्पमुञ्चं।
एतंऽपि छेत्वान परिब्बजन्ति
अनपेक्खिनो कामसुखं पहाय ।।१३।।

३४५–३४६ जे लोखंडाचे, लाकडाचे, तसेच वल्वज गवताचे बंधन त्याला धीर पुरुष दृढ बन्धन म्हणत नाहीत. मणिकुण्डलांची (जडजवाहिराची) जी अत्यंत आसक्ती, पुत्र आणि दारा यांजविषयी जी अपेक्षा तिलाच धीर दृढ बंधन म्हणतात. (हे बंधन) माणसाला खाली ओढते. हे शिथिल म्हणजे घट्ट बसणारे नसले तरी सुटण्यास कठीण. हे देखील तोडून कामसुख त्यागून अपेक्षा न ठेवणारे परिव्राजक होतात.

३४५ लोखंड लाकूड नि वल्वजांच्या
न बंधनां त्या वृद्ध धीर बोलती।
आसक्ति मोठी मणिकुंडलीं जी
जी पुत्र दाराविषयीं अपेक्षा ॥१२॥

३४६ त्या बन्धनाला वृद्ध धीर बोलती
जें ओढि खालीं, जरि सैल, सुटेना।
तोडून तेही निरपेक्ष होती
सोडूनिया कामसुखा परिव्राट् ॥१३॥

३४७ ये रागरत्तानुपतन्ति सोतं
सयं कतं मक्कटको.व जालं।
एतंऽपि छेत्वान वजन्ति धीरा
अनपेक्खिनो सब्बदुक्खं पहाय ॥१४॥

३४७ स्वतः केलेल्या जाळ्यात (गुंतलेल्या) कोळ्याप्रमाणे जे रागरक्त (कामासक्त) ते प्रवाहात सापडतात. यालासुद्धा तोडून धीर निरपेक्ष होऊन, सर्व दुःखांचा त्याग करून जातात.

३४७ स्त्रोतीं तसे वाहत रागरक्त
जाळ्यांत कोळी विणिल्या स्वयेंची।
तोडून तेंही निरपेक्ष जाती
सोडूनियां सर्व दुःखांस धीर ॥१४॥

३४८ मुञ्च पुरे मुञ्च पच्छतो
मज्झे मुञ्च भवस्स पारगू।
सब्बत्थ विमुत्तमानसो
न पुन जातिजरं उपेहिसि ॥१५॥

३४८ तू पूर्वीचे सोडून दे, पुढे येणारे सोडून दे, मधले सोडून दे (म्हणजे) भवाच्या पार जाशील. सर्वत्र विमुक्त—चित्त होऊन तू पुन्हा जन्म जरा पावणार नाहीस.

३४८ त्यज पुढलें, त्यज मागलेंही
त्यज मधलें, भवपार होशी।
सर्वत्र विमुक्तचित्त तूं
न पुनः जन्मजरेस पावसी ॥१५॥

३४९ वितक्कपमथितस्स जन्तुनो
तिब्बरागस्स सुभानुपस्सिनो।
भिय्यो तण्हा पवड्ढति
एस खो दळ्हं करोति बंधनं ॥१६॥

३४९ ज्या प्राण्याचे (मनात) वितर्काचे मन्थन चालू आहे, ज्याचा राग (काम) तीव्र आहे, जो [केवळ] शुभ बाजूच पाहतो, त्याची तृष्णा आणखी वाढते. तो खरोखर बंधन दृढ करितो.

३४९ ज्या जन्तुचें चित्त वितर्कमन्थी
जो तीव्रकामी शुभ तेंचि देखे।
तृष्णा पुनः वाढतसे तयाची
तो बंधनें घट्ट करीत साच ॥१६॥

३५० वितक्कूपसमे च यो रतो
असुभं भावयति सदा सतो
एस खो व्यन्ति-काहिति
एस छेच्छति मारबन्धनं ॥१७॥

३५० पण जो वितर्क शमविण्यात (शांत करण्यात) रत होतो, व जो स्मृतिमान् अशुभ बाजूची सतत भावना करतो, तोच खरोखर (तृष्णेचा) अंत करील. तोच माराची बंधने तोडून टाकील.

३५० वितर्कशांतींत परी रमे जो
सर्वाशुभीं जो स्मृति नित्य राखे।
तृष्णेस तो दूर करील साच
माराचिया तोडिल बंधनां तो ॥१७॥

३५१ निट्ठं-गतो असन्तासी वीततण्हो अनङ्गणो
अच्छिन्दि भवसल्लानि अन्तिमोऽयं समुस्सयो ॥१८॥

३५१ जो निष्ठेप्रत (म्हणजे ध्येयाप्रत, पूर्णावस्थेप्रत) गेला आहे, ज्याला भय राहिले नाही, ज्याने तृष्णेचा त्याग केला आहे, जो निष्कलंक (निर्दोष) झाला आहे, ज्याने भवाची शल्ये कापून काढली आहेत, त्याचा हा समुच्छ्रय-उभारलेला देह-शेवटला होय.

३५१ पूर्णते पावला, गेली तृष्णा, दोष, नुरे भय।
काढिलें भवशल्यां त्यां देह शेवटचाच हा ॥१८॥

३५२ वीततण्हो अनादानो निरुत्तिपदकोविदो।
अक्खरानं सन्निपातं जञ्ञा पुब्बापरानि च।
स वे अन्तिमसारीरो महापञ्ञो ति* वुच्चति॥१९॥

३५२ ज्याची तृष्णा गेली आहे, जो काही घेत नाही. जो निरुक्ति-पदे जाणतो, जो मागची पुढची अक्षरे व त्यांचा एकत्रित अर्थ जाणतो, तो शेवटचा देह धारण करणारा होतो, त्याला महाप्राज्ञ असे म्हणतात.

३५२ तृष्णा गेली, घे न कांहीं, निरुक्त-पद-कोविद।
मागचीं पुढचीं जाणे जो एकत्रित अक्षरें।
बोलती त्या महाप्राज्ञ देह शेवटचा तया॥१९॥

३५३ सब्बाभिभू सब्बविदूऽहमस्मि
सब्बेसु धम्मेसु अनूपलित्तो।
सब्बञ्जहो तण्हक्खये विमुत्तो
सयं अभिञ्ञाय कमुद्दिसेय्यं॥२०॥

३५३ मी सर्वांवर विजय मिळविला आहे; मी सर्व जाणणारा आहे. सर्व धर्मांनी मी अलिप्त आहे. मी सर्व सोडले आहे; तृष्णाक्षय करून विमुक्त झालो आहे. मी स्वतःच ज्ञान प्राप्त करून घेतले असता कुणाकडे [गुरू म्हणून] बोट दाखवू?

३५३ म्यां जिंकिलें सर्वचि सर्व जाणें
मी सर्व धर्मीं असेंचि अलिप्त।
तृष्णाक्षयें मुक्तचि सर्व सोडीं
झालें स्वयंज्ञान, कुणास दावूं? ॥२०॥

३५४ सब्बदानं धम्मदानं जिनाति
सब्बं रसं धम्मरसो जिनाति
सब्बं रतिं धम्मरती जिनाति।
तण्हक्खयो सब्बदुक्खं जिनाति॥२१॥

३५४ धर्मदान सर्व प्रकारच्या दानाला जिंकिते; धर्मरस सर्व प्रकारच्या रसांना जिंकितो; धर्मरती सर्व प्रकारच्या रतींस जिंकिते; आणि तृष्णेचा क्षय सर्व दुःखांना जिंकितो.

---

*काही आवृत्तींतून ह्याच्याच पुढे 'महापुरिसो' असा पाठ आहे. अर्थातच हा केवळ पर्यायी पाठ म्हणूनच समजला पाहिजे.

३५४ सर्वां रसां धर्मरसें जितूं ये
अन् सर्वदानांसहि धर्मदानें।
धर्मीं रतीं सर्व रतींस जिंकी
तृष्णाक्षयें सर्वदुःखां जितूं ये ॥ २१ ॥

३५५ हनन्ति भोगा दुम्मेधं नो च पारगवेसिनो।
भोगतण्हाय दुम्मेधो हन्ति अञ्ञे · व अत्तनं ॥ २२ ॥

३५५ संपत्ती दुर्बुद्धी माणसाचा नाश करते. पैलपार जाऊ इच्छिणाऱ्या माणसाचा ती नाश करीत नाही. संपत्ति-तृष्णेमुळे दुर्मेध माणूस, दुसरे (म्हणजे शत्रू) जसा करतील तसा स्वतःचा नाश करतो.

३५५ नाशी संपत्ति दुर्मेधां न ती पैलाड शोधित्यां।
दुर्मेध धनतृष्णेनें शत्रुसा नाशि आपणां ॥ २२ ॥

३५६ तिणदोसानि खेत्तानि रागदोसा अयं पजा।
तस्मा हि वीतरागेसु दिन्नं होति महप्फलं ॥ २३ ॥

३५६ गवत हा शेताचा दोष आहे; राग हा या प्रजेचा दोष आहे, म्हणून जे वीतराग आहेत त्यांना दिलेले दान महाफलदायक होते.

३५६ शेताचा तृण हा दोष प्रजेचा दोष राग तो।
वीतरागां दिलें दान म्हणून तें महत्फल ॥ २३ ॥

३५७ तिणदोसानि खेत्तानि दोसदोसा अयं पजा
तस्मा हि वीतदोसेसु दिन्नं होति महप्फलं ॥ २४ ॥

३५७ गवत हा शेताचा दोष आहे; द्वेष हा या प्रजेचा दोष आहे. म्हणून जे वीतद्वेष आहेत त्यांना दिलेले दान महाफलदायक होते.

३५७ शेताचा तृण हा दोष प्रजेचा दोष द्वेष तो।
वीतद्वेषां दिलें दान म्हणून तें महत्फल ॥२४॥

३५८ तिणदोसानि खेत्तानि मोहदोसा अयं पजा।
तस्मा हि वीतमोहेसु दिन्नं होति महप्फलं ॥ २५ ॥

३५८ गवत हा शेताचा दोष आहे. मोह हा या प्रजेचा दोष आहे. म्हणून जे वीतमोह आहेत त्यांना दिलेले दान महाफलदायी होते.

३५८ शेताचा तृण हा दोष मोह दोष प्रजेस या।
वीतमोहां दिलें दान म्हणून तें महत्फल ॥ २५ ॥

३५९ तिणदोसानि खेत्तानि इच्छादोसा अयं पजा।
तस्मा हि विगतिच्छेसु दिन्नं होति महप्फलं ॥ २६ ॥

तण्हावग्गो चतुवीसतिमो।

३५९ गवत हा शेतीचा दोष आहे. इच्छा हा या प्रजेचा दोष आहे. म्हणून जे विगतेच्छ आहेत त्यांना दिलेले दान महाफलदायी होते.

३५९ शेताचा तृण हा दोष इच्छा दोष प्रजेस या।
विगतेच्छां दिलें दान म्हणून तें महत्फल ॥ २६ ॥

चौविसावा तृष्णावर्ग समाप्त.

२५

[भिक्खुवग्गो]

३६० चक्खुना संवरो साधु साधु सोतेन संवरो
घानेन संवरो साधु साधु जिव्हाय संवरो ॥ १ ॥

[भिक्षुवर्ग]

३६० चक्षूंचा संयम चांगला; श्रोत्रांचा (कानांचा) संयम चांगला; घ्राणाचा संयम चांगला; जिव्हेचा संयम चांगला.

३६० बरा संयम चक्षूंचा श्रोत्र–संयम तो बरा।
बरा संयम घ्राणाचा जिव्हा-संयम तो बरा ॥ १ ॥

३६१ कायेन संवरो साधु साधु वाचायसंवरो
मनसा संवरो साधु साधु सब्बत्थ संवरो
सब्बत्थ संवुतो भिक्खु सब्बदुक्खा पमुच्चति ॥ २ ॥

३६१ कायेचा संयम चांगला, वाचेचा संयम चांगला, मनाचा संयम चांगला; सर्वत्र संयम चांगला. सर्वत्र संयमी असलेला भिक्षू सर्व दुःखांतून मुक्त होतो.

३६१ बरा संयम कायेचा वाचा-संयम तो बरा।
मनःसंयम तैसाही बरा सर्वत्र संयम।
सर्वत्र संयमी भिक्षु सर्व दुःखांतुनी सुटे ॥ २ ॥

३६२ हत्थसंयतो पादसंयतो
वाचाय संयतो संयतुत्तमो
अज्झत्तरतो समाहितो
एको सन्तुसितो तमाहु भिक्खुं ।। ३ ।।

३६२ हातांचा संयम करणारा, पायांचा संयम करणारा, वाचेचा संयम करणारा संयमी-माणसांत उत्तम; अध्यात्मी रत, समाहित, एकाकी [राहणारा], संतुष्ट असा जो पुरुष त्याला भिक्षू म्हणतात.

३६२ हस्तीं संयत पाद-संयत
वाचा-संयत संयतोत्तम ।
